९३३५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. 202

म ट्रस्ट' पारितोषिक मिळालेला ग्रंथ

पुणें अ. वि. गृह
प्रकाशन



# जपानची जीवनक्रांति

REFBK-0005693

डॉ. गजानन श्री. खैर
एम्. ए., पीएच्. डी.

विक्रीचा फायदा पुणें अ. वि. गृहाकरितां.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. निबंध
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

REFBK-0005693

# जपानची जीवनक्रांति

५६९३

REFBK-0005693

# जपानची जीवनक्रांति

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५६९३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

'यशोदा चिंतामणि ट्रस्ट'
पुरस्कृत ग्रंथमाला

ग्रंथक्रमांक आठवा

वर्ष १९३८

---

# जपानची जीवनक्रांति

गजानन श्री. खैर

*

यशोदा चिंतामणि ट्रस्ट पारितोषिक मिळालेला ग्रंथ

पुणें भ. वि. गृह-प्रकाशन

# जपानची जीवनक्रांति

समाज, संस्कृति राजकारण, उद्योगधंदे, स्त्रीजीवन, व धर्म यांच्या संक्रमणामुळें झालेली सामर्थ्यप्राप्ति.

मराठी ग्रंथ संग्रहालय

लेखक

डॉ. गजानन श्रीपत खैर

एम्.ए., पी.एच्.डी.

किंमत २ रुपये

१९३८

प्रकाशक
विष्णु गंगाधर केतकर
[व्यवस्थापक, पुणें अ. वि. गृह.
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

—प्रत्येक राष्ट्र आत्मसंरक्षण करण्यास तयार असेल तरच त्याचा निभाव लागेल. क्षत्रिय मनोवृत्ति आणि राष्ट्राकरितां आत्मार्पण करण्याची तयारी, हे गुण जर नागरिकांमध्यें असतील तर तें राष्ट्र जगेल.—

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते
व्यवस्थापक, लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

राष्ट्रयुवकाय स्वाहा ।

इदम् न मम ।

चि. भालचंद्र व भास्कर

आणि

आश्रमीय माजी व आजी विद्यार्थी

या सर्वांचा समावेश करणाऱ्या

राष्ट्राच्या तरुण पिढीस

अभिमानपूर्वक

समर्पण

अण्णा ऊर्फ गजाभाऊ

प्रकाशक
विष्णु गंगाधर केतकर
[व्यवस्थापक, पुणें अ. वि. गृह.
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

—प्रत्येक राष्ट्र आत्मसंरक्षण करण्यास तयार असेल तरच त्याचा निभाव लागेल. क्षत्रिय मनोवृत्ति आणि राष्ट्राकरितां आत्मार्पण करण्याची तयारी, हे गुण जर नागरिकांमध्यें असतील तर तें राष्ट्र जगेल.—

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते
व्यवस्थापक, लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं.
ता. ........

राष्ट्रयुवकाय स्वाहा ।

इदम् न मम ।

चि. भालचंद्र व भास्कर

आणि

आश्रमीय माजी व आजी विद्यार्थी

या सर्वांचा समावेश करणाऱ्या

राष्ट्राच्या तरुण पिढीस

अभिमानपूर्वक

समर्पण

अण्णा ऊर्फ गजाभाऊ

# ग्रंथप्रयोजन

हिंदुस्थान आणि जपान या दोन देशांत आज इतका फरक कां दिसतो ? पूर्व आशियांतील सर्व प्रदेशावर श्वेत राष्ट्रांचें आक्रमण एकाच वेळीं झालें, त्या आक्रमणाला हिंदुस्थान व इतर देश बळी पडले ; जपान स्वतंत्र राहिला, त्यानें पाश्चात्यांचे बरोबरीनें सामर्थ्य व सत्ता मिळविली आणि त्यांच्यावरही आज चढाईचें धोरण स्वीकारलें आहे. स्वातंत्र्य आणि सामर्थ्य टिकविण्याच्या जपानी साधनांचा अभ्यास हिंदी दृष्टीनें महत्त्वाचा आहे.

पाश्चिमात्य संस्कृतीची लाट हिंदुस्थानी व जपानी समाजांवर एकाच वेळीं आली. या नवीन संस्कृतीच्या आक्रमणाचा परिणाम दोन्ही समाजांवर एकच झाला कां निरनिराळा झाला हा विषयही महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानमध्यें आज मूळ संस्कृतीच्या शुद्ध स्वरूपाचा लोप झालेला असून तिच्या ठिकाणीं गंगाजमनी भेसळीची बकाल संस्कृति निर्माण होत आहे. उलट जपानमध्यें मूळ देशी संस्कृति शुद्ध स्वरूपांत राहिलेली असून तिच्याच शेजारीं सामर्थ्यानें युक्त अशी पाश्चिमात्य संस्कृतिही विराजमान झालेली आहे. एकाच परिस्थितींत दोन समाजांची प्रतिक्रिया निराळी कां झाली तें समजण्याकरितां दोन्ही समाजांच्या राष्ट्रीय स्वभावाचा विचार होणें आवश्यक आहे.

सोळाव्या शतकांत पाठीवर मालाचें गाठोडें, एका हातांत तराजू, एका हातांत बायबल आणि कमरेला तलवार, अशा साधनांनीं गोरे

लोक हिंदुस्थानच्या किनाऱ्याला आले. हे लोक कोण, कोठले, त्यांचा देश कसा आहे, संस्कृति कशी आहे, राजकारण काय आहे याची कांहींच माहिती आम्हीं मिळविली नाहीं, म्हणून गुलाम झालों. आजही जपानी मालानें सर्व बाजारपेठा व्यापलेल्या आहेत. जपानी व्यापारी प्रत्येक बाजारांत हरतऱ्हेचा माल विकीत आहेत, पण जपान्यांचा देश कसा आहे, संस्कृति, समाज, राजकारण, इत्यादि काय आहे, याची माहिती आपणांला आहे का? पूर्व आशियाच्या परिस्थितीची माहिती पदवीधराला देखील नसते, मग सामान्य माणसांची काय कथा! जी चूक पूर्वजांनीं केली तीच आज आम्ही करीत आहोंत.

हिंदुस्थानच्या भावी धोरणाचे दृष्टीनें जपान काय आहे, त्यानें सामर्थ्य कसें मिळविलें, त्याचें भवितव्य काय होईल, आणि या सर्वांपासून स्वतःकरितां आपण काय अनुमानें काढावींत हा या ग्रंथाचा मुख्य उद्देश आहे. जपानचें खंडन किंवा मंडन करणें यांपैकीं कोणताच हेतु लेखकाचे पुढें नाहीं. जपानच्या धोरणांचें समर्थन करणें किंवा त्याचा निषेध करणें अशा एकांगी व पक्षपाती दृष्टीनें त्यानें जपानकडे पाहिलेलें नाहीं. दोन्ही बाजूंचें निरीक्षण करून विचाराला उपयोगी पडणारा मालमसाला वाचकांचे पुढें ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

जपानचें चीनवर चाललेलें आक्रमण लेखकाला नापसंत आहे. पण त्या प्रकरणांत केवळ एकतर्फी विचार न करितां या पापांत कोणकोण वांटेकरी आहेत तें पाहून त्या सर्वांनाच फटके ओढले

पाहिजेत असें त्याचें म्हणणें आहे. त्यांतून चीनही स्वतः सुटणार नाहीं. आज आपत्तीच्या प्रसंगीं चीनला सक्रिय सहानुभूति दाखवून यथाशक्य मदत करणें हें शेजारधर्म या दृष्टीनें हिंदुस्थानचें कर्तव्य आहे. पण त्याकरितां जपानचें शत्रुत्व ओढवून घेण्याची जरूरीच आहे असें नाहीं. चीन आणि जपान या दोघांचेंही मित्रत्व हिंदुस्थाननें राखलें पाहिजे. विनाकारण एकाद्या राष्ट्राचें उसनें शत्रुत्व विकत घेऊन पुढच्या पिढीच्या राजकारणाला विरजण लावूं नये. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर परराष्ट्रीय संबंध कसे ठेवावेत हें पुढची पिढी त्या परिस्थितीप्रमाणें ठरवील. देशभक्त सुभाषचंद्र बोस यांनीं मध्ययूरोपमध्यें वास्तव्य करून जें निरीक्षण केलें त्यांतून हेंच धोरण बांधलेलें आहे.

जपानचा निषेध करण्यांत आपला वेळ व बुद्धि घालविण्यापेक्षां जपानच्या सामर्थ्यप्राप्तीचा अभ्यास करणें हिंदुस्थानला अधिक फायदेशीर होईल. हिंदी दृष्टीनें विचार करितां जपाननें स्वातंत्र्य-सत्ता-सामर्थ्य यांची प्राप्ति कशी केली तें महत्त्वाचें आहे. या सामर्थ्याचा उपयोग करण्याचा वेळ येईल त्या वेळीं प्रत्यक्ष कृतीनें जगाला असें पटवून द्यावें कीं हिंदुस्थान जपानपेक्षां श्रेष्ठ आहे. तोंपर्यंत आपण साधकाचीच भूमिका घेणें जरूर आहे.

वाचकांना विनंति अशी आहे कीं हिंदुस्थानची परिस्थिति मनांत ठेवून त्यांनीं ही माहिती वाचावी व आपलीं अनुमानें काढावींत. ग्रंथाचा साधनविषय जपान असला तरी गर्भविषय हिंदुस्थान आहे हें त्यांच्या लक्षांत येईलच.

अमेरिका-यूरोपमध्यें चाललेल्या सामाजिक, राजकीय घडामोडींचा संदेश मागें हिंदुस्थानला आणला. जपानसंबंधीं तेंच कार्य करावयाचें राहिलें होतें. जागतिक शिक्षणपरिषदेमुळें ती संधि मिळाली. ती देणाऱ्या पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचें ऋण माझ्यावर आहे तसेंच समाजावरही आहे.

जपानमध्यें असतांना निरीक्षण करण्याचे कामीं अनेक व्यक्ती व संस्था यांनीं मनःपूर्वक साहाय्य केलें. त्या सर्वांचाच उल्लेख करणें अशक्य असलें तरी श्री. योकोयामा, श्री. मुराता, व श्री. ओशीमान हे स्नेही, आणि कोकुभाई बुंका शिंकोकाई, व निप्पोन बुंका रेन्मेई या संस्था यांचा खास निर्देश करणें आवश्यक आहे.

गणेश चतुर्थी, १८६०<br>२८ ऑगस्ट, १९३८

गजानन श्री. खैर

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठा म.

# अनुक्रमणिका

१. "दाई निप्पोन"चें दर्शनी स्वरूप .... १–११

त्रिखंडांचें एकत्र दर्शन—जपानचें द्विविध स्वरूप—दिवसां आधुनिक जपान—सायंकाळीं 'जपानी' जपान—कांटे, चमचे आणि समिधा—इमरतींतील सोयी, गच्चीवर बगीचा—खाजगी जपानी घरांत—दुहेरी जीवनाची संवय—ग्रामजीवनाचा देखावा—जपानी मालक, गोरा नोकर—जपानी सौजन्य व सभ्याचार—स्वभाव निदर्शक चित्रें

२. जपानी वर्चस्वाचें रहस्य .... १२–२२

मनोरंजक विरोध—जपानच कां पुढें आला?—जिवंतपणाची कसोटी—कारणत्रयी—सूर्यवंशी भूपालांचा अखंड वंश—राष्ट्रकुटुंबाची पितृपूजा, शिंतोधर्म—राजनिष्ठा हीच देशनिष्ठा—बु. शिदोचें ब्रीद—जुन्या काळचे गुण—ग्रहणशील वृत्ति व सहिष्णु संस्कृति—तारक-मारक परंपरांची निवड—सामान्य व्यक्ति, सामर्थ्यवान् समष्टि—संथ व कष्टाळू बुद्धि—तत्त्वापेक्षां तंत्राची आवड—अनुकूल परिस्थितींत जागरूकता—जपानचें भवितव्य

३. आधुनिक युगाला प्रारंभ .... २३–३५

हिंदी व जपानी योगायोग—ऐतिहासिक भूमिका—गोऱ्या लोकांना बंदी—जपानचा एकांतवास—तोफा दाखवून मैत्रीचा तह—स्वेच्छेनें राज्यक्रांति—मानसिक संक्रमण—राजघराण्यांतील जीवनक्रांति—हिंदी सुधारक व जपानी—जपाननें केलेले गुरु—जगाचें शिष्यत्व—जातिभेदाला तिलांजलि—सुधारलेली वर्गपद्धति—देवघर लावून मांसाहार—सार्वजनिक व खाजगी जीवनांत भेद—क्रांतींतून निर्माण झालेला आजचा जपान

४. पूर्वपश्चिम संस्कृतींची प्रयोगशाळा .... ३६–४६

आद्य संस्कृतीचा पाया—भगवान बुद्धाचा प्रवेश—चीनचा कन्फ्यूशियस—येशूचें स्वागत व मिशनऱ्यांची हकालपट्टी—तोफांची नवी संस्कृति—संस्कृतींची भट्टी—तांत्रिक अनुकरणावर भर—वयं तत्त्वान्वेषाद् हताः, त्वं खलु कृती ।—दोघेही चुकतात—नावीन्य पाहून दृष्टि मेली—पौर्वात्य संस्कृतीचें सायुज्य—पाश्चिमात्य संस्कृतीचें स्थान घराबाहेर—द्विविध जीवनाची मीमांसा—सांस्कृतिक अहंकाराचा उद्‌भव

५. देशीय संस्कृति व स्वभाव .... ४७–६६

जपानांत हिंदु चालीरीती—चीनचे संस्कार—गरीब श्रीमंतांतील साम्य—आहारपद्धति—वस्त्रपद्धति—गृहमंडनपद्धति—हिंदु गृहमंडनाचें तत्त्व—जपानचें तत्त्व—सौजन्य व सभ्याचार—स्वागत व निरोप—सप्रेम भेटी—भाषेंतील माधुर्य—आचाराचें शिक्षण-स्वभावानें संथ व शांत—विचारपूर्वक कृति—कुटुंबनिष्ठा—चहा समारंभाचें स्वभाव शिक्षण—समाधियुक्त तिरंदाजी—ध्यानमंदिरें—बुशिदो, जपानी स्वभावाचें ब्रीद—सूक्ष्म कलासौंदर्य-दृष्टि—पुष्परचनाशास्त्र—निसर्गप्रेम—जलवर्ण चित्रकला—नृत्य व संगीत—काबुकी व नो नाट्यकला—संस्कृति-वैशिष्ट्याचा आग्रह

६. पाश्चिमात्य संस्कृतीच्या मर्यादा .... ६७–७५

पूर्वेकडून पाश्चिमात्य संस्कृति—इंग्रजी भाषेचें जपानी स्वरूप—'रीडिंग इंग्लिश' चा प्रसार—जपानी साहेब व मडमा—कां टे-च म चे-सु री चा परिचय—डिपार्टमेंट स्टोअर्स व अपार्टमेंट हाऊस—हॉलीवुड व जाझ्—कलेच्या क्षेत्रांतही स्पर्धाशक्ति—पाश्चिमात्यांचे विलास—जगाची चँपियनशिप् पाहिजे—समानतागंड व संचारक्षमता—साधर्म्य व वैशिष्ट्य यांची जरूरी—बाह्य आचाराचें अनुकरण

७. स्त्रीजीवन व कुटुंबसंस्था .... ७६–९१

उपवर कन्यांची शाळा—मॉडर्न गर्ल ऊर्फ ' मोगा ' —बायका त्या बायकाच—जपानी स्त्रीचें ' ध्यान '— चार आश्रम—स्त्रीत्वाची तयारी—आर्थिक क्षेत्रांत संचार —मुदतबंदीची अखंड नोकरी—कायद्यांचा वरदहस्त— विवाहार्थे मध्यस्थी—कौटुंबिक कुलाचार—घराचें साधें रुबाबदार सौंदर्य—हिंदु चालीरीती जपानांत— ' आमचीं मतें '

८. प्राचीन चातुर्वर्ण्य व आधुनिक चतुर्वर्ग .... ९२–९९

लेखणीनें सामाजिक क्रांति—प्राचीन जातिपद्धति— योरीतोमोकृत स्मृतिशास्त्र—सामुराई क्षात्रधर्म— क्षत्रियेतर जाती—अस्पृश्य ईटा—मेइजीकृत समाज-क्रांति—नवीन वर्गपद्धतीचा जन्म—लष्करशाही—भांड-वलशाही—ब्राह्मण व कामगार—भवितव्य

९. शेतकरी व कामगार जीवन .... १००–११५

जपानची कोंकणी शेती—शेती व ग्रामोद्योग—सुगीतो गांव—शेतकऱ्याची झोंपडी—खेड्यांतील गरिबी—जमि-नीचे लहान तुकडे—ग्रामसुधारणा—शेतीची पुनर्घटना— ग्रामसंघटनेचा एक नवीन प्रयोग—जपानबाहेर वसाहती —कामगार व कारखाने—कामगार मुलींचें वसतिगृह— मजुरीचें प्रमाण—साधिक विमानपद्धति—कामगार संघ-टना—राष्ट्रवादाचा प्रसार—समाजवादी पक्षाची चळवळ

१०. राजकारणाचे अव्यक्त सूत्रधार .... ११६–१२६

अव्यक्त सत्ता—लोकशाहीचें बाह्य स्वरूप—प्रत्यक्ष अधिकार थोडा—राजाची सत्ता—प्रत्यक्ष राजकारणाचा खेळ—गुप्त संघांचें राजकारण—कम्यूनिस्ट सर्वांना अप्रिय—प्रधान कोणाचा नोकर—वृत्तपत्रांच्या मर्यादा —वाङ्मयनियंत्रण—विचारवंताला काय वाटतें ?

११. औद्योगिक उत्कर्ष व स्वस्ताईचें रहस्य .... १२७–१५०

इंग्रजांचा नांगर कापला—शास्त्रीय युगाची जाणीव—

जपानचा जगाला पेंच व आम्ही—आंधळ्यांची व डोळसांची जिज्ञासा—जपानी उद्योगाचें विराट् स्वरूप—औद्योगिक प्रगतीचें प्रमाण—सरकारी पाळण्यांत कारखान्यांचा जन्म—युद्धकाल व कारखानें—एका नवीन धंद्याचा जन्म—कारखानदारांचा जागरूकपणा—कामगारांच्या जीवनांत सुधारणा—यंत्रासारखे हात—औद्योगिक संशोधनाचा प्रचंड व्याप—प्रयोग-शाळेंतील ब्रह्मदेव—'जपानी' माल—पत परत मिळविली—सहकारी तत्त्वावर खरेदीविक्री—करणावळ बेसुमार उतरली—'डंपिंग'ची भ्रामक कल्पना—कमखर्ची राहणी—यावज्जागर काम करितात—कारागिरीचे हात व दृष्टि—काम ह्याच धर्म आहे—पैशाची हाव नाहीं—काम हीच राष्ट्रसेवा आहे—जगाची बाजारपेठ व जपानी माल—दृष्टिकोन अनेक आहेत—हिंदुस्थानला आशा आहे

१२. चीन–जपानचा 'प्रसंग' अथवा लढा .... १५१–१७३

श्वेतवर्णीयांची इभ्रत व जपानी चढाई—अतिपूर्व राजकारण व हिंदुस्थान—जपानचा निषेध कोणीं करावा—शेजारधर्माचा इतिहास—चीन, जपान व रशिया यांचे पूर्वसंबंध—चीनचे अंतस्थ प्रश्न—जपानला कारणें मिळालीं—चीनमध्यें युरोपियन चाणक्यनीति—कम्यूनिझम् व जपानिझम्चा लढा—वसाहतींकरितां तृष्णा—आशियाचा अपमान जपानला झोंबला—बाजारपेठेंतील भांडण—चीन-जपान भांडणांत लाभ कोणाचा ?—लढ्याचें बहुविध स्वरूप—साम्राज्यवाद्यांचें शिष्यत्व—वाढती लोकसंख्या—शेतकऱ्याची गरिबी—व्यापारवाढीच्या प्रयत्नालाही बंधनें—अनुभव घेऊन धोरण बांधलें—चीनचें भवितव्य काय ?—जपान्यांची सात्त्विक समजूत—नेमस्त जपान्यांचें मत—ध्येयवाद्यांचें समाधान—प्रामाणिक मतभेदही आहे—हा प्रसंग चीनला टाळतां आला असतां चीन-जपानी समाजांतील विरोध—दोषाचा वाटा कोणाकडे किती ?—हिंदुस्थानला बोध

१३. युद्धकालीन धामधुमीचें जीवन .... १७४–१९१

'हजार टाके' रक्षाबंधन—कमरेला जपानी तल-

वार—साम्राज्यसंपादन व साम्राज्यभंजन—रणांगणावर जाणारांना निरोप—जखमी सैनिकांचें स्वागत—सैनिक येतात कोठून ?—सैनिकांच्या घरीं—गांवांतील दृश्य—रजपूतांसारखें शौर्य—संरक्षणाची रंगीत तालीम—कामाचे तास—पुरुषी स्त्रीची वीरश्री—स्त्री पोलिसांची नवी योजना—सैनिकांना घरचे आहेर—संशोधक शास्त्रज्ञांची कामगिरी—पोलादी आरशाची भेट—शृंगारिक कीं वीररसात्मक—'युद्धाकरितां कला'—नटव्या मुलींची गैरसोय—युद्धकालीं मतस्वातंत्र्याच्या मर्यादा—विरोधाची टीका नको—परदेशांत मतप्रचार—शत्रूशीं वर्तन—आर्थिक दूरदृष्टीच्या योजना—नियंत्रण आणि सहकार्य—जपान किती टिकाव धरील ?

१४. बुद्ध-शिंतो-येशू यांचा संसार .... १९२–२०८

जपानांत त्रिसुपर्ण—धर्मांतर म्हणजे समाजांतर नाहीं—धर्माची जाहिरात नाहीं—तीन धर्म व एकावन्न पंथ—शिंतो-बुद्धाची भेट व समेट—ख्रिस्ती उपदेशक गोव्याहून गेला—मिशनरी व धर्मांतर—सरकारला धर्म नाहीं—शिंतोघर व समाधी—ख्रिस्ती विचाराची छाप—बौद्ध सूत्रें व अवतार—नामसंकीर्तन व दिंड्या—कौटुंबिक धर्म—भव्य बुद्धमंदिरें—मठांतील शिक्षण—झेनपंथीय ध्यानमार्ग—भिक्षुणींचा मठ—ग्रॅज्युएट बौद्ध भिक्षू—देवालयांचें व्यापक समाजकार्य—धर्मांची सहकारिता—तरुणांचा धर्म—पुनर्घटना झाली म्हणून जगला

१५. राष्ट्रवृत्तीची मूस–जपानी शिक्षण .... २०९–२२२

हिंदी शिक्षकाला प्रश्न—राष्ट्रीय जीवनाचा पाया—शालागृहाचें प्रथमदर्शन—व्यायामाच्या सोयी—सभागृह व प्रयोगशाळा—साहित्याचें वैपुल्य—आधुनिक शिक्षणाचा पाया—नीतिशिक्षणाचा पाया—अनुकरणामुळें विविधता—केंद्रीभूत कारभार—विद्यार्थ्यांच्या सोयी—बालशिक्षण—माध्यमिक व उच्च शिक्षण—औद्योगिक संस्था—गृहिणीमातांचें शिक्षण—जपानी शिक्षणाचें वैशिष्ट्य—स्वतंत्र विचार नाहीं व नको

१६. जपान-हिंदुस्थानचा पाश्चात्यांना पाहुणचार .... २२३–२४५

पूर्वआशियांत स्वतंत्र कोण ?—आशियांतील साम्राज्यशाही—श्वेत-श्वेतेतर संबंधाचा इतिहास—पाश्चात्य 'रानटी' लोक—जपानची सावधानता—साहेबावर नियंत्रण—नवीन ज्ञानाची जिज्ञासा—तंत्रसाधनाचा स्वभाव—मिशनऱ्यांचा डाव ओळखला—ख्रिस्ती लोकांचेंच अनुकरण—गोऱ्यांची पत नाहींशी झाली—हिंदी जपानी वृत्तींतील फरक

१७. आशियांतील जपानच्या कार्याचा आढावा .... २३६–२४६

संरक्षण, प्रतिबंध व आक्रमण—प्रथम व्यापार, नंतर स्वामित्व—श्वेत-श्वेतेतर वादाची पीठिका—आशियावादाचें ध्येय—पूर्वखंडाचें नेतृत्व—श्वेत-श्वेतेतर वादाचें भवितव्य—राष्ट्रीय दृष्टीनें आढावा—आशियाला काय मिळालें ?—गुरूचे गुणदोष—जगाच्या दृष्टीनें महत्त्व—आदर्श नाहीं, पण असामान्य—अनुकरणीय व्यक्ति व समाज—शेवटीं 'आपला आपण'

१८. हिंदुस्थानचा भावी मार्ग .... २४७–२६४

हिंदुस्थान व जपान, खाण एकच—पारतंत्र्याचें तुणतुणें पुरे—स्वातंत्र्यांतील गैरसोयी—पारतंत्र्याचा मोबदला द्या—व्यापक राजकारणाची भूमिका घ्या—शेजाऱ्याविषयीं अज्ञान—संकुचित वृत्ति सोडा—विकतचें शत्रुत्व नको—देशाचें संरक्षण—पूर्वतयारी ठेवा, वेळ येईल—औद्योगिक संघटना—एकतर्फी स्वदेशी नको, सर्वतर्फी पाहिजे—'राष्ट्रीय औद्योगिक पुनर्घटना मंडळ'—औद्योगिक खात्याचा कार्यक्रम—परदेशीं शिक्षणाची सोय—'परदेश शिक्षण नियामक मंडळ'—जगभर पसरा—पूर्वतयारीची शिक्षणयोजना—तरुणांना परदेशांत वाव आहे—सांघिक व राष्ट्रीय संस्कृति—पौर्वात्य राहणीची पद्धति—प्रत्येक घरांत 'राष्ट्रकोण'—राजकीय वेदान्ताची निश्चिति—आशियाचा नेता कोण ?

* * *

# जपानची ★ जीवनक्रांति

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे



## १

## " दाई निप्पोन " चें दर्शनी स्वरूप

**त्रिखंडांचें एकत्र दर्शन—**

आशिया, यूरोप आणि अमेरिका अशा त्रिखंडांतील निवडक गोष्टींचें प्रदर्शन म्हणजे जपान. जपानमध्यें जपान आहेच, पण त्याशिवाय अमेरिका आणि यूरोप हीं दोन्ही खंडें आहेत. त्यामुळें थोडया वेळांत आणि खर्चांत ज्याला त्रिखंडांचा प्रवास करावयाचा असेल त्यानें जपान पाहावा. तेथें अमेरिकेंतील यंत्रकला आहे, इंग्लंडमधील नौकानयनशास्त्र आहे, जर्मनींतील

युद्धशास्त्र व वैद्यक आहे, फरान्समधील शिक्षणपद्धति आहे, रशियांतील एकमुखी सत्ता आहे, आणि खुद्द जपानमधील पुरातन व पौराणिक स्वरूपाचेंही जीवन आहे. अमेरिकेंत दिसणारीं प्रचंड डिपार्टमेंट स्टोअर्स जपानमध्यें आहेत. वेळापत्रकाप्रमाणें बिनचुक पोंचणाऱ्या व निघणाऱ्या आगगाड्या आहेत. रस्ते मोटारींनीं गजबजलेले आहेत. जलद प्रवास करण्याकरितां विमानें आहेत. जमिनीखालून जाणाऱ्या अंडरग्राऊंड रेल्वे किंवा सब्वेज आहेत. त्याचबरोबर जुन्या पद्धतीचीं देवालयें, प्रचंड समाधिगृहें, जपानी पद्धतीचीं उद्यानें आणि रिक्षामधून संथपणें जाणारे स्त्रीपुरुष हेही आहेत. बुद्धाच्या देवळांत जाऊन देवापुढील जाळीच्या पेटींत तांदूळ व पैसा टाकून हात जोडून भक्तिभावानें नमस्कार करणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या अंगावर पाश्चात्य पद्धतीचा झगा किंवा सूट-बूट-हॅट असा पोषाखही असेल. सारांश, प्रत्येक शहरांत आणि प्रत्येक व्यक्तींत पाश्चात्य आणि पौर्वात्य सुधारणांचा संगम झालेला आढळून येतो.

**जपानचें द्विविध स्वरूप—**

तोकियो, योकोहामा, ओसाका, कोबे, इत्यादि शहरांतून दिवसा फिरणाराला पाश्चात्य स्वरूपाचा जपान दिसतो. फेरोकाँक्रीटच्या इमारती, आधुनिक उपहार व निवासगृहें, भव्य नाटचगृहें व चित्रपटशाला, यंत्रसाहाय्यानें निर्माण होणाऱ्या असंख्य वस्तूंनीं भरलेलीं मोठमोठीं दुकानें, स्त्री-पुरुषांनीं गजबजलेल्या पायवाटा, वाहनांची गर्दी झालेले रुंद रस्ते, अंतराळांत ठिकठिकाणीं ताणलेल्या विजेच्या तारा—इत्यादि सर्व देखावा पाहिला कीं न्यूयॉर्क, लंडन, पॅरिस व बर्लिन अशा शहरांत आपण आहोंत कीं काय असा भास होतो. परंतु सायंकाळ झाल्यानंतर शहराच्या लहान रस्त्यांतून किंवा जपानी घरांतून डोकावल्याबरोबर सर्व जपानी पद्धतीचें जग दिसूं लागतें. प्रशस्त पायघोळ आणि सैल असा किमोनो अथवा कफनी घालून स्त्रीपुरुष आपल्या मुलांबाळांबरोबर जमिनीवर वीरासन घालून बसलेले आहेत, किंवा संथपणें रस्त्यांतून फिरत आहेत असा देखावा सर्वत्र दिसतो. सार्वजनिक जीवनांत जपान पाश्चात्य पद्धतीनें राहतो, परंतु त्याचें कौटुंबिक

जीवन पूर्णपणें जपानी आहे. पाश्चात्य जीवनांतील सर्व सुखसोयी जपानमध्यें आहेत, परंतु जपानच्या घरांतील संस्कृति व जीवन पूर्णपणें देशी आहे. म्हणून जपानमध्यें अमेरिका, यूरोप, चीन व हिंदुस्थान अशा सर्वांचें अभूतपूर्व असें मिश्रण झालेलें आहे.

**दिवसां आधुनिक जपान—**

सकाळीं आठ नऊ वाजण्याचे सुमारास लोकांची कामाला जाण्याची धांदल उडते. वाहनें गजबजलेलीं असतात. अशा वेळीं एकाद्या रेल्वेच्या डब्यांतील अथवा ट्राम्‌वेमधील स्त्रीपुरुषांकडे पाठमोऱ्या स्थितींत पाहिलें तर आपण यूरोपमध्येंच आहोंत असें वाटतें. सर्व पुरुषांचा नखशिखांत पोषाख पाश्चात्य पद्धतीचा असतो. चेहरेपट्टीवरून किंवा क्वचित् देशी पोषाख केलेल्या वृद्ध स्त्रियांच्या पोषाखावरून कल्पना येते कीं, हा जपान देश आहे. सरकारी किंवा खाजगी कचेऱ्यांतील अधिकाऱ्यांचा, कारकुनांचा, प्राथमिक शाळेंतील शिक्षकांचा, व्यापाऱ्यांचा, चांगल्या स्थितींतील कामगारांचा असा बहुतेकांचा पोषाख पाश्चात्य स्वरूपाचा असतो. कचेरींत काम करण्याकरितां राहिलेल्या मुलींचा, शाळेंतील कांहीं शिक्षकिणींचा, ट्राम्‌मध्यें किंवा बस्‌मध्यें तिकिट-विक्रीचें काम करणाऱ्या मुलींचा व शाळा-कॉलेजांत जाणाऱ्या कन्यांचा पोषाखही प्रायः पाश्चात्य धर्तीचा असतो.

**सायंकाळीं 'जपानी' जपान—**

सायंकाळ झाल्यानंतर याच लोकांना त्यांचे घरीं किंवा रस्त्यांत पाहिलें तर त्यांचे बाह्य स्वरूपांत बदल झालेला दिसून येतो. पायांत मोजे-बुटांचे ऐवजीं जपानी काळे मोजे व लाकडी चपला किंवा खडावा; आणि अंगावर अगदीं सैल व लांबरुंद बाह्यांचा किमोनो, असा पोषाख करून सार्वजनिक स्नानगृहांकडे चाललेले पुरुष दिसतात. पायांत पांढरे शुभ्र मोजे आणि खडावा, अंगावर सुंदर नक्षीकाम असलेले किमोनो, कमरेला रुंद असा शेले-पट्टा (ओबी), पाठीवर याच पट्ट्याची सुंदर आणि उंची नक्षीकाम केलेली अशी घडी, डोक्यावर जपानी पद्धतीनें केलेली केशभूषा—अशा स्वरूपाच्या स्त्रिया

मोठ्या विनयशीलपणानें रस्त्यांतून वावरतांना दिसतात. दिवसाचे वेळीं शाळेंत कोट-विजार-बूट घालणारीं मुलें सायंकाळचे वेळीं सुंदर नक्षीचे पायघोळ किमोनो घालून स्वैरपणें खेळत-बागडत असलेलीं दिसतात. पोषाखाच्या दृष्टीनें जपानी स्त्रीपुरुषांना पाश्चात्य आणि जपानी दोन्ही पद्धतींचे पोषाख अगदीं परिचित आहेत. साहेब-मडमेसारखा पोषाख केला म्हणून कोणी कोणाला नांवें ठेवीत नाहीं, किंवा देशी पोषाख केल्यामुळें कोणी कोणाला कमी प्रकारें लेखीत नाहीं. बाह्यतः द्विविध दिसणाऱ्या पोषाखाच्या खालीं असलेली मनोवृत्ति लक्षांत घेण्यासारखी आहे. जो ज्या वेळीं उपयुक्त आणि आवश्यक तो पोषाख त्या वेळीं करावा. हा व्यवहाराचा प्रश्न आहे. त्याकरितां देशी-विदेशी पोषाख करणाऱ्या व्यक्तीला कमीअधिक लेखण्याचें कारण नाहीं; आणि असल्या गैरमहत्त्वाच्या बाबतींत समाजामध्यें विनाकारण रण माजविण्यांतही अर्थ नाहीं. पोषाखाच्या द्विविधतेच्या मुळाशीं, परिस्थितीशीं जमवून घेणारी जपानी मनोवृत्ति दिसून येते.

**कांटेचमचे आणि समिधा—**

शहरांतून राहणाऱ्या जपानी लोकांच्या आहारांतही द्विविधता दिसते. ठिकठिकाणीं देशी पद्धतीचीं आहारगृहें आहेत, त्याचप्रमाणें पाश्चात्य पद्धतीचीं उत्कृष्ट अशीं रेस्टॉरंट्सूही पुष्कळ आहेत. कांहीं ठिकाणीं एकाच आहारगृहांत एका बाजूस देशी व दुसऱ्या बाजूस पाश्चात्य पद्धतीनें भोजन करण्याच्या सोयी आहेत. खुर्चीवर बसून टेबलावरील पाश्चात्य पद्धतीचें अन्न कांटेचमच्यानें खाणें ही गोष्ट सामान्य जपानी माणसालाही नेहमींच्या सरावांतली आहे. किंबहुना बहुसंख्य मध्यमवर्गीय लोक मधल्या वेळचा आहार पाश्चात्य पद्धतीचाच घेतात. युरोपियन अथवा अमेरिकन स्वयंपाक करण्यांत व वाढण्यांत जपानी आचारी कुशल झालेले आहेत. सार्वजनिक आहारगृहांत कांटेचमच्यानें खाणारे स्त्रीपुरुष घरीं आल्यानंतर सकाळ-सायंकाळचा आहार लाकडी वाडग्यांतून दोन समिधांचे (चॉपस्टिक्) साहाय्यानें घेतांना दिसतात. पुरुष आणि मुलें एका गुळगुळीत लांबरुंद चौरंगाचे भोंवतालीं गिरद्यांवर वीरासनांत बसून भोजन करितात आणि स्त्रिया अन्न वाढतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत १९-८-५८ ता.

पुरुषांची पंगत झाल्यावर घरांतल्या स्त्रियांचें भोजन. याच बायका दिवसा उपहारगृहांत पुरुषांचे शेजारीं बसून कांटेचमच्यानें भोजन करितांना दिसतात.

दोन प्रकारचा पोषाख करण्यांत जपानी लोक जितके सरावलेले आहेत तितकेच ते आहाराचे बाबतींतही आहेत. कांटेचमच्यानें पाश्चात्य पद्धतीनें खाणें किंवा त्यापेक्षां अगदीं भिन्न अशा जपानी पद्धतीनें खाणें यांत विशेष विधिनिषेध नाहीं. प्रत्येकानें काळ, वेळ, सोय आणि ऐपत यांच्या अनुरोधानें योग्य असेल त्याप्रमाणें करावें. युरोपियन पद्धतीनें जेवल्यामुळें कोणी साहेब होऊन बाटत नाहीं किंवा देशी पद्धतीनें जेवल्यामुळें कोणी सनातनी ठरत नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत या दोन्ही पद्धती मुरून गेलेल्या आहेत.

**इमारतींतील सोयी, गच्चीवर बगीचा—**

वस्त्रप्रावरण आणि आहार यांप्रमाणेंच इमारतींच्या रचनेंतही जपानमध्यें दोन प्रकार दिसून येतात. व्यापारधंदा, सरकारी कामकाज, सार्वजनिक कार्यें वगैरे ज्या ठिकाणीं चालतात त्या इमारती पाश्चात्य धर्तीच्या दिसतात. भूकंपापासून नुकसान होऊं नये म्हणून हल्लीं सार्वजनिक इमारती कॉंक्रीटच्या बांधल्या जातात. डिपार्टमेंट स्टोअर्स, वृत्तपत्रांचे छापखाने, करमणुकीचीं स्थानें, शिक्षणसंस्था, व्यापारी संस्था, इत्यादींच्या इमारती भव्य, शोभिवंत आणि मजबूत असतात. त्यांच्यामध्यें विजेचे पाळणे, उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत हवा थंड किंवा उष्ण ठेवण्याची यांत्रिक साहित्यसामग्री, पाश्चात्य धर्तीचें फर्निचर इत्यादि अद्ययावत् योजना असतात. डिपार्टमेंट स्टोअर्स, व्यापारी संस्था किंवा नाटचगृहें यांच्या कांहीं इमारती इतक्या मोठ्या आहेत कीं, त्यांत तळमजल्यावर आणि अखेरच्या मजल्यावर हजारों माणसें बसतील अशीं उपहारगृहें आहेत. सात आठ मजली इमारतीच्या प्रशस्त गच्चीवर बागबगीचा करून त्यांत पंधरा वीस फूट उंचीचीं झाडें लाविलेलीं असतात व लहान मुलांना खेळण्याकरितां तेथेंच विविध साहित्यसामग्री असते. त्याच इमारतींत एकाद्या मजल्यावर एकादें छोटें नाटचगृह व रंगभूमि यांचीही योजना केलेली असते. सारांश, इमारतींची भव्यता

मराठी ग्रंथ संग्रहालय ५५६६ नोंद क्र.

मोठ्या विनयशीलपणानें रस्त्यांतून वावरतांना दिसतात. दिवसाचे वेळीं शाळेंत कोट-विजार-बूट घालणारीं मुलें सायंकाळचे वेळीं सुंदर नक्षीचे पायघोळ किमोनो घालून स्वैरपणें खेळत-बागडत असलेलीं दिसतात. पोषाखाच्या दृष्टीनें जपानी स्त्रीपुरुषांना पाश्चात्य आणि जपानी दोन्ही पद्धतींचे पोषाख अगदीं परिचित आहेत. साहेब-मडमेसारखा पोषाख केला म्हणून कोणी कोणाला नांवें ठेवीत नाहीं, किंवा देशी पोषाख केल्यामुळें कोणी कोणाला कमी प्रकारें लेखीत नाहीं. बाह्यतः द्विविध दिसणाऱ्या पोषाखाच्या खालीं असलेली मनोवृत्ति लक्षांत घेण्यासारखी आहे. जो ज्या वेळीं उपयुक्त आणि आवश्यक तो पोषाख त्या वेळीं करावा. हा व्यवहाराचा प्रश्न आहे. त्याकरितां देशी-विदेशी पोषाख करणाऱ्या व्यक्तीला कमीअधिक लेखण्याचें कारण नाहीं; आणि असल्या गैरमहत्त्वाच्या बाबतींत समाजामध्यें विनाकारण रण माजविण्यांतही अर्थ नाहीं. पोषाखाच्या द्विविधतेच्या मुळाशीं, परिस्थितीशीं जमवून घेणारी जपानी मनोवृत्ति दिसून येते.

**कांटेचमचे आणि समिधा—**

शहरांतून राहणाऱ्या जपानी लोकांच्या आहारांतही द्विविधता दिसते. ठिकठिकाणीं देशी पद्धतीचीं आहारगृहें आहेत, त्याचप्रमाणें पाश्चात्य पद्धतीचीं उत्कृष्ट अशीं रेस्टॉरंट्सही पुष्कळ आहेत. कांहीं ठिकाणीं एकाच आहारगृहांत एका बाजूस देशी व दुसऱ्या बाजूस पाश्चात्य पद्धतीनें भोजन करण्याच्या सोयी आहेत. खुर्चीवर बसून टेबलावरील पाश्चात्य पद्धतीचें अन्न कांटेचमच्यानें खाणें ही गोष्ट सामान्य जपानी माणसालाही नेहमींच्या सरावांतली आहे. किंबहुना बहुसंख्य मध्यमवर्गीय लोक मधल्या वेळचा आहार पाश्चात्य पद्धतीचाच घेतात. युरोपियन अथवा अमेरिकन स्वयंपाक करण्यांत व वाढण्यांत जपानी आचारी कुशल झालेले आहेत. सार्वजनिक आहारगृहांत कांटेचमच्यानें खाणारे स्त्रीपुरुष घरीं आल्यानंतर सकाळ-सायंकाळचा आहार लाकडी वाडग्यांतून दोन समिधांचे (चॉपस्टिक्) साहाय्यानें घेतांना दिसतात. पुरुष आणि मुलें एका गुळगुळीत लांबरुंद चौरंगाचे भोंवतालीं गिरद्यांवर वीरासनांत बसून भोजन करितात आणि स्त्रिया अन्न वाढतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत १९-५०९८ ता.

पुरुषांची पंगत झाल्यावर घरांतल्या स्त्रियांचें भोजन. याच बायका दिवसां उपहारगृहांत पुरुषांचे शेजारीं बसून कांटेचमच्यानें भोजन करितांना दिसतात.

दोन प्रकारचा पोषाख करण्यांत जपानी लोक जितके सरावलेले आहेत तितकेच ते आहाराचे बाबतींतही आहेत. कांटेचमच्यानें पाश्चात्य पद्धतीनें खाणें किंवा त्यापेक्षां अगदीं भिन्न अशा जपानी पद्धतीनें खाणें यांत विशेष विधिनिषेध नाहीं. प्रत्येकानें काळ, वेळ, सोय आणि ऐपत यांच्या अनुरोधानें योग्य असेल त्याप्रमाणें करावें. युरोपियन पद्धतीनें जेवल्यामुळें कोणी साहेब होऊन बाटत नाहीं किंवा देशी पद्धतीनें जेवल्यामुळें कोणी सनातनी ठरत नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत या दोन्ही पद्धती मुरून गेलेल्या आहेत.

**इमारतींतील सोयी, गच्चीवर बगीचा—**

वस्त्रप्रावरण आणि आहार यांप्रमाणेंच इमारतींच्या रचनेंतही जपानमध्यें दोन प्रकार दिसून येतात. व्यापारधंदा, सरकारी कामकाज, सार्वजनिक कार्यें वगैरे ज्या ठिकाणीं चालतात त्या इमारती पाश्चात्य धर्तीच्या दिसतात. भूकंपापासून नुकसान होऊं नये म्हणून हल्लीं सार्वजनिक इमारती काँक्रीटच्या बांधल्या जातात. डिपार्टमेंट स्टोअर्स, वृत्तपत्रांचे छापखाने, करमणुकीचीं स्थानें, शिक्षणसंस्था, व्यापारी संस्था, इत्यादींच्या इमारती भव्य, शोभिवंत आणि मजबूत असतात. त्यांच्यामध्यें विजेचे पाळणे, उन्हाळ्यांत व हिवाळ्यांत हवा थंड किंवा उष्ण ठेवण्याची यांत्रिक साहित्यसामग्री, पाश्चात्य धर्तीचें फर्निचर इत्यादि अद्ययावत् योजना असतात. डिपार्टमेंट स्टोअर्स, व्यापारी संस्था किंवा नाटचगृहें यांच्या कांहीं इमारती इतक्या मोठ्या आहेत कीं, त्यांत तळमजल्यावर आणि अखेरच्या मजल्यावर हजारों माणसें बसतील अशीं उपहारगृहें आहेत. सात आठ मजली इमारतीच्या प्रशस्त गच्चीवर बागबगीचा करून त्यांत पंधरा वीस फूट उंचीचीं झाडें लाविलेलीं असतात व लहान मुलांना खेळण्याकरितां तेथेंच विविध साहित्यसामग्री असते. त्याच इमारतींत एकाद्या मजल्यावर एकादें छोटें नाटचगृह व रंगभूमि यांचीही योजना केलेली असते. सारांश, इमारतींची भव्यता

मराठी ग्रंथ संग्रहालय ५५६६ नोंद नं.

व त्यांतील साहित्ययोजना यांच्या दृष्टीनें तोकियोसारखीं शहरें पाश्चात्य देशांतील कोणत्याही शहराची बरोबरी सहज करतील.

**खाजगी जपानी घरांत—**

हें सार्वजनिक जीवन सोडून जपानच्या खाजगी राहणीच्या घराकडे पाहिलें कीं एकदम फरक दिसून येतो. दीड किंवा दोन मजली लाकडी घरें भूकंपाच्या हजारों धक्क्यांतूनही सुरक्षित राहतात. उंबऱ्याच्या आंत पाऊल टाकल्याबरोबर सर्वत्र जपानी वातावरण दिसतें. घराच्या जमिनी हात दीड हात उंचीवर असून त्यांवर सर्वत्र मऊ चटया पसरलेल्या असतात. मध्यभागीं एक मोठा चौरंग व त्याचे भोंवतालीं बसण्याकरितां लहान गिरद्या असतात. घरांत जातांना दारांत बूट काढून ठेवावयाचे व मऊ आणि पातळ जोडे घालून आंत जावयाचें. खोलीचे आंत जातांना तेही बाहेर ठेवावयाचे. या जपानी घरांत विलायती चित्रें अथवा साहित्य मुळींच दिसणार नाहीं. एकादा श्रीमंत सुखवस्तु गृहस्थ असेल तर तो एकादी खोली विलायती पद्धतीनें पाहुण्यांकरितां शृंगारून ठेवील. पुढील किंवा मागील दारीं जपानी पद्धतीचा बगीचा केलेला असतो. या सर्व गोष्टींमुळें घराचे आंत व भोंवतालीं एक विशिष्ट असें जपानी वातावरण असतें. दिवस-भर पाश्चात्य वातावरणांत काम करणारा जपानी गृहस्थ सायंकाळीं व रात्रीं पूर्णपणें देशी पद्धतीनें राहतो.

**दुहेरी जीवनाची संवय—**

आहार, वस्त्रें आणि घरें या बाबतींत जो दुहेरीपणा आहे तोच जपानी जीवनाच्या प्रत्येक प्रांतांत दिसतो. एकीकडे जपानी संगीत चालू आहे, दुसरीकडे पाश्चात्य पद्धतीचा जलसा चालला आहे; कोठें जपानी पद्धतीचें स्नानगृह आहे तर कोठें पाश्चात्य पद्धतीचे शीतोष्ण जलाचे फवारे आहेत; कोठें हजारों लोक "सूमो" नांवाचा कुस्तीचा खेळ पाहतात तर इतरत्र बर्फमय प्रदेशांत कांहीं लोक पायाला लांब स्की बांधून स्कीचा खेळ खेळतात. जपानी पद्धतीच्या सर्व चालीरीती कायम ठेवून शिवाय पाश्चात्यांच्या सर्व

चालीरीती तितक्याच उत्साहानें आचरणारा दुसरा समाज या जगांत तरी दिसत नाहीं. पाश्चात्य जीवनपद्धतींतून जपानी पद्धतींत आणि उलट सुलट तितक्याच गतीनें जाणारें जपानी मन बरेंच लवचिक असलें पाहिजे असें वाटतें; त्यामुळें तें वाटेल त्या परिस्थितीशीं जमवून घेऊन तिला आपल्या पचनीं पाडूं शकतें.

**ग्रामजीवनाचा देखावा—**

मोठमोठीं शहरें सोडून जरा बाजूला जाऊन जपानचें ग्रामीण जीवन पाहिलें तरी तेथेंही ही द्विविधता थोड्याफार प्रमाणांत भासमान होते. गांव जवळ येऊं लागतांच रस्त्यांमध्यें पायगाडीवर बसून जाणाऱ्या शेतकरी स्त्रिया व मुली दिसूं लागतात. खेड्यांतील विद्यार्थी व पुरुष पायगाड्या वापरतात हें निराळें सांगण्याची जरूरीच नाहीं. विजेच्या तारा सर्वत्र खेड्यापाड्यांतून पसरलेल्या आहेत; त्यामुळें विजेचे दिवे, टेलीफोन व कारखान्यांकरितां लागणारी विजेची शक्ति यांचा खेड्यांपर्यंत प्रसार झाला आहे. प्रत्येक खेड्यांत एक भव्य इमारत दिसते, ती बहुतेक प्राथमिक शाळेची असते. कारण खेड्यांतील शाळेंत देखील पांचशें सहाशेंपेक्षां अधिक विद्यार्थी असतात.

प्रत्येक खेडेगांवांत एक "वीर-समाधि" असते. त्या गांवांतील क्षात्रतेजाचें हें जिवंत स्मारकच असतें असें म्हणावयास हरकत नाहीं. देशाकरितां झालेल्या अनेक लढायांत गांवांतील जे वीर धारातीर्थी पडतात त्या सर्वांच्याकरितां मिळून ही सार्वजनिक समाधि असते. येथें वार्षिक उत्सव होतो व अशा रीतीनें गांवांतील वीरवृत्ति जागृत ठेविली जाते.

खेडेगांवांत फिरतांना अधून मधून एकाद्या घरावर उंच राष्ट्रीय निशाण लाविलेलें दिसतें. त्या घरांतील कोणी तरी पुरुष देशाकरितां रणक्षेत्रावर गेला आहे, याचें तें चिन्ह असतें. प्रत्येक गांवांत अशीं किती तरी निशाणें युद्धाचे कालीं दिसतात.

**जपानी मालक, गोरा नोकर—**

हिंदुस्थांनांतून जपानला जातांना वाटेंत कोलंबो, सिंगापूर, हाँगकाँग,

इत्यादि ठिकाणें घेऊन जावें लागतें. या सर्व ठिकाणीं श्वेतवर्णीयांचें वर्चस्व आहे. गोरा माणूस अधिकारी आणि त्याचे हाताखालीं कोणी शीख, कोणी मलायी, कोणी चिनी अशी स्थिति दिसते. जपानमध्यें गेल्याबरोबर ही परिस्थिति उलट होते. तेथें जपानी वर्चस्व असल्यामुळें श्वेतवर्णीयाला विशेष किंमत नाहीं. चार माणसांप्रमाणें तो एक. आशिया खंडांत जपान हा असा एकच देश असावा कीं जेथें गोऱ्या माणसाच्या बरोबरीनें श्वेतेतर वर्णाचे लोक वागूं शकतात. सर्व उच्च अधिकारांच्या जागेवर जपानी लोक आहेत. जहाजावरील कप्तान, सैन्यांतील सेनापती, कारखान्यांतील मुख्य एंजिनियर, प्रांतांचे गव्हर्नर आणि विद्यापीठांचे कुलगुरु—सर्व जपानी लोक आहेत. गोरे लोक कामावर कांहीं ठिकाणीं आहेत, पण ते सर्व जपानी लोकांचे हाताखालीं दुय्यम दर्जाचे मदतनीस म्हणून आहेत. विद्यापीठांत इंग्लिश वाङ्मयाचे शाखेंत इंग्रज किंवा अमेरिकन अध्यापक असतील, पण त्या खात्याचा मुख्य जपानी अध्यापक असतो. अशा जपानमध्यें कांहीं काळ घालविल्यावर पुनः परत येतांना हाँगकाँग-सिंगापूर, इत्यादि ठिकाणीं उलटलेले श्वेतश्वेतेतर संबंध पाहिले म्हणजे दोन्ही ठिकाणां-मधील विरोध चटकन् लक्षांत आल्याशिवाय राहात नाहीं. निदान या एका अनुभवाकरितां तरी जपानला एकदां अवश्य जावें.

**जपानी सौजन्य व सभ्याचार—**

बाह्यतः पाश्चात्य स्वरूपाच्या जपानी जीवनामध्यें अशा कांहीं विशिष्ट गोष्टी आहेत कीं त्यांमुळें आपण एका निराळ्या समाजांत आहोंत असें तिऱ्हाइताला वाटतें. जपानी लोकांचा कांहीं विशेष स्वभाव आहे, तो समाज-निरीक्षण करणाराच्या प्रथमदर्शनींच लक्षांत येतो. रेल्वेंतील कंडक्टर व गार्ड सतत उद्योगी असतात. नेहमींचें काम नसेल त्या वेळीं ते गाडीचा डबा किंवा प्लॅटफॉर्म झाडतील. ट्राम्वे किंवा बस्मधील कंडक्टर मुलींचे हात, पाय व तोंड यांची क्रिया सारखी चालू असते. इतर देशांत हेंच काम करणाऱ्या पुरुषांपेक्षां या मुली किती तरी मेहनत घेत असतात. सर्व डब्यांत एकसारखें फिरून तिकिटें देणें, प्रत्येक मुक्कामावर दारें उघडणें व लावणें,

पुढें येणाऱ्या व आलेल्या मुक्कामांचीं नांवें व बदलीचीं ठिकाणें यांची माहिती तोंडानें एकसारखी सांगत राहणें, रहदारी पाहून ड्रायव्हरला ' स्टॉप ' किंवा ' ऑलाइट् ' अशा सूचना देणें, आणि शिवाय एकादी मातोश्री मूलबाळ घेऊन आली तर तिच्या मुलाला उचलून गाडींत घेणें, आणि नंतर त्याला गाडींतून खालीं रस्त्यांत ठेवणें : इतकीं सर्वं कामें ट्राम्वेच्या कंडक्टर मुलींकडून एका जपानमध्येंच होतात, इतरत्र कोठेंही होत नाहींत, व होतील अशी कल्पना नाहीं. ट्राम, बस् किंवा रेल्वेमध्यें तिकिट तपासणारा अधिकारी आला तर तो " तिकिट तिकिट " असा आक्रोश करीत एकाद्या तिरशिंगरावासारखा नाचणार नाहीं. डब्यांत आल्याबरोबर बाजूला मध्यावर उभें राहून, टोपी काढून आदबीनें वाकून उतारूंना प्रणाम करील, आणि " मेहेरबानी करून तिकिटें दाखवा, तसदीची माफी करा, मला कर्तव्य म्हणून हें करावें लागत आहे " असें म्हणून मग सभ्यपणानें तिकिटें पाहून जाईल. एकाद्या मुक्कामावर गाडी अधिक वेळ थांबली तर—" आपला जादा वेळ घेतल्याबद्दल माफी करा " असें म्हणून मग गाडी चालू करील.

सौजन्य आणि शिष्टाचार हा जपानी लोकांचा स्वभावविशेष आहे. डिपार्टमेंट स्टोअरचे दरवाजाशीं किंवा अशाच इतर ठिकाणीं येणारा जाणाराला उद्देशून " आरीगातो गोजाईमास " (फार आभारी आहें ) असें एकसारखें म्हणत राहण्याकरितांच स्वतंत्रपणें कांहीं मुलींची नेमणूक केलेली असते. " आभारी आहें " असें म्हणत राहणें हेंच त्यांचें काम ! हा केवळ देखावा नाहीं. खरोखरींच प्रत्येक सार्वजनिक व खाजगी ठिकाणीं, दुकानांत किंवा घरीं, जपानी लोक एकमेकांचा मानसन्मान अत्यंत अगत्यानें करितात. उपहारगृहांत किंवा इतरत्र नोकरलोकही अत्यंत अदबीनें व सौजन्यानें वागतात. त्यांत मार्दव दिसतें, राकटपणा दिसत नाहीं.

**स्वभावनिदर्शक चित्रें—**

समाजामध्यें प्रत्येक जण आपापले उद्योग करीत असतो आणि त्या सर्वांतून कांहीं विशिष्ट असा राष्ट्रीय स्वभाव दृग्गोचर होतो. रस्त्यांतून जाणारे येणारे कांहीं लोक रस्त्यावर पडलेल्या सिगारेटच्या डब्यांतून वांया

जाणारे जस्ताचे कागद युद्धखात्याकडे पाठविण्याकरितां जमा करीत असतात. सायंकाळच्या वेळीं स्त्रिया घरीं जातांना पुष्पगुच्छांचे पुडे हातांत घेऊन जातांना दिसतात, कारण जपानी गृहमंडनांत फुलांची आवश्यकता असते. रविवारीं एकाद्या लोकप्रिय खेळाकरितां नाट्यगृहाचे किंवा बोलपटगृहाचे भोंवतालीं एकामागें एक अशा रांगा करून शिस्तीनें हजारों लोक तिकिट घेण्याकरितां तिष्ठत असलेले दिसून येतील. सायंकाळीं भोजनोत्तर केवळ सहलीकरितां मुख्य बाजारपेठेंतील दुकानांच्या रांगांमधून फिरणारे हजारों स्त्रीपुरुष "बुरा बुरा" (भोजनोत्तर सहल) करीत असलेले दिसतील. एकाद्या देवळाच्या किंवा समाधीच्या उत्सवानिमित्त भरलेल्या यात्रेकरितां आपल्या मुलांबाळांसह जाऊन, भाविकपणानें दर्शन घेऊन नमस्कार करून देवापुढें पै-पैसा टाकणारे युरोपियन पोषाखांतील किती तरी जपानी लोक दिसतील. शहरांत सर्वत्र पसरलेल्या नव्या जुन्या पुस्तकांच्या दुकानांतून सुटीच्या दिवशीं बाल आणि वयस्क अशा वाचकवर्गाची खूप गर्दी झालेली दिसते. शरद् ऋतु हा गिर्यारोहणाला अनुकूल म्हणून त्या काळीं मुलांप्रमाणें पोषाख करून डोंगर चढण्याकरितां लागणारीं सर्व उपकरणें घेऊन, शहरापासून लांब असलेल्या डोंगराळ भागांत फिरावयास जाणाऱ्या अनेक मुली दिसतात. सकाळच्या वेळीं पाठीवर प्रवासाचें सामान घेऊन स्टेशनकडे जाणाऱ्या हजारों विद्यार्थ्यांच्या रांगा दिसतात. कधीं कधीं सायंकाळचे वेळीं हजारों स्त्रीपुरुष एकाद्या राष्ट्रीय आनंदोत्सवानिमित्त काठीला बांधलेले कागदी कंदील हातांत घेऊन "बांझाय दाई निप्पोन" (जपानचा जयजयकार) असा गजर करीत चाललेले दिसतात. दुसऱ्या एकाद्या राष्ट्रीय उत्सवानिमित्त सर्व तरुण विद्यार्थी खाकी पोषाख चढवून हातांत बंदुका घेऊन, रप्रप् करून बुटांचे पाय आपटीत, मृतवीरांचे समाधिदर्शनाला जात असतांना दिसतात.

या सर्व देखाव्यांत जपानचा विशिष्ट स्वभाव दिसून येतो. बाह्यतः तो पाश्चात्य पद्धतीनें नटलेला दिसतो, पण अंतर्यामीं तो जपानी राहिलेला आहे. सार्वजनिक जीवनांत तो पाश्चिमात्य दिसला तरी घरीं पौर्वात्य आहे. अंगावर त्यानें अमेरिकन-युरोपियन पद्धतीचे कपडे घातले असले तरी त्या कपड्यांचे खालीं त्याचें काळीज जपानी आहे. परिस्थिती-

प्रमाणें आवश्यक तें बाह्य स्वरूप बदललें पण मन बदललें नाहीं. म्हणून जगांतील उत्कृष्ट गोष्टींचा संग्रह करून, पाश्चात्यांचे राहणींत त्यांच्याबरोबर यऊन, शिवाय स्वतःची राष्ट्रीय राहणी आणि स्वभाव टिकविणारा जपान हा एक अभ्यासनीय देश आहे यांत शंकाच नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ६१८
ता.
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ५५७६
ठाणें

* * *

# २

# जपानी वर्चस्वाचें रहस्य

**मनोरंजक विरोध—**

जपानी कुलुपें हिंदुस्थानांत लाखावरी येतात. पण खुद्द जपानमध्यें फारशीं कुलुपें लोक वापरीत नाहींत. कल्चर्ड मोतीं देखील जपानहून लाखों रुपयांचे इकडे येतात, पण जपानी स्त्रीचे अंगावर फुटका मणीही सांपडणें कठीण जाईल. जपानचें चीनशीं युद्ध चाललें आहे आणि रशियाविरुद्ध लढतांनाही त्यानें अलौकिक पराक्रम दाखविला. पण जपानी शहरांत दोन माणसें भांडतांना किंवा मारामारी करतांना कधींही दिसत नाहींत. विलायती पद्धतीनें नख-शिखांत सूट-बुटांत नटलेला जपानी मनुष्य देवळांत किंवा समाधिस्थानांत जाऊन मोठ्या भक्तिभावानें देवापुढें पैसा टाकून, टाळ्या वाजवून, तीर्थ प्राशन करून, कमरेपासून लवून हात जोडून नमस्कार करील. सामान्य जीवनांत विलासी आणि रंगेल प्रवृत्तीचा जपानी वेळ-प्रसंग येतांच पोटांत तरवार खुपसून घेऊन किंवा डोक्यांत पिस्तूल झाडून आत्महत्याही करून घेईल. बौद्धधर्मामुळें हिंदुस्थान निवृत्तिमार्गी बनला व त्याची अधोगति झाली असें आपण म्हणतों. पण बाराशें वर्षें बौद्धधर्माचा पुरस्कार करूनही जपानी लोक प्रवृत्तिमार्गी राहिले आणि विपरीत परिस्थितींतही जगांत पुढें आले.

# २

# जपानी वर्चस्वाचें रहस्य

**मनोरंजक विरोध—**

जपानी कुलुपें हिंदुस्थानांत लाखावरी येतात. पण खुद्द जपानमध्यें फारशीं कुलुपें लोक वापरीत नाहींत. कल्चर्ड मोतीं देखील जपानहून लाखों रुपयांचे इकडे येतात, पण जपानी स्त्रीचे अंगावर फुटका मणीही सांपडणें कटीण जाईल. जपानचें चीनशीं युद्ध चाललें आहे आणि रशियाविरुद्ध लढतांनाही त्यानें अलौकिक पराक्रम दाखविला. पण जपानी शहरांत दोन माणसें भांडतांना किंवा मारामारी करतांना कधींही दिसत नाहींत. विलायती पद्धतीनें नख-शिखांत सूट-बुटांत नटलेला जपानी मनुष्य देवळांत किंवा समाधिस्थानांत जाऊन मोठ्या भक्तिभावानें देवापुढें पैसा टाकून, टाळ्या वाजवून, तीर्थ प्राशन करून, कमरेपासून लवून हात जोडून नमस्कार करील. सामान्य जीवनांत विलासी आणि रंगेल प्रवृत्तीचा जपानी वेळ-प्रसंग येतांच पोटांत तरवार खुपसून घेऊन किंवा डोक्यांत पिस्तूल झाडून आत्महत्याही करून घेईल. बौद्धधर्मामुळें हिंदुस्थान निवृत्तिमार्गी बनला व त्याची अधोगति झाली असें आपण म्हणतों. पण बाराशें वर्षें बौद्धधर्माचा पुरस्कार करूनही जपानी लोक प्रवृत्तिमार्गी राहिले आणि विपरीत परिस्थितींतही जगांत पुढें आले.

वरील सर्व गोष्टींत जपानचा राष्ट्रस्वभाव भरलेला आहे. प्रत्येक समाजांत असे कांहीं विशिष्ट गुण असतात कीं त्यांमुळें तो समाज परिस्थितीशींही झगडून स्वतःचें स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवितो व जगांत मानमान्यता मिळवितो.

**जपानच कां पुढें आला ?—**

जपान आज आशियांतच नव्हे तर सर्व जगांत इतक्या थोड्या अवधींत पुढें आला ही केवळ दैवाची गोष्ट नाहीं. जपान केवळ सुदैवानें पुढें आलेला नाहीं, स्वतःचे गुणांमुळें वर आलेला आहे. राष्ट्रीय गुणांचा पुण्यसंचय त्याचे मागें आहे. दैववादावर त्याचा विश्वास नसून कर्मवादाचा तो पुरस्कर्ता आहे.

जपान स्वतंत्र आहे म्हणून त्यानें इतकी प्रगति केली, देशाचा आकार लहान असल्यामुळें त्याला आपलें स्वातंत्र्य टिकवितां आलें, त्याला परिस्थिति अनुकूल मिळाली, इत्यादि कारणमीमांसा करून जपानच्या यशाचा उलगडा करूं पाहणें सोपें आहे. ज्या देशांनीं जपानइतकी प्रगति केलेली नाहीं त्यांना अशा कारणमीमांसेमुळें समाधानही वाटणें शक्य आहे. परंतु एकाद्या राष्ट्राचें अंतरंग खरोखर समजून घ्यावयाचें असेल तर अशा उथळ कारणमीमांसेपेक्षां अधिक खोल जाणें जरूर आहे. जगांत किंवा आशिया खंडांत अशीं थोडीं का राष्ट्रें आहेत कीं जीं जपानसारख्याच परिस्थितींत होतीं ? पाश्चात्यांचा जपानशीं ज्या शतकांत संबंध आला त्याच सुमाराला पूर्वेकडील इतर देशांत त्यांनीं आपले हातपाय पसरण्यास प्रारंभ केला. तीं सर्व राष्ट्रेंही त्या वेळीं जपानप्रमाणेंच स्वतंत्र होतीं. आजही आशिया खंडांत अनेक राष्ट्रें स्वतंत्र आहेत. पण सर्वच "जपान" झालीं नाहींत. जपानचा आकार लहान असल्यामुळें त्यांत एकजूट राहूं शकली हें अनेक कारणांपैकीं एक असूं शकेल. पण आकारानें लहान अशीं राष्ट्रें आशियांत व यूरोपमध्येंही अनेक आहेत. सारांश, सर्व राष्ट्रें सारख्याच परिस्थितींत असतां एकाद्याच राष्ट्रानें विशेष प्रगति केली तर तिची अधिक खोल मीमांसा करणें जरूर आहे. राष्ट्रीय स्वभाव म्हणून प्रत्येक देशाला असतो. प्रत्येक शतकांत किंवा युगांत कांहीं विशिष्ट परिस्थिति येत असते. राष्ट्रीय गुणस्वभाव आणि

जगाची परिस्थिति या दोन्हींचा चांगला मेळ बसला म्हणजे राष्ट्राला उन्नतावस्था येते. या दोहोंत विसंगति झाली म्हणजे कांहीं काळ का होईना, तें राष्ट्र मागें पडतें. आजच्या युगाला अनुकूल असे गुण जपानी लोकांत होते किंवा ते संपादन करण्याची तत्परता त्यांच्यांत होती, म्हणून जपान आज पहिल्या पंक्तींत येऊन बसला आहे.

**जिवंतपणाची कसोटी—**

राष्ट्राच्या जिवंतपणाची खरी कसोटी काय? राष्ट्र परचक्रापासून स्वतंत्र ठेवणें, गेलेलें स्वातंत्र्य पुनः मिळविणें, स्वतंत्र राष्ट्राला अग्रेसर करणें आणि सुसंस्कृत समाज या दृष्टीनें श्रेष्ठत्व मिळविणें—हीं जिवंत समाजाचीं व देशाचीं लक्षणें आहेत. जपाननें आज वरील गोष्टी साध्य केल्या आहेत. हिंदुस्थान, चीन, दक्षिण बेटें, फिलिपाइन्स, इत्यादि देश ज्या काळांत परतंत्र झाले, त्याच काळांत जपाननें धोरणीपणानें गोऱ्या लोकांना हातभर दूर ठेवलें. लढाऊ जहाजांच्या आणि तोफांच्या जोरावर पाश्चात्यांनीं जपानपासून कांहीं हक्क संपादिले होते ते परत मिळवून जपाननें स्वतंत्र राष्ट्राचा आपला दर्जा प्रस्थापित केला. जगाच्या राष्ट्रमालिकेंत एक सामान्य राष्ट्र म्हणून जपानचा दर्जा होता. अवघ्या तीस चाळीस वर्षांच्या उद्योगानंतर आज पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत त्याची गणना होत आहे. सुसंस्कृत समाज या दृष्टीनें पाश्चात्य समाजालाही मोहनी पाडण्यासारखे सद्‌गुण जपानी समाजामध्यें आहेत. सौजन्य, सौंदर्याभिरुचि, कष्टाळू स्वभाव, सेवातत्परता, राष्ट्रप्रेम, इत्यादि सद्‌गुणांत जपानची बरोबरी करणारा समाज पाश्चात्य खंडांतही नाहीं.

स्वतंत्र, सुसंस्कृत आणि अग्रेसर राष्ट्र या दृष्टीनें थोड्या अवधींत जपाननें चांगला दर्जा संपादन केला आहे, त्याचें रहस्य काय तें पाहणें आवश्यक आहे.

**कारणत्रयी—**

समाजांतील परंपरा, व्यक्तींची कर्तबगारी आणि अनुकूल परिस्थिति

अशा तीन कारणांनीं देशाला त्याचा दर्जा प्राप्त होतो. अनेक पिढ्यांच्या संस्कारांमुळें प्रत्येक समाजांत कांहीं परंपरा, विचार, श्रद्धा आणि गुण हे चालत आलेले असतात. त्यांना समाजांतील व्यक्तींच्या बुद्धीची व कर्तबगारीची जोड मिळते. आणि या दोन्हींना अनुकूल परिस्थितीची जोड मिळाली तर तो समाज लौकर पुढें येतो. या दृष्टीनें जपानच्या समाजाची छाननी केली पाहिजे.

**सूर्यवंशी भूपालांचा अखंड वंश—**

जपानचा इतिहास अडीच हजार वर्षांचा आहे. त्यांतील विश्वसनीय असा इतिहास गेल्या दीड हजार वर्षांचा आहे. या काळामध्यें कांहीं विशिष्ट परंपरा व श्रद्धा दृढमूल झाल्या असून त्यांचे अवशेष समाजामध्यें आजही आहेत. सुदैवानें त्यांचा उपयोग जपानला राष्ट्रसंवर्धनाचे कामीं कसा झाला तें पाहण्यासारखें आहे.

आधुनिक जपानच्या एकीकरणाला आणि सामर्थ्यसंवर्धनाला राजसंस्थेचा अत्यंत उपयोग झालेला आहे. जपानचा सम्राट् हा परमेश्वराचा अवतार समजला जातो. जपानी राजवंशाचें असें अलौकिक वैशिष्टय आहे कीं एकच वंश अखंडितपणें आज अडीच हजार वर्षें चालत आलेला आहे. या वंशाची उत्पत्ति सूर्यदेवतेपासून आहे, अशी पौराणिक कथा असून सामान्य जनांचा तिच्यावर विश्वास आहे, आणि सुशिक्षित लोकही या कल्पनेविषयीं कधीं संशय घेत नाहींत; निदान बोलून दाखविणार नाहींत. जपानी भाषेंत राजाला "तेन्नो" अशी संज्ञा असून तिचा अर्थ "स्वर्गाधिपति" असा आहे. खड्ग, रत्न आणि दर्पण अशीं तीन राजचिन्हें आहेत. क्षात्रवृत्ति, चारित्र्य आणि आत्मनिरीक्षण अशा तीन गुणांचीं तीं निदर्शक आहेत. जपानचें राष्ट्र हें मोठें कुटुंब असून राजा हा या कुटुंबाचा जनक समजला जातो. पुरातन काळापासून चीनमधून कन्फ्यूशियन नीतिधर्म जपानमध्यें आला. राजनिष्ठा आणि पितृनिष्ठा हीं दोन तत्त्वें या धर्मांत असल्यामुळें तो जपानच्या राजसंस्थेला पोषकच झाला. पाश्चात्यांचा हल्ला जपानवर झाला त्या वेळीं ही राजसंस्था जपानचे उपयोगी पडली. तिच्या छत्राखालीं जपानची एकजूट

झाली, व तिनें पाश्चात्य आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार केला. गेल्या तीन पिढ्यांत झालेले राजेही कर्तबगारीनें, वृत्तीनें आणि चारित्र्यानें आदर्शभूत असल्याकारणानें राजाविषयींचा जपानी जनतेचा भक्तिभाव कायम राहिलेला आहे. ऐन अडचणीच्या वेळीं जपानला राजसंस्थेचा उपयोग झालेला असल्यामुळें व आजही एकीकरणाचें व एकनिष्ठेचें तें एक महत्त्वाचें साधन असल्यामुळें भावी काळांत कांहीं पिढ्या तरी राजसत्ता अबाधित राहील, आणि तिच्या छत्राखालीं जपान एकजुटीनें नांदेल.

**राष्ट्रकुटुंबाची पितृपूजा, शिंतोधर्म—**

सर्व जपानी लोकांना एकनिष्ठेनें बांधून ठेवणारी दुसरी परंपरा म्हणजे "पितृपूजा" (शिंतो) ही होय. आद्यपूर्वजांपासून आजतागायत जे पितर झाले ते सर्व देव. त्यांपैकीं प्रमुख अशा वीरांच्या, विभूतींच्या आणि राजांच्या समाधी देशांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या आहेत. राष्ट्रीय स्मारकें म्हणून या समाधिस्थानांची सरकारकडून काळजी घेतली जाते. हीं सर्व स्थानें निसर्गरम्य अशा ठिकाणीं आहेत. त्या ठिकाणीं गेल्यानंतर शांत, उदात्त, आणि गंभीर मनोवृत्ती निर्माण होतील अशा प्रकारचें वातावरण तेथें असतें. मुख्य समाधिस्थान अतिशय साधें, क्वचित् गवताच्या झोंपडीसारखें असतें. परंतु त्या स्थानाला पोंचण्यापूर्वीं कांहीं काल उंच उंच वृक्षांच्या राजीमधून मनुष्य जातो आणि समाधीचें दर्शन घेण्यापूर्वीं स्वतःच्या मनाची सात्त्विक अशी तयारी करितो. राष्ट्रीय सणाच्या, महोत्सवाच्या किंवा विशेष प्रसंगाच्या दिवशीं देशांतील बहुसंख्य आबालवृद्ध समाज या समाधींच्या दर्शनाकरितां जातो. सर्वांचे पूर्वज एकच आहेत ही भावना लोकांचे अंतःकरणांत असल्यानें राष्ट्र हें एक कुटुंबच झालें आहे. जपानी लोकांचा हा राष्ट्र-कुटुंबवाद समजला तर त्यांच्या अनेक सामाजिक, आर्थिक व राजकीय धोरणांचा उलगडा होऊं शकेल. युद्धाला जाणारे सैनिक या समाधींचा आशीर्वाद घेऊन जातात. युद्धांत पतन पावलेले सैनिक या समाधींत अंतर्भूत होतात. तोकियोमध्यें "यासुकिनी समाधि" आहे. जपानचें आधुनिक युग सुरू झाल्यापासून जे वीर धारातीर्थीं पडले व पडतील त्या सर्वांचेकरितां ही समाधि

किंवा वीरांचें स्मारक आहे. या समाधीचा महोत्सव असतो त्या रात्रीं लाखों लोक दर्शन घेऊन जातात. बारा वर्षांचे वरील सर्व युवकांच्या पलटणी खाकी पोषाख चढवून व खांद्यावर बंदूक ठेवून या समाधीचें दर्शन घेऊन जातात. पूर्वापार चालत आलेल्या पूर्वजांच्या या समाधी आधुनिक जपानला सामर्थ्य आणि एकजीव देण्याचे दृष्टीनें फार उपयोगी पडल्या व पडत आहेत.

**राजनिष्ठा हीच देशनिष्ठा—**

जपानमध्यें राजा म्हणजे देश आणि देश म्हणजे राजा असें समीकरण आहे. त्या कारणानें राजनिष्ठा म्हणजेच देशनिष्ठा अशी स्थिति आहे. या अर्थानें प्रत्येक जपानी अत्यंत राजनिष्ठ व देशनिष्ठ आहे. रणांगणावर देह ठेवितांना जपानी सैनिक "तेन्नो तेन्नो" (सम्राटाचा जयजयकार) करून प्राण सोडतो. राजाकरितां आणि देशाकरितां जपानी लोक अत्यंत अचाट आणि साहसाचीं कामें स्वार्थत्यागानें आणि निरपेक्षतेनें करूं शकतात अशीं अनेक उदाहरणें आहेत. रूसो-जपानी युद्ध, मँच्युरियांतील चिनी-जपानी युद्ध, व उत्तर चीन प्रकरणीं चाललेला "प्रसंग", या तिन्ही वेळीं जपानी सैनिकांनीं व त्यांच्या कुटुंबीयांनीं अलौकिक स्वार्थत्याग केल्याचीं प्रसिद्ध उदाहरणें आहेत. थोडक्यांत कल्पना द्यावयाची म्हणजे जपानच्या पराक्रमाचा इतिहास रजपूतांच्या इतिहासासारखा आहे.

**बुशिदोचें ब्रीद—**

आपल्याकडे जसा क्षत्रिय वर्ग तसा जपानमध्यें सामुराई वर्ग होता. या वर्गाचा आचारधर्म स्वतंत्रच होता. त्याला 'बुशिदो' असें नांव असे. स्वाभिमानी स्वभाव, जाज्वल्य स्वामिनिष्ठा, बलिदानाची तयारी, साधी राहणी आणि मनोनिग्रह, हीं बुशिदो आचारधर्माचीं मुख्य सूत्रें होतीं. आज सामुराई वर्ग कायद्यानें नष्ट केलेला असला तरी त्याचा आचारधर्म सर्व राष्ट्रांत संचरलेला आहे. स्वामीच्या किंवा स्वतःच्या मानापमानाकरितां प्राणार्पण किंवा आत्महत्या करणें हा जपानच्या अंगीं मुरलेला धर्मच होता व पुष्कळ अंशीं आजही आहे. बौद्धधर्मांतून पुनर्जन्माची कल्पना जपानी

लोकांनीं घेतली, तिच्यामुळें या आत्मबलिदान प्रवृत्तीला अधिकच पुष्टि मिळाली. विशेष प्रसंगीं जपानी लोकांची 'हाराकिरी' ऐकण्यांत येते. (हारा = पोट; किरी = कापणें.) वैयक्तिक अथवा राष्ट्रीय मानापमानाचें परिमार्जन करण्याकरितां आणि निषेध अथवा पश्चात्ताप व्यक्त करण्याकरितां, हाराकिरी हा परंपरेनें चालत आलेला राष्ट्रीय आचारधर्म आहे.

**जुन्या काळचे गुण—**

कालमानाप्रमाणें जपानी समाज विसाव्या शतकांत राहात असला तरी कांहीं मनोवृत्तीनें तो मध्य युगांतील समाज आहे. जपानमध्यें आधुनिक राज्य व समाजपद्धति गेल्या शतकाचे अखेरी अखेरीस सुरू झाली. त्यापूर्वीं सरंजामी पद्धति प्रचारांत होती. प्रत्येक प्रांताचा एक मुख्य सरदार असे. त्याचे हाताखालचे सर्व लोक त्याचे दास असत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पना त्या वेळीं अस्तित्वांत नव्हत्या व अद्यापही जपानला त्या फारशा शिवलेल्या नाहींत. स्वामी आणि सेवक या नात्याचा अनुभव जास्त आणि त्याची आवडही अधिक. जर्मन स्वभावाला शिस्त आणि आज्ञापालन हे गुण मानवतात, तसेंच जपानी लोकांचेंही आहे. पुढारी, अधिकारी, वीर पुरुष, विभूति आणि राजा यांविषयीं श्रद्धाळूपणा, पूज्यभाव, सेवातत्परता, आज्ञापालन आणि बलिदानाची तयारी हे गुण जपानी समाजांत पूर्वापार परंपरेनें चालत आलेले आहेत आणि आजही उत्कटतेनें दिसून येतात.

**ग्रहणशील वृत्ति व सहिष्णु संस्कृति—**

भौगोलिक दृष्ट्या जपान हें बेट बाजूला पडल्यासारखें दिसतें. पण ऐतिहासिक दृष्ट्या पाहिलें तर आशिया खंडाशीं, विशेषतः कोरिया, चीन आणि दक्षिण बेटें यांच्याशीं त्याचा एकसारखा संबंध आलेला आहे. चीन, कोरिया आणि हिंदुस्थान या देशांतील संस्कृतींचें शांत आक्रमण प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मार्गानें जपानवर झालेलें आहे. संस्कृतीचे दृष्टीनें जपानचा इतिहास पाहिला तर त्याची उत्कट ग्रहणशील वृत्ति दिसून येते. हीच ग्रहणशीलता जपाननें आजपर्यंत टिकविली आहे. त्यामुळें पौर्वात्य आणि पाश्चिमात्य

संस्कृतींमधील उपयुक्त भाग पचनीं पाडण्याचें काम सोपें झालें. जपानमध्यें परंपरागत संस्कृतीची आवड आहे, पण फाजील रूढिप्रियता नाहीं. परिस्थितीशीं समरस होऊन मिळतें घेण्याची जपानी वृत्ति असल्यानें जगांतील उत्कृष्ट गोष्टींचा तिनें फायदा घेतला. जपानी संस्कृति स्वाभिमानी असली तरी मत्सरी नाहीं. परकीय संस्कृतीच्या सान्निध्यांतही ती शुद्ध स्वरूपानें व ग्रहणशील प्रवृत्तीनें राहूं शकते.

**तारक-मारक परंपरांची निवड—**

परंपरा या समाजाला कधीं तारक होतात तर कधीं मारकही होतात. चिकित्सक वृत्तीनें निवडानिवड करून सामर्थ्यपोषक परंपरा टिकविणें व हानिकारक परंपरांना नष्ट करणें हें समाजधुरीणांचें कर्तव्य आहे. आधुनिक जपान निर्माण करणाऱ्या पुढाऱ्यांनीं जातिभेद इत्यादि सामर्थ्यहानि करणाऱ्या परंपरा नष्ट केल्या, परंतु इतर परंपरा टिकविल्या. राष्ट्राला सामर्थ्य देऊन एकनिष्ठा उत्पन्न करण्याचे दृष्टीनें त्यांचा जपानला चांगला उपयोग झाला. कदाचित् याच परंपरा पुढें हानिकारकही होतील ! परंतु तो भावी काळच्या पुढाऱ्यांचा प्रश्न आहे. आज तरी जपाननें आपलें डोकें वर काढलें आहे.

**सामान्य व्यक्ती, सामर्थ्यवान् समष्टि—**

जपानच्या अभ्युदयाला त्याच्या कांहीं परंपरा कशा कारणीभूत झाल्या तें वर दाखविलेंच आहे. आतां वैयक्तिक किंवा सामुदायिक बुद्धि आणि कर्तबगारी या दृष्टीनें थोडें निरीक्षण करणें जरूर आहे. या ठिकाणीं जपानी समाजाचें एक वैशिष्टय दिसून येतें. जपानचें सामर्थ्य व्यक्तींत नसून समूहांत आहे. एकेक व्यक्ति घेतल्यास ती इतर राष्ट्रांतील व्यक्तींच्या मानानें सामान्य तोलाची ठरेल. जपानांत टिळक-गांधी-टागोर यांच्या तोलाची अलौकिक विभूति क्वचितच आढळून येते. परंतु सामान्य व्यक्ती समूहानें जें काम करितात त्यामुळें अलौकिक विभूतीचा अभाव भरून निघतो. याचा अर्थ जपानी लोकांत कर्तबगार व्यक्ती नाहींत असा नव्हे; पण अलौकिक व्यक्ती नाहींत. विशिष्ट प्रसंगानें, सरकारी आश्रयामुळें किंवा विशेष स्थान-

महात्म्यामुळें पुढें आलेल्या व्यक्ती अनेक आहेत. परंतु इतर देशांत जसें एकेका जगप्रसिद्ध व्यक्तीचें नांव त्या देशाशीं निगडित झालेलें आहे तशीं नांवें जपानमध्यें नाहींत. जपानचें सामर्थ्य व्यक्तींत नसून समूहांत आहे. व्यक्तिदृष्टया बुद्धि व कर्तबगारी कमी असली तरी समष्टिदृष्टया सामर्थ्य अधिक. त्या सामर्थ्याचे जोरावर सामान्य बुद्धीही असामान्य कार्य करूं शकते.

**संथ व कष्टाळू बुद्धि—**

जपानी लोकांची बुद्धि सामान्य आहे. त्यांची ग्रहणशक्ति अगदीं संथ आहे. विचाराची तडफ बेताची. स्वतंत्र विचाराची संवय कमी. वादविवाद, सूक्ष्म आणि तात्त्विक विचार यांची फारशी हौस नाहीं. परंतु बौद्धिक कष्टाची तयारी मात्र दांडगी आहे. जपानी लोक सावकाश विचार करतील किंवा स्वीकारतील, परंतु एकदां घेतलेला विचार किंवा ग्रह लौकर सोडणार नाहींत. व्यक्ति या दृष्टीनें विचार केल्यास हिंदी लोक जपानी लोकांपेक्षां बुद्धीनें अधिक तीव्र आणि तडफदार आहेत. पण जपानी लोक अधिक कष्टाळू आणि निग्रही आहेत. विद्यापीठांतून आणि प्रयोगशाळेंतून रात्रंदिवस काम करणारे भगीरथप्रयत्नी जपानी पंडित पाहिले म्हणजे आश्चर्य वाटतें. दोन विद्यापीठांत अध्यापनाचें काम करून शिवाय एकाद्या औद्योगिक प्रयोगशाळेशीं संशोधक या नात्यानें संबंध असलेले किती तरी पंडित आहेत. बौद्धिक क्षेत्रांत असलेली ही कष्टाळू वृत्ति समाजांतील प्रत्येक कार्यक्षेत्रांत दिसून येते.

**तत्त्वापेक्षां तंत्राची आवड—**

बौद्धिक क्षेत्रांतील कमीपणा जपाननें तांत्रिक क्षेत्रांत भरून काढलेला आहे. जपानी लोकांचा मेंदू त्यांचे हातांचे बोटांत आहे असें लाक्षणिक अर्थानें म्हणावयास हरकत नाहीं. तात्त्विक विचारांत संथपणें चालणारे हे लोक यांत्रिक आणि हस्तव्यवसायाचे क्षेत्रांत अतिशय चपळ आहेत. अमेरिकन विद्यापीठांत असें दिसून येतें कीं तात्त्विक विषयांत हिंदी विद्यार्थी प्रावीण्य मिळवितात तर यांत्रिक-तांत्रिक विषयांत जपानी विद्यार्थी श्रेष्ठ ठरतात.

हा एक राष्ट्रीय स्वभावगुण आहे. पाठीवर मूल घेऊन रिकामी उभी असलेली साधी मोलकरीण देखील उभ्या उभ्या मातीची किंवा मक्याच्या पाचोळ्याची एकादी बाहुली निर्माण करील! या गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यानें पाहतां येतात. जपानचे मूळ रहिवाशी "आइनू" लोक हे हस्तव्यवसायांत फार प्रवीण होते असें सांगतात. त्यांचा गुण बहुजन समाजांत पसरलेला आहे. औद्योगिक क्षेत्रांत इतक्या थोड्या अवधींत पाश्चात्यांनाही मागें टाकण्याइतकी प्रगति जपाननें केली त्याचें मुख्य कारण असें कीं, लोकांचा स्वाभाविक कल हस्तव्यवसायांकडे व यांत्रिक उद्योगाकडे आहे. आजच्या औद्योगिक युगाला अनुकूल असाच स्वभावगुण जपानी लोकांत असल्यामुळें काळ आणि गुण यांची चांगली युति जमून आली आहे.

**अनुकूल परिस्थितींत जागरूकता—**

समाजांतील परंपरारूपी पूर्वपुण्याई, आणि वैयक्तिक अथवा सामुदायिक कर्तबगारी, यांना अनुकूल परिस्थिति मिळाली तर राष्ट्राला विशेष प्रगति करतां येते, तसें जपानचें झालें. रूसो-जपानी युद्धापासून जपान आधुनिक जगांत पुढें आला. या युद्धांत जपाननें अलौकिक स्वार्थत्याग आणि पराक्रम दाखविला तरी केवळ त्यामुळेंच जय मिळाला असें नाहीं. रशियाचा पराजय होण्यांत त्या वेळीं कांहीं युरोपियन राष्ट्रांचें हित असल्यामुळें त्यांचीही मदत जपानला झाली ही गोष्ट जमेस धरली पाहिजे. परंतु या एका जयामुळें जपानला आत्मविश्वास आला, तोच भावी प्रगतीचा पाया झाला. महायुद्धांत पाश्चात्य लोक युद्धांत गुंतले त्या परिस्थितीचा फायदा घेऊन जपाननें औद्योगिक क्षेत्रांत आपली प्रगति करून घेतली व पाश्चात्यांचें कांहीं क्षेत्र व्यापलें. अलीकडच्या काळांतही पाश्चात्य राष्ट्रांच्या असंनद्धतेचा फायदा घेऊन जपाननें पूर्वेकडील आपलें आक्रमण चालू ठेविलें. परिस्थिति अनुकूल मिळाली आणि तिचा फायदा घेण्याची जागरूकता जपाननें दाखविली, यांत त्याचें राष्ट्रीय वैशिष्टच आहे.

**जपानचें भवितव्य—**

आजच्या काळांत जपानला वर्चस्व कसें प्राप्त झालें याची जी मीमांसा

वर केली, तीवरून हें वर्चस्व अबाधित राहील असा सिद्धांत मात्र निघत नाहीं. पुष्कळ वेळां ज्या गुणांचे जोरावर प्रगति होते त्याच गुणांमुळें राष्ट्राची अधोगति होण्याचाही संभव असतो. हा कालमानाचा आणि युगाचा प्रश्न आहे. आजच्या जागतिक प्रवृत्तीला पोषक अशी जपानची परिस्थिति व राष्ट्रीय स्वभाव असल्यामुळें तो पुढें आला. राष्ट्रनिष्ठा, औद्योगिक प्रवृत्ति, आणि भौतिक सामर्थ्य हे आजच्या युगाचे विशेष आहेत; त्यांना पोषक असे गुण जपानी लोकांत असल्यामुळें ते पुढें आले. परंतु थोडा सूक्ष्म विचार केला तर असें दिसून येईल कीं कांहीं विशिष्ट विचारांचे वातावरणांत टिकून राहिलेले गुण विचारांचें वातावरण बदलल्यानंतर स्वाभाविकपणें शिथिल होतील. सांप्रदायिक राजनिष्ठा, भावनानिष्ठ देशप्रेम, श्रेष्ठांविषयीं अंध-श्रद्धा, इत्यादि गुण बुद्धियुगांत टिकणारे नाहीत. राजा हा परमेश्वराचा अवतार आहे असें मानणें ही राजनिष्ठा; पुढाऱ्यांचें अंधपणें आज्ञापालन करणें ही देशभक्ति; रणक्षेत्रांतील पराक्रम हाच पुरुषार्थ; अर्थप्राप्तिनिरपेक्ष श्रम करणें हा व्यक्तिधर्म—इत्यादि कल्पनांना सर्व जगांत धक्का बसलेला आहे. भूकंपाचे धक्के सोसणाऱ्या जपाननें हा धक्का अद्याप देशाबाहेर थोपवून धरला आहे. परंतु तो केव्हांना केव्हां तरी त्याच्या विचारक्षेत्राला स्पर्श केल्याशिवाय राहणार नाहीं. अशा वेळीं उपयोगी पडणारी विचारांची भूमिका जपानजवळ आहे कीं काय हा प्रश्न आहे. आज तशी भूमिका नाहीं. जी वैचारिक भूमिका तयार करण्याचा जपानचा प्रयत्न आहे ती नवीन नाहीं; पूर्वग्रह किंवा परंपरागत समजुती यांनाच तत्त्वज्ञानाचें स्वरूप दिलें जात आहे. भावी काळाचे पोटांत कांहींही असो. आज तरी जपानला पूर्वपुण्याई आणि राष्ट्रीय स्वभाव यांचे जोरावर महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं.
ता.
ठाणे.

# ३

# आधुनिक युगाला प्रारंभ

**हिंदी व जपानी योगायोग—**

इतिहासांत कांहीं योगायोग कसे विचित्र येतात! महाराष्ट्रांत जिजाई मातेच्या मांडीवर बाल शिवाजी राजे अंगाई गीत ऐकत असतां सर्व हिंदुस्थानमध्यें पोर्तुगीज, डच, फरेंच, इंग्लिश, इत्यादि परकीयांना मोकळे-पणानें संचार आणि व्यापार करण्याची परवानगी मिळाली होती. त्याच सुमाराला जपानमधून या लोकांची हकालपट्टी झाली होती. व्यापाराच्या मिषानें धार्मिक आणि राजकीय बाबतींत ढवळाढवळ करूं लागल्यामुळें १६२४ मध्यें स्पॅनिश लोकांना, १६३८ मध्यें पोर्तुगीज व्यापाऱ्यांना आणि १६२३ मध्यें इंग्लिशांना जपानमध्यें व्यापार किंवा धर्मप्रसार करण्याची जपानी सरकारनें बंदी केली होती.

अडीचशें वर्षांत काळ उलटला. ज्या गोऱ्या परकीयांचे दोन तीनशें वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर स्वागत झालें त्यांना बाहेर हांकून लावण्या-करितां १८५७ मध्यें हिंदी लोकांचा प्रयत्न सुरू झाला. उलट याच सुमाराला म्हणजे १८५४ पासून जपानमध्यें गोऱ्या लोकांवरील अडीचशें वर्षांचे निर्बंध उठविले गेले आणि आजपर्यंत बंद असलेलीं बंदरें त्यांना खुलीं झालीं.

आज जपान व हिंदुस्थान दोन्हीही देशांत पाश्चात्य गोरे लोक आहेत. पण दोन्ही ठिकाणीं त्यांचें स्थान किती भिन्न आहे! एका ठिकाणीं ते सिंहासनावर बसले आहेत, तर दुसरीकडे ते सिंहासनापुढें उभे आहेत. हा फरक कशामुळें झाला? योगायोग कीं योजना?

१८५७ सालचे 'बंडा' पासून जपानचाही आधुनिक इतिहास सुरू होतो. राजकीय व सामाजिक दृष्टचा हिंदुस्थानच्या व जपानच्या इतिहासांत पुष्कळ साम्य आहे. परंतु एका विशिष्ट परिस्थितींत जपाननें आपला निराळा मार्ग आंखून राष्ट्रीय जीवनांत मोठी क्रांति केली. तो वृत्तांत अत्यंत बोधप्रद व मननीय आहे. १८६८ मध्यें व पासून जपानमध्यें झपाट्यानें क्रांति झाली आहे. तिचें राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि बाह्यजीवनविषयक स्वरूप पाहण्यासारखें आहे.

**ऐतिहासिक भूमिका—**

जपानी लोकांचे पूर्वज सूर्यदेवतेपासून निर्माण झाले असें त्यांचें म्हणणें आहे. इतिहासदृष्टचा विचार केला तर असें दिसून येतें कीं, जपानच्या भोंवतालीं असलेल्या प्रदेशांतील लोकांचें जपानच्या बेटांवर आक्रमण होऊन त्यांचे व मूळ रहिवाश्यांचे मिश्रणानें आजचा जपानी समाज निर्माण झाला आहे. पश्चिमेकडून कोरिया, मंगोलिया, चीन, इत्यादि प्रांतांतून व दक्षिणेकडून फिलिपाइन व दक्षिण बेटें, आन्नम्, मलाया, इत्यादि प्रदेशांतून जे धाडशी लोक बाहेर पडले ते जपानच्या बेटांवर जाऊन राहिले. घर सोडून बाहेर पडणाऱ्या माणसांत कांहीं विशेष रग असते. कर्तबगार, धाडसी, आत्मविश्वासू आणि मेहनती असेच लोक देशाबाहेर जाऊन वस्ती करून राहतात. अशा वृत्तीचे निवडक लोक भोंवतालच्या प्रदेशांतून आले व जपानमध्यें वस्ती करून राहिले. त्यामुळें कांहीं विशिष्ट गुणांची परंपरा जपानमध्यें सुरू झाली. जपान बेट लहान आणि एका बाजूला असलें तरी तेथील लोक घरांत बसून राहिले नाहींत. शेजारीं कोरिया, चीन, खालीं दक्षिण बेटें, इत्यादि प्रांतांशीं व्यापार, चांचेगिरी आणि लढाया, इत्यादि अनक निमित्तांनीं त्यांचे संबंध आले. कोरिया, चीन आणि जपान यांचे लढाऊ संबंध अलीकडच्या



आधुनिक जपानी व्यापाराचें केंद्र

स्थळ प्रत
नं. नि. नं. ५५२६
ता. ........
ठाणें



आकाशाचे देखावे दाखविणारें यंत्र.

काळांत आलेले नसून पूर्वापार चालत आलेले आहेत. परस्परांनीं एकमेकांच्या मुलुखांत चांचेगिरी आणि स्वाऱ्या करणें या गोष्टी दोन हजार वर्षें तरी चाललेल्या आहेत. इसवी सनाच्या दुसऱ्या शकतामध्यें जिंगो नांवाच्या जपानी राणीनें स्वतः पुढाकार घेऊन कोरियावर स्वारी केली होती. जपानचे कोरिया-चीनशीं केवळ राजकीय संबंधच आले असें नाहीं, तर विशेष महत्त्वाचे असे सांस्कृतिक संबंध आले. बुद्ध संस्कृति हिंदुस्थानांतून चीनमध्यें, तेथून कोरियांत आणि कोरियामार्गें जपानमध्यें गेली. चीनमधील कन्फ्यूशियन नीतिधर्माचा प्रसारही जपानमध्यें परिणामकारक झाला.

जपानी लोक असें अभिमानानें सांगतात कीं, अडीच हजार वर्षांचे काळांत जपान कधींही परकीयांचे अंमलाखालीं गेला नाहीं. चीन व रशिया यांचीं एवढें मोठीं बलाढ्य साम्राज्यें शेजारीं असूनही जपान अपराजित राहिला.

आधुनिक कालापूर्वीचा, म्हणजे १८५७ पूर्वीचा, जपानचा इतिहास सामान्यपणें इतर कांहीं राष्ट्रांसारखाच आहे. या काळांत राजसत्ता अखंडित चालू राहिली पण ती दुर्बल होती. त्या कारणानें बलिष्ठ सरदारांनीं वजीर व्हावे व कारभार चालवावा आणि इतर सरदारांना आपल्या हुकमतींत ठेवण्याचा प्रयत्न करावा असा क्रम चाले. सर्व प्रांतीय सरदारांवर हुकमत ठेवून कांहीं प्रमाणांत मध्यवर्ती सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न सोळाव्या शतकांत यशस्वी झाला.

**गोऱ्या लोकांना बंदी—**

सोळाव्या शतकापासून पाश्चात्य धर्मप्रसारकांचा व व्यापाऱ्यांचा जपानशीं संबंध येऊं लागला. पोर्तुगीज, डच, स्पॅनिश, इंग्लिश सर्व लोक जपानशीं व्यापार करूं लागले, व पोर्तुगिजांनीं ख्रिस्ती धर्मप्रसाराला प्रारंभ केला. धर्माचे बाबतींत जपानी लोकांची वृत्ति सहिष्णु आणि उदार असल्यामुळें नवीन धर्माचा झपाट्यानें प्रसार होऊं लागला. याप्रमाणें पन्नास पाऊणशें वर्षें गेलीं. पुढें या नवीन धर्मप्रसारकांनीं स्थानिक धर्माशीं विरोध

मांडला आणि धर्माबरोबर राजकारणही येऊं लागलें. जपानी राज्यकर्त्यांनीं पाश्चात्य देशांत व इतरत्र आपले हेर पाठवून या धर्मप्रसाराचे मुळाशीं काय हेतू आहेत त्याचा तपास लावला. धर्माचे नांवावर लोकांची सहानुभूति संपादन करावयाची व पुढें राज्यावर आक्रमण करावयाचें असें गोऱ्या लोकांचें धोरण आहे अशी जपानी राज्यकर्त्यांची खात्री झाली. त्यामुळें पाश्चात्य व्यापारी आणि धर्मप्रसारक या सर्वांचे संचाराला त्यांनीं अतिशय कडक प्रतिबंध केला. सतराव्या शतकांत परकीय आणि स्वकीय ख्रिस्ती लोकांचे अत्यंत हाल करून तो धर्म बाह्यतः तरी त्यांनीं नामशेष करून टाकला. डच लोक व्यापारापलीकडे धर्म वगैरे कांहीं जाणत नव्हते, म्हणून फक्त त्यांना एका नागासाकी बंदरांतून मर्यादित प्रमाणांत व्यापार करण्याची परवानगी मिळाली.

**जपानचा एकांतवास—**

पाश्चात्यांचें आक्रमण होऊं नये म्हणून त्यांच्यावर जसें नियंत्रण घातलें गेलें तसेंच पाश्चात्यांशीं संबंध ठेवणाऱ्या जपानी लोकांवरही नियंत्रण घातलें गेलें. अशा रीतीनें पाश्चात्यांचें भावी धोरण ओळखून अगदीं आरंभींच त्यांचेवर प्रभावी नियंत्रण घालण्याचें काम जपाननें केलें ही गोष्ट आशिया खंडाचे आधुनिक इतिहासांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

बाहेरच्या राष्ट्रांशीं संबंध मर्यादित झाल्यामुळें जपानला दोन अडीचशें वर्षें शांतता मिळाली. या अवधीमध्यें हिंदुस्थान व पूर्वेकडील इतर प्रदेश हे पाश्चात्यांच्या आक्रमणाला बळी पडले. त्यांचा धर्म, व्यापार आणि राजकारण पूर्व आशियांत सर्वत्र चालू असतां केवळ जपानच त्यापासून अलिप्त असावा हें अर्थातच त्यांना रुचणें शक्य नव्हतें. जपानचा व्यापार पाश्चात्यांना पाहिजे होता. जपान त्याला सुखासुखी तयार होईना. या सुमारास जपानच्या विचाराला धक्का देणारा प्रसंग घडून आला. तेथपासून आधुनिक जपानच्या क्रांतीला प्रारंभ झाला. १८५३ मधील हा प्रसंग.

**तोफा दाखवून मैत्रीचा तह—**

अमेरिकन सरकारनें कमोडोर पेरीच्या हाताखालीं कांहीं जहाजें

देऊन त्याला जपानशीं व्यापारी तह करण्याकरितां १८५३ मध्यें पाठविलें. त्यानें बोलणें सुरू केलें, परंतु परकीय व्यापाऱ्यांना आपलीं बंदरें खुलीं करण्याचें जपाननें नाकारलें. पेरीनें आणखी एक वर्षाची मुदत विचाराकरितां दिली आणि पुन: येतों असें सांगून तो निघून गेला. पुढच्याच वर्षी तो संकेताप्रमाणें आला. बरोबर आरमारी जहाजें. जहाजांवर तोफा चढविलेल्या. 'व्यापारी तह करा नाहीं तर तोफा डागतों' असें सांगून पेरीनें 'मैत्रीचा' तह करण्याविषयीं सुचविलें. जपानी लोकांना गत्यंतरच नव्हतें. त्यांच्याजवळ प्रतिकाराला तोफा किंवा लढाऊ जहाजें नव्हतीं. तह करणें भाग पडलें. झालें. लगेच इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, रशिया, इत्यादि सर्वांनीं भराभर व्यापारी तह करून आपापलें आसन जपानी बंदरांत ठोकलें.

**स्वेच्छेनें राज्यक्रांति—**

अडीचशें वर्षांच्या काळांत जपाननें पाश्चात्यांपासून आपला देश आलप्त व स्वतंत्र राखला. परंतु भावी काळांत त्यांचें आपल्या देशावर आक्रमण झालें तर स्वसंरक्षणाकरितां आधुनिक शस्त्रास्त्रांची तयारी आवश्यक होती ती त्यानें केली नाहीं. ही चूक तत्काळ पुढाऱ्यांचे लक्षांत आली.

पाश्चात्यांनीं तोफांचे जोरावर आपल्या जमिनीवर पाय रोंविले हें स्वाभिमानी जपानी सरदारांना आवडलें नाहीं. त्यांनीं तात्पुरतें नमतें घेतलें; परंतु झालेली चूक तत्काळ सुधारण्याचा संकल्प मनाशीं केला.

या वेळेपर्यंत राजा नामधारी असून सर्व सत्ता शोगूनचे म्हणजे वजिराचे हातांत होती. प्रांतिक सत्ता अनेक सरदारांमध्यें विभागलेली होती. पाश्चात्यांना प्रभावी प्रतिकार करावयाचा तर राष्ट्रामध्यें एकजूट आणि मध्यवर्ती सत्ता स्थापन झाल्याशिवाय शक्य नाहीं ही गोष्ट पुढाऱ्यांनीं ओळखली. वजिरानें—शोगूननें—अधिकारसंन्यास करून सर्व सत्ता राजाचे चरणीं अर्पण करावी अशी त्यांनीं वजिराला विनंति केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शेंकडों वर्षें उपभोगलेली ही सत्ता वजिरानें निमूटपणें राजाला अर्पण केली. सर्व सरदारांनीं या कृत्याचें अनुकरण करून आपापले अधिकार सोडून

दिले आणि राजाला सर्वसत्ताधारी केलें. सरदारांना त्यांच्या पूर्वीच्या उत्पन्नाचा एकदशांश हिस्सा देण्यांत आला. अशा रीतीनें ऐन आणीबाणीचे वेळीं जपानी वजिरानें व सरदारांनीं अलौकिक स्वार्थत्याग करून मध्यवर्ती सत्ता स्थापन केली. ही शांततेची अधिकारक्रांति १८६७ मध्यें झाली. परंतु या राजकीय क्रांतीनें भावी जपानच्या सामाजिक आणि आर्थिक क्रांतीचा पाया घातला.

योगायोग असा आला कीं या वेळीं राजाचा मुकुट ज्याचे डोक्यावर चढला तो मेइजी सम्राट् अत्यंत दूरदर्शी, प्रगतिशील, धोरणी आणि धैर्यवान् असा निघाला. आधुनिक जपानचा पाया त्यानें घातला.

तोकियोमध्यें एका विस्तीर्ण उद्यानांत मेइजी सम्राटाची समाधि आहे. या ठिकाणीं हजारों लोक रोज जाऊन आदरानें आणि कृतज्ञतेनें आपलें शरीर कमरेपासून वांकवितात आणि आशीर्वाद मागतात.

मेइजीच्या कारकीर्दींत त्याला माणसेंही कर्तबगार मिळालीं. त्यांनीं जें धोरण घालून दिलें त्याप्रमाणें आजचा जपान चालला आहे.

**मानसिक संक्रमण—**

मेइजी युगांत जी क्रांति घडून आली ती मुख्यतः मानसिक स्वरूपाची होती. जपानला प्रत्येक बाबतींत पाश्चात्य लोकांबरोबर आलें पाहिजे हें एक सूत्र हृदयाशीं बाळगून मेइजी आणि त्याचे सहकारी यांनीं जपानच्या सर्व जीवनांत आमूलाग्र सुधारणा करण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं स्वीकारलेलें धोरण आजही चालू असून आतां त्याची उत्कटता वाढली आहे एवढाच फरक. पूर्वीचें धोरण पाश्चात्यांचे बरोबर प्रत्येक बाबतींत यावें असें होतें. आजचें धोरण पाश्चात्यांचेंच क्षेत्रांत त्यांचेवर कांकणभर सरशी करावी असें आहे. ही वृत्ति केवळ राजकीय आणि औद्योगिक क्षेत्रांतच आहे असें नव्हे, तर खेळ, करमणुकी, कला, इत्यादि इतर क्षेत्रांतही आहे.

**राजघराण्यांतील जीवनक्रांति—**

जपानी राष्ट्रांत सार्वांगिक क्रांति किती जलद झाली हें मेइजीच्या

स्वतःच्या उदाहरणावरूनच दिसून येईल. तोकियोमध्यें एक मेइजी-चित्रालय आहे. तेथें मेइजी बादशहाच्या चरित्रांतील महत्त्वाचे प्रसंग भव्य चित्रांच्या रूपानें प्रसिद्ध चितार्‍यांनीं रंगविलेले आहेत. या चित्रालयाचीं दोन दालनें आहेत. एका दालनांत नवीन धोरण स्वीकारण्यापूर्वींचीं चित्रें आहेत; दुसर्‍या दालनांत त्यानंतरचे प्रसंग आहेत. या दोन दालनांतील चित्रांवरून मेइजीच्या आणि देशाच्या आयुष्यांत एकदम किती फरक पडला तें दिसून येतें. पहिल्या विभागांतील चित्रांत राजा, राणी, त्यांचे कुटुंबीय, सरदार लोक, वगैरे सर्वांचा पोषाख देशी व जुन्या पद्धतीचा आहे. राजवाड्यांतील साहित्यसामग्री, गृहरचना वगैरे सर्व पुराणकालीन आहे. परंतु राज्यसूत्रें हातीं घेऊन जपानची पुनर्घटना करण्याचा निश्चय केल्याबरोबर झालेला बदल दुसर्‍या दालनांतील चित्रांत दिसून येतो. राजा आणि राजघराण्यांतील स्त्रिया यांनीं पाश्चात्य पद्धतीचा पोषाख स्वीकारला आहे. सरदार आणि मंत्री यांचेंही बाह्यस्वरूप युरोपियन अधिकार्‍यांप्रमाणें आहे. जपानी किमोनो जाऊन पुरुषांच्या अंगावर लांब शेपटाचे काळे कोट आणि उंच टोप्या आल्या आहेत. स्त्रियांचे रंगीबेरंगी किमोनो जाऊन त्यांचे शरीरावर मडमांचे पायघोळ झगे व फुगीर पोलकीं आलीं आहेत. दरबार, राजसभागृह, इत्यादि सर्वच बाह्यस्वरूपांत बदल झालेला आहे असें स्पष्टपणें दिसतें. राजघराणें आणि दरबार यांत ज्या स्वरूपाचा बदल झाला त्याचें प्रतिबिंब सर्व जपानी समाजावर पडलें.

**हिंदी सुधारक व जपानी—**

पाश्चात्यांशीं संबंध आल्याबरोबर त्यांचें अनुकरण करण्याची लाट हिंदुस्थानमध्येंही उठलेली होती. परंतु हिंदी आणि जपानी अनुकरणांमध्यें महत्त्वाचा फरक आहे. हिंदी समाजाच्या बाह्य आचारविचारांना पाश्चिमात्य वळण देण्याचा हिंदुस्थानांत प्रयत्न झाला. त्यांत समाजसुधारणा ही एकमेव कल्पना होती. जपाननें पाश्चात्यांचें अनुकरण करतांना त्या समाजांतील सामर्थ्याचीं स्थानें शोधून काढलीं आणि त्यांचें अनुकरण करण्यावर विशेष भर दिला. जपानचें लक्ष किरकोळ समाजसुधारणांपेक्षां राजकीय,

लष्करी, आरमारी, शैक्षणिक आणि औद्योगिक पुनर्घटनेकडे आधीं गेलें हा फरक लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

**जपाननें केलेले गुरु—**

मेइजीनें जपानची पुनर्घटना करितांना सर्व जगाला आपला गुरु केला. कोणत्याही एका देशावर अवलंबून न राहतां प्रत्येक देशांत ज्या ज्या उत्कृष्ट गोष्टी दिसतील त्या त्या उचलण्यास त्यानें प्रारंभ केला. जपानमधील कर्तबगार अशीं निवडक माणसें काढून त्यानें अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, फरान्स, इत्यादि त्या वेळीं पुढारलेल्या देशांत पाठविलीं. प्रत्येकाकडे कांहीं विशिष्ट क्षेत्रनिरीक्षणाची कामगिरी देण्यांत आली. कोणी सर्व अग्रेसर देशांतील राज्यघटना पाहून आला. कोणीं सर्व देशांच्या लष्करी पद्धतीची पाहणी केली. कोणी आरमाराचें निरीक्षण करून आला. कोणाकडे शिक्षणपद्धतींचें अवलोकन करण्याचें काम दिलें गेलें. अशा रीतीनें प्रत्येक क्षेत्रांत पुनर्घटना करण्याकरितां जपानी पुढाऱ्यांना जगाच्या पाठीवर पाठविलें गेलें. हे लोक परत आले. त्यांनीं आपला अहवाल सादर करून जपानला कोणती विशिष्ट पद्धति सोयीस्कर आहे याबाबत अभिप्राय दिले. या लोकांचे अनुभव आणि जपानची परिस्थिति या गोष्टी लक्षांत घेऊन पुनर्घटनेच्या योजना आंखण्यांत आल्या. या योजनांची अंमलबजावणी करण्याकरितां जपानमध्यें देशी तज्ज्ञ नव्हते. म्हणून प्रत्येक देशांतून त्या त्या विषयाचे पगारी परदेशी तज्ज्ञ मुदतबंदीनें आणण्यांत आले. त्यांचे हाताखालीं तरुण जपानी अधिकारी कामाला लागले. अवघ्या एक दोन पिढयांत जपाननें पाश्चात्यांची विद्या हस्तगत केली, पचनीं पाडली आणि शेवटीं कांहीं बाबतींत पाश्चात्यांवर मात केली.

**जगाचें शिष्यत्व—**

हिंदुस्थाननें केवळ इंग्लंडचें शिष्यत्व स्वीकारलें होतें. जपाननें अनेक गुरू केले. मेइजीनें आपल्या राष्ट्राला एक सूत्र दिलें—नॉलेज शॅल बी सॉट फरॉम ऑल ओव्हर दि वर्ल्ड. (सर्व जगांतून उपलब्ध ज्ञान जपानमध्यें

आणा.) जपानी लोकांनीं ही आज्ञा किती अक्षरशः पाळली तें आजच्या जपानमध्येंही दिसून येतें. शहरांच्या कानाकोंपऱ्यांतून जुन्या पुस्तकांचीं शेंकडों दुकानें पसरलेलीं आहेत. त्यांत इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, रशियन, स्पॅनिश, इत्यादि अनेक परकीय भाषेंतील पुस्तकें आहेत. राजकारण, अर्थशास्त्र, कायदा, वैद्यक, व्यापारशास्त्र, यंत्रशास्त्र, भौतिक शास्त्रें, इत्यादि अनेक विषयांवरील पुस्तकें या दुकानांतून दिसतात. जपानमध्यें अनेक मोठीं इस्पितळें आहेत. त्यांतील कांहीं इस्पितळांमध्यें डॉक्टरांना फक्त जर्मन समजतें तर कांहीं ठिकाणच्या डॉक्टरांना फक्त इंग्लिश समजतें. नाविक विद्या आणि आरमारांतील लोकांना इंग्लिश येतें. सैन्यांतील अधिकाऱ्यांना जर्मन समजतें. सारांश, अनेक देश आणि अनेक भाषा धुंडाळून जपाननें आधुनिक ज्ञान मिळविलें आहे.

जपाननें आरमाराची पुनर्घटना इंग्लिश आरमाराच्या पद्धतीवर केली, लष्कराची योजना जर्मनीच्या पद्धतीवर केली, वैमानिक विद्या फ्रान्सपासून मिळविली, शिक्षणपद्धति फ्रान्स व अमेरिका यांच्या पद्धती पाहून बसविली आणि औद्योगिक बाबतींत अमेरिकन शास्त्रोक्त पद्धतींचें अनुकरण केलें. अशा रीतीनें आज जें जपानचें सामर्थ्य दिसतें त्याचा पाया मेइजी युगांत घातला गेला. अमेरिकेच्या लढाऊ जहाजांना आणि तोफांना भिऊन ज्या जपाननें तहनाम्यावर सही केली त्याच जपाननें आपलें लष्करी, वैमानिक, आरमारी आणि औद्योगिक सामर्थ्य इतकें वाढविलें आहे कीं, त्याला आतां नियंत्रण कसें घालावें याचा विचार इतर राष्ट्रें करूं लागलीं आहेत. जपाननें पाश्चात्यांचें शिष्यत्व पत्करलें आणि शिष्य गुरूपेक्षांही सवाई होऊं लागला !

**जातिभेदाला तिलांजलि—**

पुनर्घटनेची ही चळवळ कांहीं प्रमाणांत सामाजिक बाबींमध्येंही शिरली. राष्ट्र या दृष्टीनें समाजाची शक्ति क्षीण करणाऱ्या ज्या ज्या चालीरीती किंवा परंपरा असतील त्या सर्व बंद केल्या पाहिजेत असें सर्वसामान्य धोरण. केवळ सामाजिक सुधारणेकरितां जपानमध्यें सुधारणेची चळवळ झाली नाहीं.

इतर राष्ट्रांशीं संबंध आले असतां जपान सामर्थ्यानें कोठें व कसा कमी पडतो याचीं कारणें शोधून राष्ट्रसंवर्धनाचे दृष्टीनें समाजसुधारणा झाल्या.

मध्य युगापासून जपानमध्यें सामाजिक जातिभेद चालत आलेला होता. मेइजीनें एक आज्ञापत्रक काढून सर्व जातींचे विशिष्ट हक्क काढून घेतले आणि अनेक पिढ्या चालत आलेल्या पद्धतीला फारसा गाजावाजा न करितां तिलांजलि दिली. जपानमध्यें पूर्वीं चार वर्ग असत. श्रेष्ठतेच्या मानानें क्षत्रिय, शेतकरी, कारागीर आणि व्यापारी अशा क्रमानें त्यांचा दर्जा होता. क्षत्रिय (सामुराई) वर्ग सर्वांत श्रेष्ठ. त्याला सर्व प्रकारच्या सवलती होत्या. समाजांतील इतर वर्गांवर त्यानें अन्याय केला तरी दाद मागण्याची सोय नव्हती. व्यापारी वर्ग अगदीं कनिष्ठ समजला जाई त्यामुळें व्यापारी नीतिमत्तेची परंपरा जपानमध्यें नव्हती. ती नव्यानें निर्माण करावी लागली. शिंतो आणि बौद्ध धर्मांतील उपाध्याय वर्ग हा सामुराई म्हणजे क्षत्रिय वर्गाचे बरोबरीनेंच होता. परंतु चातुर्वर्ण्याच्या यादींत त्याचें नांव कोठें दिसत नाहीं. श्रेष्ठ-कनिष्ठ या दृष्टीनें या चार वर्गांचा दर्जा, त्यांचा आचार व धर्म, त्यांचीं कर्तव्यें व सवलती इत्यादि गोष्टी ठरवून दिलेल्या होत्या. चार वर्गांची ही समाजसंस्था बारावे शतकाचे अखेरीस अंमलांत आली. विवाहसंबंध सवर्गीयांतच मर्यादित होते. मोठ्या कष्टानें व तपश्चर्येनें खालच्या वर्गांतील व्यक्तीचा सामुराई वर्गांत समावेश केला जाई. संक्रमणाची शक्यता होती, सुलभता नव्हती.

मेइजी पुनर्घटनेनें ही जातिव्यवस्था मोडून टाकल्यामुळें सध्यां ती त्या स्वरूपांत दिसत नाहीं. आज एकाद्या जपानी माणसाला तुझी जात कोणती आहे म्हणून विचारलें तर तो आठवण करून सांगेल कीं मातोश्री क्षत्रिक वर्गांतील आणि वडील वैश्य जातीचे होते. आज या जातींची जरूरी लागत नाहीं त्यामुळें ती एक ऐतिहासिक बाब होऊन बसली आहे.

**सुधारलेली वर्गपद्धति—**

सामाजिक जन्मजात जातिभेद नष्ट झाला पण पाश्चात्य समाजाच्या

पद्धतीवर नवीन वर्गपद्धति निर्माण करण्यांत आली. पूर्वींचे सरदारांचा आणि नवीन पुनर्घटनेंत ज्यांनीं पुढाकार घेऊन कर्तबगारी दाखविली अशांचा एक सरदार वर्ग निर्माण केला गेला. यांना युरोपियन पदव्यांप्रमाणें प्रिन्स, मार्क्विस, कौंट, व्हायकौंट, बॅरन, इत्यादि संज्ञाही देण्यांत आल्या. त्यांच्या खालोखाल पांढरपेशा मध्यमवर्ग, आणि त्याचे खालीं सामान्य जनांचा वर्ग अशी योजना झाली. अर्थात् पूर्वींच्या जातिपद्धतीपेक्षां ही वर्गपद्धति अधिक लवचिक आणि संक्रमणानुकूल होती. तिच्यामुळें व्यक्तीच्या प्रगतीला व कर्तबगारीला पूर्वींपेक्षां अधिक वाव मिळाला. अशा रीतीनें शस्त्र, नांगर, यंत्र आणि तराजू हीं जन्मावर व घराण्यावर अवलंबून न राहतां वैयक्तिक कर्तबगारीवर येऊन बसलीं. ज्याला जें पेलतां येईल तें साधन त्यानें उचलावें. सामाजिक श्रेष्ठ-कनिष्ठतेचें नातें व सवलती नाहींशा केल्यामुळें समाजांतील असमाधानाचें एक बीज नाहींसें झालें.

**देवघर लावून मांसाहार—**

कायदा किंवा आज्ञापत्र यांचे मदतीवांचून एक क्रांति घडून आली, ती आहाराचे बाबतींत. बौद्ध धर्माचा प्रसार झाल्यापासून जपानी लोक शाकाहारी होते. दीड हजार वर्षें शाकाहार प्रचारांत होता. शाकाहाराचा अर्थ गोव्याकडील अथवा बंगाली अर्थानें घ्यावयाचा. भात आणि मासे हा शाकाहार. जनावरांचें किंवा पक्ष्यांचें मांसभक्षण वर्ज्य होतें. पाश्चात्यांच्या आहाराशीं आणि वैद्यक शास्त्राशीं संबंध आल्यापासून शरीरप्रकृतीकरितां मांसाहार सुरू झाला. तो वाढत वाढत आज सर्व जपान मांसाहारी झाला आहे. शाकाहार म्हणजे काय व त्यांत काय विधिनिषेध आहेत याची त्यांना आतां माहिती देखील नाहीं. या पिढीपर्यंत देवळांतील बौद्ध उपाध्यायांनीं शाकाहार चालू ठेवला होता पण आतां त्यांनींही मासे आणि मांस यांत पक्षपात करण्याचें सोडून दिलें आहे! एकदां सर्व धर्मसभेचें एक वार्षिक संमेलन भरलें होतें त्यांत पन्नास सर्वधर्मीय उपाध्यायांपैकीं फक्त एक शाकाहारी निघाला! दुसरा हिंदु पाहुणा! प्रारंभीं प्रारंभीं कांहीं घराण्यांत मांसाहाराला, औषध म्हणून, प्रारंभ झाला, तेव्हां भोजनसमयीं देवघरांचीं किंवा बौद्धघरांचीं दारें बंद करण्यांत येत.

**सार्वजनिक व खाजगी जीवनांत भेद—**

आहार आणि जाती या बाबी सोडून दिल्यास नवीन क्रांतीचा गृहजीवनावर फारसा परिणाम झाला नाहीं. पण सार्वजनिक जीवनावर मात्र मोठा परिणाम झाला. सरकारी कचेऱ्या, बँका, व्यापारी पेढ्या, सैन्य, आरमार, शिक्षणसंस्था, इत्यादि सार्वजनिक व्यवहारांचे ठिकाणीं पोषाख, आचार, साहित्यसामग्री व कार्यपद्धति यांमध्यें पाश्चात्यांचें अनुकरण झालें. शाळेंतील मुलांना विजार-कोटाचा गणवेष आवश्यक झाल्यामुळें पुढचीच पिढी सूटबूट घालणारी निघाली. शाळेंतील मुलींना परकर-पोलक्याचा यूनिफॉर्म असल्यानें नवीन पिढीला मडमांच्या पोषाखांत अपरिचित असें कांहीं राहिलें नाहीं. शाळांमधून स्वयंपाक, शिवणकाम, संगीत, चित्रकला, व्यायाम आणि शिष्टाचार यांच्या जपानी आणि पाश्चात्य अशा दोन्ही पद्धती शिकविण्यांत येऊं लागल्या. त्या कारणानें सार्वजनिक जीवनांत पाश्चिमात्य पद्धतीनें आणि खाजगी घरगुती जीवनांत जपानी पद्धतीनें वागणारा समाज एका पिढींत तयार झाला. तोच समाज आजच्या जपानमध्यें दिसत आहे.

**क्रांतींतून निर्माण झालेला आजचा जपान—**

मेइजीप्रणीत क्रांतीचे अथवा पुनर्घटनेचे दृश्य परिणाम आज सर्व क्षेत्रांत दिसत आहेत. पाश्चात्यांशीं समबल आणि समान असा समाज निर्माण करण्याचा मेइजीकालीन पुढाऱ्यांचा संकल्प होता तो पुष्कळच सिद्ध झाला आहे. राष्ट्रीय सामर्थ्याचे दृष्टीनें आज जगांतील कोणत्याही राष्ट्राच्या तोडीचें असें सैन्य, आरमार व वैमानिक सामर्थ्य जपानजवळ आहे. कमोडोर पेरीनें १८५४ सालीं आरमार आणि तोफांचे जोरावर जपानकडून तह करून घेतला तेच धडे आज जपान गिरवूं लागला; तेव्हां या शिष्याविरुद्ध गहजब सुरू झाला आहे. शरीरसामर्थ्य वाढविण्यांत आणि पाश्चात्य खेळांतही जपाननें स्पृहणीय अशी प्रगति केलेली आहे. सालोसाल जपानांत येणाऱ्या अमेरिकन आणि युरोपियन संघांशीं पोहणें, बेसबॉल, टेनिस, कुस्ती, इत्यादि खेळांत सामने देऊन जपानी खेळाडू कीर्ति मिळवीत आहेत. जपानी स्त्रियांनीं

पोहण्यांत जागतिक कीर्ति संपादन केली आहे. पाश्चात्य देशांतही जपानी संघ सारखे जात येत असतात. क्रीडाक्षेत्रांत पाश्चात्यांशीं सामने देऊन मिळविलेला आत्मविश्वास राजकीय क्षेत्रांतही उपयोगी पडतो ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. संघटना आणि राष्ट्रीय भावना यांचे अभावीं, कर्तबगारी व कौशल्य असूनही, परदेशी क्रिकेट संघांकडून सालोसाल पराभव घेऊन येणाऱ्या आमच्या क्रिकेट संघांनीं हें तत्त्व लक्षांत ठेवणें जरूर आहे. त्यांना आतां असें सांगावेंसें वाटतें कीं "विजय घेऊन या नाहीं तर क्रिकेटची बॅट खालीं ठेवा. हा तुमच्या जयापजयाचा आणि हौसेचा प्रश्न नसून हिंदी राष्ट्राच्या इभ्रतीचा आणि भावनेचा प्रश्न आहे." पाश्चात्य संगीत कलेंतही जपानी लोकांनीं चांगली प्रगति केलेली आहे. जन्मसिद्ध जातिभेद नाहींसा झाल्यामुळें जातिवैमनस्याचे प्रश्न टळले आणि समाजाच्या सामर्थ्याची बचत झाली. वर्गकलहाचें बीज उगवूं लागलें आहे, पण त्याला जपान आपल्या विशिष्ट पद्धतीप्रमाणें वळण देत आहे. पाश्चात्य राहणी सहज अंगवळणी पडल्यामुळें जपानी लोकांना जगावर संचार करणें सुलभ झालें आहे. सारांश, आज प्रत्येक बाबतींत पाश्चात्य राष्ट्रांचे बरोबर आपण आहोंत, ही जाणीव जपानचे ठिकाणीं उत्पन्न झालेली आहे. या आत्मविश्वासामुळेंच आज आशिया खंडांत कोणाचें वर्चस्व असावें असा वाद निर्माण झालेला आहे. जपानला यूरोप-अमेरिकेचें वर्चस्व आशियांत नको आहे, आणि श्वेतवर्णीयांना जपानच्या वाढत्या सामर्थ्यामुळें आशिया खंडांतील आपले सत्तेविषयीं साशंकता उत्पन्न झाली आहे.

याचा परिणाम पुढें अनेक वर्षें जगाच्या राजकारणावर होणार आहे.

* * *

# ४

# पूर्वपश्चिम संस्कृतींची प्रयोगशाळा

**आद्यसंस्कृतीचा पाया—**

आदिपुरुषाचें नांव इझानागी; आदिमायेचें नांव इझानामी. या देवतांनीं प्रथम जपानच्या बेटांवर वस्ती केली. त्यांच्यापासून अमातेरासू ओमीकामी ही सूर्यदेवता निर्माण झाली. या देवतेनें यामातोंत किंवा प्राचीन जपानमध्यें संस्कृति स्थापन केली. तिचे वंशज पुढें जपानचे राज्यकर्ते झाले. जिम्मू नांवाचा पहिला सूर्यवंशी सम्राट इसवी सनापूर्वी साडेसहाशें वर्षें राज्यावर आला. त्याला देवतांनीं जपानवर राज्य करण्याचें आज्ञापत्र देऊन खड्ग, दर्पण व रत्न अशीं तीन राजचिन्हें अर्पण केलीं. देवता व पूर्वज यांचेपासून राज्यप्राप्ति झाल्यामुळें त्यांची पूजा करण्याचा धर्म जिम्मूनें सुरू केला. तोच शिंतोधर्म पुढें जपानमध्यें वाढीस लागला.

अडीच हजार वर्षांपूर्वी जपानच्या ज्ञात इतिहासाला प्रारंभ झाला. त्या वेळींच समाज आणि संस्कृति यांची वाढ झालेली होती. हा आधुनिक जपानी संस्कृतीचा पाया. जपानमधील मूळ रहिवासी आणि तेथें नंतर भोंवतालच्या प्रदेशांतून आलेले बाहयवासी यांच्या संस्कृतींच्या मिश्रणानें तयार झालेली ती जपानची आद्य संस्कृति. आशिया खंड आणि दक्षिण बेटें या प्रदेशांतून आलेल्या लोकांनीं आपल्याबरोबर कांहीं समाजपद्धती व

चालीरीती आणल्या; जपानमधील आईनू समाजाच्या चालीरीतींमध्यें यांचें मिश्रण होऊन मूळ जपानी समाजपद्धति निर्माण झाली.

ऋग्वेदामध्यें भारतीय समाजाची उत्क्रांति अगदीं प्रारंभावस्थेपासून उच्च अवस्थेपर्यंत दिसून येते, तशीच जपानच्या समाजाची उत्क्रांति त्याच्या दंतकथा व लिखित वाङमय यांवरून दिसते. प्रारंभीं समाजपद्धति अगदीं बाल्यावस्थेंत होती. विवाहबंधनें निर्माण झालीं नव्हतीं. गुलामगिरीची प्रथा होती. समाजांत दुष्ट चाली प्रचारांत होत्या. धार्मिक कल्पना अगदीं प्राथमिक अवस्थेंतील अशा होत्या. भौतिक संस्कृतीच्या दृष्टीनें पाहतां कृषिविद्येची प्रगति झालेली होती. वस्त्र करण्याची कला वाढलेली होती. अशा प्रकारची आद्य संस्कृति इतिहासाच्या प्रारंभीं म्हणजे अडीच हजार वर्षांपूर्वीं जपानमध्यें होती. या मूळ पायावर अनेक नवीन संस्कृती अधिष्ठित होऊन आधुनिक जपान बनलेला आहे.

**भगवान् बुद्धाचा प्रवेश—**

भगवान् बुद्धाच्या मूर्तीनें इसवी सनाच्या सहाव्या शतकांत आपलें स्थान जपानांत स्थिर केलें त्याची कथा मनोरंजक आहे. कोरियांतील कुदाराधिपानें मैत्रीचें चिन्ह म्हणून किनमेई नांवाच्या जपानी राजाला एक बुद्धप्रतिमा पाठविली. तिच्याबरोबर स्तोत्रें, पूजाविधि, पूजासाहित्य, इत्यादि सर्व सामग्रीही पाठविली. राजधर्म शिंतो होता. शिंतोच्या उपाध्यायांनीं दहशत घातली कीं परकीय देवाला आश्रय दिला तर स्थानिक देवांचा कोप होईल. पण सोगा नांवाचा मंत्री होता त्यानें सांगितलें कीं, भारतवर्ष, चीन, इत्यादि सुसंस्कृत देश ज्याची पूजा करितात त्या बुद्धाची पूजा करणें जपानलाही कमीपणाचें नाहीं. मग राजानें ती मूर्ति सोगाजवळ दिली. त्यानें देवालय बांधून विधिपूर्वक बुद्धाची स्थापना केली. झालें. देशांत रोगाची सांथ सुरू होऊन प्रजा मृत्युमुखीं पडूं लागली. शिंतोच्या उपाध्यायांनीं सांगितलें 'पहा, देवांचा कोप झाला.' लगेच बुद्धाची मूर्ति नदींत फेंकून देण्यांत आली व देवळावरून नांगर फिरविला गेला. पण पाटलिपुत्राहून हजारों मैल चालून गेलेला बौद्ध धर्मही कांहीं कमी पराक्रमी

नव्हता ! त्यानेंही दैवी चमत्कार घडवून आणले ! राजवाड्यावर विद्युत्पात झाला. राजाचे मुख्य प्रधान मृत्युमुखीं पडले. लगेच वातावरण बदललें. भगवान् बुद्ध शितो देवांपेक्षांही पराक्रमी ठरले. पुन्हां बुद्धप्रतिमा नदींतून वर काढण्यांत आली आणि देवालयांत तिची विधिपूर्वक स्थापना केली गेली.

अशा रीतीनें बौद्ध धर्मानें व त्याचबरोबर बौद्ध संस्कृतीनें आपलें साम्राज्य जपानमध्यें वाढविलें.

**चीनचा कन्फ्यूशियस—**

चीन देश तर जपानचा शेजारीच. पूर्वीपासून जपान-चीनचें दळण-वळण विशेष. चीनमध्यें पुरातन काळापासून उच्च संस्कृतीची व तत्त्व-ज्ञानाची वाढ झालेली आहे. त्यांचा परिणाम एकसारखा जपानंवर होत आला. विशेषतः कन्फ्यूशियसच्या नीतिधर्माचा पगडा जपानवर विशेष बसलेला आहे. त्यामुळें बाह्यतः कांहीं बाबतींत चिनी व जपानी संस्कृतींत पुष्कळ साम्य दिसतें.

**येशूचें स्वागत व मिशनऱ्यांची हकालपट्टी —**

सोळावे शतकांत १५४९ मध्यें आणखी एका संस्कृतीची लाट जपानवर आली. सेंट फरान्सिस् झेवियर यानें गोव्याच्या चर्चमध्यें आंजीरो नांवाच्या जपानी तरुणाला बाप्तिस्मा देऊन खिरस्ती शिष्य केला, व त्याला घेऊन तो जपानमध्यें आला. त्यानें आपल्या धर्मप्रचाराला प्रारंभ केला. सामान्य लोक, सरदार, श्रीमंत स्त्रिया, सर्वांनीं भराभर खिरस्ती धर्म स्वीकारण्याला सुरुवात केली. या धर्माचें बीज त्यांच्या मनांत इतकें खोल रुजलें कीं पुढें राज्यकर्त्यांनीं गोऱ्या मिशनऱ्यांचा छळ करून त्यांना हांकून दिलें तरी जपानी लोकांनीं खिरस्ती धर्म सोडला नाहीं. मग या स्थानिक खिरस्ती लोकांचाही अमानुष छळ झाला. तरी गुप्त स्वरूपांत अडीचशें वर्षें हा धर्म राहिला. धर्मछळाला जपानी लोक किती शूर व निधड्या छातीनें बळी पडले त्याचें हृदयस्पर्शी वर्णन अनेक कादंबऱ्यांतून केलेलें आहे. पुढें मेइजी युगांत खिरस्ती

धर्माचे उघड प्रचाराला परवानगी मिळाली तरी सतराव्या शतकांत त्याचा प्रसार झाला तितका नंतर होऊं शकला नाहीं. पण ख्रिस्ती संस्कृतीचा जपानी समाजावर महत्त्वाचा परिणाम झालेला आहे.

**तोफांची नवी संस्कृति—**

आतांपर्यंत धर्माच्या नांवाखालीं जपानमध्यें अनेक संस्कृती शिरल्या. एकोणिसाव्या शतकांत मात्र व्यापाराचे नांवाखालीं एक लढाऊ, आक्रमणशील, द्रव्यवादी, यंत्रपूजक व भौतिक शास्त्रप्रधान अशी संस्कृति जपानमध्यें शिरली. १८५३ मध्यें कमोडोर पेरीनें तोफांचा मोर्चा जपानकडे रोखून मैत्रीच्या तहाची मागणी केली. नाइलाज म्हणून जपाननें अमेरिका, इंग्लंड, रशिया, फरान्स, हॉलंड, इत्यादि राष्ट्रांशीं तह करून त्यांना आंत घेतलें. या नवीन पाहुण्यांच्या बरोबर त्यांची नवीन संस्कृतीही जपाननें घेतली. ज्या शक्तीच्या जोरावर गोरे लोक जपानमध्यें शिरले, तीच शक्ति संपादन करून त्यांना आपण जपानमधूनच काय पण आशियांतूनही बाहेर रस्ता दाखवूं, अशी खूणगांठ दूरदर्शी जपानी मुत्सद्यांनीं मनाशीं बांधली असावी.

**संस्कृतींची भट्टी—**

जपान देश ही संस्कृतींची प्रयोगशाळा, प्रदर्शनशाळा आणि भट्टी आहे. येथें विविध संस्कृतींचे प्रयोग होतात. त्या कधीं मूळ स्वरूपांत राखल्या जातात तर कधीं मूळ संस्कृतीशीं समरस होऊन जातात. जपानची ग्रहणशक्ति आणि पचनशक्ति विशेष प्रकारची आहे. हेकेखोरपणा किंवा फाजील रूढिप्रियता न धरतां इतर संस्कृतींपासून उत्कृष्ट भाग घेऊन तो पचविण्याचें धोरण जपाननें ठेविल्यामुळें आज त्याची प्रगति झालेली दिसते. चिनी, बौद्ध, ख्रिस्ती आणि यांत्रिक अशा सर्व संस्कृतींचे आद्य जपानी संस्कृतीवर परिणाम होऊन त्यांतून आजचा जपान उगवलेला आहे. त्यामुळें त्याला प्रत्येक संस्कृतीमधील उत्कृष्ट भागांचा सामर्थ्यसंपादनाकरितां व समाजस्थिरीकरणाकरितां उपयोग करून घेतां आला. चिनी संस्कृतीनें जपानला नीतिधर्माच्या कल्पना, पितृनिष्ठा व राजनिष्ठा हीं तत्त्वें दिलीं; बौद्ध

संस्कृतीनें आत्म्याचें अमरत्व आणि उदात्त जीवनाची कल्पना दिली ; खिरस्ती संस्कृतीनें सामाजिक ध्येयवाद दिला; आणि यांत्रिक संस्कृतीनें शास्त्र, तंत्र व यंत्र यांच्या रूपानें भौतिक सामर्थ्य दिलें. त्यावरून जपानी मनाची ठेवण या अनेक संस्कृतींतून कशी निर्माण झालेली आहे तें लक्षांत येईल. याशिवाय बाह्य जीवनावर या सर्व संस्कृतींचा परिणाम झालेला आहे तो वेगळाच.

**तांत्रिक अनुकरणावर भर--**

थोडयाफार प्रमाणांत हिंदुस्थानवरही अनेक परकीय संस्कृतींचें आक्रमण झालेलें आहे आणि हिंदी लोकांनींही परकीय संस्कृती पचविलेल्या आहेत. पण संस्कृती पचविण्यांत दोन्ही देशांच्या पद्धती व प्रमाणें निरनिराळीं आहेत असें दिसून येईल. दोन्ही देशांमध्यें परकीय अनुकरणाच्या मर्यादा कांहींशा वेगवेगळया आहेत.

जपानी लोक परकीय संस्कृतींच्या बाह्य अंगांचें व तांत्रिक स्वरूपाचें शीघ्र अनुकरण करितात. त्यांतील तात्त्विक आणि वैचारिक भागाविषयीं ते उदासीन असतात. किंबहुना जपानी स्वभाव हा तत्त्वप्रिय नसून तंत्रप्रिय आहे असें म्हणतां येईल. तात्त्विक प्रवृत्ति जपानी लोकांत मर्यादित आहे. इतर संस्कृतींचें बाह्यस्वरूप त्यांना आकलन होतें, त्यांतील विचारप्रणाली आत्मसात् होण्यास वेळ लागतो. हिदेयोशी नांवाचा जपानी वजीर खिरस्ती मिशनऱ्यांना म्हणाला, "तुमच्या धर्मांतील सर्व गोष्टी मला मान्य आहेत. पण बहुपत्नित्वावरील निर्बंध मात्र समजत नाहीं." खिरस्ती धर्मांतील चर्च, पूजाविधि, प्रार्थना, इत्यादि गोष्टी जपानी लोकांना समजल्या, परंतु त्यांतील व्यक्तिवादाचें व मानवी पावित्र्याचें तत्त्व त्यांना आकलन झालें नाहीं. यांत्रिक सुधारणा जपाननें घेतली परंतु त्यांतून निर्माण होणाऱ्या समाजवादावर नियंत्रण घातलें. बाह्यस्वरूपांतील पाश्चिमात्य सुधारणा जपानांत पूर्ण-स्वरूपानें दिसते. परंतु व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीस्वातंत्र्य, कामगारवर्गाच्या हक्कांची मान्यता, लोकमताचें महत्त्व, इत्यादि तात्त्विक आकलनाच्या भागांची फारशी प्रगति झालेली नाहीं. बौद्ध धर्मापासून पूजाविधि, शिल्पकला, इत्यादि गोष्टी जपाननें घेतल्या तरी त्याच्या निवृत्तिमार्गाचा फारसा परिणाम

जपानी मनावर झाला नाहीं. तात्त्विक स्वरूपाचें पूर्ण आकलन न होणें हा दोष असला तरी जपानी परिस्थितींत तो एक गुणच झालेला आहे. कारण बाह्य अनुकरणामुळें येणारें सामर्थ्य, जीवनांतील विविधता व संस्कृतीची संपन्नता हे फायदे जपानला मिळाले ; उलट तात्त्विक विचारानें येणारी संशयी वृत्ति, मतभेद, मतमतांतरें, श्रद्धाहीनता, मनोदौर्बल्य, इत्यादि दोष टाळले गेले. त्यामुळें अनुकरणानें येणारें सामर्थ्य मिळालें; विचारविविधतेमुळें येणारें मनोदौर्बल्य आलें नाहीं.

**वयं तत्त्वान्वेषाद् हताः, त्वं खलु कृती ।—**

उलट याच संस्कृतींचे हिंदुस्थानमध्यें कसे उलट परिणाम झाले तें पाहा. जपानमध्यें बौद्ध धर्म प्रचलित असून तो उत्कर्षाला चढला ; उलट हिंदुस्थानांत बौद्ध तत्त्वामुळें निवृत्तिवाद उत्पन्न होऊन आमच्या समाजाचा अधःपात झाला असें आपण येथें ऐकतों ! पाश्चिमात्य संस्कृतीमुळें जपानला यांत्रिक व भौतिक सामर्थ्य मिळालें, परंतु सामाजिक वादामुळें समाजांत येणारे भेद मात्र फारसे उत्पन्न झाले नाहींत. हिंदुस्थाननें पाश्चिमात्य संस्कृतीच्या तात्त्विक भागांचें शीघ्र अनुकरण केल्यामुळें श्रद्धाहीनता, संशयवृत्ति, सामाजिक भेद, मतांतरें व या सर्व दोषांमुळें येणारी सामाजिक शक्तिहीनता त्याच्या पदरीं पडली. तात्त्विक विचाराचे दृष्टीनें तो श्रीमंत झाला, भौतिक व सामाजिक सामर्थ्याचे दृष्टीनें मागें पडला. अशा रीतीनें दोन देशांच्या अनुकरणमर्यादा व पद्धती भिन्न असल्यानें बौद्ध व पाश्चिमात्य संस्कृतींचे परिणाम दोन्हीं देशांत भिन्न भिन्न झालेले आहेत.

**दोघेही चुकतात—**

याचा असा अर्थ नव्हे कीं तत्त्वप्रधान प्रवृत्ति वाईट आणि तंत्रप्रधान प्रवृत्तीच चांगली. आज तांत्रिक अनुकरणामुळें जपानची प्रगति झालेली दिसते. तरी पण तात्त्विक पाया नसेल तर ही प्रगति कायम राहणार नाहीं, कोलमडून पडेल. तांत्रिक प्रगतीमध्येंच अधोगतीचीं बीजें राहिलेलीं असतात. हिंदुस्थानची तात्त्विक अनुकरणाची प्रवृत्तिदेखील एकांगी आहे. तिच्यामुळें

बौद्धिक आनंद मिळतो, पण व्यावहारिक बळ मिळत नाहीं. केवळ तात्त्विक किंवा केवळ तांत्रिक अनुकरणापेक्षां हेतुपुरःसर, चिकित्सक दृष्टीनें, निश्चित ध्येयाला अनुसरून केलेलें अनुकरण असतें तेंच अखेर फलदायी व टिकाऊ होतें. जपानची अनुकरणपद्धति अगदीं उथळ स्वरूपाची आहे; आज त्याला फायदा झालेला दिसतो इतकेंच. हिंदी प्रवृत्ति अशी आहे कीं परकीय संस्कृतीला आधीं प्रतिकार करावयाचा व नंतर तिच्यांतील बुद्धिगम्य भाग तेवढाच घ्यावयाचा. एका टोंकाला रूढिप्रियता व नंतर दुसऱ्या टोंकाला तात्त्विक भागाचें ग्रहण, या सर्वांतून विकृत आणि अव्यवस्थित अशी संस्कृति निर्माण होते. तिच्यांत सुसंबद्धता राहात नाहीं. त्यामुळें जपानी आणि हिंदी दोघांच्याही अनुकरणपद्धती सदोष आहेत. त्यांत सुधारणा होणें जरूर आहे असें वाटतें.

**नाविन्य पाहून दृष्टि मेली—**

अनेक शतकें अनेक संस्कृती पाहिल्यामुळें व अनुभविल्यामुळें जपानी समाजाची मनोवृत्ति मात्र हिंदी मनोवृत्तीपेक्षां अधिक उदार, सहिष्णु आणि सद्यःग्रहणशील अशी झालेली आहे. परकीय जीवनपद्धतीविषयीं जपानी लोकांत अनादर, उपहास किंवा तिटकारा दिसत नाहीं. कांहीं कर्मठ, रूढिप्रिय व आकुंचित मनाचे थोडे लोक सोडून दिले तर बहुजनांची प्रवृत्ति इतर संस्कृतींविषयीं पूर्वग्रहानें दुष्ट झालेली नसते. आहार, वस्त्र, राहणी, इत्यादि गोष्टींत विविधता आली तर जपानी मनाला धक्का बसत नाहीं. दैनिक राहणीच्या पद्धतींत एकाद्या व्यक्तीनें थोडा फेरबदल केला तर त्यामुळें समाजांत वावटळ उठत नाहीं. आचारविचारांतील विविधता पाहून जपान्यांची दृष्टि आतां मेली आहे. नाविन्य किंवा पुराणता पाहून त्यांना धक्का बसत नाहीं. शहराच्या एका भागांत केवळ लंगोट लावलेला मनुष्य दिसला तर त्याला कोणी हंसत नाहीं, दुसरीकडे नखशिखांत साहेबी पोषाखांत कोणी दिसला तर त्याचा उपहास होत नाहीं. लग्नप्रसंगीं वधू अगदीं पुराणपद्धतीची केशरचना करून ऐसपैस किमोनो घालील; त्याच दिवशीं सायंकाळीं ती अमेरिकन मडमेच्या पोषाखांत बाहेर फिरावयास जातांना

दिसेल. दोन्ही प्रकार एकाच समाजांत, एकाच कुटुंबांत, एकाच शरीरावर पाहण्याची संवय जपानी लोकांना झालेली आहे. या बाबतींत ते पाश्चिमात्य व हिंदी लोक या दोघांच्याही पुढें गेले आहेत असें म्हणावें लागेल. इंग्लंड-अमेरिकेंत धोतर व चपला परिधान करून, किंवा शरीर उघडें दिसेल अशीं वस्त्रें घालून कोणी पुरुष जाऊं लागला तर शिपाई त्याला पकडून फरास-खान्यांतच नेईल व दंड करून ताकीद देऊन मग सोडील! जपानमध्यें दरबार व राजवाड्याव्यतिरिक्त अन्य स्थानीं वाटेल त्या पोषाखानें मनुष्य गेला तरी त्याला कोणी हरकत घेणार नाहीं. जी गोष्ट पोषाखाची तीच आहाराची व इतर राहणीची. या उदार सहिष्णु वृत्तीमुळें समाजाच्या वेळेची, बलाची व भावनांची पुष्कळ बचत होते. समाजांत होणाऱ्या क्षुल्लक फेरबदलामुळें लगेच वावटळ उठत नाहीं. खरोखर समाजाच्या बाह्य उपाधी पाहिल्या तर आज ज्या गोष्टीवर रण माजतें, तीच दहा वर्षांनीं समाजांत मान्य झालेली दिसते असा अनुभव आहे. पण समाजाकडे कालदृष्ट्या मागें आणि पुढें दृष्टि टाकील त्यालाच हें दिसेल. या दृष्टीनें विचार करितां जपानमध्यें व्यक्ति सामाजिक बंधनांनीं जितकी बांधलेली आहे तितकीच ती वैयक्तिक दृष्टीनें स्वतंत्रही आहे. क्षुल्लक व गैरमहत्त्वाचे बाबतींत स्वातंत्र्य आणि महत्त्वाच्या बाबतींत बंधन असें स्वातंत्र्य-बंधनाचें मिश्रण जपानांत दिसतें. अनेक संस्कृती ज्यानें पाहिल्या व अनुभविल्या अशाच समाजांत ही प्रवृत्ति शक्य आहे.

**पौर्वात्य संस्कृतींचें सायुज्य—**

विविध संस्कृतींचा स्वीकार जपानमध्यें एकाच प्रकारानें झालेला नाहीं ही गोष्टही ध्यानांत घेण्यासारखी आहे. दोन संस्कृतींचे संबंधांचा विचार करितांना त्यांच्या चार अवस्था कल्पितां येतील—सलोकता, सरूपता, समीपता व सायुज्य. जपानमध्यें परकीय पौर्वात्य संस्कृती अखेर-च्या पायरीवर जाऊन पोंचलेल्या आहेत; परंतु पाश्चिमात्य संस्कृति मात्र फक्त उपान्त्य पायरीपर्यंत पोंचलेली आहे. ती अखेरच्या पायरीला लागेल असें वाटत नाहीं.

चिनी व बौद्ध संस्कृती या आद्य जपानी संस्कृतीमध्यें विलीन झाल्या, एकजीव व एकरूप झाल्या. जपानी, चिनी व बौद्ध संस्कृती या सर्व पौर्वात्य असल्याकारणानें परस्परांत मिळून जाण्याइतक्या सधर्मीय व सुसांध्य अशा होत्या. त्यांच्या मिश्रणानें कोठें स्वरूपभंग झाल्यासारखें वाटत नाहीं. सौंदर्याभिरुचि, साधेपणा, उदात्तता, नीतिप्रधानता, निवृत्तिधर्म, इत्यादि प्रवृत्ति हिंदुस्थान, चीन व जपान यांचेमध्यें समान आहेत. त्यामुळें या तिन्ही समाजांच्या संस्कृतींचें रासायनिक मिश्रण होऊन त्यांतून पौर्वात्य जपानी संस्कृति निर्माण झालेली आहे. जपानचें घर, आंतील रचना व मंडनपद्धति, पोषाख, आहार, धार्मिक जीवन, कलाविकास, संगीतांतील हृद्यता, विलासांतील उदात्तता, सूक्ष्म सौंदर्याची अभिरुचि, निसर्गप्रियता, नीतिविचारप्राधान्य, इत्यादि सर्व गोष्टी शुद्ध पौर्वात्य आहेत. भारतीय, चिनी आणि जपानी अशा तिन्ही पद्धतींतून ही एकरूप जपानी संस्कृति निर्माण झाली आहे. त्यांतून आतां चिनी, जपानी व भारतीय असे अंश वेगळे काढणें अशक्य आहे.

**पाश्चिमात्य संस्कृतीचें स्थान घराबाहेर—**

पाश्चिमात्य संस्कृतीचें स्थान जपानमध्यें अगदीं निराळें आहे. भारतीय-चिनी-जपानी संस्कृती या रासायनिक मिश्रणानें एकरूप झाल्या; पाश्चिमात्य संस्कृति आणि जपानी संस्कृति यांचें मिश्रण केवळ सान्निध्याच्या स्वरूपाचें आहे. पहिल्या तीन संस्कृतींना सायुज्यावस्था प्राप्त झाली आहे. दुसऱ्या दोन संस्कृतींना फक्त समीपतावस्था मिळाली आहे. याचें कारण पाश्चिमात्य व जपानी किंवा पौर्वात्य संस्कृतींचीं मूलभूत तत्त्वें निराळीं आहेत. म्हणून जपाननें तिला देशांतच पण घराबाहेर ठेविली आहे. भौतिक वस्तूंचा अभिलाष, दिखाऊपणा, संघटनाप्रवृत्ति, वैविध्यप्रियता, व्यक्तिसुखप्राधान्य, स्थूल अभिरुचि, उत्तान सौंदर्यदृष्टि हे पाश्चिमात्य सुधारणेचे विशेष पौर्वात्य संस्कृतीपेक्षां अगदीं निराळे आहेत. या दोन्ही सुधारणांचें सायुज्य झाल्यास दोन्हींचें स्वारस्य नाहींसें होईल. म्हणून केवळ समीपतेचीच स्थिति त्यांना योग्य आहे असें जपानी जीवनानें ठरविलेलें स्पष्ट दिसतें.

**द्विविध जीवनाची मीमांसा—**

जपानच्या जीवनांत जी द्विविधता दिसते तिचें कारण हें आहे. सूक्ष्म आणि उदात्त अभिरुचीच्या जपाननें स्थूल आणि उत्तान अभिरुचीची संस्कृति केवळ सामर्थ्यप्राप्तीकरितां स्वीकारली. म्हणून तिचें स्थान त्यानें अगदीं अलग ठेविलें. त्याच्या सार्वजनिक व राजकीय जीवनांत पाश्चिमात्य स्वरूप आहे; परंतु वैयक्तिक अभिरुचीचें आणि सुखाचें स्थान जें जपानी घर त्यांत मात्र शुद्ध जपानी किंवा पौर्वात्य संस्कृति दिसून येते. या दोन संस्कृतींचीं दालनें किंवा प्रदर्शनगृहें अगदीं वेगळीं आहेत. म्हणून प्रवाशाला एकाच घटकेंत अमेरिका-यूरोपमधून जपानमध्यें उडी मारल्यासारखें वाटतें.

**सांस्कृतिक अहंकाराचा उद्भव—**

गेल्या पाऊणशें वर्षांच्या कामगिरीनें जपान आतां वयांत आलेला आहे. त्याला व्यक्तिमत्व प्राप्त झालें आहे. अहंकाराचा उगम होऊं लागला आहे. सोळाव्या वर्षी मुलीला किंवा अठराव्या वर्षी मुलाला जी आत्मीयत्वाची जाणीव होते ती आतां जपानला झालेली आहे. जपान या राष्ट्राला जगांत वैयक्तिक अस्तित्व आहे, त्याची स्वतःची संस्कृति ही देखील जगांतील एक श्रेष्ठ संस्कृति आहे, ती जपानमध्यें टिकविली पाहिजे, तिचा जपानबाह्य जगांत प्रचार केला पाहिजे, तिच्या पुराणस्वरूपाचें संशोधन करून जरूर तेथें उद्धार व आधुनिक जीवनांत समावेश केला पाहिजे, संशोधन करून आजच्या शास्त्रीय भाषेंत तिचें मंडन केलें पाहिजे, अशा प्रकारची जाणीव जपानी देशभक्तांना झालेली आहे. राष्ट्रीय सामर्थ्याच्या आत्मविश्वासामुळें सांस्कृतिक आत्मीयत्वाची प्रबळ भावना उत्पन्न झालेली आहे. त्यामुळें संस्कृतीचें वैशिष्टय कायम ठेवण्याची स्वाभाविक उत्कटता समाजांत आज दिसून येते.

"आंतरराष्ट्रीय संस्कृतिपरिचय मंडळ", "जपान संस्कृति संशोधक मंडळ", "पौर्वात्य संस्कृति संशोधक मंडळ", "जपान संस्कृति संशोधन संस्थांचा मध्यवर्ती संघ", इत्यादि अनेक संस्थांचा उदय अलीकडे झालेला आहे. जपानी संस्कृतीच्या वैशिष्टयाची जाणीव लोकांना करून देणें व

परदेशांत तिचा प्रसार करणें हा मुख्यतः सर्वांचा उद्देश आहे. सार्वजनिक जीवनांतही जपानी संस्कृतिविशेषांचा समावेश कोठें कसा करितां येईल या दृष्टीनें विचार व प्रयत्न चाललेला सर्वत्र दिसतो. बौद्ध मठांतील ध्यानाचा किंवा समाधीचा प्रचार शाळांतून केला जात आहे. जुन्या क्षत्रियांच्या वीरवृत्तिप्रधान खेळांचें पुनरुज्जीवन होत आहे. अशा अनेक अंगांनीं जपान-मध्यें जपानत्व आणण्याचा प्रयत्न सर्वत्र चालला आहे.

परकीय संस्कृति स्वीकारण्याचें अगदीं नवीन असें तंत्र जपाननें जगाला दिलेलें आहे यांत शंका नाहीं. सर्व पौर्वात्य व पाश्चिमात्य राष्ट्रांना या तंत्राचा अभ्यास करावा लागेल. संस्कृतीच्या इतिहासांत व शास्त्रांत जपानचें प्रकरण नवीन व अतिशय महत्त्वाचें आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ........ नं. ........
ता. ..............
ठाणे.

५

# देशीय संस्कृति व स्वभाव

**जपानांत हिंदु चालीरीती--**

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, दक्षिण बेटें, चीन आणि जपान या सर्व अतिपूर्व प्रदेशांतील अनेक समाजपद्धतींमध्यें साम्य आढळतें. धर्माच्या अनुषंगानें पूर्वी अनेक चालीरीतींचा प्रसार होत असे. त्यामुळें जेथें जेथें धर्मसाम्य आहे तेथें तेथें संस्कृतिसाम्यही आहे.

आजच्या जपानची देशी संस्कृति ही आद्य जपानी समाजपद्धति, चिनी चालीरीति व हिंदुस्थानांतून चीन-कोरियामार्फत गेलेल्या रीती या सर्वांची मिळून झालेली आहे. हिंदु चालीरीतींचीं पुष्कळ चिन्हें जपानमध्यें वरवर वावरणारालाही दिसतात. केवळ समाजपद्धतीचाच अधिक खोल अभ्यास केल्यास अनेक साम्यस्थानें आढळून येतील. या दृष्टीनें हिंदू धर्मशास्त्र व हिंदी समाजशास्त्र यांचा अभ्यास करणाऱ्या एकाद्या पंडितानें जपानचें सूक्ष्म निरीक्षण करणें आवश्यक आहे.

बुद्धाचीं देवळें, देवदर्शनाच्या पद्धती, घरांतील धार्मिक आचार, नित्य-नैमित्तिक संस्कार, व्रतें व समारंभ यांचे बाबतींत जपान व हिंदुस्थान यांत तर पुष्कळच साम्य आहे. देवापुढें तांदूळ व पैसे टाकून नमस्कार करणें,

देवदर्शनापूर्वी हस्तप्रक्षालन व आचमन, धूप व उदबत्त्या लावणें, स्तोत्रपठण, श्राद्धसमारंभ, इत्यादि चालीरीती हिंदुस्थानांतून जपाननें जशाचे तशा उचललेल्या दिसतात. चित्रकलेमध्यें अजंठा चित्रकलेशीं कांहीं जपानी चित्रांचें साम्य स्पष्टपणें दिसून येतें. मूर्तिशिल्पकला तर हिंदुस्थानांतूनच गेली आहे हें बुद्धाच्या व इतर मूर्तींच्या शरीररचनेवरून उघड दिसतें. बुद्ध आणि बौद्ध भिक्षू यांच्या मूर्तींचे नाक, डोळे, भालप्रदेश, व वस्त्रप्रावरण या गोष्टी हिंदू पद्धतीच्या आहेत. जपाननें प्रथम चिनी लिपि घेतली, पण पुढें देशी अक्षरें तयार केलीं गेलीं त्या वेळीं संस्कृत वर्णरचनापद्धतीचा उपयोग झाला. जपानमध्यें देवालयांतील कांहीं वाद्य वाजूं लागलें कीं आपण हिंदुस्थानांत असून देवळांतील चौघडा-वाजंत्रीच ऐकत आहों असा भास होतो. जपानी लोक दीड हजार वर्षें शाकाहारी राहिले होते. अलीकडे पन्नास साठ वर्षांत ते मांसाहारी झाले आहेत. हा शाकाहार बौद्ध धर्माच्या अहिंसा तत्त्वाबरोबरच आला असावा.

**चीनचे संस्कार—**

राहणीच्या पद्धतींत चीनचें पुष्कळच अनुकरण जपाननें केलेलें आहे. स्वयंपाक आणि भोजनपद्धति, काष्ठपात्रें, घरांतील चौरंग, इत्यादि गोष्टी चीनच्या सान्निध्यानें जपानमध्यें गेल्या. देवळांच्या इमारतींची शिल्पकला चीन-जपानमध्यें सारखीच दिसते. पण चीनचा महत्त्वाचा ठसा पडला तो जपानच्या नीतिधर्मावर. कन्फ्यूशियसचा धर्म मुख्यतः आचारविषयक आहे. समाजांत कसें वागावें, व संसारांत आणि समाजांत श्रेष्ठ-कनिष्ठ-समान यांशीं संबंध कसे ठेवावेत, हें चीननें शिकविलें. पितृनिष्ठा, राजनिष्ठा, आणि कुटुंबनिष्ठा हीं तत्त्वें फार प्राचीन कालापासून जपाननें चीनपासून उचललीं आहेत.

वाङ्मय आणि विद्या या क्षेत्रांत चिनी भाषा ही जपानला गीर्वाण भाषेच्या ठिकाणीं आहे. प्राकृत भाषांना संस्कृत ही मातृस्थानीं आहे त्याचप्रमाणें पुराण चिनी भाषा व आजची जपानी भाषा यांचे मायलेकीचे संबंध



लग्नविधीचे वेळीं वधूवर.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. १२ - नं. ६९८
ता.
ठाणें.

देवदर्शनापूर्वी हस्तप्रक्षालन व आचमन, धूप व उदबत्त्या लावणें, स्तोत्रपठण, श्राद्धसमारंभ, इत्यादि चालीरीती हिंदुस्थानांतून जपाननें जशाचे तशा उचललेल्या दिसतात. चित्रकलेमध्यें अजंठा चित्रकलेशीं कांहीं जपानी चित्रांचें साम्य स्पष्टपणें दिसून येतें. मूर्तिशिल्पकला तर हिंदुस्थानांतूनच गेली आहे हें बुद्धाच्या व इतर मूर्तींच्या शरीररचनेवरून उघड दिसतें. बुद्ध आणि बौद्ध भिक्षू यांच्या मूर्तींचे नाक, डोळे, भालप्रदेश, व वस्त्रप्रावरण या गोष्टी हिंदू पद्धतीच्या आहेत. जपाननें प्रथम चिनी लिपि घेतली, पण पुढें देशी अक्षरें तयार केलीं गेलीं त्या वेळीं संस्कृत वर्णरचनापद्धतीचा उपयोग झाला. जपानमध्यें देवालयांतील कांहीं वाद्य वाजूं लागलें कीं आपण हिंदुस्थानांत असून देवळांतील चौघडा-वाजंत्रीच ऐकत आहों असा भास होतो. जपानी लोक दीड हजार वर्षें शाकाहारी राहिले होते. अलीकडे पन्नास साठ वर्षांत ते मांसाहारी झाले आहेत. हा शाकाहार बौद्ध धर्माच्या अहिंसा तत्त्वाबरोबरच आला असावा.

**चीनचे संस्कार—**

राहणीच्या पद्धतींत चीनचें पुष्कळच अनुकरण जपाननें केलेलें आहे. स्वयंपाक आणि भोजनपद्धति, काष्ठपात्रें, घरांतील चौरंग, इत्यादि गोष्टी चीनच्या सान्निध्यानें जपानमध्यें गेल्या. देवळांच्या इमारतींची शिल्पकला चीन-जपानमध्यें सारखीच दिसते. पण चीनचा महत्त्वाचा ठसा पडला तो जपानच्या नीतिधर्मावर. कन्फ्यूशियसचा धर्म मुख्यतः आचारविषयक आहे. समाजांत कसें वागावें, व संसारांत आणि समाजांत श्रेष्ठ-कनिष्ठ-समान यांशीं संबंध कसे ठेवावेत, हें चीननें शिकविलें. पितृनिष्ठा, राजनिष्ठा, आणि कुटुंबनिष्ठा हीं तत्त्वें फार प्राचीन कालापासून जपाननें चीनपासून उचललीं आहेत.

वाङ्मय आणि विद्या या क्षेत्रांत चिनी भाषा ही जपानला गीर्वाण भाषेच्या ठिकाणीं आहे. प्राकृत भाषांना संस्कृत ही मातृस्थानीं आहे त्याचप्रमाणें पुराण चिनी भाषा व आजची जपानी भाषा यांचे मायलेकीचे संबंध



लग्नविधीचे वेळीं वधूवर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत, सं. १२ - नं. ६९८ ता. ....... ठाणें.



पुष्पमंडनकला (इकेबाना) वर्ग

आहेत. कलमानें (ब्रशानें) लिहिण्याची पद्धति चीन व जपान दोन्ही ठिकाणीं प्रचलित आहे.

**गरीब-श्रीमंतांतील साम्य—**

साधेपणांत उच्च प्रकारची अभिरुचि; हें जपानी राहणीचें वैशिष्ट्य आहे. हें तत्त्व घराची बांधणी, आंतररचना, पोषाख, आहार, कला, करमणुकी इत्यादि सर्व क्षेत्रांत दिसून येतें.

गरीब आणि श्रीमंत यांच्या गृहरचनेंत फार मोठी तफावत दिसून येत नाहीं. चटया, कागदी व कांचेच्या सरत्या भिंती, कौलारू, दारें इत्यादि गोष्टी गरीब व श्रीमंत यांचे घरांकडे लांबून पाहणाराला सारख्याच दिसतात झोंपडी व राजवाडा यांच्याइतकें अंतर त्यांत दिसत नाहीं. गरिबाचें घर. लहान असेल, श्रीमंताचें मोठें असेल. श्रीमंताच्या घरांतील वस्तू भारी किंमतीच्या असल्या तरी बाह्यतः त्या गरिबाच्या घरांतील वस्तूंसारख्याच दिसतात. कागद, कांच, चटया, लाकूड यांच्या किंमतींत जेवढा फरक पडेल तेवढाच फरक श्रीमंत-गरिबाच्या घरांकडे वरवर पाहणाराला दिसेल. श्रीमंताची संपत्ति त्याच्या तिजोरींत असेल ती गोष्ट निराळी. पण ती डोळ्यावर येण्याइतकी बाहेर दिसत नाहीं.

**आहारपद्धति—**

भात, मासे आणि लोणचें हा सामान्यपणें जपानी माणसाचा आहार असतो. भोजनाकरितां सर्व पात्रें लाकडाचीं असतात. लाकडी पात्रांवर विशिष्ट पद्धतीनें लाख चढवून तीं अतिशय गुळगुळीत व सुंदर केलेलीं असतात. त्यांवर सोनेरी किंवा इतर रंगांचीं फुलें, पानें, इत्यादि चित्रकलेचें काम केलेलें असतें. या सर्व वस्तू लांकडी तबकांतून आणल्या जातात. कढत खाद्य वस्तूही काष्ठपात्रांत घेतां येतात. कुटुंबांत भोजन असतें त्या वेळीं एका मोठ्या रंगीत चौरंगावर अन्न ठेवून भोंवतालीं कुटुंबीय मंडळी बसतात. सार्वजनिक भोजनसमारंभ असेल त्या वेळीं प्रत्येकाला स्वतंत्र लहान चौरंग

असतो. भात ठेवण्याकरितां लहान लाकडी पीप असतें. त्यांतून प्रत्येकाला त्याच्या त्याच्या लांकडी वाडग्यांत भात वाढला जातो.

रोजचा आहार साधा असला तरी मेजवानीच्या प्रसंगीं अनेक मिष्टान्नें केलीं जातात. बुद्ध देवालयांतून अद्यापि कांहीं शाकाहारी भिक्षू आहेत. तेथेंही वेळीं प्रसंगीं अनेक शाकाहारी पदार्थ केले जातात. स्वयंपाककला या दृष्टीनें जपानी पद्धति स्वतंत्र आहे. भाजीपाल्यांत तिखटमीठ घालीत नाहींत, कांहीं तरी गोड घालतात; त्यामुळें त्यांची चव गुळमट अशी असते. लोणचीं अनेक प्रकारचीं असतात. मासेही अनेक प्रकारानें शिजविण्याच्या पद्धती आहेत. विशेष प्रसंगीं भोजनसमयीं 'साके' घेतली जाते. तांदुळापासून केलेल्या जपानी दारूला साके असें नांव आहे.

कुटुंब मोठें असल्यास किंवा घरीं पाहुणा आल्यास पुरुष प्रथम भोजनास बसतात व वाढण्याचें काम स्त्रिया करितात. लहान कुटुंबांत स्त्री-पुरुष व मुलें एकदमही बसतात. स्वयंपाक साधाच असल्यामुळें सर्व पदार्थ घरींच शिजविले जातात.

**वस्त्रपद्धति—**

किमोनो, युकाता, होरी, इत्यादि अनेक नांवें पोषाखाला आहेत. पण त्यांतील शिवणीचें तत्त्व सामान्यपणें एकच आहे. मर्दानी व जनानी वस्त्रांच्या शिवणपद्धतींत महत्त्वाचा फरक नाहीं. फक्त कमरेला बांधण्याच्या शेल्यांत फरक आहे. किमोनो कांहींसा कफनीसारखा असतो पण पुढच्या बाजूनें ओव्हरकोटासारखा मिटतां येतो. बाह्या रुंद असून प्रत्येक बाहीलाच गोमुखीसारखी एकेक पिशवी जोडलेली असते. कॉलरच्या ऐवजीं साधी गळेपट्टी असते; गळा मोकळा ठेवून ती बंडीसारखी छातीवर बसते. आंतील व वरील किमोनोंची शिवण सारखीच असते. किमोनो एकावर एक चढविले जातात. थंडी असली तर जाड किमोनो एकाचे ऐवजीं अधिक घातले जातात. अलीकडे पाश्चिमात्य पद्धतीचा अंडरवेअर घालण्याची प्रथा पडलेली आहे. किमोनो सुती आणि रेशमी दोन्ही प्रकारचे असतात. रेशमाचा वापर गरीब

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ५६९३

लोकांतही पुष्कळ आहे; कारण रेशमी वस्त्र करण्याची कला जपानमध्यें फार प्राचीन कालापासून आहे.

पुरुषांचे किमोनो काळे किंवा इतर साध्या रंगाचे असतात. स्त्रियांचे किमोनो दिखाऊ रंगाचे असतात. त्यावर सुंदर नक्षीकाम केलेलें असतें. विशेषतः कमरेभोंवतीं बांधलेल्या शेल्याची घडी पाठीवर येते त्या घडीवर उंची नक्षीकाम केलेलें असतें. विशेष गंभीर प्रसंग असला तर किमोनो-सारखीच वरची कफनी असते. तिच्यावर प्रत्येक कुटुंबाच्या वैशिष्य-निदर्शक अशा तीनचार मुद्रा असतात.

जपानी घरांतील सर्व श्रीमंती किमोनोंत सांठविलेली असते.

**गृहमंडनपद्धति—**

घराची आंतील रचना व मंडनपद्धति साधी असते. स्वच्छता, साधे-पणा, शांतता, अतिमंडनाचा व वस्तुप्रदर्शनाचा अभाव, उच्च अभिरुचिपूर्ण कलेचा आस्वाद, निसर्गप्रेम, या गोष्टी जपानी राहणींत विशेष दिसतात. घरांत पसारा नाहीं. भिंती अगदीं साध्या व मोकळ्या, एकादेंच सुंदर चित्र, एकादा लहानसा पुतळा व एकच फुलदाणी, अशा योजनेमुळें घराचें साधें सौंदर्य विशेष खुलून दिसतें. जपानी घराभोंवतीं बाग किंवा साधीं झाडें हीं आवश्यक **असावयाचींच.**

घर व शरीर या दोन्ही बाबतींत फाजील अलंकारांचा अभाव दिसून येतो.

**हिंदु गृहमंडनाचें तत्त्व—**

पाश्चिमात्य सुधारणेचा समाजांत व देशांत कितीही प्रसार झाला असला तरी जपानी घर व गृहसंस्कृति हीं पुष्कळ प्रमाणांत शुद्ध जपानीच राहिलीं आहेत. पूर्व आशियांत सर्वत्र पाश्चिमात्य संस्कृतीचा पगडा बसलेला आहे, व बहुतेक ठिकाणीं पाश्चिमात्य आणि पौर्वात्य यांचें मिश्रण होऊन एक मिश्रसंस्कृति निर्माण होत आहे. हिंदुस्थानांत शहरांमध्यें ही गोष्ट

मुख्यत्वें दिसते. कोणत्याही सुशिक्षित हिंदी गृहरचनेकडे नजर टाकली तर तिचें मिश्र स्वरूप दिसून येईल. कांहीं वस्तू व पद्धती हिंदी संस्कृतीच्या आणि त्यांमध्येंच कांहीं गोष्टी पाश्चिमात्य संस्कृतीच्या असा प्रकार दिसून येतो. एकीकडे खुर्च्या, टेबल, मेज, इत्यादि साहित्य, एकीकडे जाजमावर एकादी गादी व तक्क्या, भिंतीवर एका बाजूस लक्ष्मीचें चित्र, दुसरीकडे मेलिन्स फूडच्या कॅलेंडरवरील गोऱ्या बाळाचें फुकट मिळालेलें चित्र, कोनाडयांत वाळलेला हार गळयांत असलेल्या दत्ताची तसबीर, मेजावर विलायती पद्धतीचें फ्लॉवर पॉट, कोनाडयांत देवापुढें पितळेची समई—अशा रीतीनें हिंदु आणि पाश्चिमात्य संस्कृती खेळीमेळीनें नांदतांना दिसतात! आपल्या पोषाखांतही तीच स्थिति. मध्यावर पाश्चिमात्य पद्धतीचा शर्टकोट, तर शरीराच्या दोन्ही टोंकांना देशी पादत्राण, धोतर व शिरस्त्राण. नेहमींच्या संभाषणाची भाषाही मिश्रच असते. पण रोजच्या परिचयामुळें हा विरोध किंवा हें मिश्रण आपल्या लक्षांत येत नाहीं.

परकीय संस्कृतीमधील सोयीस्कर भाग न कळत आपण आत्मसात् केलेला आहे. ही आपली पद्धति आहे. ती चांगली कीं वाईट हा अभिरुचीचा प्रश्न आहे. पण जपानी पद्धति यापेक्षां निराळी आहे.

**जपानचें तत्त्व—**

जपानी संस्कृति शुद्ध स्वरूपांत व पाश्चिमात्य संस्कृति तिच्या स्वरूपांत ठेवण्याची पद्धति जपानांत दिसून येते. दोन्ही पद्धतींचें मिश्रण शक्य तों टाळलें जातें. किंबहुना जपानी राहणीचें तें मुख्य तत्त्वच दिसतें. सर्वांना काटेचमचे किंवा समिधा (चॉपस्टिक्स्-हाशी) वापरून खातां येतें. पण पद्धति अशी कीं पाश्चिमात्य पद्धतीचें अन्न खातांना पात्रें चिनी मातीचीं व काटे-चमचे-सुरी यांचा उपयोग, आणि जपानी पद्धतीचा आहार करितांना काष्ठपात्रें आणि समिधा यांचा उपयोग करावयाचा. घराच्या मंडनयोजनेंत विलायती चित्र दिसणार नाहीं. परदेशी पद्धतीचें फर्निचर ठेविलेली खोली स्वतंत्र असते. तेथें सर्व मंडन परदेशी पद्धतीचें राहील. पोषाख जपानी असला तर पूर्ण जपानी, परदेशी असला तर पूर्ण परदेशी. जुन्या पद्धतीचें

सोयीस्कर शिरस्त्राण नसल्यानें परदेशीयांची टोपी (हॅट) तेवढी जपानी पोषाखावर चालते, पण ती अपरिहार्य प्रसंगीं हवामानाप्रमाणें वापरली जाते. संगीतकला, चित्रकला, स्वयंपाककला, नृत्यकला, इत्यादि सर्व कलाक्षेत्रांत जपानी आणि परदेशी कला अगदीं अलग व शुद्ध स्वरूपांत ठेविलेल्या आहेत. हें जपानी संस्कृतीचें वैशिष्टच पाहण्यासारखें व विचारपूर्वक अनुसरण्यासारखें आहे.

**सौजन्य व सभ्याचार—**

जपानी पद्धतीचे कांहीं आचार विशेष प्रकारचे आहेत. त्यांचाही संस्कृतीच्या दृष्टीनें अभ्यास करण्यासारखा आहे.

वागण्यांत आणि भाषणांत सौजन्य आणि सभ्यपणा हे गुण समाजांतील वरपासून खालच्या थरापर्यंत पसरलेले आहेत. सुशिक्षित समाजांत हे गुण कोठल्याही देशांत थोड्याफार प्रमाणांत सांपडतील. परंतु बहुजनसमाजापर्यंत त्या गुणांचा प्रसार व्हावा हें खरोखर सुसंस्कृत समाजाचें लक्षण आहे. घरांतील व दुकानांतील नोकर, कचेरींतील शिपाई व पट्टेवाले, ट्राम्वे आणि बसमधील कंडक्टर, हॉटेल-रेस्टॉरंटमधील वेटर्स, या सर्व लोकांत परस्परांशीं व वरिष्ठांशीं वागण्यांत अगत्य, नम्रपणा, सौम्यवृत्ति, व आनंद या भावना दिसून येतात. जपानमध्यें अनेक वर्षें राहिलेले हिंदी लोक सांगतात कीं जपानी लोक रस्त्यावर भांडतांना किंवा शिवीगाळ करितांना कधीं दिसणार नाहींत. समाजांत अडीअडचणींत असलेल्या बंधुभगिनींना मदत करणें ही वृत्ति त्यांच्या अंगांत मुरल्यासारखीच दिसते. दुसऱ्याला त्रास होईल अशा रीतीनें बोलणें किंवा वागणें जपानी लोक टाळतात. त्यामुळें ढोंगीपणाचा आरोपही त्यांचेवर कधीं कधीं येतो. एकाद्याच्या विनंतीला नाहीं म्हणणें त्यांच्या जिवावर येतें. त्याकरितां ते उत्तर देण्याचें टाळतील किंवा मोघम उत्तर देतील. वाणीनें व आचरणानें कठोरपणा दाखविण्याचा प्रसंग शक्य तों टाळावयाचा पण वेळ आली तर शब्दापेक्षां प्रत्यक्ष कृति करून मार्ग काढावयाचा हा जपानी स्वभाव दिसतो.

**स्वागत व निरोप—**

सौजन्याला अनुरूप असे सभ्याचारही जपानी समाजांत फार आहेत. परदेशी मनुष्य हे सर्व शिष्टाचार पाळूं लागला तर दमून जाईल इतका त्यांचा अतिरेकही होतो असें वाटतें. दोन जपानी रस्त्यांत किंवा कचेरींत भेटले तर स्वागताचे व निरोपाचे वेळीं अनेकवार परस्परांपुढें कमरेपासून वांकतील. दोघांपैकीं शेवटपर्यंत टिकतो कोण याची स्पर्धाच लागल्यासारखी दिसते ! नमस्काराचे सामनेच ते ! दुसरा गडी वांकण्याचे थांबेपर्यंत पहिला थांबत नाहीं, आणि प्रणाम करण्यांत खंड पाडणें म्हणजे अगत्य कमी असें दिसण्याचा संभव. अशा आपत्तींत प्रत्येक जण सात आठ वेळां तरी प्रणाम करीत राहील. घरांत पाहुणा यावयाचा झाला तर दारांत त्यानें पाऊल ठेवल्याबरोबर घरांतील मालकीण पुढें येऊन गुडघ्यावर बसून डोकें व हात जमिनीला लावून साष्टांग प्रणाम करील. पुन्हा घरांत गेल्यावर सर्व कुटुंबीय चटईवर वीरासन घालून बसतील व डोकें आणि हात जमिनीला लावन प्रणाम करतील. पाहुण्याला निरोप देतांनाही हाच प्रकार. शेवटीं दारापर्यंत मालक मालकीण येऊन वीरासन घालून साष्टांग नमस्कार (दोन पाऊलें, दोन गुडघे, दोन हात व डोकें) करतील व बराच वेळ आभारप्रदर्शक वाक्यें बोलत राहतील.

'स्वागत' हा जपानी जीवनांतील महत्त्वाचा भाग आहे. प्रत्येक संस्थेंत किंवा कचेरींत किंवा सार्वजनिक ठिकाणीं स्वागताची एक खोली असते. पाहुणा तेथें गेल्याबरोबर गडी त्याला मोठ्या आदबीनें सौजन्यपूर्ण हातवारे करून स्वागतखोलींत नेऊन बसवितो आणि त्याचेपुढें चिनी मातीची वाटी भरून गरम गरम ओचा (जपानी चहा) आणून ठेवितो. जपानी घरांत किंवा कचेरींत नेहमीं शेगडीवर लोखंडाचे किटलींत पाणी उकळत असतें. हिरव्या रंगाच्या चहाचा पाला डब्यांत असतो. पाहुणा आल्याबरोबर एका लहान किटलींत थोडा चहाचा पाला टाकून त्यावर कढत पाणी ओततात व लगेच तो फिकट पिवळ्या किंवा हिरव्या रंगाचा ओचा वाटींत (किंवा बिनमुठीच्या कपांत) ओतला जातो. त्यांत दूध किंवा साखर घालीत नाहींत. इकडील पद्धतीच्या काळ्या चहाला कोचा म्हणतात. तो नुसता,

किंवा साखर घालून, किंवा दूधसाखर दोन्ही घालून घेतात. कधीं थंड चहांत फक्त लिंबू, साखर व बर्फ टाकूनही घेतात. पाहुणा ओचा किंवा कोचा घेत असतां आंतमध्यें निरोप जातो व मुख्य अधिकारी किंवा मालक येतो. तो पुन्हा दुसऱ्या स्वागताच्या खास खोलींत नेऊन बसवितो व तेथें संभाषण होतें.

**सप्रेम भेटी—**

एकाद्याकडे भेटीला गेल्यानंतर, किंवा भेटीला कोणी आला तर, आणि इतर अनेक प्रसंगीं सप्रेम भेटीदाखल विविध वस्तू देण्याचा प्रचार जपानमध्यें फार आहे. भेटीदाखल मिठाई, चित्रें, फुलें, पुस्तकें, स्थानिक बाहुल्या, इत्यादि अनेक वस्तू देण्याचा परिपाठ आहे. एकाद्यानें घर बदललें कीं नवीन घराच्या शेजारीपाजारीं राहणारीं बिऱ्हाडें असतील त्यांना शेवया (उदोन) देण्याचा प्रघात आहे. आईबाप नाटकसिनेमाला गेले तर परत जातांना मुलांना भेट म्हणून कांहीं वस्तू नेण्याची फार गोड चाल आहे. त्यामुळें नाट्यगृहांचे आवारांत भेटीदाखल नेण्यासारख्या वस्तूंचीं दुकानें भरलेलीं असतात. मधल्या विश्रांतिकाळांत आईबाप आपल्या मुलांना काय वस्तू आवडेल या विवंचनेंत असतात.

आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषद तोकियोमध्यें १९३७ सालीं भरली होती. त्या वेळीं सरकारनें खास सूचना सोडल्या होत्या, कीं आपल्या देशांत अनेक देशांतील पाहुणे येणार आहेत, त्यांना जपाननें आदरातिथ्यानें वागवावें. राष्ट्र या दृष्टीनें आपली सभ्याचाराची परंपरा कायम राखण्याची किती काळजी घेतली जाते तें यावरून समजेल. ट्रामवेम्ध्यें जागा भरलेल्या असल्या आणि एकादा परदेशी पाहुणा उभा असलेला दिसला तर एकादा जपानी मनुष्य उठून चटकन् परदेशाच्या पाहुण्याला जागा रिकामी करून देई.

**भाषेंतील माधुर्य—**

सभ्याचार व सौजन्य यांना अनुसरून जपानी भाषाप्रयोग वाढलेले आहेत. परस्परांविषयीं आभार, आनंद, गौरव, कृतज्ञता, विनंति, सूचना, प्रश्न, इत्यादि शब्दानें व्यक्त करण्याकरितां अनेक सभ्य व गोड शब्दयोजना

जपानी भाषेंत आहेत. तसेंच भावनांची विविधता प्रदर्शित करण्याइतकी शब्दसंपत्तीही विपुल आहे. जपानी शब्दांचें यथातथ्य भाषांतर इंग्रजींत, मराठींत किंवा अन्य भाषेंत करितां येणें शक्य नाहीं. 'मी' हा शब्दप्रयोग करावयाचा झाल्यास त्याला वीस पर्याय आहेत! वरिष्ठानें कनिष्ठास, कनिष्ठानें वरिष्ठास, निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या शब्दांची योजना 'मी' या एका शब्दाकरितां केली जाते. साधा 'पाऊस' हा शब्द वीस प्रकारांनीं प्रदर्शित केला जातो. शब्दांतील या सूक्ष्म भेदांमुळें जपानी भाषा भाषांतराला कठिण, नव्हे अशक्य आहे. अनेक सौम्य अथवा कठोर भावना विविध प्रकारांनीं प्रदर्शित करण्याचें सामर्थ्य जपानी भाषेंत असल्यामुळें इष्ट ते परिणाम श्रोत्यांवर करण्याला ती समर्थ आहे. तितकीच ती परदेशीयांना दुर्बोधही आहे.

साध्या वस्तुनिदर्शक शब्दामध्यें थोडा वर्णविकार करून त्याला सन्मानदर्शक अर्थ आणतां येतो व अशा रीतीनें त्या वस्तूचा ज्याशीं संबंध असेल त्या व्यक्तीचाही आदर करितां येतो. 'ओ' अक्षरानें हें काम होतें. बोशी म्हणजे टोपी, ओबोशी म्हणजे 'आपली सन्मान्य टोपी'; हेया म्हणजे खोली, ओहेया म्हणजे 'आपली सन्मान्य खोली' हा शब्दप्रयोग कोठपर्यंत जाईल व सन्मान्य पाहुण्याची कोणती वस्तु सन्मान्य होईल त्याला मर्यादा नाहीं! रोजच्या व्यवहारांत तर सामान्य गडीमाणूस-नोकर-मजूरदेखील सभ्याचारदर्शक शब्दप्रयोग वापरतात. "ही बस् स्टेशनकडे जाते का?" अशा प्रश्नाला "हो, कृपा करून आंत बसा" असें उत्तर मिळेल. "अहो, आपल्या दुकानांत दूध असेल काय?" या प्रश्नाला नकार असल्यास ती खेदाची भावना मुखविकारानें व शब्दांनीं व्यक्त केली जाईल; "फार वाईट वाटतें; दूध नाहीं बरें का. हें पाहा, शेजारच्या दुकानांत असेल." एकाद्या प्रश्नाचें उत्तर माहीत नसल्यास नुसतें रुक्षपणानें नाहीं असें कोणी म्हणणार नाहीं; "माफ करा, मुरातासान कोठें राहतात माहीत आहे काय?" या प्रश्नाला "हां, असें आहे का! मला माहीत नाहीं हो" इतकें लांबलचक दिलगिरीचें उत्तर मिळेल.

दैनिक व्यवहारांत प्रत्येक प्रसंगाला अनुलक्षून बोलण्याचे अनेक भाषा-प्रयोग ठरलेले आहेत. ते ऐकून उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं सभ्याचारांची आठवण होते. पण जपानमध्यें शब्दांबरोबर अभिनयानें व मनानें ती भावना व्यक्त करण्याचा प्रघात असल्यानें आनंद वाटतो, व केवळ ढोंगी शिष्टाचाराची भावना कमी होते. पाहुण्यानें भोजनोत्तर 'अन्नदाता सुखी भव' निदर्शक म्हणण्याचे प्रयोग, पाहुण्याचें स्वागत व निरोप प्रसंगीं मालक मालकिणीनें म्हणण्याचे प्रयोग, एकाद्या विशिष्ट प्रसंगीं आभार मानण्याचे प्रयोग या सर्वांकरितां विशिष्ट भाषायोजना आहे. तिचा उपयोग न करणारा अडाणी, उद्धट व असंस्कृत समजला जातो.

**आचाराचें शिक्षण—**

जपानमध्यें सभ्याचारांना फार महत्त्व आहे. हे आचार मुलामुलींना लहानपणापासून शाळांतून शिकविले जातात. त्यामुळें दहाबारा वर्षांचीं मुलेंदेखील वयस्क माणसाप्रमाणें आदबीनें वागतांना पाहून मोठी गंमत वाटते. कारण वय आणि आचार यांत अपेक्षेपेक्षां फार अंतर दिसतें. या वर्तनामुळें सार्वजनिक जीवनांत एक प्रकारची रम्यता व आनंदी वृत्ति निर्माण होते. रुक्षपणा नाहींसा होऊन व्यवहाराला ओलावा येतो. अतिरेक मा टाळणें जरूर आहे.

**स्वभावानें संथ व शांत—**

शांतपणा आणि संथपणा हें जपानी स्वभावाचें लक्षण आहे. जपानी मनुष्य सहसा रागावलेला दिसत नाहीं. रागावलेला असला तरी तो बाहेर फारसें दाखविणार नाहीं. क्रोध, दुःख, इत्यादि भावना उघडपणें प्रदर्शित करणें असभ्य समजलें जातें. पुष्कळ वेळां भाषेच्या व इतर अडचणीमुळें परदेशीयांना रागावण्याचे प्रसंग अनेक येतात. अशा वेळींही जपानी मनुष्य शांतच असतो. रागावलेल्या माणसावर उलट न रागावतां तो शांतपणें व्यवहार करीत असतो. हें आत्मसंयमन केवळ योग्यालाच शक्य आहे असें वाटतें.

जपानी सहसा रागावत नाहीं याचा अर्थ मनानें दुबळा असतो असा नाहीं. त्याला काय सांगायचें तें तो एकदांच पण निश्चित स्वरानें सांगेल- पुढें प्रसंग आला तर कृति करील. संतापानें बडबड करणार नाहीं.

**विचारपूर्वक कृति—**

स्वभावांत जसा शांतपणा तसा कृतींत संथपणा दिसून येतो. जपानमध्यें आपलें काम तडकाफडकीनें कधींही होणार नाहीं. सावकाश धीम्मेपणानें सर्व काम चालतें. कोणाला घाई असल्यासारखें वाटत नाहीं. या दृष्टीनें अमेरिकन आणि जपानी लोक यांत दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. अमेरिकन स्त्रीपुरुषांत जी तडफ आहे ती जपानी लोकांत नाहीं, ती उणीव आपल्या कष्टाळूपणानें त्यांनीं भरून काढली आहे.

कृतीमधला संथपणा विचारांतही दिसतो. एकादा प्रश्न किंवा माहिती विचारली असतां जपानी मनुष्याकडून तडफदार असें उत्तर ताबडतोब मिळ-णार नाहीं. " हां असें आहे काय ? हें पहा, अं ऽऽ " इत्यादि निरर्थक व कालापव्ययकारक शब्दप्रयोग पूर्ण झाले म्हणजे मुख्य प्रश्नाचें उत्तर बाहेर पडेल. जपानी माणसाच्या विचारांत संथपणा असण्याचें कारण काय असावें, बुद्धिमत्ता कमी, कीं विचाराची तडफ कमी, कीं संवयच अशी आहे, याची चर्चा करितांना जपानमध्यें राहिलेले एक हिंदी अध्यापक म्हणाले, " बुद्धीनें किंवा विचारानें ते कमी नाहींत. पण कोणत्याही प्रश्नाचें उत्तर देतांना, त्याचें उत्तर माहीत असलें तरी, पुन्हा सर्व बाजूंनीं विचार करून उत्तर द्यावें अशी त्यांना संवय आहे." दुसऱ्या माणसाचा मतलब समजून घेण्यांतही जपानी लोकांची ग्रहणशक्ति संथ असल्यासारखी वाटते. त्याविषयीं एक अनुभवी हिंदी गृहस्थ म्हणाले, " ते लोक थोडेच विचार पण संथपणानें ग्रहण करितात, आणि सर्व बाजूंनीं शहानिशा करून विचार स्वीकारल्यामुळें एकदां स्वीकार-लेला ग्रह सहसा सोडीत नाहींत; कृतींत आणण्याचा प्रयत्न करितात."

स्वभाव, बुद्धि आणि विचार यांत शांतपणा किंवा संथपणा असणें हें जपानी स्वभावाचें व संस्कृतीचें वैशिष्ट्य आहे. या स्वभावाच्या मागें

अनेक पिढ्यांची तपश्चर्या आहे, म्हणून त्याची संस्कृतींत गणना केली पाहिजे. बौद्धधर्माच्या आचारांत असे कांहीं आचार आहेत कीं त्यामुळें स्वभावाला शांतपणा व उदात्तता येते; कन्फ्यूशियानिझम्च्या तत्त्वज्ञानामुळें स्वभावांत संयम येतो; या दोहींच्या मिश्रणानें जपानी स्वभाव तयार झालेला आहे. त्यांत पौर्वात्य वैशिष्टय आहे.

**कुटुंबनिष्ठा—**

कुटुंबनिष्ठा आणि कौटुंबिक प्रेम या गोष्टी सर्वच पौर्वात्य समाजांत आढळतात तशा जपानांतही आहेत. नातेवाईकाची आर्थिक जबाबदारी घेण्याची परंपरा अद्याप असल्यामुळें बेकारीच्या दिवसांतही उपासमार होत नाहीं. कृषीवल समाजांत सामायिक कुटुंबपद्धति अद्याप आहे. विवाहाचें मुख्य उद्दिष्ट कुटुंबसेवा हें समजलें जातें. जपानी लोक लहान मुलांचें कौतुक अनेक मार्गांनीं करितात. वयाच्या तिसऱ्या, पांचव्या व सातव्या वर्षी विशेष समारंभ केले जातात, त्याकरितां एक वार्षिक सण असतो. मुलांचे व मुलींचे स्वतंत्र उत्सव असतात; त्यांना राष्ट्रीय असें स्वरूप दिलें जातें.

कुटुंबपद्धतीचे आदर्श संबंध राष्ट्रक्षेत्रांत कसे आचरतां येतील या दृष्टीनें जपानी लोकांचा विचार चालला आहे. कारखान्यांतील मुलींचें वसतिगृह हें एक मोठें कुटुंबच समजलें जातें. जपान देश हें एक मोठें कुटुंब असून राजा हा कुटुंबाचा पालक आहे. याच तत्त्वावर समाजांतील इतर व्यवहार नियमित करावेत अशी एक विचारसरणी आहे. यालाच राष्ट्र-कुटुंबवाद असें म्हणतां येईल.

**चहासमारंभाचें स्वभावशिक्षण—**

गांभीर्य, शिस्त आणि संयम हे गुण वाढविण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न जपानी लोक करितात. राष्ट्रीय स्वभावांचें तें वैशिष्टय आहे व तें कायम राखलें पाहिजे अशी भावना सर्वत्र झालेली आहे. हा स्वभावविशेष वाढविण्याकरितां पूर्वापार कांहीं चाली किंवा परंपरा चालत आलेल्या आहेत. जपानी संस्कृति या दृष्टीनें त्यांचा अभ्यास आवश्यक आहे.

"चा नो यू" किंवा चहासमारंभ या नांवाचा एक विधि मुलींच्या शिक्षणांत पूर्वापार समाविष्ट केलेला आहे. बौद्ध साधूंनीं एकांतांत स्वतःच्या करमणुकीकरितां व मनाला शिस्त लावण्याकरितां हा विधि बसविला. जपानी उद्यानांत एक अतिशय साधी लहान झोंपडी असते. त्या ठिकाणीं हा विधि सामान्यपणें होतो. चहाची हिरवी पूड असते तिचा घट्ट चहा करणें हा मुख्य विधि. परंतु तो करण्याचे बारीक सारीक शास्त्रोक्त तपशील ठरलेले आहेत, त्याप्रमाणें तो करावयाचा असतो. चहाचीं भांडीं वगैरे अगदीं साधीं असतात. कारण साधेपणा आणि संयम हेच या विधीचें वैशिष्ट्य आहे. एक मुलगी शास्त्रोक्त क्रियांनीं चहा करिते; पाहुणे वीरासन घालून बसलेले असतात; तास अर्धा तास कोणीं बोलायचें नाहीं; चालणें, उठणें, बसणें, चहापात्र घेणें, तें खालीं ठेवणें, इत्यादि क्रिया यथाशास्त्र केल्या जातात; सर्व क्रिया झाल्या म्हणजे परस्परांचे आभार मानून शिस्तवार उठून सर्वांनीं जावयाचें.

या विधीमुळें मनाला वळण लागतें अशी जपानी समजूत असल्यामुळें मुलींच्या शिक्षणांत तो आवश्यक विषय आहे.

**समाधियुक्त तिरंदाजी—**

तिरंदाजी हा असाच शिस्तीच्या शिक्षणाचा विषय आहे. तिरंदाजी करतांना सर्व क्रिया अगदीं शांतपणें, न बोलतां, एकाग्र मनानें, विधियुक्त अशा करावयाच्या असतात. पवित्र्यांत उभें राहणें, रुबाबदारपणें बाण घेऊन तो धनुष्यावर चढविणें, लक्ष्याकडे निश्चयानें व एकाग्रतेनें पाहणें, बाण सोडणें, सोडलेल्या बाणाकडे क्षणभर पाहात राहाणें, लक्ष्यवेध झाला न झाला तरी निर्विकार मन ठेवणें, आणि शेवटीं पवित्रा मोडून बाजूला होणें— या क्रिया अतिशय डौलानें, आत्मसंयमनानें, निर्विकार मनानें व शांतपणें केल्या जातात. ही तिरंदाजी क्रियासौष्ठवाचे व विकारदर्शनाचे दृष्टीनें प्रेक्षणीय वाटते. जपानी तिरंदाजींत लक्ष्यवेध करणें यांत खरें यश नसून मनोवृत्ति स्थिर ठेवणें यांत खरें कौशल्य आहे. मनोवृत्ति अस्थिर ठेवून लक्ष्यवेध होण्यापेक्षां मनोवृत्ति निश्चल ठेवन लक्ष्यवेध न झाला तरी तो अधिक श्रेयस्कर, असें शास्त्र आहे.

**ध्यानमंदिरें—**

झेन किंवा ध्यान ही पद्धति बौद्धधर्मापासून आलेली आहे. शांत ठिकाणीं बसून एकाग्रतेनें चिंतन करणें ही गोष्ट मनाचें सामर्थ्य व आत्मसंयमन मिळविण्याकरितां आवश्यक समजली जाते. कांहीं शाळांमध्यें ध्यानाकरितां सुंदर उपवनांत प्रशस्त अशीं साधीं मंदिरें आहेत. कांहीं संस्थांमध्यें खास ध्यानमंदिरें नवीन बांधलीं जात आहेत.

**बुशिदो, जपानी स्वभावाचें ब्रीद—**

'बुशिदो' या शब्दांत आपल्या स्वभावाचें सारसर्वस्व येतें असें जपानी लोक मानतात. पूर्वींच्या सामुराई अथवा क्षत्रिय वर्गानें स्वतःच्या मानसिक शिक्षणाकरितां 'बुशिदो' नांवाची आचारविचारांची नियमावलि तयार केली. स्वामिनिष्ठा, आत्मसंयमन, बलिदानाची तयारी, मानापमानाच्या तीव्र भावना, ध्येयनिष्ठा व साधी राहणी या गोष्टी बुशिदोमध्यें मुख्यतः येतात. या परंपरेचा परिणाम स्वभावावर झालेला आहे. सर्व जपानी राष्ट्राला बुशिदोचें शिक्षण देण्याचा प्रयत्न सध्यां चाललेला आहे.

बुशिदोचें शिक्षण सामान्य जनांना ऐतिहासिक कथांच्या साधनानें दिलें जातें. पौराणिक व ऐतिहासिक नाटकें किंवा बाहुल्यांचीं नाटकें यांत बहुतेक बुशिदोचें शिक्षण देणारे विषय असतात. 'चूशिंगुरा' नांवाचें एक प्रसिद्ध व अतिशय हृदयंगम कथानक आहे. त्यांत आपल्या स्वामीच्या अपमानाचा सूड घेण्याकरितां त्याच्या सत्तेचाळीस अनुयायांनीं स्वार्थत्यागानें अनेक रहस्यमय गोष्टी करून शेवटीं हाराकिरी (उदर-विदारण) करून घेतली अशी कथा वर्णन केलेली आहे. जपानी स्वभावाची निदर्शक अशी ही कथा आहे.

**सूक्ष्म कलासौंदर्यदृष्टि—**

जपानी लोकांच्या कलाभिरुचीचें वर्णन केल्याशिवाय त्यांच्या संस्कृतीची पूर्णत्वानें कल्पना येणार नाहीं. ध्वनि, वर्ण, आकार आणि स्पर्श यांच्यांतील अतिसूक्ष्म अशी गोडी अनुभविण्याचें सामर्थ्य जपानी कानांना

व डोळ्यांना आहे, तसें इतर सुसंस्कृत समाजांतही सांपडणें कठिण आहे. लोखंडाच्या पात्रांत पाणी उकळत असतां निघणारा गंभीर ध्वनि ऐकण्यांत त्यांच्या घटका खर्च होतात. रातकिड्यांचें संगीत ऐकण्याकरितां ते अनेक किड्यांना बांबूच्या लहान पिंजऱ्यांत घालून घरीं त्यांचें पालन करतात. साध्या दगडाकडे पाहून इतरांना त्याचें सौंदर्य दिसणार नाहीं, पण जपानी लोकांना दगडांत फुजी पर्वताचा किंवा अन्य वस्तूचा आकार दिसतो व तो दगड संग्राहय वाटतो. लाकडाला सात ठिकाणीं बांक असेल तर तें सरळ न करतां वापरण्यांत त्यांना आनंद वाटतो. लाकडाच्या नैसर्गिक सौंदर्याचा उपभोग घेतां यावा म्हणून त्यावर रंगाचें लिंपण न देतां घरकामांत तें वापरलें जातें. शरद् ऋतूंतील चंद्र, वसंत ऋतूंतील फुलोरा, हेमंत ऋतूंतील निसर्गाचे रंग, अशा सारखें नैसर्गिक सौख्य भोगण्याकरितां जपानमध्यें कांहीं ठराविक समारंभ आहेत. सणाचे दिवशीं घरांतील लोक काव्यस्पर्धा लावतात. एका विशिष्ट प्रसंगीं सर्व राष्ट्रांत काव्याची स्पर्धा होऊन त्यांत गरीब-श्रीमंत सर्व लोक भाग घेतात व उत्कृष्ट काव्याचा राजदरबारीं सन्मान होतो. १९३७ सालीं या राष्ट्रीय काव्यस्पर्धेकरितां राजानें "देवालयाच्या उद्यानांतील प्रातःशोभा" असा विषय दिला होता. लोक कविता रचीत असतां इकडे सैनिक लढाईवर जात येत होतेच !

आपली कलाभिरुचि व रसिकता तृप्त करण्याकरितां जपानी लोकांनीं अनेक कला वाढविल्या आहेत. त्या सर्वांमध्यें पौर्वात्य असे कांहीं विशेष गुण दिसून येतात. साधेपणा, निसर्गनिष्ठा, उत्तानतेचा अभाव आणि गंभीर भावना या गुणांचा जपानी कलांमध्यें उत्कर्ष झालेला आहे. विकृत भावनांना चेतना देणें किंवा भडक सौंदर्याची खुलावट करणें या दोषांपासून सांप्रदायिक जपानी कला अलिप्त आहे.

दुसरा विशेष असा कीं गृहजीवनाच्या अनुषंगानें कला वाढलेल्या आहेत. रोजच्या सांसारिक जीवनांत त्यांचा आस्वाद घेतां येतो. जपानी घरांत जपानी लोकांची कलाभिरुचि व कलेचा उत्कर्ष हीं प्रतिबिंबित झालेलीं आहेत.

**पुष्परचनाशास्त्र—**

गृहजीवनांत वाढलेली व जपानी वैशिष्ट्य असलेली एक कला म्हणजे "पुष्परचनाशास्त्र" (फ्लॉवर अरेंजमेंट = इकेबाना) हें होय. बुद्धाच्या मूर्तीपुढें कमळें व फुलें ठेवण्याचा हिंदुस्थानांत प्रघात होता तो या कलेचा उगम आहे. जपानी लोकांनीं त्याचें शास्त्र बनविलें असून या कलेच्या सांप्रदायाचे पंचवीस तीस पंथ आहेत. पुष्परचनेंत फुलें, पानें व फांद्या सर्व येतात. त्यांकरितां बांबू, चिनी माती, लाकूड, पितळ किंवा अन्य वस्तूचें फुलदान (फ्लॉवर पॉट) केलेलें असतें. त्यांत फुलांच्या फांद्या अशा रचनेनें ठेवावयाच्या कीं सर्व फुलांचें व पानांचें सौंदर्य चांगल्या रीतीनें दिसावें. फुलदानांत रचण्यापूर्वी फांद्यांचा सुंदर भाग कायम ठेवून अनवश्यक भाग कापून टाकला जातो. फुलांच्या रचनेंतही तत्त्वज्ञान आहे. कांहीं फुलांची दृष्टि स्वर्गाकडे, कांहींची पृथ्वीकडे व कांहींची मानवाकडे लागलेली अशी दिसली पाहिजे. फुलदानांत रचलेलीं फुलें हीं विश्वाचीं प्रतीकें आहेत. पुष्परचना करणाऱ्याच्या मनांत कांहीं विशिष्ट भावना, देखावा किंवा प्रसंग असतो, तो फुलांच्या रूपानें प्रदर्शित करण्याचा तो प्रयत्न करितो. अरण्याचा व सरोवराचा देखावा, वसंत ऋतूंतील भावना, शरद् ऋतूची शोभा, ग्रीष्मांतील शीतल प्रभात, इत्यादि अनेक विषय कल्पून पुष्परचना केली जाते.

हा जपानी इकेबाना शिकण्याकरितां कांहीं पाश्चिमात्य स्त्रीपुरुषही जपानमध्यें येतात.

**निसर्गप्रेम—**

उद्यानरचना, पुष्पसंवर्धन, वृक्षसंवर्धन हीं शास्त्रेंही जपानमध्यें उच्च दर्जापर्यंत पोंचलीं आहेत. प्रत्येक ऋतूंत त्या त्या काळच्या फुलांचें व झाडांचें प्रदर्शन भरतें. झाडांना विविध आकार दिले जातात. कुंड्यांतील झाडें कधीं पन्नास वर्षांपेक्षांही अधिक जुनीं असतात. सारांश झाडांना आणि माणसांना दोघांनाही वळण लावण्याची कला जपानमध्यें आहे.

"बोनसेकी" (लँडस्केप मेकिंग) नांवाची कला जपानी लोकांनीं

वाढविलेली आहे. पांढरी रांगोळी, वाळू, झाडाच्या फांद्या, विविध आकारांचे दगड, पाणी या सर्वांची रचना एकाद्या लाकडी तबकांत अशा रीतीनें करावयाची कीं त्यांतून एक उत्कृष्ट निसर्गदेखावा निर्माण व्हावा; हें या कलेचें तत्त्व आहे. या कलेकडे स्त्रियांचें विशेष लक्ष आहे.

**जलवर्ण चित्रकला—**

जपानी चित्रकलेंत जलवर्ण वापरले जातात. त्यांत खडूचें मिश्रण असल्यामुळें चित्रावर सौम्यपणा व उठाव दिसतो. चित्रकलेचें लक्ष विशेषतः निसर्गाकडे अधिक आहे. निसर्गसृष्टींतील सूक्ष्म जीवन व मानसशास्त्र जपानी चित्रकारांनीं जितकें अवलोकन केलें आहे तितका त्यांनीं मानवी जीवनाचा अभ्यास केलेला दिसत नाहीं. त्यांच्या चित्रकलेंत देखाव्याचीं व निसर्गजीवनाचीं चित्रें विशेष चांगलीं आहेत. रेशमी किमोनो, घरांतील पडदे, पंखे, पात्रें, इत्यादि वस्तूंच्या निमित्तानेंही चित्रकलेचा सांसारिक जीवनांत पुष्कळ प्रचार झालेला आहे.

**नृत्य व संगीत—**

संगीतकलेंत फारशी प्रगति झालेली दिसत नाहीं. नानीवाबुशी, गागाकू, बिना, गिदायू वगैरे संगीताचे निरनिराळे प्रकार आहेत. हें संगीत कांहींसें मद्रासकडील संगीतासारखें वाटतें. त्यांत गांभीर्य, उदात्त भावना आणि शोकरसानुकूलता हे विशेष गुण आहेत. आनंदी वृत्ति आणि रंगेलपणा यांना जपानी संगीत फारसें अनुकूल नाहीं.

नृत्यकला पूर्वीपासून चांगली वाढलेली आहे. विशिष्ट अभिनय आणि हस्तमुद्रा यांचे सांप्रदायिक अर्थ आहेत. रोजच्या सांसारिक जीवनांतील क्रिया घेऊन त्यांना सहजसुंदर व कलात्मक असें वळण देऊन त्यांतून अनेक नृत्यविक्षेप निर्माण केलेले आहेत. त्यांत नागर आणि जानपद असे भाग आहेत. नागर नृत्यांत पौराणिक कथात्मक व शृंगारिक असे विभाग आहेत. शृंगार अतिमुग्ध व संयमित असतो. त्यांत उत्तानपणा किंवा

अश्लील सूचना या गोष्टी वर्ज्य केलेल्या दिसतात. जानपद नृत्य हें कांहीं उत्सवानिमित्त शेतकरी लोकांनों एकत्र करावयाचें असें आहे.

**काबुकी व नो नाटचकला—**

नाटचकलेंत 'काबुकी' आणि 'नो' असे दोन प्रकार आहेत. काबुकी सामान्य जनांकरितां असल्यामुळें त्यांतील विषय पौराणिक, ऐतिहासिक, धार्मिक किंवा काल्पनिक असा असतो. 'नो' हा प्रकार अधिक गंभीर स्वरूपाचा व उदात्त असल्यानें वरच्या दर्जाच्या लोकांकरितांच त्याचा उपयोग होतो. आपल्याकडील ललितें किंवा रामलीला यांना अधिक पद्धतशीर, गंभीर आणि कलात्मक असें रूप दिलें असतां जो प्रयोग होईल त्याला काबुकी असें म्हणावयास हरकत नाहीं. तोकियोंतील काबुकी नाटचगृह उत्कृष्ट दर्जाचें असून त्याचे दरही भारी असतात. विशेष उदात्त अभिरुचि असलेले प्रेक्षकच हे खेळ पाहावयास जातात. उथळ व थिल्लर वृत्तीला आनंद देण्यासारखें त्यांत कांहीं नसतें, त्या कारणानें काबुकी पाहणें हें एक सुसंस्कृतपणाचें लक्षण समजलें जातें.

सांप्रदायिक नाटचकलेचा प्रचार जपानमध्यें लहान गांवींही झालेला दिसतो. दहा हजार वस्तीच्या गांवांतही चक्रगतीची रंगभूमि असते व तेथें दाखविल्या जाणाऱ्या खेळांतही उच्च प्रतीची जुनी कला दिसून येते ही गोष्ट विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे.

**संस्कृतिवैशिष्टचाचा आग्रह—**

संस्कृति संस्कृति म्हणजे काय अशी पुष्कळ लोकांना शंका येत असते. त्यांना जपानच्या उदाहरणावरून संस्कृतिवैशिष्टचाची कल्पना येईल. प्रत्येक समाजाची विचार करण्याची विशिष्ट पद्धति असते. तिचा संस्कार त्या समाजाच्या राहणीवर आणि कलांवर झालेला असतो. हें वैशिष्टच राखण्यांत त्या समाजाचा स्वाभिमान तृप्त होतो आणि जगाच्या संस्कृतींच्या संग्रहांत विविधता येते. विविधतेमुळें मानवी आनंदांत भर पडते. म्हणून

प्रत्येक समाजानें स्वतःकरितां आणि जगाकरितां आपली संस्कृति शुद्ध स्वरूपांत राखणें आवश्यक आहे.

इतकी सुसंस्कृत परंपरा असलेले लोक शेजारराष्ट्रांशीं आक्रमण-प्रवृत्तीचे संबंध कां ठेवितात असा प्रश्न स्वाभाविकपणेंच मनांत एकसारखा डोकावत असतो. मानवी जीवनांत सुसंगतता सांपडणें कठिण आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे

# ६

# पाश्चिमात्य संस्कृतीच्या मर्यादा

**पूर्वेकडून पाश्चिमात्य संस्कृति—**

जपानमध्यें पाश्चिमात्य संस्कृति पूर्वेकडून आली हें विशेष आहे! जपान व अमेरिका यांचेमध्यें पासिफिक महासागर आहे. दोन्हीही देशांत नाविक कला वाढलेली असल्यानें समुद्राचें बंधन जवळ जवळ नसल्यासारखेंच आहे, इतके या दोन्ही देशांचे संबंध आलेले आहेत. मेइजी युगापूर्वी पहिला व्यापारी तह झाला तो अमेरिकेशीं झाला, आणि आधुनिक जपानी जीवनाला प्रारंभ झाला त्या वेळीं बरेचसे विद्यार्थी नवीन विद्या व कला शिकण्याकरितां अमेरिकेला गेले. यूरोपमधील इतर देशांबरोबरही जपानचा संबंध आला. त्याचीं चिन्हें औद्योगिक आणि शास्त्रीय क्षेत्रांत दिसतात. परंतु अमेरिका हें नवीनच पुढें आलेलें राष्ट्र या दृष्टीनें जपानवर त्याचा अधिक परिणाम झाला. म्हणून जपानमध्यें जपान, अमेरिका व यूरोप अशा तिहींचें दर्शन एकदम होऊं शकतें.

**इंग्रजी भाषेचें जपानी स्वरूप—**

प्रथम दर्शनींच दिसणारें पाश्चात्य संस्कृतीचें स्वरूप म्हणजे भाषा व पोषाख. तोकिओ, ओसाका वगैरे कांहीं शहरांत परदेशी प्रवाश्यांची जा ये

मोठ्या प्रमाणावर असल्यानें तें गिऱ्हाईक आकर्षून घेण्याकरितां दुकानांवर इंग्रजी पाट्या लावल्या जातात. जपानमधील इंग्रजी फलक म्हणजे एक विनोदाचा विषय आहे.

उच्चारित वर्णांच्या पूर्णत्वाचे दृष्टीनें जपानी भाषा सदोष आहे. अ, ऐ सारखे कांहीं स्वर, आणि ल, ट, ड, यांसारखीं व्यंजनें जपानी भाषेंत नाहींत. त्यामुळें परकीय भाषेंतील हे उच्चार करण्याला अडचण पडते. स्वाभाविकपणेंच परदेशी शब्द स्वतःच्या भाषेंत विकृत करून घेतला जातो. मिल्कचें मीरिकु, क्रीमचें क्लीम, स्लीपरचें सुरिप्पु, फोर्कचें फोकु अशीं रूपें करून घेतलीं जातात. आणि यांचें स्पेलिंग करतांना मग जपानी स्पेलिंग केलें जातें. म्हणून दुकानावर व इतरत्र पुढीलप्रमाणें पाट्या दिसतात— Mirk Hall, Recture Hall, इत्यादि. कांहीं ठिकाणीं विद्वत्ताप्रचुर शब्द वापरण्याचा प्रयत्न केला जातो. Tonsorial Artist हा बार्बर शॉपचा पर्याय आहे. हॉटेलमध्यें मेनू म्हणजे खाद्यपदार्थांच्या यादींत आर्‌चे ठिकाणीं एल् व एल्‌चे ठिकाणीं आर असा विपर्यास कांहीं ठिकाणीं दिसतो व tea with cleam, coffee with mirk हे शब्द त्या दृष्टीनें वाचावे लागतात. या सर्व पाट्यांचें शुद्धीकरण करण्याची मोहीम काढावी असा विचार अनेक वेळा कांहीं जपानी लोकांच्या मनांत येतो.

व्यवहारांत अनेक शब्द जपानी स्वरूप धारण करून बसले आहेत. मॉडन गारू म्हणजे मॉडर्न गर्ल, शात्सु म्हणजे शर्ट, आइसो वात्तु म्हणजे आईस् वॉटर, गारासु म्हणजे ग्लास, रांची म्हणजे लंच आणि साब्बीस म्हणजे सर्व्हिस—हे उच्चार व अर्थ थोड्या अनुभवानें कळूं लागतात.

कांहीं इंग्रजी शब्द मूळ स्वरूपांतच वावरत आहेत. बस् किंवा ट्राम्वे-मधील कंडक्टर मुलगी ड्रायव्हरला "स्टॉप" व "ऑलाइट" अशा शब्दांनीं सूचना देते. सभागृहांत नो नो, हिअर हिअर हे शब्द प्रचारांत आहेत.

**'रीडिंग इंग्लिश' चा प्रसार—**

प्रत्यक्ष संभाषणांत इंग्रजीचा उपयोग फार थोडा होतो. खास इंग्रजीचें

स्थळ प्रत
सं. ....... नं.
ता. .......

अध्ययन केलेला, किंवा इंग्लंड अमेरिकेंत जाऊन आलेला एकादा मनुष्य असल्याशिवाय तो इंग्रजी बोलूं शकत नाहीं. पण इंग्रजी वाचणारांची संख्या मात्र अफाट आहे. ज्याला संभाषणांतील दोन शब्दही कळत नाहींत त्याला तेच शब्द लिहून दाखविल्याबरोबर डोक्यांत प्रकाश पडतो. याचें कारण जपानी लोक "रीडिंग इंग्लिश" म्हणजे मुद्रित इंग्रजी भाषा शिकतात. संभाषण व लेखन शिकत नाहींत. प्राथमिक शिक्षणानंतर कोणतेंही शिक्षण घेणारा विद्यार्थी वर्ष दोन वर्षें तरी इंग्रजी शिकतोच. पण जपानमध्यें इंग्रजी शिकण्याचा हेतु संभाषण हा नाहीं; त्या भाषेंतील ग्रंथसंपत्तीचा आपल्या व्यवसायाकडे उपयोग व्हावा हा मुख्य हेतु असतो. आंतरराष्ट्रीय संमेलनें, परिषदा, ऑलिंपिक गेम्म् इत्यादि प्रसंगीं दुभाषांची जरूर लागते म्हणून त्याकरितां मुद्दाम परदेशी भाषा शिकणारे अनेक लोक आहेत.

जुन्या पुस्तकांच्या दुकानांतून इंग्रजी, जर्मन, फरेंच, रशियन वगैरे भाषेंतील पुस्तकांचा मोठा संग्रह असतो. त्यावरून पाश्चिमात्य वाङमय जपानी लोक किती मोठ्या प्रमाणावर वाचतात याची कल्पना येते. परदेशी भाषांचा पुस्तकी अभ्यास जपानमध्यें ज्या प्रमाणांत होतो तितका इतर एकाद्या देशांत क्वचितच होत असेल. कोणत्याही महत्त्वाच्या यूरोपियन भाषेंतील पुस्तकाचें भाषांतर आधीं जपानमध्यें होतें.

सारांश पाश्चिमात्य संस्कृतीचें वाहन जी भाषा तिचें जपानी बाह्य स्वरूप विनोदात्मक दिसलें तरी तिचा परिणाम जपानच्या औद्योगिक, शास्त्रीय, राजकीय, आणि वाङमयात्मक जीवनावर फार मोठ्या प्रमाणांत झाला आहे. जपानचें इंग्लिश वाचून इकडील इंग्लिश भाषेचे विद्वान् मनांत उपहासानें हंसतील. पण शंभर वर्षें इंग्रजांच्या सहवासांत राहून त्यांच्या ललित वाङमयाशिवाय हिंदी लोकांनीं भरीव असें कांहीं घेतलें नाहीं हें पाहून हंसण्याची जपानी लोकांनाही संधि मिळेल हें त्यांनीं विसरूं नये. भाषा महत्त्वाची नसून भाषेंतील गाभा महत्त्वाचा आहे. तो जपान्यांनीं घेतला एवढें खरें.

**जपानी साहेब व मडमा—**

पोषाखाचे दृष्टीनें पाहतां सार्वजनिक जीवनांत जपाननें पाश्चिमात्य

पोषाख स्वीकारला आहे ही गोष्ट वरवर पाहणारालाही दिसते. मध्यम व उच्च वर्गांतील लोक, आणि गरीब वर्गांतील वरच्या थरांतील लोक हे सर्व कामाचे वेळांत सूट-बूट-हॅट वापरतात. प्राथमिक शाळेचे शिक्षक व मध्यम स्थितींतील कामगारही पाश्चिमात्य पोषाख वापरतात. सरकारी कचेऱ्या, दरबार, आणि कायदेमंडळ, इत्यादि सर्व ठिकाणीं परदेशी पोषाख आवश्यक दिसतो. आधुनिक पद्धतीवर व्यापार करणाऱ्या पेढ्यांतील सर्व लोकही अद्यावत् पोषाख करितात. शाळा-कॉलेजांतील मुलांना विजार, मिटलेल्या गळेपट्टीचा कोट व बूट या गोष्टी गणवेश म्हणून आवश्यकच आहेत.

बहुसंख्य स्त्रिया जपानी किमोनो वापरतात, परंतु व्यापार, शिक्षण, वाहतूक, वैद्यकी, इत्यादि क्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रिया परदेशी झगे घालतात. मडमेसारखा पोषाख करण्यांत जपानी स्त्रियांना चमत्कारिक किंवा अपरिचित असें कांहींच वाटत नाहीं. शाळेंतील मुलींना पोलकें व परकर यांचा गणवेश घालावा लागतो, त्यामुळें स्वाभाविकच पुढें विलायती पोषाख करण्यांत कांहीं विशेष नवीन असें वाटत नाहीं. शाळेंत जपानी व पाश्चिमात्य, दोन्ही प्रकारचे कपडे शिवण्याचें शिक्षण दिलें जातें.

**कांटे-चमचे-सुरीचा परिचय—**

घरोघर जपानी पद्धतीचा आहार घेतला जातो. परंतु मोठ्या शहरांतून कांहीं सार्वजनिक आहारगृहांत पाश्चिमात्य पद्धतीचें अन्न मिळतें. पण एकंदरींत पोषाखाच्या मानानें पाश्चिमात्य आहाराचा प्रचार फार कमी आहे. हजार वर्षांचा शाकाहार सोडून मांसाहाराला जपानी लोकांनीं सुरुवात केली, हा पाश्चिमात्य संस्कृतीचा जपानवर फार मोठा परिणाम झालेला आहे. दूध व लोणी या वस्तूही पूर्वीं जपानी आहारांत नव्हत्या, त्यांचा आतां समावेश झालेला आहे. दूध व तज्जन्य पदार्थ यांची पूर्वीं मांसाहारांत गणना होत असे. पाश्चिमात्य आहाराचा प्रचार कमी असला तरी प्रत्येक जपानी स्त्रीपुरुषाला त्याचा चांगला परिचय असतो व कांटे-चमच्यानें विलायती अन्न खाणें यांत त्यांना नवीन किंवा अपरिचित असें कांहींच वाटत नाहीं.

**डिपार्टमेंट स्टोअर्स व अपार्टमेंट हाऊस—**

१९२४ मध्यें तोकियो व योकोहामा या शहरांत मोठे भूकंप झाले व शहरभर आगी लागून घरें जळून गेलीं. असा अपघात पुनः होऊं नये याकरितां आतां सीमेंटकाँक्रीटचीं घरें बांधलीं जात आहेत. विशेषतः सार्वजनिक कामकाजाच्या इमारती या अंतर्बाह्य अमेरिकन किंवा यूरोपियन पद्धतीच्या बांधलेल्या असतात. विशेषतः डिपार्टमेंट स्टोअर्स, नाटचगृहें, चित्रपटगृहें, बँका, व्यापारी कंपन्या यांच्या इमारती अगदीं आधुनिक स्वरूपाच्या असतात. जपानमधील मुख्य व्यापारी भाग, कामकाजाच्या पेठा आणि करमणुकीचीं स्थानें यांच्यावर पाश्चिमात्य पद्धतीची छाप पडलेली आहे. परंतु राहण्याचीं घरें मात्र अंतर्बाह्य जपानी पद्धतीचीं असतात. सध्यां अपार्टमेंट हौसेसची पद्धति नवीन अस्तित्वांत येत आहे, ती अमेरिकन पद्धतीचें अनुकरण आहे. एकाच इमारतींत शेंदोनशें कुटुंबें राहण्याची सोय केलेली असते. विशेष म्हणजे थंडीच्या दिवसांत घरें गरम राहण्याकरितां उष्ण वाफ या घरांत खेळविलेली असते.

**हॉलीवुड व जाझ्—**

करमणुकींत जपानी व पाश्चिमात्य असे दोन प्रकार असून दोन्हीही सारखेच लोकप्रिय आहेत. हॉलीवुडचे बोलपटांना बरीच मागणी असते. कांहीं चित्रपटगृहांत फक्त परदेशी पट दाखवितात, कांहीं ठिकाणीं एक परदेशी व एक जपानी, व कांहीं गृहांत सर्व जपानी अशी विविधता आहे. पाश्चिमात्य संगीताचा प्रचार जपानमध्यें फार झालेला आहे. अमेरिकेंतील लोकप्रिय व चटकदार संगीतांला जाझ् असें म्हणतात. कोणत्याही लोकप्रिय अमेरिकन जाझ् गाण्याचें जपानीमध्यें त्वरित रूपांतर होतें. अशीं पदें जपानी भाषेंत पण पाश्चिमात्य संगीत पद्धतीनें गायलीं जातात. आधुनिक पाश्चिमात्य संगीत व वादनकलेंत जपानी लोकांनीं फार चांगली प्रगति केलेली आहे. सामान्यपणें नवीन पिढीला हें नवीनच संगीत आवडतें. संगीतकलेच्या संस्थांतून दोन्ही प्रकार शिकविले जातात.

जपानी नाट्यकला तंत्राचे दृष्टीनें अगदीं अद्यावत् आहे. चक्रगतीची रंगभूमि, वर्णप्रकाशांची योजना, वास्तविक देखावे, इत्यादि दृष्टींनीं सर्व आधुनिक तंत्रें तेथें दिसतात. परंतु नाटचविषयाच्या दृष्टीनें मात्र प्रतिभा असावी तशी नाहीं. जपानी लोक तंत्रांत कुशल आहेत, पण प्रतिभेंत मागें पडतात.

**कलेच्या क्षेत्रांतही स्पर्धावृत्ति—**

सार्वजनिक नाटचगृहांतून अमेरिकन व यूरोपियन पद्धतीचे रेव्हूज् व नृत्यें यांचें कार्यक्रम जपानी कलावंतांकडूनच दाखविले जातात. शें दीडशें प्रमाणबद्ध शरीराच्या मुलींचें एकाच वेळीं रंगभूमीवर कलापूर्ण नृत्य, आधुनिक पद्धतीचे देखावे, व उत्कृष्ट संगीत आणि वादन, इत्यादि कार्यक्रम पाहून असें वाटतें कीं अगदीं पूर्णांशानें नसलें तरी पुष्कळ अंशानें अमेरिकन कार्यक्रमांचें यशस्वी अनुकरण जपानी लोकांनीं याही क्षेत्रांत केलें आहे. अमुक एक गोष्ट पाश्चिमात्य लोक करितात आणि ती जपानी लोकांना येत नाहीं असा यत्किंचित-ही प्रवाद राहतां कामा नये अशी महत्त्वाकांक्षा या लोकांनीं ठेविली आहे असें स्पष्ट दिसतें.

जागतिक शिक्षणपरिषदेकरितां जपानी आणि पाश्चिमात्य संगीताचे कार्यक्रम करण्याचें काम तोकियोचे संगीत महाविद्यालयाकडे होतें. त्या वेळीं विद्यार्थी म्हणाले, "जपानी संगीत आमचें आहे तें आम्ही सहज दाखवूं. पण पाश्चिमात्य संगीतांतही आम्ही त्या लोकांइतकेंच चांगले कार्यक्रम करितों असें आम्हांस दाखवावयाचें आहे." या वाक्यांत सर्व जपानची भावना आली. संगीतकलेच्या विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रांत जी गोष्ट साध्य करावयाची आहे तीच इतरांना आपापल्या देशांत साध्य करून हरएक बाबतींत पाश्चात्यांच्या बरोबर यावयाचें आहे.

**पाश्चिमात्यांचे विलास—**

पाश्चिमात्यांचे कांहीं विलासाचे प्रकारही मोठ्या शहरांतून दिसतात. परंतु एकंदरींत त्यांच्यावर पोलीस अधिकाऱ्यांची जरा करडी नजरच असते.

पाश्चिमात्य पद्धतीचीं नृत्यगृहें व मदिरालयें हीं अलीकडे कांहीं ठिकाणीं निघालेलीं आहेत. पाश्चिमात्य पद्धतीच्या मिश्र नृत्यावर कडवे सनातनी व पोलीस यांची वक्रदृष्टि आहे. प्रथम यूरोपियन लोकांकरितां जपानी लोकांनीं चालविलेल्या हॉटेलांतून हे कार्यक्रम होत असत. त्या वेळीं अशा कार्यक्रमांत शिरून व्यत्यय आणण्याचा प्रयत्न अनेकवार केला जाई.

एकदां एका हॉटेलमध्यें मिश्र पद्धतीच्या नृत्याचा कार्यक्रम चालू होता. याच सुमाराला कांहीं राजकीय कारणांमुळें गोऱ्या लोकांविरुद्ध वातावरण कलुषित झालें होतें. नृत्य चालू असतां कांहीं कडवट देशभक्त नागव्या तरवारी घेऊन नाचणारांना मारण्याकरितां आंत घुसले. आतां काय करावें असा मालकाला पेंच पडला. त्यानें लगेच वाद्यसंघाला (ऑर्केस्ट्रा) राष्ट्रीय गीत वाजविण्यास सांगितलें. त्याबरोबर तरवारवाले स्वस्थ उभे राहिले. राष्ट्रगीत चालू असतांना सर्वांनीं जागचे जागीं स्तब्ध राहावयाचें असतें. मालकानें एकसारखें राष्ट्रगीत चालू ठेविलें त्यामुळें कोणासच हालतां येईना. अशा रीतीनें आणीबाणीचा प्रसंग टळला.

सध्यां कांहीं सार्वजनिक नृत्यगृहांतून या कार्यक्रमाची परवानगी असते. पण त्यावर पोलिसांची दृष्टि असते. गणवेष करून विद्यार्थ्यांना तेथें जातां येत नाहीं. या करमणुकींवर वेळेचीं, पोषाखाचीं व इतर अनेक बंधनें असतात.

करमणुकी आणि विलासपद्धति यांचेवर पाश्चिमात्य छाया बरीच पडली असून जपानी व परदेशी अशा दोन्ही प्रकारच्या कलांचा आस्वाद घेऊन स्वतःचें मनरंजन करण्याची संवय जपानी स्त्रीपुरुषांना झाली आहे.

**जगाची चँपियनशिप् पाहिजे—**

जपाननें पाश्चिमात्य क्रीडाक्षेत्रांत अमेरिकेचें अनुकरण केलेलें आहे. बेसबॉल, फूटबॉल, व बॉक्सिग हे तिन्ही अमेरिकन लोकप्रिय खेळ जपानांतही आवडते आहेत. त्यांचेकरितां बांधलेल्या क्रीडारंगणांत तीस ते ऐंशी हजार प्रेक्षक एका वेळेला बसूं शकतात. शिक्षणसंस्थांतून हे खेळ फार लोकप्रिय आहेत. त्याशिवाय पोहणें, बर्फावर स्केटिंग करणें, स्की, टेनिस, इत्यादि

सर्व अमेरिकन व यूरोपियन खेळ जपानी लोक देशी खेळासारखे खेळतात. त्यांचें परकीयत्व गेलें आहे. प्रत्येक ऑलिंपिक सामन्यांत व इतर आंतर-राष्ट्रीय सामन्यांत जपानी खेळाडू भाग घेतात, व जगांतील चँपियनशिप् मिळविण्याची शिकस्त करतात. जपानी खेळही तितक्याच आस्थेवाईकपणानें खेळले जातात.

**समानतागंड व संचारक्षमता—**

सामान्यपणें असें विधान करितां येईल कीं सार्वजनिक जीवनांत जगा-बरोबर राहावें आणि खाजगी जीवनांत आपलें वैशिष्टय कायम ठेवावें असें जपानी धोरण आहे. मेईजी युगांत राजघराण्यानेंच सर्व पाश्चिमात्य गोष्टींचा स्वीकार केल्यामुळें बहुजनसमाजांत त्याचें लौकर अनुकरण झालें. राजनिष्ठा-प्रधान देशांत राजाचें व राजदरबारचें अनुकरण समाजांत चटकन् होतें तसें जपानांत झालें असावें. जगाच्या बरोबर येण्याकरितां म्हणून जपाननें पाश्चात्यांचें अनुकरण केलें; पण स्वतःची हौस म्हणून आपली संस्कृतीही कायम ठेविली.

यांत मानसिक दृष्टचा एक मोठा फायदा झाला. सर्व क्षेत्रांत आपण पाश्चात्यांचे बरोबरीनें आहोंत असें पाहून स्वाभाविकपणेंच समानतेची जाणीव जपानी मनांत उत्पन्न झाली. आशिया खंडांत इतरत्र दिसून येणारा न्यूनगंड किंवा कनिष्ठत्त्वाची जाणीव जपानमध्यें राहिलेली नाहीं.

व्यावहारिक दृष्टीनें विचार करितां या अनुकरणामुळें जपानी लोकांना जागतिक संचारक्षमता आली. आहार-विहार, पोषाख, इत्यादि दृष्टींनीं त्यांच्या संवयी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या झाल्या आहेत. त्यामुळें ते जगाच्या पाठीवर वाटेल तेथें संचार करूं शकतात.

**साधर्म्य व वैशिष्टय यांची जरूरी—**

समाजांत राहणाऱ्या व्यक्तीला आणि जगांत राहणाऱ्या राष्ट्राला साधर्म्य आणि वैशिष्टय असे दोन्ही गुण लागतात. कांहीं बाबतींत इतर व्यक्ती किंवा राष्ट्रें यांचे बरोबरीनें राहिलें पाहिजे. परंतु कांहीं बाबतींत

स्वतःचें वैशिष्टयही राखलें पाहिजे. पहिल्या गुणामुळें अस्तित्व कायम राहतें; दुसऱ्या गुणामुळें वैशिष्टय प्राप्त होतें.

**बाह्य आचाराचें अनुकरण—**

आचार आणि विचार अशीं संस्कृतीचीं दोन अंगें आहेत. जपाननें कोणत्या अंगाचें अनुकरण केलें असा विचार केला म्हणजे त्याची अनुकरण-मर्यादा लक्षांत येते. सामर्थ्याकरितां जपानला पाश्चात्य संस्कृति पाहिजे होती म्हणून भौतिक सामर्थ्य देणाऱ्या तंत्रांचें व शास्त्रांचें त्यानें अनुकरण केलें; समाजक्रांति करणाऱ्या विचारांचें अनुकरण केलें नाहीं. त्यामुळें बाह्यतः नवीन राष्ट्र दिसलें तरी अंतर्यामीं विचारानें जपानी समाज जुना व पुराणकालीन आहे.

जपानच्या आजच्या प्रगतीचा वैचारिक पाया मजबूत नाहीं. जुन्या विचारांवर नवी इमारत बांधली गेली आहे. स्वतंत्र विचाराच्या व बौद्धिक जीवनाच्या युगांत या इमारतीला जपानी भूकंपासारखे धक्के बसतील. कांहीं असो, सध्यां तरी आजचें मरण उद्यांवर ढकललें गेलें व राष्ट्रीय दृढीकरणाला वेळ मिळाला हा मोठा फायदा झाला आहे.

विचाराचा पाया अजूनही घालतां येईल. तोंपर्यंत पाश्चिमात्यांचे विचारही अनुभवाचे मुशींतून तावून सुलाखून बाहेर पडतील आणि त्यांतील ग्राह्याग्राह्य कोणतें यांचीही निवड चांगल्या रीतीनें करितां यईल. ज्या विचारांचे बाबतींत ते निर्माण करणाऱ्या पित्यांनाही संदेह उत्पन्न झाला आहे ते घेऊन आपल्या देशांत घोंटाळें निर्माण करण्याचा धोका एकाद्या पौर्वात्य राष्ट्रानें तरी कां स्वीकारावा!

* * *

७

# स्त्रीजीवन व कुटुंबव्यवस्था

**उपवर कन्यांची शाळा—**

'उपवर कन्याशाळा' नांवाच्या शिक्षणसंस्था जपानमध्यें अलीकडे निघाल्या आहेत. उपवर झालेल्या मुलींना विवाहयोग्य होण्याकरितां जरूर तें शिक्षण देणें हा मुख्य उद्देश आहे. शाळेंत प्रेक्षकानें पाऊल टाकल्याबरोबर मुली त्याचेकडे पाहून हंसतात व लाजतात. शाळेचें विशिष्ट नांव, मुलींचें वय आणि पाहावयास येणारांची जिज्ञासा या तिहींचा परिणाम तरुण मनावर सहजच होतो. आणि जपानी मुली म्हणजे कांहीं अमेरिकन मुली नव्हेत.

उत्तम माता आणि पत्नी होणें हें जपानी स्त्रीचें ध्येय असतें. त्याला धरूनच या शाळा १९३१ पासून निघाल्या आहेत. आज लहान मोठ्या सर्व शहरांतून या संस्था पसरल्या आहेत. पांच हजार वस्तीच्या एका लहान गांवांतही अशी शाळा आढळते.

हायस्कूलचें शिक्षण झाल्यानंतर एक वर्षभर मुली अशा ठिकाणीं शिकतात. या सर्व शाळा खाजगी असून उत्तम रीतीनें चालल्या आहेत, आणि १२० येन वार्षिक फी देऊनही पालक आपल्या मुलींना अशा संस्थांमधून पाठवितात यावरून वधू तयार करण्याचा व्यवसाय किती कसोशीनें व मनापासून चालतो याची कल्पना येईल.

शाळेची वेळ सकाळीं ८॥ ते १२॥ व दुपारीं १ ते ४ अशी एकूण सात तास असते. अभ्यासक्रमांत सामान्य आणि ऐच्छिक असे विभाग आहेत. सामान्य अभ्यासक्रमांत नीतिशास्त्र, शिष्टाचार, राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें, प्रपंचशास्त्र, शिवणकाम, हस्ताक्षर आणि जमाखर्च, इत्यादि विषय असतात. चहापानसमारंभ, पुष्परचनाशास्त्र, जपानी व पाश्चात्य गायनवादनकला, व घरगुती कलात्मक हस्तव्यवसाय, इत्यादि विषयांपैकीं कोणतेही ऐच्छिक विषय म्हणून शिकविले जातात.

मुलींच्या हायस्कूल शिक्षणामध्यें निम्मा वेळ गृहशिक्षणात्मक विषयांना दिला जातो आणि गृहशास्त्राच्या उच्च शिक्षणाकरितां उत्तम साहित्यसामग्री असलेलीं आधुनिक कॉलेजें आहेत. या संस्थांच्या इमारती व साहित्य यांकरितां सरकारनें व खाजगी संस्थांनीं लाखों रुपये खर्च केले आहेत. श्रीमंत आणि मध्यम वर्गांतील प्रौढ मुली अशा ठिकाणीं शिक्षण घेऊन भावी संसाराची तयारी करीत असतात.

यावरून गृहजीवनाकरितां स्त्रिया तयार करण्यावर जपानचा किती भर आहे त्याची सहज कल्पना येईल.

स्त्रियांनीं संसारच करावा हें जपाननें आपल्या स्त्रियांकरितां ध्येय ठरवून दिलेलें आहे. तें पूर्वपरंपरेशीं सुसंगत असल्यानें स्त्रियांनींही त्याला मनःपूर्वक मान्यता दिली आहे.

**मॉडर्न गर्ल ऊर्फ ‘ मोगा ’—**

‘ मोगा ’ म्हणजे ‘ मॉडर्न गर्ल. ’ जपानमध्यें मधून मधून पुष्कळ मोगा दिसून येतात. मानेपर्यंत कापलेले केस, तोंडावर पुष्कळशी पावडर व ओंठावर लाल रंग, अंगावर पाश्चिमात्य झगा आणि पायांत उंच टांचांचे बूट— एवंगुणविशिष्ट कन्या तोकियोसारख्या मोठमोठ्या शहरांतून पुष्कळ दिसतात. अमेरिकन छायापटांतील मॉडर्न गर्लची छाया या मुलींवर बाह्यतः पडलेली आहे. परंतु वरून जरी या कन्या ‘ मॉडर्न ’ म्हणजे ‘ सुधारलेल्या ’ दिसल्या तरी अंतर्यामीं बिचाऱ्या सनातनी आणि मनानें ‘ अबला ’ असतात. पोषाखानें आणि मनानें खरी ‘ मॉडर्न गर्ल ’ जपानमध्यें मिळणें कठिण.

**बायका त्या बायकाच—**

जपानी बायकांना बायकांचेंच जीवन आवडतें. त्यामुळें स्त्रीस्वभावांतील आदर्श गुण जपानमध्यें दिसतात त्याचप्रमाणें या स्वभावामुळें समाजांत उत्पन्न झालेले प्रश्नही प्रामुख्यानें जपानमध्येंच दिसून येतात. जपानच्या बाह्य जीवनावर पाश्चिमात्य सुधारणेचा जितका पगडा बसलेला आहे तितका स्त्रीजीवनावर आणि स्त्रियांच्या स्थितीवर बसलेला नाहीं.

समाजांत मधून अधून थोड्या मोगा दिसत असल्या तरी बहुसंख्य मुली आणि स्त्रिया बाळबोध वळणाच्याच असतात. त्यांचा पोषाख सभ्यतेच्या सर्व मर्यादा सांभाळून योजलेला असतो. अगदीं सुधारलेल्या मोगाचा पोषाख पाहिला तरी कांहीं विशिष्ट सभ्य मर्यादेच्या पलीकडे तो कधींच जात नाहीं. आचारामध्यें कमालीची शालीनता दिसून येते. जपानमध्यें शिष्टाचाराचें बंड विशेष. त्यांत स्त्रियांचे कांहीं आचार ठरलेले आहेत. पुरुष बाहेर जातांना दारापर्यंत पोंचविणें आणि परत आल्यावर सामोरे जाऊन स्वागत करणें; घरांतील दारें उघडतांना जमिनीवर गुडघे टेकून आवाज न करतां तें काम करणें, इत्यादि आचार अत्यंत कसोशीनें पाळले जातात. अगदीं सुशिक्षित पुरुषाची सुशिक्षित पत्नीही फोटोच्या वेळीं मागें उभी राहील; खुर्चीवर बसणार नाहीं. घरांत पाहुणे आले तर पुरुषांच्या पंक्तीला वाढून नंतर गृहिणी भोजन करील. पुरुष घरीं आल्यावर त्याचे कपडे उतरून नवे कपडे त्याचे अंगावर चढविणें आणि तो बाहेर जाण्यास निघाल्याबरोबर त्याच्या खडावा पायापुढें ठेवणें हीं गृहलक्ष्मीचीं कामें आहेत. मुलींच्या शाळेंत गेल्यावर एकाद्या वर्गांत जातांना आपण आपले "सुरिप्पू" (स्लिपर) बाहेर काढून ठेवावेत; परत यावें तों कोणी तरी त्यांची दिशा बदलून पुन्हा ते घालण्याला योग्य असे जुळवून ठेवलेले दिसतील. शाळेंतील मुलींच्या शिक्षणांत इतक्या बारीक सारीक गोष्टींकडे लक्ष दिलें जातें. घरांतील स्वयंपाक, बालसंगोपन, देवपूजा, बाजारहाट, वगैरे सर्व कामें स्त्रियांचीं. पुरुषानें फक्त बाहेर काम करून पैसे मिळवून आणावेत. घरीं आल्यावर स्त्रीनें सर्वतोपरीं त्याची सेवा करावी. घरांत पाहुणा आला तरी त्याची सेवाही घरमालकिणीनें करावी. अशा प्रकारचें जपानी स्त्रियांचें जीवन आहे.

**जपानी स्त्रीचें 'ध्यान'—**

'कल्चर्ड पर्लस्' आज प्रत्येक हिंदी स्त्रीचे अंगावर सांपडतील. हीं मोत्यें जपानमधून येतात, पण खुद्द जपानी बायकांचे अंगावर एक फुटका मणी सांपडेल तर शपथ. त्या दागिने घालीत नाहींत. डोक्याचे मागील बाजूस सैल आंबाडा घालतात. त्यांतच उजव्या बाजूस एकादें रेशमी, हस्तिदंती किंवा चांदीचें सपर्णफूल खोंचलें कीं दागिन्यांची मर्यादा संपली. जपानी पुरुषाला बायकोचे दागिन्याकरितां श्रमावें लागत नाहीं. परंतु त्यांच्या किमोनोकरितां बिचाऱ्याचा अर्धा खिसा रिकामा होतो! हिंदी बायका दागिन्यांत पैसे घालतात, जपानी स्त्रिया किमोनोंत खर्च करितात. किमोनो म्हणजे स्त्रियांची कफनी. गळ्यापासून पायांपर्यंत लांबी, अघळ-पघळ रुंदी, सैल आणि रुंद बाह्या, अशा प्रकारचा हा कपडा एकाद्या पायघोळ कफनीसारखा असतो. तो शरीरावर चांगला राहावा म्हणून कमरेभोंवतीं एक रुंद शेला (ओबी) गुंडाळून पाठीच्या बाजूला त्याची रुंद अशी घडी बांधली जाते. हें वाचून किमोनोच्या सौंदर्याची कल्पना येणार नाहीं. जपान-मधील साऱ्या चित्रकलेच्या व रंगकलेच्या सौंदर्याचें सार किमोनोंत उतरलेलें आहे. त्यांचे निरनिराळे रंग आणि त्यावर काढलेल्या विविध प्रकारच्या नक्षी, वेलबुट्टी, किंवा इतर चित्रें पाहिलीं म्हणजे त्यांच्या मोलाची कल्पना येते. अंगावरचे दागिने घातलेल्या हिंदी स्त्रिया पाहिल्या म्हणजे फिरत्या 'गोल्ड रिझर्व्ह बँके'ची स्मृति होते. सुंदर नक्षी आणि देखावे काढलेले किमोनो पेहेरणाऱ्या जपानी स्त्रिया पाहिल्या म्हणजे फिरत्या 'आर्ट गॅलरी'ची आठवण होते. विशेषतः पाठीवरील शेल्याच्या घडीवर आणि पायावर रुळणाऱ्या वस्त्रावर चित्रकलेचें खास प्रदर्शन केलेलें दिसतें.

केशभूषा साधी असते. मधोमध किंवा किंचित् तिरपा भांग पाडून मागें सैल आंबाडा बांधलेला असतो. अलीकडील सामान्य स्त्रियांची ही पद्धति. परंतु जुन्या पद्धतीच्या स्त्रियांची केशरचना कांहीं निराळीच असते. खास कारागिराकडे जाऊन दोन तीन रुपये खर्चून ती करावी लागते. चित्र पाहिल्या-शिवाय या पद्धतीची कल्पना येणें कठिण. अपरिचित हिंदी माणसाला अशी केशरचना केलेल्या स्त्रिया दिसल्या तर हे कोणी जटाधारी ऋषीच आहेत

अशी त्याची कल्पना होईल. जुन्या वळणाच्या स्त्रिया, लग्नप्रसंगीं वधू आणि विशिष्ट व्यवसायांतील स्त्रिया यांची केशरचना या प्रकारची असते.

मध्यम आणि उच्च वर्गातील स्त्रिया पायांत पांढरे शुभ्र मोजे घालतात. या मोजांत आंगठा निराळा असतो. त्यामुळें चपलासारखे पट्टे असलेल्या लाकडी खडावा किंवा उंची चपला वापरतां येतात. पाठीवरील ओबीमुळें बायकांचें कुबड आल्यासारखें दिसतें. त्या जरा वांकूनच चालतात त्यामुळें असा समज साहजिकच होतो.

शरीरानें हाडकुळी अशी जपानी बाई दिसणें जरा कठिणच. उंचीनें यष्टी लहान असली तरी जपानी स्त्रियांचें शरीर चांगलें पुष्ट असतें. गाल, मान, मनगटें, इत्यादि भाग अगदीं पुष्ट दिसतात. भात आणि मासे हेंच मुख्य अन्न असल्यानें त्याचा बांध्यावर परिणाम होत असावा. कृश होण्याचें अमेरिकन वेड जपानमध्यें नाहीं.

जपानी बाईच्या पाठीवर मूल दिल्याशिवाय तिचें चित्र पूर्ण होणार नाहीं. जपानी घरांत पाळणा नाहीं. घरीं दारीं सदैव पाठीवर एका फडक्यानें मूल बांधलेलें असतें. त्याचें पोट व छाती आईच्या पाठीला भिडते आणि डोळ्यांपुढें त्याला नेहमीं आईचें डोकें दिसतें. मूल रडूं लागलें तरी दोन्ही पायांवर शरीर डोलवून आई मुलाला झोंका देते.

दुःखी कष्टी आणि दुर्मुखलेली जपानी मुलगी किंवा स्त्री दिसणें कठिण. तिच्या तोंडावर नेहमीं हास्य आणि आनंद यांचें राज्य दिसतें. अंतःकरणांत दुःखाचा आवेग असला तरी वर आनंदी वृत्ति दाखविण्याचें शिक्षण या मुलींना बाळपणापासून दिलेलें असतें.

### चार आश्रम—

सामान्यपणें जपानी स्त्रियांच्या आयुष्यांत चार आश्रम आहेत. बारा ते पंधरा वर्षेपर्यंत त्यांचें शिक्षण होतें. पंधरा ते तेवीस-चोवीस वयापर्यंत त्या कोठेंतरी काम करून द्रव्यार्जन करितात. पंचवीस ते पन्नासचे सुमारा-पर्यंत गृहरक्षण, पतिसेवा आणि अपत्यसंगोपन करितात, आणि त्यानंतर



जपानी उद्यान व घर

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. १/नि. नं. ६९८
ता.



किमोनो व पंखा

कांहीं स्त्रिया सार्वजनिक कामाकडे लक्ष देतात. अर्थात् ही कालविभागणी अगदीं स्थूल मानानें केलेली आहे. सक्तीच्या शिक्षणामुळें विद्यार्जन, गरिबीमुळें द्रव्यार्जन, स्त्रीधर्म म्हणून अपत्यार्जन आणि उत्तरवयांत कांहीं समाजसेवा अशा चार प्रकारच्या अनुभवांतून बहुतेक स्त्रिया जातात.

जपानची स्त्रीविषयक कल्पना पौर्वात्य पद्धतीची आहे. पाश्चिमात्य व्यक्तिवाद आणि स्वातंत्र्यवाद यांचा फारसा स्पर्श स्त्रीवर्गाला झालेला नाहीं. शिक्षणपद्धति आणि सरकारी कायदे हे जुन्या कल्पनेलाच पोषक असे आहेत. त्यामुळें स्त्रीस्वातंत्र्य, मतदानाचा हक्क, समान शिक्षणाची संधि, इत्यादि चळवळी कांहीं अमेरिका-यूरोपनिवृत्त आणि ख्रिस्ती मिशनरी स्त्रीपुढाऱ्यांनीं केल्या तरी त्या फारसा जोर धरूं शकत नाहींत. आधुनिक दृष्टीनें विचार करितां स्त्रियांची प्रगति अत्यंत सावकास चालली आहे. त्या मानानें हिंदी स्त्रियांत अधिक जागृति आहे आणि हिंदी पुरुषवर्गही जपानी पुरुषवर्गापेक्षां अधिक उदारमतवादी आणि स्त्रियांच्या प्रगतीला अनुकूल असा आहे.

सुगृहिणी, सुमाता, सुस्नुषा आणि सुपत्नी अशा क्रमानें जपानी स्त्रीला आपलीं कर्तव्यें करावीं लागतात. ती पतीशीं लग्न करीत नाहीं, पतीच्या कुटुंबाशीं व त्याच्या कुलाचाराशीं लग्न करिते. घरांतील सर्वांची सेवा तिला करावी लागते. अपत्यसंगोपन हें समाजांत तिचें आद्यकर्तव्य समजलें जातें. जपानमध्यें संततीचें वैपुल्य असतें. रेल्वे, नाटकगृह, यात्रा, इत्यादि ठिकाणीं ही गोष्ट विशेष नजरेला येते. अविभक्त कुटुंबांत सासू-सासऱ्यांची सेवा सुनेला करावी लागते. कांहीं प्राथमिक शाळांतून "पाठ तिंबण्याचें" (मसाज) शिक्षण प्रौढ मुलींना दिलें जातें. कारण विवाहोत्तर त्यांना सासूची सेवा करावी लागेल ! कुटुंबांत पतिपत्नीचें नातें शेवटीं येतें. कुटुंबाकरितां व्यक्ति; व्यक्तिकरितां व्यक्ती नाहीं अशा तत्त्वावर कुटुंब आणि विवाह यांची योजना झालेली आहे. आणि औद्योगिक युगामुळें ती मोडत असली तरी तिला सावरण्याचा प्रयत्न चालू आहे. त्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे स्त्रियांची शिक्षणपद्धति व त्यांचें समाजांतील स्थान या गोष्टींचा उलगडा होतो.

**स्त्रीत्वाची तयारी—**

स्त्रियांना गृहिणी व्हावयाचें असल्यानें त्यांची शिक्षणपद्धति अगदीं स्वतंत्र आहे. प्राथमिक सहा वर्षांच्या शिक्षणानंतर मुला-मुलींचे मार्ग भिन्न होतात. कांहीं खाजगी शाळांतून सह आणि समान शिक्षण थोड्या प्रमाणांत आहे. पण ही सार्वत्रिक पद्धति नाहीं. स्त्रियांचीं हायस्कुलें व कॉलेजें आहेत. पण त्यांत बराच वेळ गृहशिक्षणाचे विषयांना व प्रात्यक्षिक कामाला दिला जातो. त्यामुळें बौद्धिक विषयांत कॉलेजचा दर्जा मुलांच्या कॉलेजशिक्षणापेक्षां कमी आहे. सरकारी विद्यापीठांतून मुलींना घेण्याची परवानगी नाहीं. एकदोन विद्यापीठांनीं अपवाद केला आहे. पण त्या सोयीचा फायदा फार थोड्या विद्यार्थिनी घेऊं शकतात. मुलांच्या कॉलेजमधून स्त्रियांना प्रवेश नसला तरी स्त्रियांना करण्यासारख्या अनेक उद्योगांचें उच्च शिक्षण देणाऱ्या खास संस्था आहेत. वैद्यकीय, व्यापारी, कलाविषयक, गृहशास्त्रीय, इत्यादि विषयांकरितां अनेक संस्था आहेत. वाङ्मयात्मक शिक्षण देणारीं स्त्रियांचीं कॉलेजेंही पुष्कळ आहेत. माध्यमिक शिक्षणांत मुलांपेक्षां मुलींचीच संख्या अधिक आहे. सारांश स्त्रियांना समान शिक्षणाची संधि नसली तरी स्त्री-विशिष्ट शिक्षणाची संधि मुबलक आहे. शिक्षणाच्या मर्यादेमुळें स्त्रियांचा व्यवसायक्षेत्रांतील संचारही मर्यादितच होऊं शकतो. परंतु या बाबतींत स्त्रियांचीही फारशी तक्रार असलेली दिसत नाहीं. त्यांची मागणी समान शिक्षणाकरितां नसून अधिक उच्च शिक्षणाकरितां आहे.

जपानमध्यें पुरुषांना सार्वत्रिक मताधिकार आहे, परंतु स्त्रियांना मतदानाचा हक्क नाहीं.

**आर्थिक क्षेत्रांत संचार—**

जपानी स्त्रिया प्रत्येक क्षेत्रांत पुरुषांचे बरोबर परंतु निराळें काम करितात. स्त्रिया आणि पुरुष यांचे समाजांतील संबंध अगदीं मोकळेपणानें येतात, त्यामुळें अमुक एका क्षेत्रांत स्त्रिया काम करीत नाहींत असें नाहीं. किंबहुना रशियाचे खालोखाल जपानमध्येंच बहुसंख्य स्त्रिया हरएक क्षेत्रांत वावरत आहेत. बंदरांत पाऊल टाकल्याबरोबर ही गोष्ट नजरेस येते.

प्रवाशी लोकांकरितां गाईड, डिपार्टमेंट स्टोअर्समध्यें विक्री, बस् किंवा ट्राम्-मध्यें तिकिटविक्री, हॉटेल-रेस्टॉरंटमधून वाढण्याचें काम, ऑफिसमधील साधीं कामें, इत्यादि अनेक व्यवसायांत स्त्रिया अथवा प्रौढ मुली दिसून येतात. पुष्कळशा लहानमोठ्या जपानी खाणावळी आणि वसतिगृहें स्त्रियांनींच मोठ्या कर्तबगारीनें चालविलेलीं आहेत. प्राथमिक व दुय्यम शिक्षणांत कांहीं प्रमाणामध्यें स्त्रीशिक्षक आहेत. जपानमध्यें स्त्री-डॉक्टरांची संख्या फार मोठी आहे. या बाबतींत जपानचा दुसरा कीं तिसरा क्रम लागतो असें सांगतात. परंतु यापेक्षां वरच्या क्षेत्रांत किंवा अधिकाराच्या प्रांतांत स्त्रियांचा समावेश झालेला नाहीं. कारखान्यांतून कामगार म्हणून तेरा चौदा ते पंचवीस वयाच्या मुलींची संख्या फार मोठी आहे. किंबहुना कापडासारखे कांहीं धंदे या विशिष्ट कामगार वर्गामुळेंच जगांत पहिल्या प्रतीनें पुढें आलेले आहेत. मुली शिक्षण झाल्यानंतर विवाह होईपर्यंत म्हणजे तेवीस-चोवीस वयापर्यंत कारखान्यांत अथवा अन्यत्र काम करून पैसे मिळवितात. त्या कांहीं पैसे गरीब पालकांना पाठवितात व कांहीं विवाहाकरितां शिल्लक ठेवितात. योग्य स्थळ मिळतांच काम सोडून गृहस्थाश्रमी बनतात. पतीची मिळकत थोडी असली तर कांहीं स्त्रिया द्रव्यार्जनाचें काम चालू ठेवितात. परंतु केवळ द्रव्यार्जन आणि आर्थिक स्वातंत्र्य या कल्पना स्त्रीवर्गांत नाहींत.

**मुदतबंदीची अखंड नोकरी—**

शेतकरी वर्ग अत्यंत गरीब असल्यामुळें खेड्यापाड्यांतून पुष्कळ तरुण मुलें आणि मुली यांना गांव सोडून शहरांत द्रव्यार्जनाकरितां यावें लागतें. शेतकऱ्यांच्या गरिबीचा फायदा घेऊन त्यांच्या मुली मुदतबंदीनें विकत घेऊन त्यावर व्यवसाय करणारा वर्ग जपानमध्यें वाढत्या प्रमाणांत आहे. जपानी स्त्रीजीवनाची ही अगदीं करुणाजनक अशी कथा आहे. अडचणींत असलेला शेतकरी तीनचार किंवा अधिक वर्षांकरितां हजार पांचशे रुपये घेऊन आपली मुलगी देतो. पुढें ती बिचारी घरीं परत आली तर नशीब. कारण कांहीं बनावट निमित्तानें तिच्यावरील कर्ज वाढत जातें आणि ती जन्माची गुलाम बनते. गरिबीमळें या मलींना अनीतिकारक अथवा कमीअधिक प्रमाणानें

त्यासारख्याच व्यवसायांत आयुष्य कंठावें लागतें. असे प्रसंग कधीं कधीं मध्यमवर्गीय कुटुंबावरही येतात. या पद्धतीविरुद्ध स्त्रियांच्या कांहीं संस्थांची जोरदार चळवळ चाललेली आहे.

**कायद्यांचा वरदहस्त—**

गेल्या शतकापर्यंत स्त्रियांना कायदेशीर दृष्टचा अनेक अडचणी होत्या. १८९८ मध्यें कांहीं दूर झाल्या आणि राहिलेल्या इतर अडचणी दूर करण्याकरितां चळवळी चालू आहेत. आतां नवीन कायद्याप्रमाणें बहुपत्निकत्वाला परवानगी नाहीं. पंचवीसपेक्षां अधिक वयाच्या मुली वडिलांच्या परवानगीशिवाय विवाह करूं शकतात. आपल्या नांवाची संपत्ति त्यांना ठेवितां येते. विवाहित स्त्रियांना स्वतंत्र धंदा करितां येतो. पती स्त्रीशीं घटस्फोट करूं शकत असे परंतु उलटपक्षीं शक्यता नव्हती. अलीकडे वरिष्ठ कोर्टानें एका खटल्यांत पत्नीला पतीविरुद्ध फिर्याद करून घटस्फोट करण्याची परवानगी दिलेली आहे. आतां पतिपत्नीपैकीं कोणालाही घटस्फोट करितां येतो. याच्या अनेक कारणांपैकीं सासूसासऱ्यांकडून किंवा त्यांचा अपमान हें एक पुरेसें कारण समजलें जातें. घटस्फोट खाजगी रीतीनें करूनही नोंदवितां येतो. संपत्तीच्या वारसाहक्काबाबत मात्र स्त्रीपुरुषांच्या अधिकारांत कायदा अद्याप पक्षपाती आहे.

**विवाहार्थ मध्यस्थी—**

जपानांत विवाहाकरितां " मध्यस्थाची कुशलता " लागते. सुशिक्षितांच्या घराण्यांतही अद्याप ही पूर्वापार चाल आहे. मध्यस्थ धंदेवाईकच असतो असें नाहीं. एकादा शिक्षक, प्रोफेसर, डॉक्टर अथवा उभय पक्षांच्या कुटुंबीयांचा परिचित मित्र मध्यस्थाचें काम करूं शकतो. प्रेमविवाह प्रचारांत नाहींत. मध्यस्थ प्रथम उभयता वधूवरांच्या फोटोंची देवघेव करितो. नंतर पाहण्याचा आणि भेटीचा योग, अर्थात् वडिल मंडळींचे समक्ष, घडवून आणतो. सुशिक्षित घराण्यांत वधूवरांची परस्परसंमति घेतली जाते. नंतर विवाहाचा विधि घरीं, सार्वजनिक ठिकाणीं अथवा देवळांत होतो. अगदीं

टचे स्नेही व आप्त बोलाविले जातात. फार गर्दी नसते. अर्ध्या एक
ांत विधि संपतो. विधीमध्यें जुन्या पद्धतीचे कपडे घालणें, मद्याची
वेव व कांहीं मंत्र याच गोष्टी मुख्यपणें दिसतात. मात्र विधि चालू असतां
क्रिया व हालचाली अतिशय शिस्तवार आणि शास्त्रोक्त केल्या जातात.
ंक विवाह सरकारांत नोंदवावा लागतो. केवळ धार्मिक विधीनें लग्न
देशीर होत नाहीं. विवाहोत्तर मित्रांना भोजन दिलें जातें. लहान गांवां-
गांवभोजन द्यावें लागतें.

विवाहाचा खर्च वरपक्षाला अन्नखर्चापुरता येतो. वधूपक्षाला अधिक
. कारण वरगृहीं जातांना वधू आपल्याबरोबर भांडीं, वस्त्रें आणि
टें, इत्यादि घेऊन जाते. मध्यमवर्गीय कुटुंबांत वधूला हजार रुपये आणि
ला पांचशें रुपये इतका खर्च सहज येतो. अलंकारांऐवजीं किमोनोवर
क खर्च होतो. लग्नांतील वधूचा मूल्यवान् किमोनो पुन्हा जन्मांत
ला जात नाहीं. पितृगृहांतून वरगृहीं जातांना वधू पांढरा पोषाख करते.
घरीं मृत्यु होऊन दुसऱ्या घरीं तिचा जन्म होतो अशी मूळ कल्पना आहे.
रीं गेल्याबरोबर ती प्रथम देवघराकडे जाऊन तेथें प्रणाम करिते.

बालपणीं मातापित्यांची, तारुण्यांत पतीची, आणि वार्धक्यांत अप-
ची सेवा करणें हीं स्त्रियांचीं पूर्वापार चालत आलेलीं कर्तव्यें आहेत.

विवाहानंतर स्त्री विधवा झाली तर पुनर्विवाह करण्याची कायद्यानें
नाहीं. पण प्रत्यक्ष व्यवहारांत शेंकडा चार पांच स्त्रिया पुन्हा विवाह
ीत असतील. पूर्वापार रूढि विरुद्ध आहे. अगदीं तरुण आणि अपत्यहीन
वा विवाह करूं शकेल. एरव्हीं ती सासरीं राहून आपल्या मुलांची
णि सासूसासऱ्यांची सेवा करीत राहील. क्वचित् प्रसंगीं ती माहेरींही
ऊन राहील. " ही जपानी पद्धति फार चांगली आहे. " असें एक जपानी
स्थ उद्गारले ! पुरुषांविषयीं प्रश्न विचारतां त्यांनीं सांगितलें कीं
ीच्या निधनानंतर एक वर्षानें पतीला पुन्हा विवाह करितां येतो ! तरुण
वेच्या जीवनाविषयीं प्रश्न विचारतां त्यानें सांगितलें कीं लहान गांवांत
चें तिच्या चारित्र्यावर लक्ष असतें; शहरांत तिला अधिक स्वातंत्र्य
ठू शकतें.

त्यासारख्याच व्यवसायांत आयुष्य कंठावें लागतें. असे प्रसंग कधीं कधीं मध्यमवर्गीय कुटुंबावरही येतात. या पद्धतीविरुद्ध स्त्रियांच्या कांहीं संस्थांची जोरदार चळवळ चाललेली आहे.

**कायद्यांचा वरदहस्त—**

गेल्या शतकापर्यंत स्त्रियांना कायदेशीर दृष्टचा अनेक अडचणी होत्या. १८९८ मध्यें कांहीं दूर झाल्या आणि राहिलेल्या इतर अडचणी दूर करण्याकरितां चळवळी चालू आहेत. आतां नवीन कायद्याप्रमाणें बहुपत्निकत्वाला परवानगी नाहीं. पंचवीसपेक्षां अधिक वयाच्या मुली वडिलांच्या परवानगीशिवाय विवाह करूं शकतात. आपल्या नांवाची संपत्ति त्यांना ठेवितां येते. विवाहित स्त्रियांना स्वतंत्र धंदा करितां येतो. पती स्त्रीशीं घटस्फोट करूं शकत असे परंतु उलटपक्षीं शक्यता नव्हती. अलीकडे वरिष्ठ कोर्टानें एका खटल्यांत पत्नीला पतीविरुद्ध फिर्याद करून घटस्फोट करण्याची परवानगी दिलेली आहे. आतां पतिपत्नीपैकीं कोणालाही घटस्फोट करितां येतो. याच्या अनेक कारणांपैकीं सासूसासऱ्यांकडून किंवा त्यांचा अपमान हें एक पुरेंसें कारण समजलें जातें. घटस्फोट खाजगी रीतीनें करूनही नोंदवितां येतो. संपत्तीच्या वारसाहक्काबाबत मात्र स्त्रीपुरुषांच्या अधिकारांत कायदा अद्याप पक्षपाती आहे.

**विवाहार्थ मध्यस्थी—**

जपानांत विवाहाकरितां "मध्यस्थाची कुशलता" लागते. सुशिक्षितांच्या घराण्यांतही अद्याप ही पूर्वापार चाल आहे. मध्यस्थ धंदेवाईकच असतो असें नाहीं. एकादा शिक्षक, प्रोफेसर, डॉक्टर अथवा उभय पक्षांच्या कुटुंबीयांचा परिचित मित्र मध्यस्थाचें काम करूं शकतो. प्रेमविवाह प्रचारांत नाहींत. मध्यस्थ प्रथम उभयता वधूवरांच्या फोटोंची देवघेव करितो. नंतर पाहण्याचा आणि भेटीचा योग, अर्थात् वडिल मंडळींचे समक्ष, घडवून आणतो. सुशिक्षित घराण्यांत वधूवरांची परस्परसंमति घेतली जाते. नंतर विवाहाचा विधि घरीं, सार्वजनिक ठिकाणीं अथवा देवळांत होतो. अगदीं

निकटचे स्नेही व आप्त बोलाविले जातात. फार गर्दी नसते. अर्ध्या एक तासांत विधि संपतो. विधीमध्यें जुन्या पद्धतीचे कपडे घालणें, मद्याची देवघेव व कांहीं मंत्र याच गोष्टी मुख्यपणें दिसतात. मात्र विधि चालू असतां सर्व क्रिया व हालचाली अतिशय शिस्तवार आणि शास्त्रोक्त केल्या जातात. प्रत्येक विवाह सरकारांत नोंदवावा लागतो. केवळ धार्मिक विधीनें लग्न कायदेशीर होत नाहीं. विवाहोत्तर मित्रांना भोजन दिलें जातें. लहान गांवांतून गांवभोजन द्यावें लागतें.

विवाहाचा खर्च वरपक्षाला अन्नखर्चापुरता येतो. वधूपक्षाला अधिक येतो. कारण वरगृहीं जातांना वधू आपल्याबरोबर भांडीं, वस्त्रें आणि कपाटें, इत्यादि घेऊन जाते. मध्यमवर्गीय कुटुंबांत वधूला हजार रुपये आणि वराला पांचशें रुपये इतका खर्च सहज येतो. अलंकारांऐवजीं किमोनोवर अधिक खर्च होतो. लग्नांतील वधूचा मूल्यवान् किमोनो पुन्हा जन्मांत घातला जात नाहीं. पितृगृहांतून वरगृहीं जातांना वधू पांढरा पोषाख करते. एका घरीं मृत्यु होऊन दुसऱ्या घरीं तिचा जन्म होतो अशी मूळ कल्पना आहे. सासरीं गेल्याबरोबर ती प्रथम देवघराकडे जाऊन तेथें प्रणाम करिते.

बालपणीं मातापित्यांची, तारुण्यांत पतीची, आणि वार्धक्यांत अपत्यांची सेवा करणें हीं स्त्रियांचीं पूर्वापार चालत आलेलीं कर्तव्यें आहेत.

विवाहानंतर स्त्री विधवा झाली तर पुनर्विवाह करण्याची कायद्यानें बंदी नाहीं. पण प्रत्यक्ष व्यवहारांत शेंकडा चार पांच स्त्रिया पुन्हा विवाह करीत असतील. पूर्वापार रूढि विरुद्ध आहे. अगदीं तरुण आणि अपत्यहीन विधवा विवाह करूं शकेल. एरव्हीं ती सासरीं राहून आपल्या मुलांची आणि सासूसासऱ्यांची सेवा करीत राहील. क्वचित् प्रसंगीं ती माहेरींही जाऊन राहील. " ही जपानी पद्धति फार चांगली आहे. " असें एक जपानी गृहस्थ उद्गारले ! पुरुषांविषयीं प्रश्न विचारतां त्यांनीं सांगितलें कीं पत्नीच्या निधनानंतर एक वर्षानें पतीला पुन्हा विवाह करितां येतो ! तरुण विधवेच्या जीवनाविषयीं प्रश्न विचारतां त्यानें सांगितलें कीं लहान गांवांत सर्वांचें तिच्या चारित्र्यावर लक्ष असतें; शहरांत तिला अधिक स्वातंत्र्य मिळूं शकतें.

**कौटुंबिक कुलाचार—**

जपानला आपल्या कुटुंबपद्धतीचा फार अभिमान आहे. लहान गांवांतून सामायिक कुटुंबपद्धति प्रचलित आहे. परंतु शहरामध्यें ती प्रचारबाह्य होत चालली आहे. औद्योगिक सुधारणेचा परिणाम इतर राष्ट्रांवर जसा झाला तसाच जपानवरही होत आहे. तरुण वधूवरांना विभक्त पद्धतीनें राहणें अधिक पसंत पडतें. नवीन वधूंना सासूसासऱ्यांचें नियंत्रण नकोच; त्यामुळें वृद्ध पिढी अविभक्त कुटुंबाचे गोडवे गात आहे आणि एकीकडे विभक्त कुटुंबें अस्तित्वांत येत आहेत.

विभक्त-अविभक्त दोन्ही पद्धतींत घरचीं सर्व कामें स्त्रियांकडेच येतात. पतिसेवा किती करावयाची त्याला मर्यादा नाहीं. घरीं दारीं जपानी स्त्रिया अतिशय कष्ट करीत असतात. इतकें असूनही आनंदी आणि सहनशील असा त्यांचा स्वभाव दिसतो.

स्त्रियांना संततीची हौस फार. त्यामुळें कुटुंबांत मुलें पुष्कळ असतात परंतु सुशिक्षितांत अपत्यांचें प्रमाण कमी दिसतें. प्रारंभीं संततिनियमनाच्या चळवळीला खूप प्रतिकार झाला. मार्गारेट सँगर या बाईंना व्याख्यानालाही बंदी होती. पण आतां देशी वृत्तपत्रांनींही नियमनाला पाठिंबा दिला आहे. त्याची उघड चर्चाही होऊं शकते. तोकियो, ओसाका यांसारख्या ठिकाणीं संततिनियमन दवाखानेही स्थापन झाले आहेत. त्याचें साहित्यही हरएक दवादुकानांत विकत मिळतें इतकें सुलभ झालें आहे. पुढच्या पिढींत लोकसंख्येवर याचा परिणाम व्हावा असा अंदाज आहे.

जपानी कुटुंबजीवनांतही सभ्याचार आणि सौजन्यपूर्ण भाषा यांचा प्रचार आहे. पत्नी पतीला नांवानें संबोधीत नाहीं, "आनाता" (आपण) अशा नांवानें हांक मारते. पती पत्नीला घरच्या एकेरी नांवानें संबोधतो. पती बाहेरून आल्याबरोबर 'तदा इमा" (मी आलों) असें म्हणून मान वांकवितो. पत्नी दारांत येऊन गुढगे टेकून व डोकें खालीं लववून "कोंबांवा" (सु-संध्या) असें म्हणून त्याचें स्वागत करिते.

स्त्री-पुरुष नीतिविषयक कल्पना तात्त्विक दृष्टीनें जुन्या पद्धतीच्या

आहेत, परंतु प्रत्यक्ष परिस्थितीमुळें त्यांच्यांत बदल होत आहे. जुन्या नीतिमर्यादा एकतर्फी होत्या. सर्वप्रकारें विवाहपूर्व आणि विवाहोत्तर पावित्र्याचीं बंधनें स्त्रियांवर असत, आणि अद्यापही आहेत. पुरुषांना स्वातंत्र्य असे आणि कांहीं प्रमाणांत अद्यापही तसेंच आहे. सध्यां समाजांतील आर्थिक परिस्थितीमुळें स्त्रियांच्या विवाहपूर्व नीतिजीवनांतही स्थित्यंतर होत आहे. आर्थिक अडचण आणि विषमता यांचा परिणाम गरीब व मध्यमवर्गाला प्रतिकूल असा होत आहे.

**घराचें साधें रुबाबदार सौंदर्य—**

सोळा आणे जपानी अशी वस्तु कोणती असेल तर ती जपानी घर असें वाटतें. जपानी घर आणि त्याच्या भोंवतालच्या वातावरणांत कांहीं विशेष आहे. बाहेरून पाहिलें असतां घरें लहान, एक किंवा दोन मजली, लाकडाचीं, वर काळीं कौलें असलेलीं अशीं दिसतात. भूकंपाच्या प्रदेशांत लाकडी घरें धक्क्यांना तोंड देऊनही उभीं राहूं शकतात. घराच्या बाहेरचीं आणि आंतील दारें बहुतेक सरळ रेषेंत आणि समांतर चकारींतून घसरणारीं अशीं असतात. घरें बांधलीं जात असतांना पाहिलीं तर त्यांचा मालमसाला किती साधा असतो आणि त्यांतून दिसण्यांत इतकीं सुबक घरें कशीं बांधलीं जातात तें पाहून कारागिरीचें कौतुक वाटतें. साध्या बांबूच्या कुडाच्या भिंतींवर आंतल्या बाजूनें चिखल लिंपला जातो आणि त्यावर रंगीत बारीक वाळूचा हात मारून दर्शनी पृष्ठभाग सुंदर व दिखाऊ केलेला असतो. रस्त्याच्या बाजूनें फळचा मारून पाऊस-उन्हापासून संरक्षण केलें जातें. लाकडावर रंग कधींच वापरला जात नाहीं. चारी बाजूंच्या भिंती याप्रमाणें बांधल्या म्हणजे आंतील खोलींच्या भिंती या सरकणाऱ्या व सुटया होणाऱ्या असतात. त्यामुळें मधलीं दारें व भिंती, दोन्हीं एकच, काढून घेतल्या कीं घरांत ऐसपैस जागा होते. या मधल्या भिंती व दारें विशिष्ट जाड पुठ्ठयाचीं केलेलीं असतात. त्यांचेभोंवतीं लाकडी चौकट असते. रंगाची योजना खोलीला शोभेल अशी असते. घराभोंवतीं सोपा असतो. त्याचे बाजूला असलेल्या भिंती लाकडी चौकटीच्या असून त्यांवर

कागद अथवा कांचा लाविलेल्या असतात. लाकूड उत्तम जातीचें व मऊ मिळत असल्यामुळें घरकामांत विविध प्रकारें त्याचा उपयोग केलेला दिसतो. खोलीला आंतील किंवा बाहेरील बाजूनें कडी-कोंडा वगैरे कांहीं नसतें. फक्त दार सरकावून घेतां येतें. जपानी भाषेंत "खाजगी" (प्रायव्हेट) असा शब्द नाहीं. त्यामुळें घरांत कडीकोंडयाची फारशी जरूर भासत नाहीं. पुढचे दाराला एक लहान घंटा अशी बांधलेली असते कीं दार सरकल्या-बरोबर ती किणकिणते. दार उघडून "गोमेन कुदासाय" "गोमेन्नासाय" (माफ करा) असें म्हणून दारांत ललकारी दिली म्हणजे घरांतून कोणी तरी येतें. पुढील दारीं किंवा मागील दारीं जपानी पद्धतीची बाग असते. जपानी बागेचा विशेष गुण हा कीं तेथील सर्व वस्तू कृत्रिम रीतीनें नैसर्गिक स्थितींत ठेविल्या जातात. सरळ रांगा, त्रिकोणी-चौकोनी आकृति, गोल तळीं, घडीव दगड, इत्यादि कृत्रिम दिसणारे प्रकार जपानी बागेंत नाहींत. झाडें, दगड, तळें, इत्यादि बागेंतील वस्तू जणूं कांहीं निसर्गांत होत्या तशाच ठेविल्या आहेत अशा प्रकारची योजना असते. दगड अनगड स्थितींतच ठेविलेले असतात, पण प्रत्येक दगड कांहीं विशिष्ट आकृतीसारखा असल्या-मुळें भारी किंमत देऊन लांबन आणलेला असतो. पाण्याचें तळें वांकडें तिकडें, आपोआप निसर्गानें केल्यासारखेंच दिसतें. झाडांच्या कृत्रिम रांगा न लावितां प्रत्येक झाडाचें सौंदर्य खुलून दिसेल अशा रीतीनें त्यांची योजना केलेली असते. जपानी बगीचा हा घराचा एक अपरिहार्य असा भागच आहे.

घरांत सर्वत्र लाकडी जमीन असते आणि खोलींत मऊ चटया असतात. प्रथम दर्शनी दिसणारें सामान म्हणजे खोलीच्या मध्यभागीं असणारा सुंदर गुळगुळीत लांबरुंद चौरंग, एकादी लाकडी अथवा चिनी मातीची शेगडी (हिबाची), आणि चौरंगाभोंवतीं बसण्याच्या उशा या होत. खोलीच्या एका कोपऱ्यांत एक चौकोनी खोल गेलेला कोपरा असतो; तें मानाचें व पवित्र स्थान समजलें जातें. त्याचें नांव तोकोनामा. ही सर्व खोलीच्या शोभेची जागा. त्यांत एकच सुंदर चित्र आलटून पालटून लाविलें जातें. जपानमध्यें प्रत्येक घरांत चित्रसंग्रह असतो. प्रसंगाला अनुरूप असें चित्र त्या त्या वेळीं तोकोनामामध्यें लावून नंतर तें गुंडाळून ठेविलें जातें. सर्व चित्रांचें एकदम

प्रदर्शन करणें अनुचित समजलें जातें. चित्राखालीं छोटचा चौरंगावर एकादा बुद्धाचा अथवा बुद्ध मुनीचा लहान पुतळा असेल. त्याचेपुढें एकाद्या पुष्प-पात्रांत अथवा सुंदर तबकामध्यें जपानी पद्धतीनें फुलांची आणि फांद्यांची रचना केलेली असते. पुष्परचनाशास्त्राला इकेबाना असें म्हणतात.

प्रत्येक घरांत एक शिंतोघर आणि एक बुद्धघर अशीं देवघरें असतात. शिंतोघर अगदीं साधें असतें. बुद्धघर म्हणजे काळचा कुळकुळीत लाकडाचा देव्हारा होय. यांत बुद्धाची लहान मूर्ति असते आणि बाजूला पूर्वजांचीं छोटीं स्मारक-नांवें लाकडावर लिहून ठेविलेलीं असतात. मूर्तीपुढें घंटा अथवा लाकडी नगारा, धूपपात्र, स्तोत्र, इत्यादि सामुग्री असते. मालक धार्मिक व काळजी घेणारा असला तर देवापुढें भाताचा नैवेद्य ठेविलेला दिसेल.

गृहस्थ विशेष श्रीमंत असला तर घरांत एकाद्या खोलींत पाश्चिमात्य पद्धतीच्या खुर्च्या, टेबलें, गालीचा, शेक-भट्टी, जमिनीवर गालीचा, इत्यादि वस्तू ठेवील. पाश्चिमात्य खोलींत तें वातावरण आणि जपानी खोलींत जपानी वातावरण अशी सामान्यपणें अभिरुचि दिसून येते. जपानी घरें कमी खर्चाचीं, साधीं, सुंदर आणि रुबाबदार दिसतात. साधेपणांत सौंदर्य, आणि सौंदर्यांत सूक्ष्म अभिरुचि अनुभविण्याची कला जपानांत आहे. हा गुण त्यांच्या गृह-रचनेमध्यें प्रामुख्यानें दिसून येतो.

**हिंदु चालीरीति जपानांत—**

कुळाचार आणि चालीरीति या दृष्टीनें जपानी व हिंदु चालीरीतींत कित्येक साम्यस्थानें आहेत. जपानांत एक दिवस सर्व पितृश्राद्धाकरितां ठेविलेला असतो. त्या दिवशीं जवळचे नातेवाईक बोलाविले जातात. बौद्ध उपाध्याय घरीं येऊन स्तोत्रें म्हणतात आणि भोजन करून दक्षिणा घेऊन जातात. बुद्धजयंती मोठचा आनंदानें साजरी केली जाते. एक दिवस मुलांचा उत्सव असतो. त्या दिवशीं किल्ला मांडून त्यावर शूर राजे व वीर पुरुष यांच्या प्रतिमा ठेवितात. एक दिवस मुलींचा उत्सव असतो त्या वेळीं सुंदर बाहुल्यांचें प्रदर्शन मांडून त्यापुढें गायनवादनाचा व भातुकलीचा कार्यक्रम होतो.

घरांत एकुलती एक मुलगी असेल तर घरजांवई करितां येतो. विवाहित मुलगी आपल्या पहिल्या बाळंतपणाकरितां आईबापांच्या घरीं येते. लग्न जमविण्याचे कामीं ज्यानें मध्यस्थी केली असते तो मुलाचें उष्टावण करण्याचे वेळीं लागतो. हा विधि झाला म्हणजे मध्यस्थाची विवाहविषयक जबाबदारी संपली.

**'आमचीं मतें'**—

स्त्रियांचा बहुसंख्य वर्ग मतानें जुन्या वळणाचा सनातनी आहे. स्त्रियांचें स्थान घरांतच आहे. अपत्यजनन हेंच मुख्य कर्तव्य. स्वतंत्र व्यवसायापेक्षां पतीवर अवलंबून राहणें अधिक पसंत. सासूसासरे असलेलें कुटुंब चांगलें. प्रणयाराधन पद्धतीपेक्षां मध्यस्थाचे मदतीनें विवाह झालेला चांगला. निदान चार पांच मुलें तरी घरांत असावींत. जितकीं अधिक मुलें तितकें अधिक सुख. स्त्रियांना मताधिकाराची जरूरी नाहीं. संततिनियमन हानिकारक व घातक आहे. पोषाख आणि विचार यांत पाश्चात्यांचें अनुकरण करणें अनिष्ट आहे. स्त्रियांना आणि पुरुषांना स्वतंत्र शिक्षण चांगलें. अशा स्वरूपाची विचारसरणी सामान्य स्त्रीवर्गांत आढळते.

सुशिक्षित स्त्रियांचा एक लहान पण कर्तबगार असा गट स्त्रियांच्या उन्नतीकरितां काम करणारा आहे. स्त्रियांचे वारसाहक्कासंबंधीं व घटस्फोटासंबंधीं कायद्यांत सुधारणा, त्यांना सार्वत्रिक मतदानाचा हक्क, उच्च शिक्षणाच्या सोयी, वेश्याव्यवसायावर नियंत्रण, पुरुषांच्या नैतिक स्वैराचारावर नियंत्रण, इत्यादि अनेक गोष्टींकरितां काम करणाऱ्या थोड्या कर्तबगार स्त्रिया जपानमध्यें आहेत. परंतु स्त्रियांचा बहुसंख्य वर्ग हा चाकोरींतून सहसा बाहेर जाण्याच्या हिंमतीचा नसल्यामुळें हें सुधारणेचें कार्य अत्यंत सावकाश चाललेलें आहे. सुशिक्षित जपानी पुरुषही स्त्रियांचे बाबतींत जरा जुन्या मताचाच असतो. छायाचित्राचे वेळीं पुरुषानें खुर्चीवर बसून स्त्रीनें उभें राहावें, भोजनाचे वेळीं पुरुषांनीं आधीं भोजन करून नंतर स्त्रियांचें भोजन व्हावें, इत्यादि चाली सुशिक्षितांच्याही घरामध्यें आढळून येतात. यावरून पाश्चिमात्य सुधारणा यांचे मनाला केवळ चाटून गेली

आहे असें वाटतें. त्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील सुशिक्षित पुरुष अधिक उदार प्रवृत्तीचे आणि स्त्रियांचे सुधारणेला अनुकूल आहेत. हिंदी स्त्रियाही जपानी स्त्रियांपेक्षां अधिक जागरूक, प्रगतिप्रिय आणि हक्कांविषयीं दक्ष आहेत.

पण जपानी स्त्रियांचे स्वभावांत जें माधुर्य आहे तें जगांतील कोणत्याच समाजांतील स्त्रियांत नसावें असें वाटतें. अनेक शतकें कन्फ्यूशियननें घालून दिलेल्या वळणानें जपानी स्त्रियांचें शिक्षण झालेलें आहे. त्यामुळें त्यांच्या वागण्यांत कमालीचें सौजन्य आलेलें आहे. सभ्य भाषणाचें व आचारांचें बाळकडू त्यांना लहानपणापासून दिलें जातें. मुख नेहमीं आनंदी असावें अशी पूर्वापार शिकवण असल्यानें जेथें जेथें मुली आणि स्त्रिया तेथें तेथें हास्य आणि आनंद यांनीं वातावरण भरून जातें. त्यांच्या पोषाखांत, भाषणांत आणि आचारांत संयम व अभिरुचि दिसून येते. भावना किंवा आचार यांत उत्तानपणा नाहीं. या सर्व गुणांना त्यांच्या कष्टाळू स्वभावामुळें अधिकच मोल चढतें.

इतकें सर्व असलें तरी मनांत असा विचार येतो कीं जपानी स्त्रिया यापेक्षां कमी मवाळ आणि अधिक कणखर असत्या तर किती छान झालें म्हणतें !

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ..............
ठाणे.

* * *

## ८

# प्राचीन चातुर्वर्ण्य व आधुनिक चतुर्वर्ग

**लेखणीनें सामाजिक क्रांति—**

जपानच्या आधुनिक इतिहासांत त्यानें मिळविलेलें साम्राज्य व त्यानें उभारलेली औद्योगिक संघटना यांचेपेक्षांही आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे त्याची सामाजिक क्रांति ही होय. आणि ही सामाजिक क्रांति राजाच्या एका लेखणीच्या फटकाऱ्यानें झाली व समाजानें ती बिनविरोध मान्य केली ही गोष्टही विशेष लक्षांत घेण्यासारखी आहे. ज्या जपानी समाजांत पूर्वी कडक जातिनिर्बंध होते त्या समाजांतील नागरिकांना आतां आपली जात म्हणजे मातापित्यांची जात आठवण करून सांगावी लागते. आणखी दोन-तीन पिढ्यांनंतर कदाचित् तो इतिहासही पुढची पिढी विसरून जाईल.

पाश्चिमात्य लोकांनीं जपानच्या राजकीय व औद्योगिक प्रगतीचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. पण जातिभेदाच्या इतिहासाचा फारसा अभ्यास झालेला दिसत नाहीं. राजकीय इतिहासाच्या अनुषंगानें झाला असेल तेवढाच.

जपानचा अभ्यास करणाऱ्या हिंदी प्रेक्षकाला हा सामाजिक इतिहास फार महत्त्वाचा आहे. कारण पाश्चिमात्यांचे संबंध येण्यापूर्वी दोन्हीही

देशांत एकाच प्रकारचा समाज होता. नंतर या दोन्ही समाजांनीं आपापल्या प्रवृत्तीप्रमाणें निराळे मार्ग कसे आंखले ती तुलना मनोरंजक आहे.

जपानमध्यें सुधारणा राजाज्ञेनें झाली. लोकमत, लोकांचें शिक्षण किंवा परिवर्तन हा मुद्दा त्या वेळीं पुढें आला नाहीं. या सामाजिक क्रांतीमुळें ज्या वर्गाच्या खास सवलती काढून घतल्या गेल्या त्या वर्गानें थोडा विरोध करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो तितकासा यशस्वी झाला नाहीं.

जपानमध्यें जातिसंस्था नाहींशी करणें याचा हेतु व अर्थ वरिष्ठ वर्गाच्या सवलती काढून घेणें, खालच्या वर्गांवरील निर्बंध दूर करणें, आणि या दोन्ही वर्गांतील दळणवळणाच्या आड येणारे नियम रद्द करणें, अशा स्वरूपाचा होता. आजच्या समाजाकडे पाहिल्यानंतर या क्रांतीमुळें जपानी समाजाचें नुकसान झालें आहे असें वाटत नाहीं. समाज व राष्ट्र या दृष्टीनें फायदाच झालेला दिसतो.

**प्राचीन जातिपद्धति—**

प्राचीन जातिभेदाची संस्था जपानमध्यें तेराव्या शतकापूर्वीपासून चालत आलेली आहे. तेराव्या शतकापर्यंत समाजांत व्यवसाय व सत्ता यांच्या भिन्नतेमुळें वर्गीकरण झालेलेंच होतें, परंतु त्याला कायद्यानें निश्चित स्वरूप दिलेलें नव्हतें. राज्य करणारा व लढणारा वर्ग, शेतकरी वर्ग, थोडा कारागीर वर्ग आणि व्यापारी वर्ग असे चार वर्ग लवचिक स्वरूपाचे होते. उपाध्याय वर्ग हा राज्यकार वर्गाच्या समान व आश्रयानें असा असे. पराक्रमी व्यक्तींनीं वरच्या वर्गांत जावें, सामान्य लोकांनीं आपापल्या व्यवसाया-प्रमाणें व लायकीप्रमाणें खालच्या वर्गांत असावें, अशी पद्धति होती. आर्थिक व राजकीय हक्क वरच्या वर्गाचे लोकांना अधिक होते.

**योरीतोमोकृत स्मृतिशास्त्र—**

तेराव्या शतकाच्या अखेरीस योरीतोमो नांवाचा कर्तबगार वजीर सत्ताधीश झाला. देशांतील सर्व सरदारांना आपल्या कह्यांत आणून त्यानें मध्यवर्ती सत्ता निर्माण केली व राज्यकारभारांत शिस्त आणली. हीच

शिस्त व पद्धतशीरपणा समाजांत यावा म्हणून त्यानें व्यवसायभिन्नत्वानें चार निश्चित वर्ग निर्माण केले. प्रत्येक वर्गाला त्याची शिस्त, शिक्षण, हक्क, निर्बंध, सवलती व वरिष्ठ आणि कनिष्ठ समाजाशीं संबंध, इत्यादि गोष्टी ठरवून दिल्या. सारांश, योरीतोमो हा एक प्रकारें जपानचा स्मृतिकारच होऊन गेला. समाजांत विद्यमान असलेल्या परिस्थितीला त्यानें निश्चित स्वरूप दिलें, व त्याचा लवचिकपणा नाहींसा केला. असें करतांना त्या वेळीं प्रचलित असलेल्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा आश्रय त्यानें घेतला. श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे भेद समाजांत होते ते त्यानें अधिक निश्चित केले. श्रेष्ठांनीं सर्व सवलती भोगावयाच्या, कनिष्ठांनीं कर्तव्यें करावींत असा कांहींसा विषम प्रकार होता. प्रत्येक जातीचीं आद्याक्षरें घेऊन शी नो को शो म्हणजे जपानी जातिव्यवस्था हा शब्द झालेला आहे. त्यांत श्रेष्ठतेच्या अनुक्रमानें क्षत्रिय, कृषीवल, कारागीर आणि वैश्य अशा चार वर्गांचा समावेश होतो. सरदार वर्ग व उपाध्याय वर्ग यांचा या चातुर्वर्ण्यांत उल्लेख झालेला नाहीं. तो वरिष्ठ वर्गांत मोडत असे. ईटा किंवा जपानांतील अस्पृश्य वर्ग याचाही उल्लेख शी नो को शोमध्यें नाहीं. परंतु या वर्गाचेंही समाजांत अस्तित्व होतें व आजही आहे.

**सामुराई क्षात्रधर्म**—

तेराव्या शतकाचे अखेरीस जे नवीन नियम झाले त्यांमुळें प्रत्येक वर्गाचा पोषाख, आचार, हक्क, कर्तव्यें, विवाह व आहारविषयक निर्बंध इत्यादि गोष्टी ठरविल्या गेल्या. विशेषतः सामुराई किंवा क्षत्रिय हा वर्ग श्रेष्ठ समजला जात असे. त्या वर्गांत खालच्या वर्गांतील व्यक्तीचा समावेश फार कष्टानें व अलौकिक क्षत्रियवृत्ति, स्वार्थत्याग, पराक्रम, इत्यादि गुणांमुळें होण्याची शक्यता होती. पण या वर्गावर आचारात्मक बंधनेंही तितकींच कडक होतीं. खास सामुराई वर्गाकरितां आचारस्मृति तयार झाली, तिला बुशिदो असें नांव आहे. स्वामिनिष्ठा, पितृनिष्ठा, साधी राहणी, आत्मसंयमन, गंभीरवृत्ति, मानाची तीव्र जाणीव, अपमानाची चीड, बलिदानाची तयारी, इत्यादि आचारगुणांचा समावेश बुशिदोमध्यें होत असे. सामुराई

घराण्यांत मुलामुलींचें शिक्षण अतिशय शिस्तीनें होत असे. गुरूपुढें मुलगा किंवा मुलगी एकदां वीरासन घालून बसल्यानंतर तास तास हूं का चूं न करतां त्यांना बसावें लागे. मुलांना आणि मुलींना उभयतांनाही क्षात्रविद्या शिकविली जात असे. यांत तरवार, तिरंदाजी, नागीनाता (जपानी लांब पात्याचा भाला), इत्यादि शस्त्रविद्येचा समावेश होत असे. प्रत्येक सामुराईच्या घरांत आत्महत्या करण्याचीं साधनें नेहमीं तयार असत. क्षात्रविद्येबरोबरच वाङ्मय, धर्म, तत्त्वज्ञान, लेखन या विषयांचाही व्यासंग या लोकांत होता. या वर्गावर आचाराचीं बंधनें होतीं त्याचप्रमाणें त्याला समाजांत सवलतीही होत्या. सामुराई वर्ग इतर वर्गापेक्षां श्रेष्ठतम समजला जाई. त्यानें खालच्या वर्गांतील व्यक्तीची हत्या केली तर न्याय मिळण्याची सोय नव्हती. उलट खालच्या वर्गांतील व्यक्तीला मात्र सामुराईवर हात टाकण्याचा अधिकार नसे. शस्त्र धरण्याचा अधिकार फक्त सामुराई वर्गाला असे. प्रत्येक वीर दोन तरवारी नेहमीं बरोबर ठेवी. या क्षत्रियांचा खालच्या वर्गांतील लोकांशीं बेटीव्यवहार होत नसे.

**क्षत्रियेतर जाती—**

सामुराईव्यतिरिक्त इतर खालचे वर्गांचीं कर्तव्यें निराळीं होतीं. प्रत्येक वर्गाला पोषाख, केशरचना, नांवें, इत्यादि बाबतींतही कांहीं निर्बंध असत.

शेतकरी, कारागीर व वैश्य हे वर्ग जरी खालचे समजले जात तरी आर्थिक दृष्टीनें सर्वच लोक कनिष्ठ दर्जाचे नसत. किंबहुना या चारीही वर्गांत आर्थिक दृष्टचा श्रेष्ठ कनिष्ठ असणाऱ्या लोकांचे अनेक प्रकार असत. जन्मतः निश्चित केलेली जाति आणि आर्थिक दर्जा यांचा संबंध नसे. किंबहुना वैश्य वर्ग जरी नीच समजला जाई तरी ऋणको-धनकोच्या संबंधानें तो सामुराईपेक्षांही कधीं कधीं श्रेष्ठ असे.

**अस्पृश्य ईटा—**

अस्पृश्य वर्गाला ईटा असें नांव होतें. ईटा याचा शब्दशः अर्थ खाटीक,

जनावरें कापणारा, असा होता. पुढें त्याला अस्पृश्य असा अर्थ आला. पूर्वापार जनावरें कापणारे, मृत प्राण्यांची व्यवस्था लावणारे व आरोग्य-विषयक कामें करणारे, अशा लोकांची वस्ती निराळी असे. सामान्य वस्तींत निवास आणि विवाहव्यवहार या गोष्टी त्यांना प्रतिषिद्ध होत्या. कायद्यानें या वर्गाला नीच स्थितींत व समाजापासून अलिप्त ठेविलें होतें.

१८६७ मध्यें मेईजी पुनर्घटना झाली त्या वेळीं अशा प्रकारची समाजरचना जपानमध्यें अस्तित्वांत होती.

**मेइजीकृत समाजक्रांति—**

१८७१ मध्यें मेइजी राजानें एक आज्ञापत्र काढलें. या आज्ञापत्रानें वरिष्ठ वर्गाच्या सर्व खास सवलती काढून घेतल्या, आणि कनिष्ठ वर्गावरील निर्बंध दूर करण्यांत आले. सामुराई नेहमीं दोन तरवारी घेऊन रस्त्यांतून जाई व विशिष्ट प्रकारची केशरचना करी. या गोष्टींना बंदी करण्यांत आली. पूर्वीं सैन्यांत फक्त सामुराईचाच समावेश होत असे. आतां शेतकरी किंवा कारागीर कोणीही सैन्यांत दाखल होऊं लागला. व्यवसायनिर्बंध नाहींसे होऊन प्रत्येक वर्गाला व व्यक्तीला वाटेल ते व्यवसाय करण्याला स्वातंत्र्य मिळालें. त्याचप्रमाणें श्रेष्ठ कनिष्ठ जातींत विवाहविषयक निर्बंध होते तेही रद्द करण्यांत आले. ईटा किंवा अस्पृश्य वर्गावरील सामाजिक निर्बंध कायद्यानें दूर करण्यांत आले. अशा रीतीनें एका फर्मानाचे जोरावर जपानी समाजांत क्रांति झाली !

या सुधारणेविरुद्ध कांहीं सामुराई लोकांनीं प्रतिकार करून बंड उभारण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारनें शेतकरी वर्गातील सैनिकांचें सैन्य तयार करून त्याचेकडून या सामुराई बंडाचा पराभव करविला. त्यामुळें सामुराईंचे डोळे उघडले. तरवार फक्त आपणच पेलावी, इतर वर्गांची ती लायकी नाहीं, अशी श्रद्धा असणाऱ्या क्षत्रियांचा भ्रमनिरास झाला. त्यानंतर या वर्गानें शांतपणानें हातीं येईल तो व्यवसाय करण्याला प्रारंभ केला. कांहीं राजकारणांत, कांहीं व्यापारांत, कांहीं उद्योगधंद्यांत असे अनेक व्यव-

सायांत पडूं लागले व त्यांतील कांहीं चांगले पुढें आले. जपानमधील पहिल्या पांच कोट्याधीशांत मित्सुई, सुमितोमो, ओकुरा, इत्यादि सामुराई कुटुंबें आहेत.

आजच्या जपानी समाजांत व्यवसाय, अन्नव्यवहार किंवा लग्नव्यवहार यांवर जातिनिर्बंध राहिलेले नाहींत. सर्व समाज एकजात झालेला आहे. मात्र ईटा वर्गाचे निर्बंध दूर केलेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांची दुःस्थिति पूर्णपणें कमी झालेली नाहीं. त्यांची वस्ती अद्याप वेगळीच असते. बहुजनसमाजाशीं सहवास किंवा रोटीबेटीव्यवहार या दृष्टीनें त्यांना अद्याप वरचें स्थान मिळालेलें नाहीं. सध्यां या वर्गाला "सुईहेइशा" (समान झालेले) अशी संज्ञा आहे.

**नवीन वर्गपद्धतीचा जन्म—**

जपानमधील जन्मसिद्ध जातिपद्धति नष्ट झाली तरी दुसरी वर्गपद्धति लगेच तेथें निर्माण झाली. फरक इतकाच कीं पूर्वींचीं बंधनें आतां राहिलीं नाहींत. कांहीं लोकांना फक्त सामाजिक दर्जा मिळाला. पूर्वींचे जे सरदार लोक होते त्यांचा एक स्वतंत्र वर्ग करण्यांत येऊन त्यांना काझोकू अशी संज्ञा मिळाली. या लोकांना प्रिन्स, मार्क्विस, कौंट, व्हायकौंट व बॅरन असे किताब देण्यांत आले. बाकीच्या समाजांत व्यवसायभिन्नत्वामुळें चार वर्ग पडले आहेत. हे वर्ग प्रत्येक समाजांत असतात. पण जपानमध्यें त्यांचे हातीं किती व कशा प्रकारची सत्ता आहे हें पाहणें आवश्यक आहे.

क्षत्रिय, वैश्य, ब्राह्मण आणि कारागीर अशा क्रमानें आजच्या समाजांतील वर्गरचना झालेली दिसते. तात्त्विक दृष्टीनें विचार करितां सर्व वर्ग सारखे आहेत. प्रत्यक्ष वस्तुस्थिति पाहतां आजच्या घटकेला राजकीय सत्तेची वांटणी विषम झालेली दिसते. क्षत्रिय व वैश्य यांचे हातांत सत्ता आहे. ब्राह्मण व कारागीर यांना समाजांत फारशी सत्ता नाहीं.

**लष्करशाही—**

आजचा क्षत्रिय वर्ग, म्हणजे सैन्य, आरमार व वैमानिक दल ज्यांचे हातांत आहे ती लष्करशाही. आज जपानचीं सूत्रें या वर्गाचे हातांत आहेत.

या वर्गाकडे लष्करी सत्ता असल्यानें तोच खरा सामर्थ्यवान् पक्ष आहे. परराष्ट्रीय राजकारणांत तो आपल्या इच्छेप्रमाणें धोरण आंखू शकतो. मुत्सद्यांचें त्याचेवर फारसें वजन पडूं शकत नाहीं. या वर्गांत पराक्रमानें व चारित्र्यानें श्रेष्ठ असे पुढारी असल्यानें बहुजनसमाजावर त्याचें नैतिक वजन आहे. त्यांची संघटना खेडयापाडयापर्यंत पसरलेली आहे. लष्करी शिक्षणाच्या निमित्तानें सर्व तरुणांवर त्यांची छाप आहे. त्यामुळें वेळ पडली तर इतर सर्व वर्गांना किंवा पक्षांना तुच्छ लेखून हा वर्ग आपलें धोरण अंमलांत आणूं शकतो. आजच्या जपानवर या लष्करी वर्गाची हुकमत चालू आहे. परराष्ट्रीय राजकारणांत जपान म्हणून म्हणतात तेव्हां हा लष्करी जपान असा एक अर्थ होतो.

**भांडवलशाही—**

क्षत्रियांचे बरोबरीनें पण किंचित् खालोखाल वैश्य वर्गाचे हातांत सत्ता आहे. राष्ट्राचे सर्व उद्योगधंदे, व्यापार, बँका, आयातनिर्यात, व्यवहार, इत्यादि या वर्गाचे ताब्यांत आहेत. मोठे भांडवलदार या वर्गांत आहेत. जपानची निम्मी संपत्ती पांच घराण्यांत विभागली गेली आहे असें म्हणतात. मित्सुई, मित्सुबिशी, सुमितोमो, यासुदा आणि ओकुरा हीं पहिलीं पांच कोटयाधीश घराणीं आहेत. त्यांच्या ताब्यांत सर्व दारूगोळ्याचे, विमानांचे, जहाजांचे, पोलाद-लोखंडाचे, इत्यादि कारखाने व मोठ्या खाणी, बँका, विमा कंपन्या, वृत्तपत्रें, इत्यादि धंदे आहेत. आयातनिर्यात व्यापार आणि जहाजाची वाहातूक त्यांच्या हातांत आहे. सारांश जपानच्या तिजोरीवर या वर्गाचे नियंत्रण आहे.

आज लष्करी वर्ग व वैश्यवर्ग यांचें संगनमत आहे, कारण दोघांचीं धोरणें परस्परांना पोषक आहेत. लष्करानें नवीन प्रांत मिळवावेत व तेथें वैश्यांनीं आपलें भांडवल घालावें अशी सहकारिता चाललेली आहे.

**ब्राह्मण व कामगार—**

ज्याचे हातांत फारशी सत्ता नाहीं असे वर्ग म्हणजे बौद्धिक व्यवसायां-

तील लोक आणि कारागीर-कामगार-शेतकरी हे होत. परराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय राजकारणांत या लोकांना फारसें वजन नाहीं. त्यांच्या हातांत कांहीं सत्ता नाहीं.

जपानमधील बौद्धिक व्यवसायांतील वर्गाला हें शल्य बोंचत आहे. जपान लष्करशाहीचे अंमलाखालीं आहे ही गोष्ट त्यांना मनपसंत नाहीं, पण उघडपणें कोठें बोलतां येत नाहीं. जो कोणी बोलतो तो पटकन् गप् केला जातो किंवा तुरुंगांत जाऊन पडतो. तेव्हां आपापसांत कुजबुज करण्यापलीकडे आणि असंतुष्ट राहून परिस्थिति बदलेल अशी वाट पाहण्यापलीकडे त्याला अधिक कांहीं करितां येत नाहीं. अध्यापक, संपादक, डॉक्टर, धर्मप्रचारक, इत्यादि लोक या वर्गांत येतात.

शेवटचा वर्ग कारागीर-कामगार-शेतकरी लोकांचा. याही वर्गाला राजकीय सत्ता किंवा वजन नाहीं. कायदेशीर संघटनेची परवानगी नसल्यामुळें समाजांत त्याला सामर्थ्य नाहीं. सरकारी मर्जीवर अवलंबून राहणें हाच एक मार्ग त्याला उपलब्ध आहे.

**भवितव्य—**

मेइजी क्रांतीनंतर सामाजिक परिवर्तन होऊन विशिष्ट वर्गाचे सामाजिक हक्क घेतले गेले व सामाजिक स्वातंत्र्य स्थापन झालें. पण त्यानंतर आलेल्या राजकीय व औद्योगिक परिस्थितीमुळें लष्करी वर्गाच्या व भांडवलदार वर्गाच्या हातांत राजकीय व आर्थिक सत्ता गेली आहे. जपानमधला सामाजिक प्रश्न नाहींसा झाला पण आर्थिक व राजकीय प्रश्न नवीन उपस्थित झाला. वरच्या दोन वर्गांचे हातांत केंद्रीभूत झालेली सत्ता खालच्या समाजांत येईल कीं नाहीं हा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितींत जोंपर्यंत श्वेतराष्ट्रें जपानला बुडविण्याकरितां टपून बसलीं आहेत तोंपर्यंत तरी तेथें राजकीय व आर्थिक परिवर्तन होणें शक्य दिसत नाहीं. आणीबाणीचें परराष्ट्रीय राजकारण चालू असतां आपले सर्व मतभेद बाजूला ठेवून सरकारला मनोभावें मदत करणें किंवा स्वस्थ राहणें हा जपानी स्वभाव आहे. म्हणून अंतस्थ राजकारणांत आहे ही परिस्थिति आणखी बरींच वर्षें राहील असें आज तरी दिसतें.

★ ★ ★

# १
# शेतकरी व कामगार जीवन

**जपानची कोंकणी शेती—**

जपानची शेती कोंकणांतील शेतीसारखी आहे. शेतांचा आकार अगदीं लहान असतो. बहुतेक शेतांत माणसेंच काम करितांना दिसतात. जनावरें कामाकरितां लावलीं आहेत असें क्वचितच कांहीं भागांत दिसतें. शेतकरी आणि त्यांच्या तरुण व वृद्ध स्त्रिया अहोरात्र राबत असतात. शेतीला उपयोगी अशी सर्व जमीन नांगराखालीं आली आहे. एक वीतभर जागा अशी दिसत नाहीं कीं जिचा शेती-बागायतीकडे उपयोग केलेला नाहीं. घराचीं अंगणें, आडबाजूंच्या जागा, डोंगर वगैरे सर्वत्र शेती आणि बागायत झालेली आहे. दोन शेतांमध्यें बांधाकरितां देखील जागा वायां दवडलेली नाहीं. डोंगरावर कृत्रिम जमिनी करून संत्र्यांची लागवड केलेली आहे. शेतांतून अधिकाधिक उत्पन्न काढण्याची पराकाष्ठा जपानी लोकांनीं केलेली आहे. गेल्या पाऊणशें वर्षांत शास्त्रोक्त पद्धतीमुळें शेतीचें उत्पन्न दुप्पट वाढलें आहे.

**शेती व ग्रामोद्योग—**

महायुद्धापूर्वी जपान कृषिप्रधान देश होता. महायुद्धांत आणि नंतर त्यानें औद्योगिक क्षेत्राकडे लक्ष दिलेलें आहे. त्यामुळें गेल्या वीस पंचवीस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ५६९३ दा. क्र.

वर्षांत उद्योगधंद्याकडे लागलेल्या लोकसंख्येचें प्रमाण वाढलें आहे. सध्या शेती आणि उद्योगधंदे व व्यापार यांवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचें प्रमाण निम्मेनिम आहे असें म्हणतां येईल. एकंदर कुटुंबांपैकीं शेंकडा पंचेचाळीस कुटुंबें शेतीवर व शेंकडा चाळीस कुटुंबें व्यापार—उद्योगधंद्यांवर अवलंबून आहेत. राष्ट्रीय जीवनाचे दृष्टीनें जपानला उद्योगधंद्यांइतकीच शेती महत्त्वाची आहे.

नांगराखालीं आलेली व येण्यासारखी जमीन थोडी आणि शेतीचा आकारही लहान, असें असलें तरी स्वतःचें पोट भागवून परदेशींही निर्यात करण्याची महत्त्वाकांक्षा जपानमध्यें दिसते. कांहीं प्रांतांत संत्र्यांच्या झाडांनीं डोंगर अगदीं पिवळेजर्द झालेले दिसतात. परदेशांत पाठविण्याकरितां ही संत्र्यांची लागवड चालते असें समजतें. विशिष्ट प्रकारच्या लहान जातीच्या शेवंतीची लागवड कांहीं भागांत केली जाते. आपल्याकडे ढेंकूण, डास, इत्यादि जंतू मारण्याकरितां ज्या जपानी उदबत्त्या किंवा इतर औषधी येतात त्यांचेकरितां ही लागवड चाललेली असते. जपानी सफरचंदें इकडील बाजारांत येतात ही माहिती सर्वश्रुतच आहे. सारांश, निर्यातीकरितां उद्योग हें तत्त्व आपल्या लहान शेतीलाही जपानी लोकांनीं लावलें आहे. त्यामुळें खेडेगांवांतून केवळ शेती न दिसतां शेतीला धरून अनेक उद्योगधंदेही चाललेले दिसतात.

एकाद्या गांवांत आम्लें (ॲसिडस्) काढण्याचा कारखाना असतो. भोंवतालीं होणाऱ्या प्रदेशांत तयार झालेल्या संत्र्यामोसंब्यांचे ढीगच्या ढीग या कारखान्यांत पडलेले असतात. हीं ॲसिडें परदेशीं निर्यात होतात. एकाद्या गांवांत येथें विकल्या जाणाऱ्या जंतुनाशक वेटोळ्या उदबत्त्यांचे कारखाने असतात. तेथें एक शेड वाळलेल्या फुलांच्या पोत्यांनीं भरलेली असते. समुद्रकिनारीं एकाद्या गांवांत मासे पकडून डबेबंद करण्याचा कारखाना चाललेला असतो. कोठें लोणचीं, कोठें फळें, कोठें भाजीपाले, इत्यादि अनेक वस्तू डबाबंद करण्याचे कारखाने खेडेगांवांतून इतस्ततः पसरलेले आहेत. रेशमाचे किडे ठेवून रेशीम पैदास करण्याचा दुय्यम धंदा तर अनेक वर्षें जपानी

शेतकऱ्यांचे झोंपड्यांतून चालू आहे. रस्त्यानें जातांना सहज एकाद्या झोंपडींत डोंकावलें तर रेशमी किड्यांची जोपासना चाललेली दिसून येते.

**सुगीतो गांव—**

सुगीतो नांवाचें एक लहान खेडें तोकियोपासून साठसत्तर मैलावर आहे. या गांवाची वस्ती ३००० लोकांची आहे. गांवांतील मुख्य रस्ता व बाजूचे कांहीं रस्ते चांगले केलेले आहेत. लहान रस्ते पक्के नाहींत. गांवांत एक शेतीची शाळा आहे. तेथें आजूबाजूच्या प्रदेशांतून दहा पंधरा मैलांचे टापूंतील ४०० विद्यार्थी पायगाडीवरून येतात. शेतीच्या शाळेंत भाताची लागवड, बागायत, कोंबड्यांची व डुकरांची जोपासना, कृषिविषयक लहान-सहान धंदे, इत्यादि विषय शिकविले जातात. गांवांत सात डॉक्टर व तीन डेंटिस्ट आहेत. वकील नाहींत. एक प्राथमिक शिक्षणाची शाळा असून तींत ७०० विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत. सुमारें वीस वर्षांपूर्वी म्हणजे १९१७ चे सुमारास विजेचा उपयोग सुरू झाला. गांवांत कांहीं टेलीफोन उपलब्ध आहेत. स्टेशनजवळ स्वच्छ, नीटनेटकें व वरच्या दर्जाच्या उतारूंना-ही योग्य असें भोजन व निवासगृह आहे. गांवांतील शेतकरी, व्यापारी व मुख्याध्यापक यांचीं घरें स्वच्छ, नीटनेटकीं व अभिरुचिपूर्ण अशीं आहेत.

**शेतकऱ्याची झोंपडी—**

शेतकऱ्यांची वस्ती दोन प्रकारची आहे. कांहीं गांवांत राहतात. कांहीं गांवाजवळील आपल्या शेतांतच राहतात. शेतांत राहणाऱ्या एका सधन शेतकऱ्याच्या घरांत अकरा माणसें कामाला होतीं. हे लोक तेथेंच शेतावर राहून भोजनाला जमीनदाराच्या घरांतच असत. तेथें सर्वांचा स्वयंपाक एकदम होतो. दारांतून घरांत शिरल्याबरोबर राहण्याच्या खोल्या जमिनीपासून फूट दीडफूट उंचीवर असून सर्वत्र चटया पसरलेल्या दिसतात. शेतकरी व पत्नी मोठ्या विनयानें व सभ्यतेनें आगतांचें स्वागत करितात. स्वयंपाकघरांत एक सुधारून बांधलेला चुलाणा असतो. त्यांत भाताचें तूस जाळून फक्त भात शिजवीत असावेत असें दिसलें. मुख्य सोप्या-

मध्यें दर्शनीच बुद्धाचें देवघर होतें. आंत एका खोलींत शितोघर होतें. उठण्याबसण्याकरितां एक स्वतंत्र खोली शृंगारून ठेविलेली होती. घराशेजारीं दोन पडळी होत्या. धान्यसांठवण, यंत्रसामग्री, भातकांडण, इत्यादि कामाकरितां त्यांचा उपयोग होतो. त्यांत एक तांदूळ सडण्याचें यंत्र पेट्रोलवर चालणारें आणि हालता पाया असलेलें असें होतें. एका माळयावर रेशमी किडयांची पैदास करण्याची व्यवस्था होती. त्याचप्रमाणें कोंबडया व डुकरें यांच्या जोपासनेकरितांही निराळया झोपडया असतात. घरांत विजेचे दिवे असतात. जमीनदाराला तीन मुली व दोन मुलें होतीं. मुलाचें शिक्षण स्थानिक शेतीशाळेंत व मुलीचें शेजारच्या गांवांत हायस्कूलमध्यें झालें होतें. मध्यम प्रतीच्या शेतकऱ्याची ही स्थिति आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

**खेडयांतील गरिबी—**

कांहीं गांवें फार लहान आहेत. तेथें अद्याप सर्व सुखसोयी असाव्यात तशा नाहींत. विजेची सोय सर्वत्र आहे, पण रस्ते मात्र अगदीं वाईट स्थितींत दिसतात. गांवांतील एकादा रस्ता चांगला असतो. बाकीच्या रस्त्यांत पावसाळयांत खूप चिखल होतो. पण गुडघ्यापर्यंत उंच रबरी बूट स्वस्त मिळत असल्यानें शेतकरी त्यांचा उपयोग करितांना दिसतात. घाण पाणी काढून लावण्याची सोय झालेली नाहीं. गटारें सामान्य स्थितींत आहेत. घरामध्यें एक दोन खोल्या चांगल्या असतात. बाकी एकंदर गरिबीचीच स्थिति दिसते. सारांश कांहीं खेडीं बरीं दिसतात तर कांहीं अगदींच हलाखीच्या स्थितींत आहेत. माणसें मात्र सर्वत्र उद्योगी दिसतात.

**जमिनीचे लहान तुकडे—**

जपानांत ५६ लाख कुटुंबें शेतीवर अवलंबून आहेत, त्यांपैकीं १७ लाख स्वतःच्या मालकीची शेती करितात, १५ लाख दुसऱ्याच्या जमिनी खंडानें करितात आणि बाकीचीं अंदाजें २४ लाख कुटुंबें स्वतःच्या जमिनी करून शिवाय खंडानेंही कांहीं शेती करितात.

शेताचा आकार सामान्यपणें अडीच एकरांपेक्षां लहान आहे असें धरून चालण्यास हरकत नाहीं, कारण शेंकडा सत्तर कुटुंबें अशा शेतीवर निर्वाह करितात. सामान्यपणें १९ लाख कुटुंबांची शेती सव्वा एकर, १९ लाख कुटुंबांची अडीच एकर, आणि बाकीच्या १७।१८ लाख कुटुंबांची त्यापेक्षां अधिक अशी आहे. सुमारें शेंकडा ३५ कुटुंबांची शेती सव्वा एकरांपेक्षां कमी आहे आणि शेंकडा ९० घरांची पांच एकरांपेक्षां कमी आहे. शेंकडा पन्नास लोक शेतीवर अवलंबून आहेत ही परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे त्या मानानें एकूण शेती किती लहान पडते त्याची कल्पना येईल. इंग्लंडमध्यें शेंकडा सात लोक शेतीवर अवलंबून आहेत; तेथेंही दर कुटुंबामागें येणाऱ्या शेतीचा आकार जपानचे मानानें मोठा आहे. या शेतीवर वर्षांतून दोन किंवा तीन पिकें निघतात.

पाण्याची फारशी अडचण नसल्यामुळें या लहान शेतींतही शेतकऱ्यांचा निर्वाह होतो. कारण जपानचें हवामान असें आहे कीं वर्षभर केव्हां ना केव्हां तरी पाऊस पडत असतोच. त्यामुळें वर्षांतून तीन पिकेंही काढतां येतात.

जमीन सुपीक, वर्षभर पाऊस, स्थानिक खतांचा पूर्ण उपयोग, इत्यादि सर्व अनुकूल गोष्टी असल्या तरी शेतकऱ्यांची स्थिति चांगली नाहीं उद्योग-धंद्यांच्या मानानें शेतीवरील कर अधिक भारी आहेत. उत्पन्नावरील सरकारी कराची तुलना केली तर व्यापाऱ्यापेक्षां शेतकऱ्यावर दुप्पट आणि कारखान-दारापेक्षां तिप्पट प्रमाणांत कर लादलेले आहेत. म्हणजे समाजांतील कोणत्याही वर्गापेक्षां शेतकरी अधिक कर देत आहे. त्याचप्रमाणें खंडानें जमिनी करणाऱ्या कुळांकडून जमीनदारांना धान्याचे स्वरूपांत कायम स्वरूपाचा खंड दिला जातो. शेतांत उत्पन्न कमीजास्त झालें तरी ठराविक स्वरूपाचा खंड धान्याचें रूपांत देण्याची पद्धति पूर्वापार चालत आलेली आहे. परंतु गेल्या पन्नास वर्षांत धान्याच्या किमतींत बराच चढ झालेला आहे. त्यामुळें कुळाचें नुकसान होतें. जमीनदाराला ठराविक उत्पन्न मिळतें. अशा रीतीनें सरकारी कर व जमीनदाराचा खंड या दोन्ही दृष्टींनीं शेतकरी अड-चणींत आहे. सरकारी कर कमी करण्याची योजना सध्यां घाटत आहेत. तसें झाल्यास शेतकऱ्यांची स्थिति थोडी सुधारेल.

**ग्रामसुधारणा—**

शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरितां सरकारकडून अनेक प्रयत्न करण्यांत येत आहेत. शेतीच्या पद्धतींत सुधारणा झाल्यामुळें गेल्या पन्नास वर्षांत शेतीचें उत्पन्न दुप्पट झालें आहे असें सांगतात. सहकारी पेढ्या, बँका, करांत उतार, इत्यादि अनेक प्रयत्नांबरोबरच शेतीला उद्योगधंद्यांची जोड देण्याची चळवळ जपानमध्यें चाललेली आहे ती महत्त्वाची आहे.

गेल्या दहा बारा वर्षांत यांत्रिक उद्योगधंदे लहान गांवांत निघण्यास सुरुवात झाली आहे. स्वस्त मजुरी आणि कच्च्या मालाचें सान्निध्य, या दोन सोयींमुळें कारखानदारांनीं हें धोरण स्वीकारलें आहे. अशा कारखान्यांत कांहीं शेतकरीवर्गाची सोय होते.

कांहीं उद्योगधंदे शेतीला धरूनच निघण्यासारखे असतात ते शेतकऱ्यांनीं काढावेत म्हणून अनेक मार्गांनीं शेतकी खातें उत्तेजन देत आहे, असे जोडधंदे अनेक निघूं लागले आहेत. या धंद्यांची वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे.

१. फळें आणि भाज्या टिकाऊ स्वरूपांत ठेवून विक्रीला बाहेर पाठविणें.
२. तेलें गाळणें.
३. गिरणींत धान्याचें पीठ करून बाहेर पाठविणें.
४. कोंबड्या, जनावरें इ. ठेवून उत्पन्न होणारे पदार्थ बाहेर पाठविणें.
५. मच्छीमारी व त्यासारखे धंदे.
६. अरण्यविषयक उद्योगधंदे.
७. कच्च्या द्रव्यांचा पक्का माल करणें.
८. लहानसहान यांत्रिक धंदे.

वर जी वर्गवारी दिलेली आहे त्यांतील प्रत्येक वर्गांत अनेक उद्योगधंदे येतात. त्यांची एकूण संख्या ३००।३५० असेल. नमुन्यादाखल कांहीं धंद्यांचीं नांवें व संख्या हीं दिलीं आहेत.—

फळें डबाबंद करणें ३२; लोणचीं १५; भाज्या डबाबंद किंवा कुपीबंद करणें १४; भाज्या सुकविणें २; तेलें गाळणें २१; पीठ

दळणें २६; कृषिविषयक द्रव्यांतून तयार होणारे पदार्थ १७; शेतीवरील प्राण्यांपासून निघाणारे पदार्थ ४३; इत्यादि.

सरकारी शेतीखातें भांडवल देऊन व अन्य रीतीनें शेतकऱ्यांना जोड धंदे काढण्याकरितां उत्तेजन देत आहे. रेशमाचा धंदा अतिशय शास्त्रोक्त असा वाढलेला आहे. संशोधन संस्थांचे साहाय्यानें जपाननें रेशमाच्या धंद्यांत चांगली प्रगति केली आहे. रेशीम विषयक धंद्यांत व त्याच्या शास्त्रीय संशोधनांत त्याचा जगांत बराच वर क्रम लागेल. जपानी रेशीम अमेरिकेंत व इतर देशांत निर्यात होत असतें.

**शेतीची पुनर्घटना—**

शेतीच्या सुधारणेकरितां तोकियोमध्यें "शेती पुनर्घटना मंडळ" (अॅग्रिकल्चरल् रीकन्स्ट्रक्शन् असोसिएशन) नांवाची संस्था आहे. सहकारी पतपेढ्या, शेतीसंघ इत्यादि अनेक चळवळी या संस्थेमार्फत चालतात. शेतीसंघाच्या शाखा देशांत अगदीं खालपर्यंत पोंचलेल्या आहेत. आर्थिक सहकारितेचे दृष्टीनें कृषिविषयक खरेदी आणि विक्री करणारे संघ (फेडरेशन) आहेत.

कर्जनिवारणाचा प्रश्न सोडविण्याकरितांही कांहीं प्रयत्न चालले आहेत. प्रथम शेतकऱ्यांचे संघ तयार होऊन त्यांतील सभासद एकमेकांना जामीन राहतात. नंतर गांवांतील अधिकारी धनकोला बोलावून कर्ज आणि व्याज दोन्हींत ऋणकोला कांहीं सूट देण्याविषयीं सांगतो. या अटी मान्य झाल्या तर सरकार कर्जफेडीकरितां आर्थिक मदत करितें. हें काम अॅग्रिकल्चरल् को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँकतर्फे चालतें. या बँकेला सरकारनें भांडवल दिलें आहे. याशिवाय कर्जतडजोडीकरितां लवाद नेमण्याचीही पद्धति आहे.

शेतकरी तरुणांना शेतीची गोडी लागावी म्हणून ट्रेनिंग फार्म्स हीं काढलेलीं आहेत. या ठिकाणीं शेतीच्या शिक्षणाबरोबर शेतकऱ्याची मनोवृत्ति तयार केली जाते हें विशेष. "शेती हें शेतकऱ्याचें कर्तव्य आहे. त्यानें जमिनींत सुधारणा करून पिता व पितृभूमि यांची सेवा केली पाहिजे. पुढच्या

पिढीला पूर्वीपेक्षां चांगल्या स्थितींत जमीन दिली पाहिजे." अशा वृत्तीचें शिक्षण शेतकरी तरुणांना दिलें जातें.

शेतकऱ्याचें जीवन स्वावलंबी व्हावें हा शेतीच्या चळवळीचा उद्देश आहे. आवश्यक वस्तूकरितांच जमिनीचा उपयोग व्हावा म्हणून तंबाखू व दारू या दोन्ही वस्तू करण्याची शेतकऱ्यांना मनाई आहे.

**ग्रामसंघटनेचा एक नवीन प्रयोग—**

ग्रामजीवनाची पुनर्घटना करण्याचे दृष्टीनें दक्षिण जपानमध्यें क्यूशू बेटांत तेथील पूर्वीचा गव्हर्नर मात्सुमोतो यानें एक नवीन योजना सुरू केलेली आहे. तिला "अखिल ग्रामशाला" (होल व्हिलेज स्कूल=झेनसोन गाक्को) असें नांव आहे.

या चळवळीचें नेतृत्व तीन व्यक्तींकडे असतें—गांव अधिकारी, नगराध्यक्ष व शाळेचा मुख्य अध्यापक. गांवांत असलेल्या सर्व शिक्षणाच्या व सार्वजनिक कामांचीं सूत्रें या तिघांच्या हातांत असतात. या निरनिराळ्या संस्थांना मार्गदर्शक होऊन व जरूर त्या नवीन संस्था काढून त्यांचेमार्फत गांवसुधारणा करण्याचा प्रयत्न होतो.

खाचूरा नांवाच्या खेड्यांत या संघटनेचें कार्य कसें चालतें तें पाहण्यासारखें आहे. या गांवांत ३०० शेतकऱ्यांचीं व १०० कोळ्यांचीं अशी एकूण ४०० घरें आहेत. गांवांतील जीवनाची पुनर्घटना करण्याकरितां पुढील संस्था हातांत घेण्यांत आल्या.—

(१) गांवकामगार कचेरी, (२) प्राथमिक शाळा, (३) पितासंघ, (४) मातासंघ, (५) शेतीसंघ, (६) औद्योगिक मंडळ, (७) धीवर संघ, (८) देशसेवक संघ, (९) निवृत्त सैनिक संघशाखा, (१०) फायर ब्रिगेड, (११) तरुण मार्गदर्शक मंडळ, (१२) तरुण संघ, आणि (१३) कन्यासंघ.

या निरनिराळ्या संघांमार्फत गांवांत सुधारणा करण्याची संघटना करण्यांत आली. सामाजिक, औद्योगिक, कृषिविषयक, आरोग्यविषयक सर्व प्रकारच्या

चळवळी गांवांत सुरू झाल्या आणि सर्वांना मार्गदर्शक अशा तीन व्यक्ती असल्यामुळें या सर्व कामांत सुसंगता व सहकारिता आली.

गांवांतील सर्व तरुण मुलें व मुली यांनीं जबाबदारीनें आपल्या अंगावर कांहीं उपयुक्त काम घेऊन तें करून दाखवावें अशी योजना होती. त्यामुळें एका वीस वयाच्या मुलीनें तीन वर्षे एका लहान शेताची मशागत करून तिची रोजनिशी ठेविली होती. एका मुलानें शास्त्रोक्त टिपणें ठेवून एका बैलाची निगा राखली. एका तरुणानें ग्रंथालय चालविलें. कन्यासंघ व युवकसंघ यांनीं स्वतंत्रपणें रेशमी किडयांचें संवर्धन करण्याचें सामुदायिक काम सुरू केलें. गांवकऱ्यांनीं आपापल्या घरापुढचा रस्ता झाडावयाचा, आणि जे रस्ते बिनवारशी असतील ते तरुणसंघानें झाडावयाचे. सार्वजनिक पोल्ट्री एका संघानें चालविली. अशा रीतीनें समाजांतील सर्व नागरिकांचा उपयोग करून व विशेषतः तरुणांना विधायक कामाला लावून उपलब्ध परिस्थितींत ग्रामजीवन शक्य तितकें सुधारण्याचा प्रयत्न चालू आहे. याच योजनेच्या अनुरोधानें इतर प्रांतांतही काम सुरू होईल.

**जपानबाहेर वसाहती—**

शेतीवर पोसणें शक्य नाहीं अशी जादा लोकसंख्या बाहेर काढून लावण्याचा जपानचा अनेक वर्षे प्रयत्न चाललेला आहे. अमेरिका, कानडा, व ऑस्ट्रेलिया यांचीं दारें बंद झाल्यामुळें शेजारीं मांच्युरियाकडे जपाननें लक्ष दिलें आहे. आतां जपानच्याच धोरणानें चालणारें मांच्युरियन सरकार असल्यानें त्या देशांत वसाहत करण्याकरितां जपानी शेतकरी पाठविण्याच्या पद्धतशीर योजना झाल्या आहेत. जपानमध्यें अनेक ठिकाणीं "वसाहतकार शाळा" निघाल्या आहेत. मांच्युरियांत जाऊन शेती करून राहण्यास तयार असणाऱ्या तरुणांच्या करितां या शाळा आहेत. तेथें मुख्यतः शेतीचें व आत्मसंरक्षणाचें शिक्षण दिलें जातें. नंतर हे विद्यार्थी मांच्युरियांत पाठविले जातात. दरसाल ५०,००० तरुण याप्रमाणें दहा वर्षांत ५००,००० तरुण पाठविण्याचा जपानी अधिकाऱ्यांचा विचार आहे. शिवाय वीस वर्षांत एक लाख कुटुंबें किंवा पन्नास लाख लोक पाठविण्याची योजना आहे.

वसाहतीस जाणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला सरकारकडून १३०० येन (१००० रुपये) देण्यांत येतील.

अशा रीतीनें अंतर्बाह्य साधनांनीं शेतकऱ्याची स्थिति सुधारण्याचे व शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या कमी करण्याचे प्रयत्न जपानमध्यें चालू आहेत. शेतकऱ्यांच्या मानानें कामगार वर्ग सुखी आहे.

**कामगार व कारखाने—**

महायुद्धापूर्वी जपानमध्यें लहान उद्योगधंदे वाढले आणि महायुद्धानंतर मोठे कारखाने (हेवी इंडस्ट्रीज्) निघाले. उद्योगधंद्यांत वाढ झाली त्याबरोबर कामगारविषयक कायदेही होऊं लागले. १९१६ सालीं फॅक्टरीज ॲक्ट मंजूर झाला. त्यामुळें स्त्रिया आणि सोळा वयाखालील मुलें यांचे कामाचे तास दहापर्यंत मर्यादित झाले. पुरुषांच्या कामाच्या तासांबाबत कायद्याची कांहीं मर्यादा नाहीं. मोठ्या कारखान्यांत साडेनऊ ते दहा तास व लहान कारखान्यांत बारा तास असें सामान्यपणें प्रमाण आहे. युद्धाचे काळांत जरूरीप्रमाणें कामाचे तास वाढविले जातात.

लहानमोठे असे ४०,००० कारखाने जपानमध्यें आहेत, त्यांत कांहीं अगदीं मोठे आहेत आणि बाकीचे लहानसहान आहेत. एकेका मोठ्या कारखान्यांत ५००० कामगार आहेत, तर बहुसंख्य लहान कारखान्यांत पांच ते दहा कामगार आहेत. फॅक्टरी कायद्याप्रमाणें सर्व लहानमोठ्या कारखान्यांची तपासणी होते. पांच कामगारांचा कारखानाही तपासला जातो. जपानमध्यें एकदा कायदा झाला कीं त्याची सक्त अंमलबजावणी केली जाते असें सांगतात.

पुरुष कामगारांची एकूण संख्या ६० लाख आहे; त्यांतील ३० लाख निव्वळ कारखान्यांत व बाकीची ३० लाख वाहतूक वगैरे इतर उद्योगधंद्यांत आहे. कामगार स्त्रियांची संख्या १० लाख आहे. त्यांतील आठ लाख स्त्रिया केवळ कापडाचे कारखान्यांत काम करितात. कामगार स्त्रियांचें वय सामान्यपणें पंधरा ते तेवीस असतें. कारखान्यांतील, विशेषतः कापडाच्या

धंद्यांतील, शेंकडा ऐंशी कामगार मुली कारखान्याच्या वसतिगृहांत राहतात. खाणी, कॅनिंगचे कारखाने, वगैरे कांहीं धंद्यांत कामगारांचे कुटुंबांकरितां वसाहतीची सोय केलेली असते.

**कामगार मुलींचें वसतिगृह—**

उद्योगधंद्यांत पंधरा ते पंचवीस वर्षांच्या मुली घेऊन त्यांची वसतिगृहांत कुटुंबाप्रमाणें राहण्याची व शिक्षणाची व्यवस्था करणें ही पद्धति जगांत फक्त जपानमध्येंच आढळून येते. खेड्यांतून येणाऱ्या तरुण मुलींना दिवसां काम झाल्यावर रात्रीं मोकळ्या सोडल्या तर त्यांच्या आयुष्याचें मातेरें होण्याचा संभव फार. त्या दृष्टीनें विचार करितां ही पद्धति इष्ट वाटते. या वसतिगृहांत मुलींची राहण्याची, खाण्यापिण्याची, करमणुकीची, धार्मिक व सामान्य शिक्षणाची व्यवस्था चांगली होते. एकाद्या मुलींच्या हायस्कूलचें वसतिगृह असावें तशा प्रकारचीं कांहीं गृहें कारखान्यांना जोडून आहेत. शिक्षणामध्यें माध्यमिक शिक्षणाचे विषय व गृहशिक्षण यांचा समावेश होतो. या वयांत मुली काम करून कांहीं पैसे पालकांना पाठवितात, कांहीं शिल्लक टाकतात, व लग्न जमलें कीं काम सोडून देतात. कारखानदार असें सांगतात कीं सामान्यपणें सतरा अठरा या सुमाराला मुलींचें काम उत्कृष्ट होतें. सारांश गृहजीवन किंवा कौटुंबिक जीवन यांना न मुकतां, आयुष्यांतील एक अनुभव म्हणून कांहीं काळ कारखान्यांत काम करून, पुढें या मुली गृहिणी होतात. आजन्म कामगार राहात नाहींत.

**मजुरीचें प्रमाण—**

जपानी मजुरांचा पगार व राहणी या बाबतींत पाश्चिमात्य लोकांनीं पुष्कळ शहानिशा केलेली आहे. जपानी लोक कमी पगार देऊन व काम पिळून घेऊन स्वस्त माल विकतात कीं काय असा त्यांना संशय होता. पण अखेर अनेक चौकशीमंडळें नेमून त्यांतून असें निष्पन्न झालें कीं इतर देशांपेक्षां जपानी कामगारांना कांहीं कमी मोल दिलें जात नाहीं. स्वस्ताई आणि स्वस्त राहणी असल्यामुळें मजुरीचा आंकडा लहान दिसतो. वास्तविक

मजुरी (रियल वेजेस) इतर देशांप्रमाणेंच आहे. सामान्यपणें पुरुष व स्त्री कामगाराची मजुरी पुढीलप्रमाणें आहे.—

| कामगार | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| पुरुष | १.७० | २.५० | १.७५ येन |
| स्त्री | .६० | .९० | .७५ येन |

निरनिराळ्या कारखान्यांतील सरासरी मजुरीचे दर १९३४ सालीं पुढीलप्रमाणें होते.—

| धंदा | पुरुष कामगार | स्त्री कामगार |
|---|---|---|
| लहानमोठीं घड्याळें | १.६० | ०.८० |
| दारू गाळणें | २.३० | ०.७७ |
| इन्शुलेटर | २.४० | ०.६० |
| विजेचे दिवे | २.६८ | १.१० |
| फौंटन पेन | २.१४ | .८० |
| कांच काम | २.४८ | — |

(आंकडे येनचे आहेत.)

जपानमध्यें सर्वत्र स्वस्ताई असल्याकारणानें वरील पगारांत मजूर पाश्चिमात्य मजुराइतक्याच सुखसोयी भोगूं शकतो. पगार कमी आहे त्याच प्रमाणांत वस्तूंच्याही किमती कमी आहेत. जपानमध्यें सर्वांचेच पगाराचें प्रमाण कमी आहे.

**सांघिक विमापद्धति—**

कामगारवर्गाच्या हिताकरितां कांहीं नवीन योजना अंमलांत येत आहेत. त्यांत ग्रूप लाइफ् इन्शुअरन्स सिस्टिम ही एक आहे. या योजनेंत एकाच कारखान्यांत काम करणाऱ्या सर्व कामगारांचा विमा एकदम उतरला जातो. त्यामुळें एकाद्या कामगाराचें आरोग्य चांगलें असलें नसलें तरी त्याच्या विम्यावर कांहीं परिणाम होत नाहीं. त्याचप्रमाणें एकाद्या विमादाराला हप्ता भरतां आला नाहीं तरी तेवढी सवलत मिळते. विम्याचे हप्ते

कामगारांनीं, कारखानदारांनीं किंवा उभयतांनीं मिळून भरले तरी चालतात. पगारी प्रचारक व मोठा अधिकारी यांचा पगार विमा कंपनीनें वांचविल्यामुळें विमादारांना अधिक सवलती देतां येतात. सारांश कामगारांना अतिशय सवलतीनें व कमी दरांत विमा उतरतां यावा व याचा फायदा कामगार-मालक दोघांनाही व्हावा हा उद्देश आहे. १००० येनच्या विम्याचा वार्षिक हप्ता काय बसतो त्याची पुढील कोष्टकावरून कल्पना येईल.—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वय | १० | १५ | २० | २५ | ३० | ३५ | ४० | ४५ | ५० |
| हप्ता | ५.३० | ६.९० | ९.४० | ७.७० | ७.१० | ८.०० | ९.८० | १२.५० | १६.३० |

नॅशनल् कॉन्फेडरेशन् ऑफ इंडस्ट्रियल असोसिएशन्स नांवाचा संघ तोकियोमध्यें आहे, त्या संस्थेमार्फत या नवीन योजनेला प्रारंभ झालेला आहे.

कामगार आणि मालक यांचे संबंध वर्गकलहाच्या तत्त्वावर जाऊं नयेत असा भांडवलदार वर्गाचा प्रयत्न. त्याची एक विधायक बाजू या दृष्टीनें सांघिक विमा ही एक योजना आहे.

**कामगार संघटना—**

आधुनिक यांत्रिक उद्योगधंदे जपानमध्यें सुरू झाल्यापासून कामगार वर्गामध्यें मवाळ व जहाल अशी दोन्हीं स्वरूपाची चळवळ चालू आहे. तिला सरकारकडून पहिल्यापासून विरोध होत आलेला आहे. भांडवलदार वर्ग व लष्करी अधिकारी यांचे सरकारवर वजन आहे. या दोन्ही वर्गांना कामगार वर्गाची स्वतंत्र संघटना नको आहे. म्हणून कायदेशीर मान्यता मिळालेल्या कामगार संघटनेचा जपानमध्यें अभाव आहे.

१९३१ मध्यें ट्रेड यूनियन बिल कायदेमंडळांत सरकारकडून आणलें गेलें परंतु तें फेंटाळून लावण्यांत आलें. त्यामुळें कामगारसंघांना कायदेशीर मान्यता व अस्तित्व नाहीं. सरकारी व लष्करी खात्यांशीं संबंध असलेले जे कारखाने आहेत, त्यांतील कामगारांना कोणत्याच संघाचे सभासद होतां येत नाहीं.

संघशक्तीनें कामगार वर्गाच्या अडचणी दूर होण्याचा मार्ग जवळ जवळ बंद झालेला आहे. सरकार स्वतः कायदे करून व इतर मार्गांनीं कामगारांच्या हिताकरितां ज्या गोष्टी करील त्यावर कामगारांची प्रगति अवलंबून आहे. सरकार जितकें प्रगतिप्रिय असेल त्या मानानें खालच्या वर्गाची स्थिति सुधारेल. कामगार आणि मालक यांच्या परस्पर कलहांतून कामगारवर्गाला अधिक हक्क मिळावेत ही पद्धति जपानी सरकारला अमान्य आहे असें धोरण जवळ जवळ ठरल्यासारखें झालें आहे. मालक आणि मजूर हे दोघेही राष्ट्रकुटुंबांतील घटक; सरकार हें पालक. या सर्वांनीं कलह न करितां परस्परांचे सलोख्यानें आपले वाद मिटवावेत. ते न मिटल्यास सरकारनें पालक या नात्यानें तडजोड घडवून आणावी; अशा प्रकारची प्रवृत्ति दिवसेंदिवस निश्चित होत आहे. या राष्ट्रकुटुंबवादांत सरकार ज्या वर्गाचें पक्षपाती असेल त्या वर्गाचा फायदा होईल हें उघड आहे.

**राष्ट्रवादाचा प्रसार—**

कामगार वर्गांत सध्यां राष्ट्रवादी आणि समाजवादी असे दोन तट आहेत. मालक आणि मजूर हे एका राष्ट्राचेच घटक आहेत, या दृष्टीनें राष्ट्रवादी कामगारवर्ग हा सर्व प्रश्नांकडे पाहतो. समाजवादी पक्ष हा मुख्यतः कामगार वर्गाचें हित पाहतो. दुसऱ्या पक्षाची मुख्य संघटना ‘जपान ट्रेड यूनियन कौन्सिल’ ही आहे. नऊ कामगारसंघांची मिळून ही संघटना झालेली आहे. त्यांत जपान सीमेन्स् यूनियन, ऑल जपान जनरल फेडरेशन ऑफ् लेबर, जपान आयर्न लेबरर्स यूनियन, टोकियो इलेक्ट्रिक कंपनी वर्कर्स यूनियन, इत्यादि निरनिराळे मोठे संघ आहेत. या सर्वांचे मिळून अडीच लक्षांवर सभासद आहेत. बुंजी सूझूकी हा प्रसिद्ध कामगार पुढारी कौन्सिलचा सल्लागार आहे.

पेट्रिऑटिक ट्रेड युनियन्स्मध्यें एकूण पंधरा संघ असून एकंदर सभासद एक लाखापेक्षां थोडे कमी आहेत. जपान इंडस्ट्रियल लेबर क्लब, टोकियो इलेक्ट्रिक कंपनीज् पेट्रिऑटिक अलायन्स, न्यू जपान सीमेन्स् यूनियन्, इत्यादि

कामगारसंघ या पक्षांत सामील आहेत. राष्ट्रवादी कामगार वर्गाची ही संघटना १९३६ नंतरची आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांतील वर्गकलहाचे तत्त्वावर जपानी कामगारांनीं आपली चळवळ चालवूं नये, पूर्वापार परंपरेला धरून व जपानी नीतितत्त्वांना अनुसरून मालक-मजूरांचे संबंध असावेत, हें या नवीन पक्षाचें मुख्य तत्त्व आहे. जपानचा राष्ट्रवाद कामगार वर्गाच्या चळवळींत या स्वरूपानें उतरलेला आहे. पेट्रिऑटिक ट्रेड यूनियनच्या मागण्या पुढील-प्रमाणें आहेत—जपानी राष्ट्रवैशिष्याचें संगोपन; कारखानदार व कामगार यांचें संयुक्त मंडळ स्थापन करणें; मालक-मजूर उभयतांना नियंत्रण करणारा कायदा करणें, राष्ट्रीय कामगार महोत्सव सुरू करणें, इत्यादि.

सध्यां जपानमध्यें राष्ट्रवादी कामगारवर्गाची लोकप्रियता वाढत आहे असें दिसतें. १९३७ च्या नोव्हेंबरमध्यें कामगारवर्गाच्या 'सोशल मास पार्टी' या प्रमुख राजकीय पक्षाची परिषद भरली होती. त्या परिषदेंत या पक्षाच्या ध्येयांत आमूलाग्र फरक करण्यांत आला. पूर्वी या पक्षाचें ध्येय असें होतें—'कामगार, शेतकरी आणि मजूर यांच्या जीविताचें रक्षण करण्याकरितां आमचा झगडा आहे. भांडवलशाही नष्ट करून सामान्य लोकांना मुक्त करणें हें आमचें ध्येय आहे." नोव्हेंबरच्या परिषदेंत या ध्येयांची पुनर्घटना पुढीलप्रमाणें झाली—"जपानी लोकांची प्रगति आणि उत्कर्ष हें आमचें ध्येय आहे. त्याकरितां जपानच्या विशिष्ट राष्ट्रतत्त्वा-प्रमाणें कार्यक्रम अंमलांत आणून त्या मार्गानें जागतिक संस्कृतीला आम्ही हातभार लावूं. भांडवलशाहीची पुनर्घटना, उद्योगधंद्यांत नियमबद्धता आणि जपानी लोकांच्या जीवनाची शाश्वती हीं आमचीं ध्येयें आहेत." यावरून जपानी कामगारवर्गांतील वर्गनिष्ठेचें तत्त्व कमी होऊन राष्ट्रनिष्ठेचें तत्त्व वाढत आहे असें दिसून येईल. याचा अर्थ समाजवादी व कामगारवर्गनिष्ठ असा पक्ष अस्तित्त्वांत नाहीं असें नव्हे. परंतु चीन-जपान युद्धाचे प्रसंगामुळें सर्व राष्ट्रांत राष्ट्रीयत्वाचें वातावरण असतां या पक्षाला सहानुभूति मिळणें कठिण आहे. आतां एकंदर कामगारवर्गांत राष्ट्रवाद किती टिकेल व वाढेल हें भांडवलदार वर्गावर अवलंबून आहे. कारण राष्ट्रवाद हा उभयपक्षी पाहिजे. भांडवलदार स्वार्थवादी आणि कामगार मात्र राष्ट्रवादी अशी

परिस्थिति राहिल्यास पुन्हा कामगारवर्गांत प्रतिक्रिया झाल्याशिवाय राहणार नाहीं. चीन-जपान युद्धानंतर राजकीय सत्ता लष्करशाहीचे हातांत जाते कीं भांडवलदारांचे हातांत जाते यावर सर्व अवलंबून राहील. लष्करशाही प्रबळ राहिली तर ती कामगार व शेतकरी वर्गाच्या हिताच्या दृष्टीनें झगडेल. तसें झाल्यास कामगार वर्गांतील राष्ट्रवाद वाढून समाजवाद संपुष्टांत येईल.

**समाजवादी पक्षाची चळवळ—**

समाजवादी चळवळ जपानमध्यें १९०१ पासून चालत आली आहे. वारंवार कायदे करून सरकारनें ती दडपून टाकली आहे. १९१९ नंतर कम्यूनिझम्‌चा प्रचार बराच झाला होता. १९१४ नंतर मजुरांचे संप जोरांत होते. परंतु १९२५ नंतर कायदा होऊन सरकारनें पद्धतशीर संघटना करून कम्यूनिझम्‌ची चळवळ दडपून टाकली. सनदशीर अशी मजूरसंघटना जपानमध्यें आहे पण क्रांतिवादाला वाव नाहीं. सध्यां जो राजकीय कामगार पक्ष आहे तो सनदशीरपंथी आहे. क्रांतिकारक पक्षापासून त्यानें आपला संबंध तोडलेला आहे. ब्रिटिश मजूरपक्षाचे संघटनेप्रमाणें या पक्षाचें काम चाललेलें आहे. बुंजी सूझूकी हा या पक्षाचा नेता समजला जातो. कामगार वर्गाचा प्रभावी व जोरदार असा मोठा पक्ष अद्याप बनलेला नाहीं; कारण अंतस्थ मतभेद, पक्षोपपक्ष, इत्यादि फार असल्यानें या पक्षाला कायदेमंडळांत महत्त्वाचें असें स्थान अद्याप मिळालेलें नाहीं. १९२५ सालीं पुरुषवर्गाला सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळाल्यामुळें एकूण एक कोटी लोकांचीं नवीन मतें राजकारणांत आलीं. परंतु या मतदारवर्गांत संघटना नसल्यामुळें व कामगारवर्गाच्या संघटनेला सरकारी मान्यता नसल्यामुळें या मतांच्या जोरावर कामगारांचा असा जोरदार पक्ष कायदेमंडळांत अद्याप आलेला नाहीं.

अशा परिस्थितीमध्यें विद्यमान सरकारच्या मनांत असेल त्या मानानेंच कामगारवर्गाची स्थिति सुधारेल. सरकारला कम्यूनिझ्मची चळवळ चार हात दूर ठेवावयाची असल्यानें त्याकरितां तरी कामगारवर्गाची स्थिति सुधारणें प्राप्त आहे.

* * *

## १०

# राजकारणाचे अव्यक्त सूत्रधार

**अव्यक्त सत्ता—**

जपानचें राजकारण अपौरुषेय आहे. त्यावर कोणत्याही एकाद-दुसऱ्या अलौकिक व्यक्तीच्या विचारांचा अथवा धोरणाचा पगडा बसलेला दिसत नाहीं. 'जपानच्या राजकारणांत जागतिक प्रसिद्धि मिळविलेली अलौकिक व्यक्ति कोणी आहे काय ?' असें जपानी मित्राला विचारलें तर त्याला चटकन् उत्तर देतां येत नाहीं. इंग्लंडमध्यें लॉईड जॉर्ज-चेंबर्लेन-चर्चिल, अमेरिकेंतील विल्सन-रुझवेल्ट, हिंदुस्थानांतील महात्मा गांधी-टागोर हीं नांवें त्यांच्या व्यक्तित्वामुळें जगप्रसिद्ध झालीं आहेत. तसें एकादें नांव जपानच्या वांट्याला आलेलें दिसत नाहीं. याचें कारण तेथील राजकारण एकाददुसऱ्या व्यक्तीच्या कर्तबगारीवर चाललेलें नाहीं. प्रसंगोपात् अधिकारावर येणाऱ्या व्यक्तीच्या मागें अव्यक्त अशा सत्ता, शक्ति, सूत्रें आणि धोरणें असतात. त्यांच्या अनुसंधानानें राजकारण चालतें. तें अनुसंधान तुटलें कीं प्रसंगानें पुढें आलेली व्यक्ति मागें पडते. दुसरी एकादी व्यक्ति कांहीं काल पुढें येते. परंतु कालक्रमानें येणाऱ्या व बदलणाऱ्या या व्यक्तींच्या मागें अखंड आणि अढळ अशी कांहीं शक्ति असावी असें वाटतें.

आधुनिक राजकारणांत जपानचा प्रवेश होऊन पाऊणशें वर्षे होऊन गेलीं. या काळांतील जपानी राजकारण पाहिलें तर त्यांत एक प्रकारची सुसंगतता, एकसूत्रीपणा, व निश्चित आणि नियोजित असें धोरण दिसून येतें. याचें कारण पाऊणशें वर्षांचें राजकारण ज्यांचे डोळ्यांपुढून गेलें आहे, मागें आणि पुढें दृष्टि टाकून आजच्या घटनेचा अर्थ जे लावूं शकतात, जपानचा आपत्काल ज्यांनीं पाहिला आहे, आधुनिक कालांत पाऊल टाकतांना जपाननें केलेले संकल्प ज्यांनीं ऐकले आहेत, अशा व्यक्तींचा समूह जपानचे राजकारणा-मागें आहे. या समूहामुळें राजकारण व धोरण यांची परंपरा चालू आहे. बाह्यतः दिसणाऱ्या राजकीय घटनेच्या चित्रांत या व्यक्ती दिसत नाहींत. चित्र निर्माण करणारा चितारी जसा चित्रांत अव्यक्त असतो त्याप्रमाणें लौकिक राजकारणांत या व्यक्ती अव्यक्त आहेत, पण राजकारणाचीं सूत्रें त्यांच्या हातांत आहेत. म्हणून केवळ राजकीय घटना (कॉंस्टिटच्यूशन) वाचून जपानचें राजकारण समजणें शक्य नाहीं.

**लोकशाहीचें बाह्य स्वरूप—**

बाह्य स्वरूपांत जपानी राज्यघटनेमध्यें लोकसत्तेचे सर्व अलंकार आहेत. पाश्चिमात्य विचारांचें वारें जपानमध्यें आल्याबरोबर लोकसत्तात्मक राज्यघटनेची मागणी कांहीं पुढाऱ्यांकडून होऊं लागली. जपानमध्यें पूर्वापार चालत आलेली दैवी राजसत्ता आणि ही लोकसत्ता यांचा मेळ कसा घालावा हा त्या वेळच्या मुत्सद्यांपुढें प्रश्न होता. यूरोप-अमेरिकेंतील राज्यघटनांचें निरीक्षण करण्याकरितां प्रिन्स ईटो या मुत्सद्याला पाठविण्यांत आलें. त्यानें सर्व देशांची पाहणी करून जर्मनीच्या राज्यघटनेचा कित्ता उचलला, व जपानकरितां नवीन घटना तयार केली. लोकांना संतुष्ट करण्याकरितां बाह्यतः लोकसत्तात्मक राज्यपद्धतीचें स्वरूप, परंतु प्रत्यक्ष राज्यव्यवहारांत राजा, मंत्री, लष्करशाही आणि अनुभवी मुत्सद्दी यांच्या हातांत महत्त्वाची सत्ता, अशा स्वरूपाची नवी राज्यघटना ईटोनें केली व ती १८९० पासून अंमलांत आली.

जपानच्या कायदेमंडळाला 'डाएट' अशी संज्ञा आहे. इंग्लंडच्या

पार्लमेंटप्रमाणें त्यांत दोन विभाग आहेत. लोकांनीं निवडून दिलेल्या सामान्य जनतेच्या प्रातिनिधिक सभेला "हौस ऑफ् रेप्रेझेंटेटिव्हज्" असें नांव आहे. राजानें नेमलेल्या सभासदांच्या आणि सरदार वर्गानें निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभागृहाला हौस ऑफ पीयर्स अशी संज्ञा आहे. पहिल्या सभागृहांत ४६६ व दुसऱ्यांत ४०८ सभासदांची संख्या असते. दोन्ही सभांत मंजूर झालेल्या ठरावांना राजाची संमति मिळून त्यांस कायद्याचें स्वरूप येऊं शकतें.

राज्यघटनेच्या कायद्याप्रमाणें कायदेमंडळांतील सभासदांचें काम केवळ सरकारनें पुढें आणलेल्या ठरावांना संमति देणें हें आहे. स्वतःचे असे ठराव त्यांना आणतां येत नाहींत. पण प्रत्यक्ष व्यवहारांतील रूढीप्रमाण मूळ ठरावही सभासदांकडून आणले जातात व त्याला नंतर सरकारी मंजुरी किंवा नामंजुरी मिळते.

**प्रत्यक्ष अधिकार थोडा—**

कायदेमंडळाची प्रत्यक्ष सत्ता फार थोडी आहे. मंत्रिमंडळ किंवा राजा यांना जरूर ते हुकूम कायदेमंडळाचे संमतीशिवायही सोडतां येतात. मंडळाच्या बैठकीची मुदत थोडी असल्यानें इतर वेळीं जरूरीचे अनेक कायदे सरकारलाच करावे लागतात. अंदाजपत्रक कायदेमंडळाला सादर करावयाचें असतें, पण मंडळाच्या संमतीशिवाय किंवा बैठक भरली नसेल तरीही अंदाजपत्रक अंमलांत येऊं शकतें. सारांश कायदे आणि तिजोरी यांच्यावर कायदेमंडळाचें प्रत्यक्ष असें फारसें नियंत्रण नाहीं. पुढें आलेल्या योजनांना संमति देणें, कांहीं कायदे सुचविणें आणि सरकारच्या मनांत आलें कीं बरखास्त होणें अशी कायदेमंडळाची भूमिका आहे.

सैन्य आणि आरमार यांच्यावर कायदेमंडळाची सत्ता नाहीं. लष्करी अधिकारी फक्त राजाला जबाबदार आहेत. लष्करविषयक कांहीं किरकोळ गोष्टी कायदेमंडळाचे हातांत आहेत. पण त्याचा लष्करी धोरणावर कांहीं परिणाम होण्यासारखा नाहीं.

कायदेमंडळ उघडणें, बरखास्त करणें, मोडणें, व नवीन निवडणुकी

करणें ही सर्व सत्ता राजाच्या हातांत आहे. त्याच्या संमतीनें मुख्य प्रधान वाटेल तें करूं शकतो. या सत्तेच्या जोरावर मंत्रिमंडळ कायदेमंडळावर हुकमत चालवूं शकतें.

**राजाची सत्ता—**

राजा हा परमेश्वरी अंश, ही कल्पना राजकारणांत प्रभावी आहे. राज्यघटनेप्रमाणें 'राजा पवित्र व पूज्य' आहे. तो जसा राज्याचा मुख्य तसा राष्ट्रीय शितोधर्माचाही मुख्य आचार्य समजला जातो. ऐहिक आणि धार्मिक अशा दोन्ही सत्ता त्याच्या ठिकाणीं एकत्र झाल्या आहेत. राजसत्तेविषयींची कल्पना पाश्चिमात्य कल्पनेहून भिन्न आहे. राजा हा लोकांचा प्रतिनिधि ही अलीकडची कल्पना आहे. जपानमध्यें राजा हाच प्रजेचा आणि राज्याचा मुख्य आहे; त्याच्या कृपेनें प्रजेला कांहीं अधिकार दिले जातात. सर्व सत्ता त्याची असली तरी तो स्वतः कारभार पाहात नाहीं. म्हणून बरें-वाईट न्याय-अन्याय याबद्दल तो जबाबदार नाहीं. मंत्रिमंडळामार्फत तो सर्व कारभार चालवितो. त्यांच्यामार्फत तो आज्ञापत्रें काढतो, कायदे करतो, व कायदेमंडळावर अधिकार चालवितो. प्रत्येक मंत्री व्यक्तिशः राजाला जबाबदार आहे अशी मूळ घटना आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत सामुदायिक जबाबदारीचें तत्त्व पाळलें जातें. लष्कर आणि आरमार यांचें आधिपत्य राजाकडेच आहे. लष्करी व आरमारी अधिकारी कायदेमंडळाला जबाबदार नाहींत. त्यांचा संबंध थेट राजाशीं येतो. सारांश, आधुनिक पुढारलेल्या राष्ट्रांत जपानी राजाइतकी सत्ता कोणत्याच राजाला नाहीं.

राजाला सल्लामसलत देण्याकरितां एक प्रीव्ही कौन्सिल असतें. यांत अनुभवी मुत्सद्दी, सेवानिवृत्त अधिकारी व वजनदार राजकारणी व्यक्ती यांचा समावेश केलेला असतो. त्यांपैकीं कांहीं लोकांनीं मागील पिढीचें राजकारण पाहिलेलें असतें. त्यांच्या संमतीनें राजा योग्य मंत्री बोलावून त्याला मंत्रिमंडळ बनविण्यास सांगतो.

अशा रीतीनें राजाचे ठिकाणीं अनुभवी मुत्सद्दी, लष्करी अधिकारी

व लोकनियुक्त प्रतिनिधी, अशा सर्वांच्या विचारांचें केंद्रीकरण झालेलें आहे. त्यांतून जपानी राजकारणाच्या धोरणाची निष्पत्ति होते.

**प्रत्यक्ष राजकारणाचा खेळ—**

प्रत्यक्ष राजकारणांत अनेक सत्तांची क्रियाप्रतिक्रिया कशी चालते तें पाहण्यासारखें आहे. कायदेमंडळांतील लोकनियुक्त प्रतिनिधींचे अनेक पक्षोपपक्ष आहेत. त्यांत मिन्सेईतो, सेयुकाई व शकाई थाईशूतो असे तीन मुख्य पक्ष आहेत. हे पक्ष सामान्यपणें लिबरल, कॉंझरव्हेंटिव्ह व लेबर अशा स्वरूपाचे आहेत. लेबर पक्षाच्या प्रतिनिधींची संख्या थोडी आहे.

लोकसत्तात्मक राज्यपद्धतीमुळें उत्पन्न होणारे दोष जपानमध्येंही उत्पन्न झाले आहेत. पक्षोपपक्षांचीं भांडणें, द्वेष, लांचलुचपती, स्वार्थ, इत्यादि प्रकार चालू असतात. महायुद्धानंतरच्या राजकारणांत त्यांचा अतिरेक झाल्यामुळें सामान्य जनांना राजकीय पक्षांचा वीट आला आहे. आतां कोणताच राजकीय पक्ष लोकप्रिय नाहीं. निवडणुकींत आपलीं मतें देण्याबाबतही लोक उदासीन होऊं लागले आहेत. ही परिस्थिति जाणून स्थानिक निवडणुकीचे वेळीं उमेदवार आपल्या पक्षाचें नांवही देत नाहींत. फक्त लेबर पक्ष अद्याप लोकांच्या मनांतून उतरला नाहीं. पण त्याला पाठिंबाही फारसा नाहीं.

राजकीय पक्षांचें लोकांवरील वजन नाहींसें झाल्यामुळें पुढें येण्यासारखा पक्ष म्हणजे लष्करशाहीचा. प्रत्यक्ष राज्यकारभाराचीं सूत्रें लष्करशाहीच्या हातांत नसलीं तरी तिच्या धोरणाप्रमाणें चालणारें मंत्रिमंडळ नेमून घेण्याइतकी सत्ता आज लष्करी पुढाऱ्यांनीं संपादन केली आहे. मंत्रिमंडळापेक्षांही लष्करशाहीचें नैतिक वजन समाजावर अधिक. भांडवलदार, राजकीय पक्ष, मंत्रिमंडळ आणि नोकरशाही यांचेविषयीं लोकांचे मनांत तिटकारा उत्पन्न झाला आहे. उलट त्याच प्रमाणांत लष्करी सत्तेची लोकप्रियता वाढलेली आहे.

लष्करी अधिकाऱ्यांनीं आपली संघटना देशांत चांगली केलेली आहे. सेवानिवृत्त लष्करी अधिकारी प्रत्येक लहानसहान गांवांत असून त्यांनीं तेथें



राजकारणाचें केंद्र–डाएट (कायदेमंडळ)

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.



जपानी झेन (ध्यान)चा वर्ग

तरुणांचे संघ काढले आहेत. लष्करशाहीचे पुढारी वर्तनानें साधे, चारित्र्यानें शुद्ध, देशभक्तींत कडवट, राजकारणांत पराक्रमाची कृति करून दाखविणारे असे असल्यामुळें आज इतर पक्षांपेक्षां त्यांचें वजन समाजावर अधिक आहे. या आधारावर मंत्रिमंडळाला धाब्यावर बसवूनही लष्करशाही आपला कार्यक्रम पार पाडूं शकते.

लष्करांत शेतकरी तरुणांचा भरणा अधिक आहे. समाजवादी तरुणांचा सैन्यांत प्रवेश होऊं नये याची दक्षता ठेविली जाते. सैनिकांत शिक्षणाचें प्रमाण थोडें आहे. प्राथमिक शिक्षणापेक्षां अधिक शिक्षण ज्यांचें झालें आहे अशांची संख्या शेंकडा आठपर्यंत असेल. सारांश बुद्धिवादापासून सैन्याला अलिप्त ठेवण्याचा पुढाऱ्यांचा प्रयत्न दिसतो.

परराष्ट्रीय राजकारणांत लष्करशाहीचें धोरण आक्रमणशील आहे. अधिक प्रांत जपानचे नियंत्रणाखालीं आल्यास बेकार शेतकरी तरुणांची सोय होईल या आशेनें शेतकरी वर्गाचाही लष्कराला पाठिंबा आहे.

एकीकडे शेतकरी वर्गाची गरिबी, दुसरीकडे भांडवलदार वर्गाचा स्वार्थ, आणि इकडे राजकारणी पक्षांची लाथाळी—हीं सर्व पाहून लष्करी तरुणांत फॅसिझम् किंवा राष्ट्रीय समाजवादाचें वारें संचरूं लागलें आहे. जुन्या विचाराच्या पुढाऱ्यांच्या हातांतील सर्व सत्ता काबीज करून फॅसिस्ट धोरणाचें राज्य स्थापण्याचा मोठा कट १९३६ मध्यें केला गेला. यांत अनेक अधिकाऱ्यांना ठार करून राज्यक्रांति करण्याची योजना होती पण ती आयत्या वेळीं फसली. परंतु जपानी लष्करांत विचाराचा वारा कोणत्या दिशेनें वाहतो ही गोष्ट त्यामुळें उघडकीस आली.

**गुप्त संघांचें राजकारण—**

राजकारणांतील महत्त्वाची परंतु अदृश्य सत्ता म्हणजे देशभक्तांच्या गुप्त मंडळ्या होत. यांची परंपरा जपानमध्यें फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. पूर्वी एकादा सरदार मारला गेला तर त्याचे सर्व अनुयायी गुप्त रीतीनें कट करून त्याचा सूड शत्रूवर उगवीत. पुढें पुढें हा सांप्रदाय फार वाढत

गेला; तोच आजपर्यंत चालत आलेला आहे. सध्यांही अनेक गुप्त मंडळ्या असून त्यांचें राजकारणावर फार वजन आहे. धमकी, अत्याचार, बेअब्रू, इत्यादि अनेक बेसनदशीर व बेकायदा मार्गांनीं या गुप्त मंडळ्यांचे कारभार चालतात.

या सर्व गुप्त संघांचा विशेष हा आहे कीं त्यांचीं कृत्यें देशभक्तीच्या अतिरेकामुळें प्रेरित झालेलीं असतात, त्यामुळें समाजावर व राजकीय पुढाऱ्यांवर त्यांचें नैतिक दडपण पडतें. देशाला अपमानकारक किंवा हानिकारक अशी कोणतीही गोष्ट एकाद्या व्यक्तीकडून झाली किंवा होऊं लागली कीं या गुप्त मंडळ्यांची वक्रदृष्टि त्या व्यक्तीकडे वळते. जपानचे अनेक मंत्री मारले गेले त्याचें कारण हे गुप्त संघच असावेत.

राजाशीं सर्वांनीं निष्ठेनें वागावें; त्याची सत्ता कोणत्याही रीतीनें कमी करूं नयें; राजसत्ता व जपानी परंपरा यांना बाधक अशा कम्यूनिझमचें समूळ उच्चाटन करावें; जपानमधून गोऱ्या लोकांची हकालपट्टी करावी; पाश्चिमात्य आचारांचा पगडा जपानवर बसूं नये; चीन किंवा इतर देशावर आक्रमण करून जपानच्या वाढत्या लोकसंख्येची व्यवस्था करावी; आशिया खंडांतून पाश्चिमात्यांचें वर्चस्व कमी करून जपानचें वर्चस्व स्थापावें; आशियाची एकी करावी; इत्यादि अनेक कल्पनांचा आश्रय घेऊन गुप्त संघांचें काम चालू असतें. या तत्त्वाविरुद्ध आचरण करणारा अधिकारी, मंत्री, भांडवलदार अथवा मुत्सद्दी, कोणीही असला तरी त्याला अचानक शासन गुप्त रीतीनें दिलें जातें.

कोकूऱ्यूकाई (ब्लॅक ड्रॅगन सोसायटी), कोकुसुईकाई (नॅशनल एसेन्स सोसायटी), तेईकोशा (ग्रेट ॲक्शन सोसायटी), तेक्केत्सुशा (आयर्न अँड ब्लड सोसायटी,) सेकीशिदान (रेड शर्ट सोसायटी) अशा नांवांचे अनेक संघ गुप्त रीतीनें कामें करीत आहेत. जपानमध्यें व जपानच्या बाहेरही त्यांचें जाळें पसरलेलें आहे. त्यांची माहिती पोलीसखात्याला असली तरी तें कांहीं करूं शकत नाहीं. राजकारणी मुत्सद्दी आपला हेतु साध्य करण्याकरितां या संघांचा उपयोग करून घेतात.

हिंदी राष्ट्रीय चळवळीमुळें सरकारी रोषास पात्र झालेले कांहीं देशभक्त जपानमध्यें आश्रयास गेले. महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकारनें जपानी सरकारकडून या देशभक्तांना आपल्या ताब्यांत घेण्याचा प्रयत्न केला. त्याकरितां जपानच्या गृहमंत्र्यानें आज्ञापत्रही सोडलें; परंतु ऐन वेळीं या गुप्त संघांपैकीं एका संघाच्या नायकानें या हिंदी देशभक्तांना आश्रय दिल्यामुळें ब्रिटिश सरकारची निराशा झाली.

**कम्यूनिस्ट सर्वांना अप्रिय—**

कडवट देशभक्तांचे गुप्त संघ आणि राजनिष्ठेनें प्रेरित झालेली लष्करशाही या दोघांचा समान शत्रू म्हणजे कम्यूनिस्ट पक्ष. जपानिझम् आणि कम्यूनिझम् यांचीं तत्त्वें अगदीं विरुद्ध असल्यामुळें कम्यूनिस्टांची चळवळ दडपून टाकण्याचा सतत प्रयत्न जपानमध्यें चाललेला आहे. किंबहुना कम्यूनिझम्शीं झगडा हा जपानचा अंतर्बाह्य प्रश्न आहे. राजा, राज्यघटना आणि लष्करशाही या त्रयीच्या विरुद्ध एकही शब्द काढलेला सरकारला खपत नाहीं. विद्यार्थीवर्ग, कामगार आणि अध्यापक यांच्यांत समाजवादी विचारसरणीचा प्रसार होऊं नये याकरितां स्वतंत्र खातें निर्माण करण्यांत आलेलें आहे. त्याला 'विचारनियंत्रण खातें' (थॉट कंट्रोल डिपार्टमेंट) असें नांव आहे. शिक्षणखातें व पोलीसखातें यांच्या सहकार्यानें विचारनियंत्रणखात्याचें काम चालतें. आगगाडींत प्रवास करितांना विद्यार्थी काय वाचतात, अध्यापकांचे विचार काय आहेत, कामगार वर्गांत संप वगैरे करण्याचा कोण प्रयत्न करतो, इत्यादि गोष्टी डोळ्यांत तेल घालून पाहिल्या जातात.

१९२५ सालीं "शांततारक्षण कायदा" मंजूर झाला. राष्ट्रीय राज्यघटना अथवा खाजगी मालमत्तेचें तत्त्व यांच्याशीं द्रोह करण्याचा उद्देश असलेले संघ काढणें, अशा संघाचा सभासद होणें किंवा दुसऱ्याला सभासद होण्यास सांगणें, या गोष्टी कायद्यानें निषिद्ध आहेत. प्रथम या गुन्ह्याला दहा वर्षें तुरुंगवासाची शिक्षा होती. पुढें १९२८ सालीं कायद्यांत बदल होऊन ही शिक्षेची मर्यादा देहान्तशासनापर्यंत वाढविण्यांत आली.

जपानमध्यें पोलीसचा कारभार अगदीं पद्धतशीर आहे. सर्व देशभर त्यांचें जाळें पसरलें आहे. प्रत्येक पोलीसचौकीवर भोंवतालच्या नागरिकांची यादी असते. त्या वस्तींत नवीन कोणी आला गेला तर पोलीसला त्याची त्वरित माहिती मिळते. नागरिकांच्या हालचालीवर पोलीसचें लक्ष राहतें. सरळपणें वागणाऱ्या व्यक्तींना पोलिसांचा त्रास होत नाहीं, उलट मदतच होते. परंतु सरकारविरुद्ध वागणाऱ्या किंवा संशयास्पद वागणुकीच्या व्यक्तीवर तेव्हांच नियंत्रण पडतें. राजा, लष्करशाही आणि राज्यघटना या गोष्टी सोडून दिल्यास इतर बाबतींत मोकळेपणानें टीका करण्याची जपानी नागरिकाला मोकळीक आहे.

**प्रधान कोणाचा नोकर—**

राज्याचीं सूत्रें हातांत घेऊन चालविणाऱ्या मंत्र्यावर अप्रत्यक्षपणें किती प्रकारचीं दडपणें पडतात त्याची वरील वर्णनावरून कल्पना येईल. मुख्य प्रधानाची व मंत्रिमंडळाची नेमणूक प्रीव्ही कौन्सिलच्या (राजाचें सल्लागार मंडळ) संमतीनें होते. लष्करी अधिकाऱ्यांना ही निवड पसंत असल्याशिवाय प्रधान जागेवर राहणार नाहीं. तो काय करितो इकडे गुप्त मंडळयांचें लक्ष असतेंच. कांहीं महत्त्वाची परिस्थिति निर्माण झाली कीं जुन्या मुरब्बी मुत्सद्यांकडे प्रधानाचे हेलपाटे चालू होतात. या सगळया दडपणांतून प्रधानाचें स्वतःचें व ज्या पक्षानें आणि मतदारांनीं त्याला निवडलें त्यांचें मत काय राहील असा प्रश्न स्वाभाविकच मनांत उभा राहतो. प्रधान हा केवळ बाहुलें म्हणून उपयोगी पडतो. त्याला हलविणाऱ्या अनेक सत्ता मागें असतात. त्यांच्या तंत्रानें तो चालला नाहीं तर पदच्युत होईल किंवा प्राणाला मुकेल. म्हणून बाह्यतः लोकसत्तात्मक पद्धति असली तरी जपानी राजकारण चालविणारी सत्ता अव्यक्त आहे असें म्हणावें लागतें.

**वृत्तपत्रांच्या मर्यादा—**

लोकमतावर आणि विचारप्रसाराच्या साधनांवरही राजकीय नियंत्रण स्वाभाविकपणेंच पडलें आहे. जपानमध्यें वृत्तपत्रांच्या संस्था अवाढव्य

प्रमाणावर वाढलेल्या आहेत. असाही आणि निचिनिचि या वृत्तपत्रसंस्थांचें जाळें देशभर पसरलेलें आहे. कित्येक लाखांवर त्यांचा खप आहे. प्रत्येक छापखान्यांत वीस पंचवीस प्रचंड छापयंत्रें आहेत. बातमीची ने-आण करण्या-करितां विमानें व कबुतरांचे तांडे आहेत. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं टेलीव्हिजनच्या साधनानें चित्रें पाठविण्याची यंत्रसामग्री आहे. वर्तमान-पत्राची किंमत दोन सेंट म्हणजे हिंदी नाण्यांत एक पैसा आहे. लोकमतावर वृत्तपत्रांचें चांगलें वजन आहे. समाजसुधारणेसारख्या विषयावर वृत्तपत्रांना स्वतंत्रपणें लिहितां येतें. परंतु लष्कर, राजा आणि राज्यघटना या बाबतींत लिहितांना अतिशय काळजी घ्यावी लागते. सामान्य अधिकाऱ्यावर वाटेल तितकी टीका केली तरी तिकडे कोणी लक्ष देणार नाहीं. परंतु राजकारणांत पवित्र म्हणून मानलेल्या विचारांना धक्का देण्यासारखें लिखाण प्रसिद्ध करण्याची मुळींच सोय नाहीं.

**वाङ्मयनियंत्रण—**

रेडिओ, ग्रंथप्रकाशन, चित्रें, इत्यादि सर्व क्षेत्रांत वरील निर्बंध पाळावे लागतात. एक काळ असा होता कीं जपानी वाङ्मयांत समाजवादी विचार-सरणीच्या वाङ्मयाचा बराच प्रसार झालेला होता. नाओशी तोकुनागा या ग्रंथकारानें मजूर जीवनावर "स्ट्रीट विदौट सन्" नांवाची वर्गकलह-प्रतिपादक कादंबरी लिहिली होती. तिचीं आठ भाषांत रूपांतरें झालीं. आतां अशा वाङ्मयावरून लेखकांचें लक्ष उडालें असून तें आत्मनिरीक्षणाकडे अधिक लागलें आहे. या नवीन प्रवृत्तीची निदर्शक अशी "मशीन" नांवाची कादंबरी आहे. तिच्यांत सामाजिक जीवनापेक्षां व्यक्तिजीवनाच्या प्रश्नाचा विचार अधिक झालेला आहे. लोखंडाच्या यंत्रावरून मानसिक यंत्राकडे लेखकाची दृष्टि वळली आहे.

दरसाल सामान्यपणें दहा पुस्तकें सरकारजमा होतात. कम्यूनिझम्, उत्तान शृंगार आणि लष्करी धोरणावर टीका अशा स्वरूपाच्या वाङ्मयावर पोलीसची नजर असते.

जपानी राजकारणाचा सर्व प्रयत्न समाजवादापासून आपला देश

अलिप्त ठेवण्याकरितां चालला आहे. त्यामुळें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर सरकार, पोलीस आणि लष्करशाही यांचें नियंत्रण पडलें आहे.

**विचारवंताला काय वाटतें ?—**

सध्यांच्या परिस्थितींत सामान्य जनांना आणि विचारी माणसांना काय वाटतें हा प्रश्न आहे. सामान्य लोक फारसा विचार करीत नाहींत. कायदेमंडळांच्या निवडणुकींच्या वेळीं उमेदवारांचीं प्रचारव्याख्यानें होतात, तेव्हां सभेंत वादविवाद-प्रश्नोत्तरें वगैरे प्रकार घडत नाहींत. लोकांना स्वतंत्र विचार व चर्चा करण्याची फार संवय किंवा हौस नाहीं. त्यामुळें सामान्य लोक चालू परिस्थितींत फारसे नाखुष असलेले दिसत नाहींत. आर्थिक परिस्थिति शेतकरी वर्गाला जाणवते. पण चीन-जपानलढा संपला म्हणजे आपलाही प्रश्न सुटेल असें त्याला वाटतें.

विचारवंतांची भूमिका मात्र निराळी आहे. अध्यापक आणि विद्यार्थी-वर्ग यांत अल्पप्रमाणांत कांहीं लोक स्वतंत्र विचार करणारे आहेत. परंतु त्यांना आज वाचा नाहीं. जे बोलतील ते स्थानभ्रष्ट होतील. आपल्या देशांत क्षात्रबलाचे जोरावर सर्व राजकारण चाललें आहे ही गोष्ट विचार-वंतांना पटत नाहीं. त्यांतील कांहीं धीट लोक आहेत ते उघडपणें आपले विचार मांडून त्याचे परिणाम भोगतात. बाकीचे आपापसांतच असमाधान व्यक्त करून काळ बदलेल म्हणून वाट पाहात बसतात. खरी लोकशाही आज जपानमध्यें नाहीं ही स्थिति उदारमतवादी जपानी लोकांना रुचत नाहीं. लष्करशाहीला लोकसत्ता आणि उदारमतवाद या गोष्टी नको आहेत. त्यामुळें आज बाह्यतः जरी लोकशाहीच्या सर्व उपाधी जपानजवळ असल्या तरी प्रत्यक्ष राजकारण लष्करशाहीच्या, जुन्या मुत्सद्यांच्या आणि गुप्त संघांच्या हातांत आहे. त्यांच्या हातांत प्रधानमंडळ आहे आणि त्यांच्याच तंत्रानें राजाही चालतो.

आहे ही परिस्थिति अधिक काळ टिकली तर जपानमध्यें पूर्ण स्वरूपांत फॅसिझम् येईल असें वाटतें.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत
सं. ........ नं. ..........
ता. ..............
ठाणे.

# ११

# औद्योगिक उत्कर्ष व स्वस्ताईचें रहस्य

**इंग्रजांचा नांगर कापला—**

ऐतिहासिक गोष्ट आहे. जपानमध्यें नवीन युग आलेलें नव्हतें. जुन्या पद्धतीची राजवट होती. गोऱ्या लोकांचा संबंध थोड थोडा येत होता. एके दिवशीं वजिराची स्वारी रस्त्यानें लव्याजम्यानिशीं चालली होती. सामुराई नागव्या तरवारी घेऊन पुढें चालले होते. पायघोळ रंगीबेरंगी किमोनो आणि चिलखतें घातलेले सरदार मागें चालले होते. मध्यभागीं वजिराची स्वारी सेवकांच्या खांद्यांवर असलेल्या मेण्यामध्यें बसलेली होती. स्वारीची मिरवणूक चालू असतां तिच्यामधून कोणीं जायचें नसतें. एक गोरा इंग्रज शिपाई उद्धटपणानें मधूनच गेला. झालें. वजिराचा अपमान झाला. जपानी लोकांत मानापमानाची कल्पना विशेष. त्यापुढें गोरा माणूस काय होय ? सामुराईनें त्या इंग्रजावर एक तरवारीचा वार करून त्याचा मुडदाच पाडला. इंग्रजांचा अपमान झाला.

इंग्लिश आणि जपानी जहाजांची लढाई सुरूं झाली. त्यांत इंग्रज लोकांना पळून जाण्याची घाई झाली. ती संधि साधून जपान्यांनीं जहाजाचा नांगरच कापून घेतला. हें म्हणजे इंग्लंडचें नाकच कापून घेतल्यासारखें झालें ! इंग्रजांनीं नांगर परत मिळण्याकरितां खूप शर्थ केली. शेवटीं जपानी

लोकांनीं त्यांच्या कल्पनेप्रमाणें मौल्यवान् असा मोबदला घेऊन नांगर परत दिला.

हा मोबदला काय होता ?

कापड विणण्याचा यांत्रिक माग !

याच लढाईंत अॅडमिरल टोगोनें आधुनिक पद्धतीची युद्धसामग्री पाहिली. लगेच तो आरमारी शिक्षणाकरितां इंग्लंडमध्यें गेला आणि सात वर्षें तेथें शिकला.

जपान्यांची राष्ट्रीय दूरदृष्टि अशी आहे.

**शास्त्रीय युगाची जाणीव—**

दुपारीं एक वाजण्याची वेळ. तोकियोमध्यें विज्ञान-उद्योग-प्रदर्शनाच्या (म्यूझियम् ऑफ् सायन्स अँड इंडस्ट्री) सोप्यामध्यें मऊ हिरवी गादी असलेल्या कोचावर प्रदर्शन पाहण्यास आलेली एक कामगार स्त्री बसली होती. जवळ तिचीं चार मुलें होतीं. सर्वांनीं मिळून दुपारच्या आहाराकरितां घरून बरोबर आणलेलीं अंडीं सोलून खाल्लीं. आजूबाजूला शाळेंतील कांहीं विद्यार्थीही प्रदर्शन पाहात होते. काम करणाऱ्या स्त्रिया, मुलें, विद्यार्थी इत्यादींना या प्रदर्शनांत काय दिसलें ?

एका टेबलावर मोठ्या परातीएवढें मनगट घड्याळ ! (रिस्टवॉच) ठेविलेलें होतें. त्याच्या आंतील सर्व यंत्रें सहज दिसतील अशा रीतीनें मांडलीं होतीं. लहान घड्याळाचे कांहीं भाग सूक्ष्मदर्शक कांचेखालीं ठेविल्यामुळें मोठे दिसत होते. दुसऱ्या एका कोपऱ्यांत विमानाचे सर्व भाग सोडवून ठेवलेले होते. विज्ञानशास्त्राचे नियम यंत्रांच्या रचनेंत कसे उपयोगी पडतात तें दाखविण्याकरितां एका दालनांत अनेक यंत्रें ठेविलेलीं होतीं. कोणीही किल्ली दाबून तें यंत्र चालवून पाहावीत. लहान मुलांना तो एक शास्त्रीय खेळच झाला होता. कांचेवर दाब पडला म्हणजे ती किती वांकते तें एका यंत्रांतून दिसत होतें. रेडियोची रचना समजण्याकरितां कांहीं भाग एका विभागांत ठेविलेले होते. वर्तमानपत्राच्या छापखान्यांत, कागद यंत्रांत जाऊन

त्यावर मजकूर छापून वर्तमानपत्राची घडी होऊन बाहेर पडते, ही क्रिया दाखविणारें एक लहान आकाराचें सर्व भाग असणारें व मोठ्या प्रेसप्रमाणें चालणारें एक यंत्र एका कांचेच्या खोलींत होतें. तें चालू झालें कीं डायरीच्या आकाराचें वर्तमानपत्र छापून घडी होऊन बाहेर पडे. दुसऱ्या मजल्यावर प्राणी, वनस्पती व भूगर्भशास्त्रविषयक माहितीच्या वस्तू होत्या. गच्चीवर मोठा टेलीस्कोप ठेविलेला असून त्यांतून आकाशांतील ग्रह पाहण्याची सोय होती.

शेंकडो आबालवृद्ध या प्रदर्शनांतील वस्तू मोठ्या मजेनें पाहून जात होते.

ओसाका शहरामध्यें एका मोठ्या इमारतींत वीज-प्रदर्शन (म्यूझियम् ऑफ् इलेक्ट्रिसिटी) आहे. वीजशास्त्रांतील सामान्य नियम सोप्या यंत्रांचे साहाय्यानें सामान्य लोकांना समजण्याची योजना येथें केलेली आहे. एकाद्या शास्त्रज्ञाच्या प्रयोगशाळेंत असावींत अशीं उपकरणें तेथें आहेत. पंधरा सोळा वर्षांच्या मुली यंत्राची किल्ली दाबून एका खांबांतून दुसऱ्या खांबांत कडकडाट करून उडी मारणारी वीज उत्पन्न करितात. शहरावर विमानांचा हल्ला आल्यास विजेचे दिवे एकदम मालविले जाऊन शत्रूचीं विमानें खालीं पाडल्याबरोबर दिवे एकदम कसे लाविले जातील तें एका दालनांत दाखविलें आहे. अगदीं वरच्या मजल्यावर खगोल शाळा आहे. या जागेंत यंत्रांच्या साहाय्यानें रात्रींचा आकाशाचा देखावा दिवसां वाटेल त्या वेळीं उत्पन्न करितां येतो. फिरणारे ग्रह, चंद्रोदय, ग्रहण, इत्यादि वाटेल तो देखावा येथें दाखवितां येतो. एका तासाचे अवधींत अवघ्या वर्षांत बदलणारी आकाशाची स्थिति प्रेक्षकाला पाहतां येते. या मंदिरांतील हवा कृत्रिमतेनें थंडगार ठेविलेली असते. एकीकडे थंडी व एकीकडे हा रात्रीचा देखावा, यामुळें आपण उघड्या मैदानांत विशाल आकाशाखालीं मध्यरात्रीचे वेळीं बसलों आहोंत कीं काय असा भास होतो. वास्तविक ती दुपारची वेळ असून प्रेक्षक शहराच्या मध्यभागीं इमारतीच्या अखेरच्या मजल्यावर बसलेला असतो आणि बाहेर प्रखर ऊन पडलेलें असतें. हजारों माणसें येथें ज्योतिषशास्त्राचें लौकिक शिक्षण घेत असतात.

आशियाखंडांत अशा प्रकारची मोठी खगोलशाळा ही एकच आहे. जपानांतील सर्व शहरांतून अशा प्रकारचीं शास्त्रीय व औद्योगिक प्रदर्शनें पसरलेलीं आहेत. आजचें युग उद्योगधंद्यांचे आहे; उद्योगधंदे शास्त्रांचे पायावर उभारलेले आहेत; त्या शास्त्रांची माहिती सामान्य जनांना झाली पाहिजे, हा उद्देश. औद्योगिक युगाची मानसिक व लौकिक तयारी काय असते त्याची कल्पना यावरून येईल.

**जपानचा जगाला पेंच व आम्ही—**

जपानी लोक आपला माल इतका स्वस्त कसा विकतात याचें आज ज्याला त्याला आश्चर्य वाटून राहिलें आहे. हिंदुस्थानांतील व पूर्वेकडील इतर लोकांना स्वस्त माल मिळतो म्हणून सानंद कौतुक वाटतें. पण भावी काळांत आपण यांच्याशीं कशी स्पर्धा करणार म्हणून मनांत शंका येऊन जाते. मात्र यूरोप-अमेरिकेंतल्या लोकांच्या खिशाला आज ही गोष्ट जाणवं लागली आहे. जपानी माल यूरोप-अमेरिकेंतही पाश्चात्यांच्या मालपेक्षां स्वस्त मिळूं लागल्यामुळें आपले कारखाने बंद पडतात कीं काय ही भीति त्यांना वाटूं लागली आहे. पूर्वखंडांतील यूरोप-अमेरिकेचें गिऱ्हाईक तर जपाननें काबीज केलें आहेच. त्यामुळें पाश्चात्य लोकांच्या कौतुकांत भीति आणि असूया या भावनांचें मिश्रण आहे.

जपानच्या या स्वस्ताईमुळें जगाच्या राजकारणांत मोठ्या घडामोडी होणार आहेत. सर्व पुढारी राष्ट्रांची स्पर्धा जगांतील कच्चा माल आणि व्यापारी पेठा काबीज करण्याकरितां चाललेली आहे. त्या स्पर्धेला जपाननें अगदीं निकराचें स्वरूप दिलेलें आहे.

पौर्वात्यांना आज स्वस्त माल मिळत आहे. पण अशा स्थितींत त्यांचे स्वतःचे उद्योगधंदे वाढूं शकतील कीं काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तरीहीं याविषयीं त्यांच्यांत फारशी जागरूकता दिसत नाहीं. हिंदुस्थानांतही ती नाहीं. जपानच्या औद्योगिक व आर्थिक स्थितीवर युरोपियन भाषेंत जितकें वाङ्मय लिहिलें गेलें आहे त्या मानानें येथें काय आहे? वीस पंचवीस वर्षें जपान-मध्यें राहून अभ्यास केलेल्या युरोपियन व अमेरिकन लोकांनीं या प्रश्नावर

स्वतःच्या राष्ट्रीय दृष्टीनें विचार करून माहिती मांडलेली आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें अद्याप हें काम कोणीं केलेलें नाहीं, व केलें पाहिजे ही जाणीवही दिसत नाहीं. "सावधान असावें सर्व ठायीं" हा मंत्र दासबोधांत व कंठांत मात्र राहिला! मनोबोधांत उतरला नाहीं.

तीनशें साडेतीनशें वर्षांपूर्वीं पोर्तुगीज व डच व्यापारी हिंदी किनाऱ्यावर आले व व्यापार करून गेले. फ्रेंच-इंग्रज आले आणि ठाणें देऊन बसले. हे कोण, कोठून आले, त्यांची संस्कृति काय, उद्देश काय, इत्यादि माहितीचा त्या वेळीं कोणास थांग नव्हता. आजही जपानी व्यापारी आले आणि सर्व देशभर त्यांचा माल पसरला. पण त्यांची माहिती आम्हांला किती आहे? तीनशें वर्षांपूर्वीं डच-पोर्तुगीज व्यापाऱ्यांविषयीं होती तितकीच! यापुढचें तर्कशास्त्र व अनुमान स्पष्ट शब्दांतच मांडलें पाहिजे का?

**आंधळ्यांची व डोळसांची जिज्ञासा—**

जपानी लोक स्वस्त माल कां विकूं शकतात याची खोल चौकशी करण्याची जिज्ञासा न होतां वरकरणी उथळ कारणें देऊन या प्रकरणाचा निकाल लावण्याकडेच बहुतेकांची प्रवृत्ति असते. कामगार वर्गाला पिळून स्वस्त माल देत असतील, स्वतःच्या देशांत योग्य किंमत ठेवून परदेशांत मुद्दाम किंमती हाणून पाडीत असतील, उद्योगधंद्यांना सरकार पैसे देत असेल, इत्यादि तर्ककुतर्क रचून मनाचें समाधान करून घेण्याकडे प्रवृत्ति. पण संघटित रीतीनें या प्रश्नाची माहिती प्रत्यक्ष मिळवून त्याचे आधारावर आपला औद्योगिक कार्यक्रम आंखण्याइतकी संघटनाशक्ति, तसा प्रयत्न, आपल्या समाजानें दाखविलेला नाहीं हें कटु सत्य आहे.

वर जी काल्पनिक कारणपरंपरा दाखविली आहे ती सर्वथा सत्य नाहीं असा निर्वाळा यूरोप-अमेरिकेंतील अधिकारी प्रेक्षकांनीं व संस्थांनीं दिला आहे. जपानच्या औद्योगिक यशाचीं कारणें खोल आहेत. राष्ट्रीय स्वभावगुणांशीं त्यांचा संबंध पोंचतो. त्या दृष्टीनें या प्रकारचा अभ्यास होणें जरूर आहे.

आशियाखंडांत अशा प्रकारची मोठी खगोलशाळा ही एकच आहे.

जपानांतील सर्व शहरांतून अशा प्रकारचीं शास्त्रीय व औद्योगिक प्रदर्शनें पसरलेलीं आहेत. आजचें युग उद्योगधंद्यांचे आहे; उद्योगधंदे शास्त्रांचे पायावर उभारलेले आहेत; त्या शास्त्रांची माहिती सामान्य जनांना झाली पाहिजे, हा उद्देश. औद्योगिक युगाची मानसिक व लौकिक तयारी काय असते त्याची कल्पना यावरून येईल.

**जपानचा जगाला पेंच व आम्ही—**

जपानी लोक आपला माल इतका स्वस्त कसा विकतात याचें आज ज्याला त्याला आश्चर्य वाटून राहिलें आहे. हिंदुस्थानांतील व पूर्वेकडील इतर लोकांना स्वस्त माल मिळतो म्हणून सानंद कौतुक वाटतें. पण भावी काळांत आपण यांच्याशीं कशी स्पर्धा करणार म्हणून मनांत शंका येऊन जाते. मात्र यूरोप-अमेरिकेंतल्या लोकांच्या खिशाला आज ही गोष्ट जाणवं लागली आहे. जपानी माल यूरोप-अमेरिकेंतही पाश्चात्यांच्या मालापेक्षां स्वस्त मिळूं लागल्यामुळें आपले कारखाने बंद पडतात कीं काय ही भीति त्यांना वाटूं लागली आहे. पूर्वखंडांतील यूरोप-अमेरिकेचें गिऱ्हाईक तर जपाननें काबीज केलें आहेच. त्यामुळें पाश्चात्य लोकांच्या कौतुकांत भीति आणि असूया या भावनांचें मिश्रण आहे.

जपानच्या या स्वस्ताईमुळें जगाच्या राजकारणांत मोठ्या घडामोडी होणार आहेत. सर्व पुढारी राष्ट्रांची स्पर्धा जगांतील कच्चा माल आणि व्यापारी पेठा काबीज करण्याकरितां चाललेली आहे. त्या स्पर्धेला जपाननें अगदीं निकराचें स्वरूप दिलेलें आहे.

पौर्वात्यांना आज स्वस्त माल मिळत आहे. पण अशा स्थितींत त्यांचे स्वतःचे उद्योगधंदे वाढूं शकतील कीं काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. तरीही याविषयीं त्यांच्यांत फारशी जागरूकता दिसत नाहीं. हिंदुस्थानांतही ती नाहीं. जपानच्या औद्योगिक व आर्थिक स्थितीवर युरोपियन भाषेंत जितकें वाङ्मय लिहिलें गेलें आहे त्या मानानें येथें काय आहे? वीस पंचवीस वर्षें जपान-मध्यें राहून अभ्यास केलेल्या युरोपियन व अमेरिकन लोकांनीं या प्रश्नावर

स्वतःच्या राष्ट्रीय दृष्टीनें विचार करून माहिती मांडलेली आहे. हिंदुस्थानच्या दृष्टीनें अद्याप हें काम कोणीं केलेलें नाहीं, व केलें पाहिजे ही जाणीवही दिसत नाहीं. "सावधान असावें सर्व ठायीं" हा मंत्र दासबोधांत व कंठांत मात्र राहिला! मनोबोधांत उतरला नाहीं.

तीनशें साडेतीनशें वर्षांपूर्वी पोर्तुगीज व डच व्यापारी हिंदी किनाऱ्यावर आले व व्यापार करून गेले. फरेंच-इंग्रज आले आणि ठाणें देऊन बसले. हे कोण, कोठून आले, त्यांची संस्कृति काय, उद्देश काय, इत्यादि माहितीचा त्या वेळीं कोणास थांग नव्हता. आजही ज़पानी व्यापारी आले आणि सर्व देशभर त्यांचा माल पसरला. पण त्यांची माहिती आम्हांला किती आहे? तीनशें वर्षांपूर्वी डच-पोर्तुगीज व्यापाऱ्यांविषयीं होती तितकीच! यापुढचें तर्कशास्त्र व अनुमान स्पष्ट शब्दांतच मांडलें पाहिजे का?

**आंधळ्यांची व डोळसांची जिज्ञासा—**

जपानी लोक स्वस्त माल कां विकूं शकतात याची खोल चौकशी करण्याची जिज्ञासा न होतां वरकरणी उथळ कारणें देऊन या प्रकरणाचा निकाल लावण्याकडेच बहुतेकांची प्रवृत्ति असते. कामगार वर्गाला पिळून स्वस्त माल देत असतील, स्वतःच्या देशांत योग्य किंमत ठेवून परदेशांत मुद्दाम किमती हाणून पाडीत असतील, उद्योगधंद्यांना सरकार पैसे देत असेल, इत्यादि तर्ककुतर्क रचून मनाचें समाधान करून घेण्याकडे प्रवृत्ति. पण संघटित रीतीनें या प्रश्नाची माहिती प्रत्यक्ष मिळवून त्याचे आधारावर आपला औद्योगिक कार्यक्रम आंखण्याइतकी संघटनाशक्ति, तसा प्रयत्न, आपल्या समाजानें दाखविलेला नाहीं हें कटु सत्य आहे.

वर जी काल्पनिक कारणपरंपरा दाखविली आहे ती सर्वथा सत्य नाहीं असा निर्वाळा यूरोप-अमेरिकेंतील अधिकारी प्रेक्षकांनीं व संस्थांनीं दिला आहे. जपानच्या औद्योगिक यशाचीं कारणें खोल आहेत. राष्ट्रीय स्वभावगुणांशीं त्यांचा संबंध पोंचतो. त्या दृष्टीनें या प्रकारचा अभ्यास होणें जरूर आहे.

**जपानी उद्योगाचें विराट् स्वरूप—**

जपाननें हरक्षेत्रांत केलेली प्रगति पाहिली म्हणजे औद्योगिक प्रगति हा त्यांतीलच एक भाग आहे असें वाटतें. त्याचा विशाल व सार्वांगिक औद्योगिक पसारा पाहिला म्हणजे जपानी मालाच्या स्वस्ताईचा थोडा थोडा उलगडा होऊं लागतो. एकाद्या मोठ्या इमारतीच्या पांचव्या मजल्यावरील गच्चीवर उभे राहून शहराकडे नजर टाकली कीं सर्वत्र कारखान्यांचीं धुराडें दिसतात. खडेगांवांत जाऊन पाहावें तरी लहान सहान कारखाने तेथेंही आहेतच. शहरांत औद्योगिक संशोधन-संस्था हरएक उद्योगधंद्याकरितां आहेत. रात्रंदिवस समाजांत उद्योगधंदा चालला आहे. लोकांचा कष्टाळू स्वभाव चटकन् दिसून येतो. एकाद्या बैलानें काम करावें तसें माणसें काम करितात. सामानानें गच्च भरलेला गाडा संथपणें ओढीत असतात. औद्योगिक शिक्षणाच्या शाळा—सर्व दर्जाच्या, सर्व प्रकारच्या, सर्व उद्योगधंद्यांच्या—देशभर पसरल्या आहेत. बाजारपेठेंत पाहावें तो रोज कांहीं तरी नवीन जिन्नस दुकानांत येत आहे. तोकियोंत 'गिंझा' म्हणून बाजारपेठ आहे त्या ठिकाणीं नुसते खेळ पाहिले तरी रोज एकाद्या तरी यांत्रिक खेळाची भर पडलेली दिसते. असें वाटतें कीं इतक्या खेळांचा शोध रोजचे रोज लावतो तरी कोण ? शेंकडों जपानी जहाजें जगांतल्या प्रत्येक बंदरांत थांबून मालाची चढउतार करीत असतात. मुंबईंतून कापूस घेतील आणि कापड उतारतील; कोलंबोमधून नारळ सुपारी घेतील आणि विजेचे दिवे उतारतील; सिंगापूरहून रबर घेतील आणि रबरी जोडे उतारतील. अशा रीतीनें हरएक ठिकाणीं कच्चा माल घेऊन पक्का माल उतारण्याचें काम प्रत्यहीं चालू आहे. जपानी बंदरांत पाहावें तों मालाचे शेंकडों पेटारे पडलेले आहेत. पण त्यावर ओ. के. असा शिक्का पडल्याशिवाय माल जहाजावर जाणार नाहीं. जपानच्या मालाची जगाच्या मालांत पत वाढविण्याकरितां हा ओ. के. शिक्का आहे. कारखान्यांतून बाहेर वाहणारा हा माल जगावर कोण पसरवितो हा प्रश्न आहे. त्याचेंही उत्तर सोपें आहे. जपानमधून इंग्लंड-अमेरिकेला जाणाऱ्या जहाजावर अनेक जपानी व्यापारी व गुमास्ते असतात. बिचाऱ्यांना धड इंग्रजीचीं चार वाक्येंही येत नसतात. कांहींना तर एक शब्दही कळत नाहीं. पण

इंग्लंडला व्यापाराकरितां जातात ! कोणाजवळ हातरुमाल आहेत, कोणाजवळ फौंटनपेनें आहेत, कोणाजवळ कारागिरीचा माल आहे—हरएक वस्तु आहे. आफ्रिका, अमेरिका, यूरोप, आशिया, इत्यादि चारी खंडांच्या कानाकोंपऱ्यांतून आपला माल पोंचविण्याचें काम हे लोक करीत आहेत.

इतक्या गोष्टी पाहिल्यानंतर जपानच्या मालस्वस्ताईचा थोडा थोडा उलगडा होऊं लागतो.

**औद्योगिक प्रगतीचें प्रमाण--**

जपानचा माल हलका आणि कमी प्रतीचा म्हणून स्वस्त अशी येथें सर्वत्र समजूत आहे. 'जपानी माल' हा शब्दप्रयोगही उपरोधिक अर्थानें वापरण्यांत येतो. असें करण्यांत जपानी मालाच्या हलकेपणापेक्षां माल घेणाराचाच हलकेपणा दिसून येतो. या गोष्टीचा विचार करण्यासारखा आहे. जपानी माल हलका आहे कीं आपला खिसा हलका आहे?

घाऊक प्रमाणांत सायकलीसारखी वस्तु घ्यावयास एकादा व्यापारी गेला तर जपानी कारखानदार त्याला प्रथम भारी माल दाखवील. पण हा व्यापारी हिंदुस्थानकरितां माल मागतो आहे, असें लक्षांत आल्याबरोबर तो त्याला स्वस्त आणि हलक्या मालाकडे नेईल. असें कां? गिऱ्हाईक तसा माल.

जपानमध्यें सर्व दर्जाचा माल निघतो. हिंदी व्यापारी फक्त हलकाच माल मागवितात. सर्व बाजारपेठांकरितां आणि सर्व खिशांना परवडेल असा माल काढणें हें कारखानदार या दृष्टीनें जपानी लोक करितात. त्यांचा भारी माल अमेरिका व यूरोपमध्यें जातो. हलका माल हिंदुस्थान-आफ्रिका इकडे जातो.

यांत्रिक सुधारणेच्या कांहीं क्षेत्रांत तर जपाननें अग्रेसरत्व मिळविलें आहे. पाश्चिमात्यांच्या यंत्राचें अनुकरण करणें, व नंतर त्यांत संशोधन करून अधिक सुधारणा करणें, अशा क्रिया जपानमध्यें फार वेगानें चालू आहेत. जगाभोंवतीं प्रवास करणारा एक इंग्रज गृहस्थ अमेरिकेंत गेला. तेथें त्यानें

एक अगदीं नवीन प्रकारचा असा सिगारेट-लायटर विकत घेतला. अमेरिकेंतून जपानमध्यें आल्यावर त्याला तशाच प्रकारचा जपानी लायटर दिसला. अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहतां या जपानी वस्तूमध्यें कांहीं सुधारणा केलेली त्याला आढळून आली. आणि किंमत, अमेरिकन वस्तूपेक्षांही कमी. जी गोष्ट सिगारेट-लायटरची तीच इतर उद्योगांची. एकोणिसाव्या शतकांत इंग्रजांचा जिंकलेला जहाजाचा नांगर परत देऊन जपान्यांनीं मोबदल्यांत यांत्रिक माग घेतला. आज विसाव्या शतकांत इंग्लंडमध्यें नवीन कापड-गिरणी निघायची असली तर आधुनिक यंत्रसामग्रीकरितां तिला जपानी पद्धतीचे माग बसवावे लागतात. मागाची पृथ्वीप्रदक्षिणा पुरी झाली! गेल्या शतकांत तो पश्चिमेकडन पूर्वेकडे आला. आज तो पूर्वेकडून पश्चिमेकडे जात आहे. आजपर्यंत पूर्वेकडून पश्चिमेकडे फक्त तत्त्वज्ञान जात होतें; आतां यंत्रें आणि वस्तूही जाऊं लागल्या आहेत.

जपाननें, एका पौर्वात्य देशानें, पाश्चात्यांना त्यांच्याच यांत्रिक क्षेत्रांत जोराची टक्कर देण्यास प्रारंभ केला आहे. जपानी उद्योगधंद्यांची प्रगति इंग्लंड-अमेरिकेशीं तुलना केल्यानें लौकर लक्षांत येईल. पुढील आंकड्यांवरून दिसेल कीं तीस वर्षांत इतर देश मागासले किंवा जागचे जागीं राहिले, पण जपाननें तिपटीपेक्षां अधिक प्रगति केली.

१९१३ सालच्या स्थितीशीं तुलना केली असतां १९३३ सालीं तिन्ही देशांचें उत्पादन किती वाढलें त्याचें प्रमाण असें.—

**औद्योगिक उत्पादनाचें प्रमाण**

| वर्ष | जपान | अमेरिका | ब्रिटन |
|---|---|---|---|
| १९१३ | १०० | १०० | १०० |
| १९२५ | २२२ | १५१ | ८७ |
| १९२९ | २९७ | १७० | ९७ |
| १९३३ | ३४६ | १०९ | ८७ |

जपानला आपल्या उद्योगधंद्यांकरितां सर्व कच्चा माल परदेशाहून आणावा लागतो ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. जपानच्या आयात

मालापैकीं शेंकडा ५४ टक्के कच्चीं द्रव्यें असतात. तयार केलेल्या मालाचें प्रमाण अवघें १४ आहे; यापैकीं बराचसा माल जपानमध्यें असलेल्या परकीयांना लागतो. म्हणजे देशाला लागणारा ८५ टक्के माल जपान स्वतःच्या कारखान्यांत तयार करितो.

इतकी प्रगति थोडया अवधींत कशी झाली ? ती हिंदुस्थानलाही करितां येईल काय ?

**सरकारी पाळण्यांत कारखान्यांचा जन्म—**

जपानच्या औद्योगिक युगाला प्रारंभ सरकारी उत्तेजनानें व पुढाकारामुळें झाला. पुढची प्रगति कारखानदारांनीं केली. यांत्रिक सुधारणेला आरंभ १८६३ सालीं झाला. त्या वर्षीं कापड-गिरणीची यंत्रसामग्री यूरोपमधून आणली गेली. मेइजी कारकीर्दीनें उद्योगधंद्यांना शिस्तवार प्रोत्साहन देण्याचें धोरण ठेविलें. सरकारनें स्वतः कांहीं कारखाने काढले आणि कांहीं कारखाने काढण्यास श्रीमंत लोकांना प्रोत्साहन दिलें. १८७४ सालीं प्रसिद्ध ओजी कागदाचा कारखाना सरकारी प्रोत्साहनानें निघाला. १८७२ सालीं सरकारनें एक रेशमाचा कारखाना काढला आणि तो पुढें मित्सुईच्या स्वाधीन केला. १८७४ सालीं सरकारनें सीमेंट कारखाना काढला व तो यशस्वी झाल्यावर सोइचिरो आसानोला विकून टाकला. वरील उदाहरणांवरून सरकारी धोरण दिसून येईल. सरकारनें कारखाने काढावेत आणि ते यशस्वी रीतीनें चालू लागले कीं खाजगी व्यक्ति किंवा कंपन्या यांचे स्वाधीन करावेत. निप्पोन यूसेन कैशा या कंपनीचा इतिहासही असाच मनोरंजक आहे. तिचें जनकत्व एका हिंदी गृहस्थाकडे आहे ही गोष्ट अभिमानास्पद आहे. टाटा व एक जपानी व्यापारी अशा दोघांनीं एक नाविक व्यापाराची कंपनी काढली. परंतु ब्रिटिश कंपन्यांनीं चुरशीमध्यें तिला मारण्याचा घाट घातला. तेव्हां जपानी सरकारनें तिला आश्रय दिला आणि ती चांगली चालू लागतांच ती सध्याचे कंपनीकडे देण्यांत आली. सरकारनें काढलेले यशस्वी कारखाने खाजगी किंवा सांघिक मालकीचे करण्याकरितां विशिष्ट नियम करण्यांत आले. सरकारी पैसे हप्तेबंदीनें देऊन कारखाने

विकत घेणें शक्य झालें. या पद्धतीमुळें जपानी उद्योगधंद्यांचा प्रारंभ चांगला झाला. सर्व प्रकारचे कारखाने देशांत अवघ्या थोडक्या अवधींत सुरू झाले.

**युद्धकाल व कारखाने—**

युद्धाचे वेळीं जे कारखाने उपयोगी पडण्यासारखे आहेत, किंवा युद्धोपयोगी वस्तूंकरितां राष्ट्राला ज्या कारखान्यांची आवश्यकता आहे त्या कारखान्यांकडे सरकारचें व युद्धखात्याचें नेहमीं लक्ष असतें. राष्ट्राचें संरक्षणच अशा कारखान्यांवर अवलंबून असल्यानें त्यांना आश्रय देणें सरकारचें कर्तव्य ठरतें. इतर उद्योगधंद्यांकडेही सरकार राष्ट्रीय दृष्टीनें पाहतें. जपानमध्यें प्रत्येक धंदा निघाला पाहिजे व चांगला चालला पाहिजे याकरितां सरकार उत्तेजन देण्यास तयार असतें.

**एका नवीन धंद्याचा जन्म—**

नवीन धंदे अस्तित्वांत कसे येतात त्याचें १९३७ मधील एक उदाहरण पाहण्यासारखें आहे. एकीकडे उत्तर चीनशीं लढा चालू असतां ही कंपनी निघाली. लढाईंत मोटारी-विमानें-जहाजें यांना पेट्रोल लागतें. जपानला स्वतःच्या तेलाच्या खाणी नाहींत. म्हणून संशोधकांनीं कोळशापासून कृत्रिम पेट्रोल काढण्याचे प्रयोग करून त्यांत यश मिळविलें. नंतर सरकारनें निमसरकारी कंपनी काढण्याचें ठरविलें. निम्में भांडवल लोकांचें, निम्में सरकारचें. या कंपनीला काय सवलती सरकारनें दिल्या त्या पहा.—

१. दहा वर्षें प्राप्तीवरील कर नाहीं.
२. स्थानिक कर वरील मुदतीपर्यंत नाहीं.
३. कारखान्याला लागणारी यंत्रसामग्री परदेशहून येईल तिच्यावर आयात कर माफ.
४. भांडवलासंबंधीं कायद्यांत कांहीं सवलती.
५. कारखान्याला लागणारी वाटेल ती जमीन घेण्याची सवलत.

याच प्रकारचे इतर कारखाने निघाले तरी वरील सवलती मिळावयाच्या. मात्र कारखाने जपानी लोकांनींच चालविलेले असले पाहिजेत.

मेइजी कारकीर्दींत व नंतर जे कारखाने निघाले त्यांना महायुद्धांत चांगली संधि मिळाली. कारण युरोपियन राष्ट्रें लढाईंत गुंतल्यामुळें त्यांना व्यापारधंद्याकडे लक्ष देतां आलें नाहीं. त्या संधीचा फायदा घेऊन जपाननें आपले उद्योगधंदे पुढें ढकलले आणि पूर्वेकडील बाजारपेठाही काबीज केल्या. पुढें युद्ध संपल्यानंतर पुन्हा युरोपियन राष्ट्रांची स्पर्धा जपानला जाणवूं लागली. त्या वेळीं त्यानें आपले उद्योगधंदे शास्त्रीय संशोधन व सुधारणा यांचे जोरावर कसे सांवरले ती हकीकत मोठी मनोरंजक आहे.

**कारखानदारांचा जागरूकपणा—**

महायुद्धानंतर युरोपियन राष्ट्रांचे कारखाने पुन्हा जोरांत सुरू झाले. तेव्हां त्यांचा माल पूर्वेकडे पूर्ववत् येऊं लागला. जपानच्या उद्योगधंद्यांना नुकताच प्रारंभ झालेला असल्याकारणानें मालाच्या गुणांत आणि स्वस्तपणांत युरोपियन मालाशीं स्पर्धा करणें पुन्हा जड जाऊं लागलें. अशा स्थितींत शास्त्रीय पद्धतींचा आधार घेतल्याशिवाय जपानचे उद्योगधंदे जगूं शकणार नाहींत ही गोष्ट जपानी कारखानदारांनीं ओळखली. 'कारखानदारांनीं ओळखली' या विधानाची द्विरुक्ति करणें जरूर आहे. 'जपानी उद्योगधंद्यांना सरकारी मदत आहे म्हणून ते जगले' असें समाधान मानणारांनीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं केवळ सरकार अनुकूल असून भागत नाहीं. इतर सर्व गोष्टी अनुकूल व लोकही जागरूक असतील तरच सरकारी सहानुभूतीचा उपयोग होईल. जपानी कारखानदारांपैकीं ओहारा या गृहस्थानें पुढाकार घेऊन कारखान्यांवर आलेल्या परिस्थितीचा विचार केला. यापुढें शास्त्रीय संशोधनाचे पायावर काम आणि यंत्रें या दोहोंतही अखंड सुधारणा चालत राहिल्याशिवाय भावी काळांत आपण स्पर्धेंत टिकणार नाहीं, या गोष्टीची जाणीव ओहाराप्रभृति पुढाऱ्यांना झाली. त्यांनीं औद्योगिक कामाच्या शास्त्रीय संशोधनाकरितां एक संस्था (इन्स्टिटयूट फॉर दि सायन्स ऑफ् लेबर) ओसाका येथें स्थापून देशांत इतरत्र तिच्या शाखा काढल्या.

१९१८ सालीं महायुद्ध संपलें आणि १९२२ चे सुमारास ही संस्था निघाली. या संस्थेंत मुख्यतः पुढील विषयांवर संशोधन सुरू झालें.—

१. कामगारच्या आरोग्याला आणि कार्यशक्तीला अनुकूल अशी परिस्थिति.
२. काम करण्याच्या क्रियेंत शास्त्रीय सुधारणा.
३. थकवा, काम व विश्रांति यांचें संशोधन.
४. कामगारांचे विशेष रोग.

या संस्थेनें अनेक गोष्टींचा शास्त्रीय अभ्यास करून वार्षिक, सहामाही आणि प्रासंगिक संशोधन-वृत्तांत प्रसिद्ध करण्याचा उपक्रम केला. देशांतील सर्व कारखानदारांनीं त्यांचा फायदा घेऊन आपापल्या उद्योगधंद्यांत शास्त्रोक्त सुधारणा केली. या संशोधन-संस्थेचा व्याप मोठा आहे. तिच्यांत चाळीस प्रयोगशाळा असून तेथें विविध प्रयोग करण्याकरितां अद्यावत् यंत्रसामग्री आहे.

**कामगारांच्या जीवनांत सुधारणा—**

कामगारांचें आरोग्य आणि कार्यशक्ति सुधारल्याशिवाय उद्योगधंदे सुधारणार नाहींत या श्रद्धेनें अन्नाचें शास्त्रीय संशोधन करण्याकरितां डॉ. साइकी यानें अन्नसंशोधनसंस्था (इन्स्टिटयूट् फॉर दि स्टडी ऑफ् न्यूट्रिशन्) काढली. जपानी मजुराचें अन्न म्हणजे भात, मासे, भाजीपाला आणि लोणचीं. भातानें बेरीबेरी आणि पोटाचे रोग उद्‌भवत. गिरणींत सडलेल्या तांदुळामुळें तर त्याची भीति अधिकच. तांदुळावर शास्त्रीय संशोधन करून शास्त्रज्ञांनीं अशी सडण्याची क्रिया शोधून काढली कीं जिच्यामुळें पौष्टिक द्रव्यांची हानि न होतां रोगकारक भाग मात्र नष्ट होईल. या सुधारलेल्या अन्नाचा प्रचार सर्व कारखान्यांतून सुरू झाला. अन्न सुधारल्याबरोबर आरोग्य सुधारलें, त्याबरोबरच काम करण्याची गति आणि वृत्ति वाढली. कापडाच्या गिरणींत एकेका वेळीं हजार दीड हजार माणसांचें अन्न शास्त्रोक्त रीतीनें शिजविलें जातें. कारखान्याप्रमाणेंच सैन्य, शाळा, इत्यादि सामुदायिक ठिकाणींही या अन्नाचा प्रसार झाला आहे. भाताचा पौष्टिकपणा वाढविण्याकरितां त्यांत तीस टक्के प्रमाणांत गहूं घातला जातो. हा आहार पौष्टिक असून अतिशय स्वस्त मिळतो. अवघ्या पांच पैशांत मधल्या वेळचें भोजन होऊं शकतें. सुखवस्तु मुलींच्या एका हायस्कूलमध्येंही मधल्या वेळीं हा आहार

देतात. त्याची किंमत प्रत्येक मुलीला फक्त पांच पैसे पडते. शहरांत अनेक सहकारी स्वयंपाकगृहें निघालीं असून तेथें हजारों कुटुंबांचें अन्न तयार होतें आणि मोटारींतून गरम गरम डबे घरोघर पोंचते केले जातात.

**यंत्रासारखे हात—**

कारखान्यांत मुलींना काम करितांना पाहिलें तर असें आश्चर्य वाटतें कीं हीं यंत्रें आहेत का मानवी हात आहेत ! इतक्या एकाग्रतेनें आणि चलाखीनें काम चाललेलें असतें. वेळेची आणि श्रमाची काटकसर होऊन ताशीं कमाल काम व्हावें अशा बेतानें प्रत्येक क्रिया योजनापूर्वक बसविलेली असते. हाताची एकही क्रिया वायफळ होतां कामा नये. दोन्ही हात सारखे चालू राहिले पाहिजेत. आणि सर्व काम यंत्रच करीत आहे इतकें अंगवळणीं पडलें पाहिजे. विचार करण्याची व त्यांत वेळ घालविण्याची जरूरी पडूं नये. अशा तत्त्वांवर सर्व क्रिया बसविलेल्या आहेत. सारांश औद्योगिक क्षेत्रांत मानवी हात व डोकें यांना जें कमाल काम शक्य आहे तें करून घेण्याची शिकस्त जपाननें चालविली आहे.

**औद्योगिक संशोधनाचा प्रचंड व्याप—**

जपानी उद्योगधंदे शास्त्रीय संशोधनावर उभारलेले आहेत. यंत्रसामग्री, औद्योगिक द्रव्यें, व औद्योगिक प्रक्रिया यांवर शेंकडों संशोधनसंस्थांतून रात्रंदिवस हजारों शास्त्रज्ञांचीं कामें चाललीं आहेत. किती विविध प्रकारच्या औद्योगिक संशोधनसंस्था आहेत ! प्रत्येक शहरानें स्थानिक उद्योगधंद्याकरितां संशोधनसंस्था चालविल्या आहेत. नागोयाला चिनी मातीच्या वस्तूंचा धंदा आहे तेथें त्याची संशोधनसंस्था शहरानें चालविली आहे. कियोतोला विणकाम-रंगकामाचा धंदा आहे तेथें एक अवाढव्य संशोधनसंस्था शहरखर्चानें चालविलेली आहे. अशी प्रत्येक मोठ्या शहरांत स्थिति आहे. प्रत्येक विद्यापीठांत उच्च संशोधन चालू आहे. तोकियो सरकारी विद्यापीठाच्या एंजिनियरिंग कॉलेजची वैमानिक शास्त्रसंशोधन शाळा आहे. ही संस्था म्हणजे सर्व शास्त्रीय शाखांच्या संशोधनाचीच संस्था आहे असें वाटतें. या

एका संस्थेच्या इमारतीच एका लहान विद्यापीठासारख्या आहेत. तोकियो विद्यापीठाच्या या संशोधनसंस्थेनें तयार केलेल्या एका विमानानें दीर्घ उड्डाणांत १९३८ सालीं जगाचा उच्चक्रमांक मिळविला. विमानें तयार करणाऱ्या कारखान्यांच्याही संशोधनसंस्था आहेत त्या निराळ्याच. कित्येक मोठमोठ्या कारखानदारांनीं आपापल्या संशोधनसंस्था चालविल्या आहेत. याशिवाय सरकारी खर्चानें चाललेल्या अनेक संस्था आहेतच. पूर्वी सरकारी मदतीवर चाललेल्या अनेक संशोधनसंस्था आज स्वावलंबनावर चालल्या आहेत. औद्योगिक संशोधनसंस्थांचें हें अफाट जाळें पाहिलें म्हणजे जपान केवळ अनुकरणावर जगत नसून भावी औद्योगिक वाढीचा खोल पाया त्यानें घातला आहे ही गोष्ट लक्षांत येते.

**प्रयोगशाळेंतील ब्रह्मदेव—**

तोकियोमध्यें एक विज्ञान-रसायन-संशोधनसंस्था आहे. प्रारंभीं हिला सरकारी मदत मिळत असे. आतां ती स्वावलंबी आहे. या संस्थेच्या कामाचा फायदा घेणारे पन्नास कारखाने आहेत. तिनें आतांपर्यंत ८०० पेटंटस् घेतलीं आहेत. १७० नवीन द्रव्यें शोधून काढलीं असून त्यांपैकीं शेंकडा चाळिसांचा उद्योगधंद्यांत उपयोग केला जातो. वायां गेलेल्या रबरापासून चांगला रबर तयार करणें, कोळशापासून गॅसोलीन करणें, अशा प्रकारचे राष्ट्रीय दृष्टया महत्त्वाचे प्रयोग येथें चालतात. कोळशापासून गॅसोलीन करण्याचा प्रयोग यशस्वी झाल्यानें युद्धकाळीं जपानला त्याचा फार उपयोग होईल. या द्रव्याचे कारखाने काढण्याकरितां १९३७ सालीं एक खास कायदा पास करण्यांत आला. या संशोधनशाळेंत १११२ लोक काम करीत आहेत; डॉक्टर ऑफ् सायन्स्‌ची पदवी असलेले १०० संशोधक आहेत. उद्योगसृष्टींतील ब्रह्मदेवच ते! एकाद्या प्रयोगशाळेंत जाऊन काम करीत असलेल्या संशोधकाकडे पाहिलें तर पोषाखावरून तो मजूर असल्यासारखा दिसतो. खरोखरीच तो मजुरासारखा काम करीत असतो. प्रत्येकाला स्वतंत्र प्रयोगशाळा आहे. ही संस्था चांगल्या रीतीनें पाहण्यास दोन दिवस लागतात.

कियोतोमध्यें एक प्रयोगशाळा आहे. तेथें जुन्या कापडाचा धागा काढून तो नवा करण्याचे प्रयोग चालू आहेत. या संस्थेंत विणकामविषयक अद्यावत् यंत्रसामग्री प्रयोगाकरितां ठेविली आहे. स्थानिक कारखान्याला एकादा प्रश्न उत्पन्न झाला तर संशोधनाचा खर्च घेऊन त्याला योग्य तो मार्ग दाखविला जातो. इमारतीचा खर्च दीड लाख येन असून सालिना खर्च एक लाख येन आहे.

जपानच्या उत्तर भागांत सेंदाई नांवाचें दोन लाख वस्तीचें शहर आहे. तेथें कारागिरीच्या वस्तूविषयीं संशोधन चालतें. या संस्थेचे संशोधक यूरोप-अमेरिकेंत जातात आणि तेथें लोकप्रिय असलेल्या वस्तूंचे नमुने परत आणतात. नंतर तशा दिसणाऱ्या अथवा प्रत्यक्ष त्याच द्रव्यापासून जपानी वस्तू करण्याविषयीं संशोधकांचे प्रयोग चालू होतात. परदेशच्या बाजारांत आपल्याला या वस्तू विकल्या पाहिजेत ही जाणीव संशोधकांना असते. पुष्कळ वेळां मूळ वस्तूंत अनेक सुधारणा करून ती घडविली जाते. रंगीत नक्षीचें लाकडी तबक करावयाचें झाल्यास प्रत्येक तबकावर रंग देण्याची क्रिया या संस्थेनें वांचविली आहे. रंगीत लाकडाचे अनेक मोठे तुकडे घेऊन ते एकजीव होतील असे डकविले जातात. नंतर या लाकडांतून अनेक तबकें निर्माण केलीं कीं त्यांना नैसर्गिक रंग असल्यासारखा वाटतो. अशा प्रकारें अनेक वस्तूंवर प्रयोग चालले आहेत. परदेशीं आपला माल खपविणें या एका गोष्टीची अहोरात्र जाणीव संशोधकांना आहे असें दिसून येतें.

**'जपानी' माल—**

जपानी माल आतां 'जपानी' राहिला नाहीं. एक काळ असा होता कीं, स्वस्त, हलका आणि खोटा माल असला कीं त्याला 'जपानी' हें विशेषण मिळे. या वृत्तीला वास्तविक कारणेंही होतीं. महायुद्धाचे काळीं गोऱ्या कारखानदारांशीं स्पर्धा नसल्यामुळें जपाननें कारखान्यांतून निघेल तो माल जसाच्या तसा बाहेर पाठविला. त्याच्या चांगुलपणाविषयीं आणि एकजात-पणाविषयीं फारशी फिकीर केली नाहीं. पुढें गोऱ्यांचा माल येऊं लागल्या-बरोबर जपानी मालाला ठोकर बसूं लागली. तो खात्रीचा नसल्यामुळें

बाजारांत जपानची पत कमी झाली. परदेशीं पाठविलेले मालाचे पेटारे स्वदेशीं परत येऊं लागले, तेव्हां कारखानदारांचे आणि सरकारचे डोळे उघडले. सरकारनें कारखानदारांना बोलावून या बाबतींत सुधारणा करण्याविषयीं बजावलें. या परिस्थितींतून जपानी उद्योगधंद्यांनीं मार्ग कसा काढला तें एका उदाहरणावरून दिसून येईल.

**पत परत मिळविली—**

जपानी ब्रशांचा व्यापार आज फार मोठा आहे. महायुद्धाच्या काळांत हा व्यापार खूप वाढला आणि कसाही माल बाहेर निघाला तरी तो खपत असे. युद्ध संपल्यानंतर ही स्थिति पालटली. हलका आणि वाईट माल परत येऊं लागला. लगेच सरकारनें ब्रशाच्या कारखानदारांना ताकीद देऊन परिस्थिति सुधारण्यास सांगितलें. ठराविक दर्जाचाच माल बाहेर जावा, हलका माल बाहेर जाऊं नये अशी कांहीं तरी व्यवस्था करा असें ब्रश् एक्स्पोर्ट असोसिएशनला सांगण्यांत आलें. असोसिएशननें कस्टम्स् अधिकाऱ्यांशीं विचारविनिमय करून असें ठरविलें कीं, असोसिएशनच्या अधिकाऱ्यानें मालाचा दर्जा चांगला आहे अशी खात्री करून घेऊन ओ. के. असा शिक्का मारल्याशिवाय माल जपानी बंदरांतून बाहेर जाऊं नये. असा ठराव झाल्यामुळें ठराविक दर्जाचाच माल बाहेर जातो. पेटींतील माल एकजातीचा किंवा स्टॅंडर्डाइझड् असल्याबद्दल खात्री करून घेतली जाते. या ब्रश असोसिएशनचा जो इतिहास तोच इतर पुष्कळ धंद्यांचा इतिहास आहे. आज जपानी बंदरांत पडलेल्या खोक्यांकडे पाहिलें म्हणजे त्यांच्यावर निरनिराळ्या उद्योगसंघांचे मालाच्या खात्रीविषयीं शिक्के असतात. माल तपासणारे अधिकारी चांगले परीक्षक असावेत याविषयीं असोसिएशन दक्ष राहतें.

अशा रीतीनें जपाननें आपली गेलेली व्यापारी पत परत मिळविली आहे. याचा अर्थ हलका माल तयार होत नाहीं असा नव्हे. हलका-भारी सर्व माल तयार होतो. पण मागणीप्रमाणें एका दर्जाचा, एका जातीचा व ठराविक गुणाचा माल जावा याविषयीं दक्षता बाळगिली जाते.

**सहकारी तत्त्वावर खरेदीविक्री—**

सहकारी तत्त्वाचा उपयोग आणखी अनेक मार्गांनीं जपानी उद्योगधंद्यांत व व्यापारांत करून घेतलेला आहे. माल करणावळीचा खर्च कमी होण्याला आणखी महत्त्वाचें कारण म्हणजे कारखानदार सहकारी तत्त्वावर कच्चा माल विकत घेतात व तयार झालेला माल विकतात. परदेशांत कापूस, रबर, लोखंड, कोळसा, इत्यादि माल विकत घेण्याचें काम कांहीं ठराविक थोडच्या कंपन्या करितात. त्यांचीं स्वतःचीं जहाजें असल्यानें त्या अगदीं थोडच्या खर्चांत कच्चा माल जपानमध्यें आणून टाकतात. त्याचप्रमाणें तयार झालेला माल, विशेषतः परदेशीं जाणारा, कांहीं कंपन्या घेतात आणि परदेशांत त्याचा प्रसार करितात. त्यामुळें कारखानदाराला फारसें कमिशन न जातां कच्चा माल मिळतो आणि तयार झालेल्या मालाच्या उठावाची चिंता करावी लागत नाहीं. मित्सुई, मित्सुबिशी, इत्यादि अनेक कंपन्यांचें जाळें जगावर पसरलें आहे. जपानी उद्योगधंद्यांत व व्यापारांत ही अगदीं अलीकडील अवस्था आहे. यापूर्वी हिंदी व्यापारी व जपानी कारखानदार यांचा संबंध येत असे तो दिवसेंदिवस बंद पडून भावी संबंध कारखान्याशीं न येतां व्यापारी कंपनीशीं येईल. त्यामुळें कारखाना पाहणें किंवा तेथें शिकण्याकरितां मनुष्य ठेवणें या गोष्टी दिवसेंदिवस दुष्कर होतील. या अडचणीचा विचार केला पाहिजे.

**करणावळ बेसुमार उतरली—**

शास्त्रोक्त सुधारणा आणि व्यापारी संघटना यांच्या जोरावर वस्तूची करणावळीची किंमत किती कमी झाली, आणि कामाचे तास कमी करूनही माणशीं उत्पादन किती वाढलें तें पाहण्यासारखें आहे. उत्पादनखर्चाचे दृष्टीनें विचार करितां वीजदिव्याच्या कांचा करण्याचा खर्च १९२३ पासून १९३२ च्या अवधींत ·१०० वरून ·०३७ इतका म्हणजे जवळ जवळ $\frac{१}{३}$ इतका खालीं आला. कांहीं धंद्यांत दहा वर्षांचे अवधींत माणशीं उत्पादन दुप्पट व कांहीं धंद्यांत जवळ जवळ तिप्पट वाढलें. एकीकडे कामाचे तास कमी झाले, ११ वरून ८॥ वर आले. हे सर्व आंकडे जिनीव्हा येथील लेबर

ऑफिसच्या प्रतिनिधीनें दिले आहेत. (फर्नांद मोरेत् —सोशल ॲस्पेक्टस् ऑफ इंडस्ट्रियल डेव्हलप्मेंट इन् जपान. इंटरनॅशनल लेबर ऑफिस, जिनीव्हा १९३४, पान १७ व २४.)

**'डंपिंग'ची भ्रामक कल्पना—**

उद्योगधंद्यांतील महत्त्वाचा मानवी भाग म्हणजे कामगार वर्ग. जपानवर पाश्चात्य राष्ट्रांचा असा आक्षेप आहे कीं कामगार वर्गाला पिळून बाहेर स्वस्त माल विकला जातो. याचाच अनुवाद हिंदुस्थानमध्येंही होतो. याबाबत ब्रिटिश लोकांनीं व जिनीव्हा इंटरनॅशनल लेबर ऑफिसनें चौकशी करून वरील विधानाला आधार नसल्याचा निर्वाळा दिला आहे. त्यांच्या चौकशीचा थोडक्यांत निष्कर्ष असा : जपानमध्यें पगाराचें मान कमी आहे, पण त्या मानानें वस्तूंचे बाजारभावही कमी आहेत. राहणी स्वस्ताईची आहे. राहणी आणि वेतन यांचें प्रमाण इतर देशांत जें आहे त्यापेक्षां जपानमध्यें कमी नाहीं. जपानी लोकांची राहणीच कमी खर्चाची आहे. याचा अर्थ ती कमी दर्जाची आहे असा नव्हे. उच्च अभिरुचि असूनही राहणी साधी म्हणून कमी खर्चाची असूं शकते. वॉशिंग्टन् कराराप्रमाणें मोठ्या कारखान्यांत कामाचे तास ८॥ ते ९ इतके आहेत. लहान कारखान्यांतील वेतन व कामाचे तास याबाबत समाधानकारक स्थिति नाहीं. पण त्याचा अर्थ कामगारांची भांडवलवाल्याकडून पिळणूक (सोशल डंपिंग) होते असा नव्हे. कारण तेथें मालक हा मजूरासारखाच काम करितो व त्यांच्याच पद्धतीनें राहतो. अशा लहान कारखान्यांत शेंकडा साठ टक्के कामगारवर्ग आहे. कामगाराचें उत्पन्न शेतकऱ्याच्या उत्पन्नापेक्षां बरें आहे. त्यापेक्षां फार वाढलें तर शेतकऱ्यावर अनिष्ट परिणाम होईल. सारांश, कामगारांची पिळणूक हें जपानी स्वस्ताईचें कारण नाहीं.

यांत्रिक व शास्त्रीय सुधारणा, व्यापारी संघटना, जागतिक चलनाबरोबर येन नाण्याचा उतरलेला भाव आणि कामगारांची निष्ठा या मुख्य कारणांमुळें जपानी माल स्वस्त देणें परवडतें.

जपानी औद्योगिक यशाचें निम्में श्रेय कामगारवर्गाकडे आहे.

**कमखर्ची राहणी—**

जपानी कामगाराची राहणी अल्पव्ययी आहे. एकंदर जपानी लोकांविषयीं हेंच विधान करितां येईल. घरें साधीं असल्यामुळें फारसा खर्च त्यांवर होत नाहीं. अन्न साधें व कमी खर्चाचें. घरांतील राहणींत गोऱ्या कामगाराइतक्या वस्तू जपानी माणसाला लागत नाहींत. म्हणून तो थोडक्या खर्चांत राहूं शकतो. देशांतही स्वस्ताई आहे. कामगाराला कमी वेतन द्यावें लागत असल्यामुळें कारखान्यांना स्वस्त माल देणें परवडतें.

जपानमध्यें मध्यम व वरिष्ठ अधिकाऱ्यांचेही पगार कमी आहेत. वरिष्ठ अधिकारी व कामगार या दोघांच्या उत्पन्नांत इतर देशांत जें अंतर आहे त्यापेक्षां जपानमध्यें अधिक नाहीं. कमीच असेल.

**यावज्जागर काम करितात—**

कामगारवर्ग स्वभावतःच अत्यंत कष्टाळू आहे हें जपानी समाजांत फिरणाराच्या तेव्हांच लक्षांत येतें. नागोयांत चिनी मातीच्या वस्तूंचे घरोघर लहान कारखानें आहेत. तेथें सायंकाळीं पांच वाजतांही काम चाललेलें असतें. घरांतील म्हातारे तरणे लोक, व कामाला लावलेलीं बाहेरचीं माणसें सर्व काम करीत असतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, मुलें शाळा सुटल्यावर घरीं आल्याबरोबर आईबापांच्या कामांत लगेच सामील होतात. जेवण-खाणांतही जपानी मजूर फारसा वेळ खर्च करीत नाहीं. वाडग्यांत भात घेऊन काड्यानें भराभर तोंडांत घातला कीं लागला पुन्हा कामाला. जपानी बोटीवर अधिकारी वर्गाचें भोजन अवघ्या पंधरा मिनिटांत होतें. घरगुती कारखान्यांत मालक-मजूर यांच्यांत फारसा भेद दिसत नाहीं. दोघेही सारखेच कष्टाळू दिसतात. यावज्जागर काम करण्याची जपानी वृत्ति काम-गारांतच आहे असें नव्हे तर मध्यम वर्गीयांच्या स्त्रीपुरुषांतही दिसून येते. विद्यापीठांत इंग्लिश शिकविणारा एक अध्यापक घरीं आल्यावर रेडियो जुळवीत असे. आणि तें काम नसेल तेव्हां व्यापारी चित्रकलेमध्यें वेळ घालवी.

**कारागिरीचे हात व दृष्टि—**

कांहीं समाजांत कारागिरीची पूर्वापार परंपराच असते. जपानी लोक पूर्वापार संवयीनें हस्तकलाप्रिय आहेत. जपानी जीवनांत पसरलेल्या शेंकडो सुंदर वस्तू त्यांच्या कारागिरीची व अभिरुचीची साक्ष देतात. हस्तव्यवसाय व यंत्रकला यांविषयीं त्यांना स्वाभाविक आवड आहे. वाटेल तें द्रव्य दिसलें तरी त्यापासून काय वस्तु कशी निष्पन्न करितां येईल याची नैसर्गिक दृष्टि जपानी लोकांना आहे. ते मक्याच्या पाचोळ्याची बाहुली करतील, कागदाचे विविध उपयोग करतील, बांबूपासून हजारो सुंदर जिनसा करतील, यांत्रिक खेळणीं शोधून काढतील, आणि पाहिलेल्या वस्तूची हुबेहूब नक्कलही करतील. साध्या मोलकरणीही बसल्या बसल्या लहान सहान कारागिरीच्या वस्तू हातानें करतांना दिसतात.

जपानची राहणी सुधारली ती केवळ पाश्चात्यांच्या अनुकरणानें सुधारली असें नाहीं. त्यांच्या जीवनांत अशा अनेक गोष्टी आणि सोयी आहेत कीं त्या जपानी लोकांनीं स्वतःच्या विशिष्ट परिस्थितीकरितां शोधून काढल्या आहेत. उदाहरणार्थ, थंडीच्या दिवसांत थोड्या खर्चांत पुष्कळ वेळ धग राहील अशा शेगड्या त्यांनीं स्वतःच तयार केल्या आहेत, कारण गॅस वापरणें महाग जातें.

**काम हाच धर्म आहे—**

समाधिपूर्वक काम करणें ही जपानी कारागिरांची परंपरा आहे आणि तिचा त्यांना अभिमान आहे. त्यांच्या समाजांत याविषयीं अनेक कथा प्रचलित आहेत, त्यांचा नव्या पिढीवर परिणाम होत असतो.

योशिहीरो आणि मासामुनें असे दोन प्रसिद्ध लोहकार पूर्वी होऊन गेले. एकदां राजाला उत्कृष्ट तलवार पाहिजे होती. ती करण्याविषयीं त्यानें मासामुनेला आज्ञा दिली. तें ऐकून योशिहीरोला वैषम्य वाटून तो आपल्या प्रतिस्पर्ध्याला मारण्यास निघाला. मारण्यापूर्वी त्याची काम करण्याची पद्धति पाहावी म्हणून तो दाराआड लपला व पाहूं लागला. त्यानें

पाहिलें कीं मासामुने काम करीत होता ती जागा त्यानें एकाद्या देवालया-प्रमाणें शृंगारली व पवित्र केली होती. देवपूजेकरितां पोषाख करावा तसा त्यानें ती तलवार घडवितांना केला होता. सारांश उदात्तता, गांभीर्य, व पावित्र्य ज्या वातावरणांत आहे अशा ठिकाणीं मोठ्या समाधिपूर्वक वृत्तीनें मासामुनेनें आपलें काम चालविलें होतें. तें पाहून योशिहीरो वरमला आणि त्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्याचे पाय धरले.

जपानी कारागिरांचा हा आदर्श आहे.

**पैशाची हांव नाहीं—**

स्वकर्म ही एक पूजा आहे, ही भावना अशा प्रकारच्या गोष्टीमुळें लोकांचे मनांत बिंबविली जाते. जपानी हमाल, गाडीवान, व कामगार केवळ पैशाकरितां काम करीत नाहीं. पैशाची त्याला हांव नाहीं. द्रव्याला देव मानणाऱ्या इतर देशांतील लोकांना ही वृत्ति पाहून विस्मय वाटतो. कोबेमध्यें स्थाईक झालेल्या एका हिंदी गृहस्थाकडे कांहीं मित्र आले. बाहेर जाण्या-करितां त्यांनीं मोटार मागविली आणि भाडें किती द्यावयाचें त्याची रुजवात करून देण्याविषयीं सुचविलें. त्यावर हिंदी गृहस्थानें उत्तर दिलें, "कांहीं काळजी करूं नका. गाडीवाल्याला तुमचे जादा पैसे नको आहेत." जपान-मध्यें स्वस्ताई असल्यामुळें तेथील गाडीभाडें हमाली वगैरेचे दर अमेरिकन लोकांना फारच क्षुल्लक वाटतात म्हणून ते दहावीस पैसे जादा बक्षिशी देतात. पण गाडीवाला, हमाल किंवा वाढपी प्रथम हे पैसे परत करितो, आणि पुनः आग्रह झालाच तर बक्षिशी घेतो. पण कांहीं ठिकाणीं तर आग्रह करूनही बक्षिशी स्वीकारली जात नाहीं. कामाविषयीं निष्ठा आणि द्रव्याविषयीं उपेक्षा जपानमध्यें दिसते तितकी इतरत्र दिसत नाहीं. याचा अर्थ कोणाला द्रव्य नको असा नव्हे. तुलनात्मक दृष्टीनें घ्यावयाचें एवढेंच.

**काम हीच राष्ट्रसेवा आहे—**

कामगार वर्गाचे ठिकाणीं असलेले हे गुण त्यांच्यांत पूर्वापार चालत आलेले आहेत. अलीकडे मुद्दाम नवीन निर्माण केलेला गुण म्हणजे राष्ट्रदृष्टि. कामगार-

वर्गांत वर्गकलहाचें बीज वाढू नये, म्हणून त्याला प्रतिकार करणारी अशी राष्ट्रदृष्टि वाढविण्याचा सरकारी प्रयत्न आहे, त्याचा परिणाम झाल्या-सारखा दिसतो. आपण कारखान्यांत काम करितों तें पगाराकरितां नसून राष्ट्राकरितां करीत आहोंत; माल चांगला व पुष्कळ निघाल्यास जपानचें पाऊल जगांत पुढें पडेल व त्याची कीर्ति होईल; माल वाईट निघाल्यास जपानची अपकीर्ति होईल; या भावनेनें कामगार काम करीत असतो. रशियांतील कामगार जसे विशिष्ट सामाजिक-राजकीय तत्त्वज्ञानानें भारले गेले आहेत तशीच स्थिति जपानमध्येंही कांहीं प्रमाणांत आहे. जपानी कार-खानदार मात्र तितकीच राष्ट्रदृष्टि ठेवतात कीं नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे !

कामगारवर्गाची मानसिक वृत्ति ही जपानच्या औद्योगिक प्रगतीमध्यें अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

**जगाची बाजारपेठ व जपानी माल—**

यांत्रिक प्रगति आणि कामगारांची निष्ठा यांच्या जोरावर निर्माण होणारा माल आज जगाचे कोनाकोपऱ्यांतून फेंकला जात आहे. चीन, हिंदु-स्थान, डच इंडियन बेटें, व आशियांतील इतर देश यांत आपल्या हक्काच्या बाजारपेठा आहेत असें जपानी व्यापारी धरून चालतात. ग्रेटब्रिटनशीं तुलना करितां जपानचा परदेशी व्यापार अद्याप कमी आहे. तो लौकरच ब्रिटनइतका वाढवावा अशी जपानची महत्त्वाकांक्षा आहे. १९१९ ते १९३४ या काळांतच जपानचा हिंदुस्थानांतील व्यापार २२० टक्के अधिक वाढला. हिंदुस्थानांत जकाती बसविल्यामुळें दक्षिण आफ्रिका, अमेरिका, इत्यादि देशांतील बाजारपेठा जपानी व्यापारी धुंडीत आहेत.

**दृष्टिकोन अनेक आहेत—**

जपानच्या औद्योगिक प्रगतीकडे तीन दृष्टींनीं पाहतां येईल. पाश्चा-त्यांच्या दृष्टीनें पाहिलें तर भांडवलपद्धतीचे जे गुणदोष इतर देशांत आहेत त्यापेक्षां जपानमध्यें जास्त नाहींत किंवा कमी नाहींत. गोऱ्या लोकांना जपानला नांवें ठेवण्यास मुळींच जागा नाहीं. त्यांची जपानकडे पाहण्याची दृष्टि वरकरणी

भूतदयेची असली तरी अंतर्यामीं स्वार्थी आहे. जपानी मजुरांचे वेतनापेक्षां त्यांना गोऱ्या मजुरांच्या "राहणीच्या दर्ज्या"ची काळजी जास्त आहे. तेव्हां त्यांचे आक्षेप जमेस धरण्यासारखे नाहींत. जपानच्या राष्ट्रीय दृष्टीनें पाहिलें तर कांहीं काळ तरी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत जपान पुढें येईपर्यंत त्याला सध्यांचें औद्योगिक धोरण ठेवणें जरूर आहे. आजच तो पाश्चात्यांप्रमाणें वेतन, कामाचे तास, इत्यादिबाबत कांटेकोरपणें वागूं लागला तर उद्योगधंदे झपाट्यानें वाढणार नाहींत. जपानी कामगारवर्गाचे दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला तर विद्यमान स्थितींत जपानी कारखानदारांनीं वेतनाचें प्रमाण वाढविण्यास कांहीं हरकत नाहीं. परदेशांत फार स्वस्त माल विकण्यापेक्षां थोडा महाग विकावा आणि घरच्या कामगारांना वेतन थोडें अधिक द्यावें म्हणजे त्यांची आर्थिक स्थिति सुधारेल. कामगारवर्ग आणि विचारी अर्थशास्त्रज्ञ यांच्याकडून वरील मागणी सध्यां होत आहे. तिच्याकडे जपानी कारखानदार व सरकार सहानुभूतिपूर्वक पाहतील तर देशांत समाधान नांदेल आणि जपानची प्रगति अशीच चालू राहील.

**हिंदुस्थानला आशा आहे—**

हिंदुस्थानच्या दृष्टीनें विचार करितां असें वाटतें कीं यापुढें हिंदी उद्योगधंद्यांचा जपानशीं संबंध आहे. या संबंधांत स्वतःचें हित साधून यशस्वी व्हावयाचें असेल तर वैयक्तिक प्रयत्नांपेक्षां संघटित प्रयत्न अधिक झाले पाहिजेत. जपानच्या प्रत्येक उद्योगधंद्यामागें सर्व राष्ट्र उभें आहे. या राष्ट्रापुढें कोणतीही व्यक्ति किंवा लहानसा संघ किती टिकाव धरणार? त्याला मोठ्या प्रमाणावर संघटित प्रयत्न पाहिजेत. सतराव्या शतकाच्या आरंभीं जशा प्रत्येक युरोपियन राष्ट्राच्या ईस्ट इंडियन कंपन्या व्यापाराकरितां निघाल्या, तशा उद्योग धंदे आणि व्यापार यांकरितां प्रत्येक प्रांतांत मोठ्या प्रमाणावर संघटना निघणें जरूर आहे. तसें झालें तरच दुसऱ्या देशाशीं स्पर्धा करण्याइतकें भांडवल, यंत्रसामग्री, संशोधनसंस्था, वाहतुकीचीं साधनें, बाजारपेठा, इत्यादि गोष्टींची योजना करितां येईल. देशादेशांच्या स्पर्धेत व्यक्ति अथवा छोटे संघ कोठल्या कोठें गडप होतील; फक्त देशाइतकी मोठी

संस्थाच टिकूं शकेल. आधुनिक यांत्रिक सुधारणेची परंपरा नसतांनाही जपाननें आपलें सर्व राष्ट्रीय बळ एकवटून आज औद्योगिक जगांत ठाण मांडलें आहे. ही सारी घडामोड अवघी गेल्या वीस पंचवीस वर्षांतील आहे. तिचा सूक्ष्म अभ्यास केला तर हिंदुस्थानलाही पुष्कळ सूचना मिळून निदान औद्योगिक स्वावलंबनाची स्थिति सहज प्राप्त करून घेतां येईल. राजकीय स्वातंत्र्य आणि सरकारी उत्तेजन या गोष्टी जपानप्रमाणें आज हिंदुस्थानांत नाहींत. तरीपण औद्योगिक प्रगतीला लागणाऱ्या इतर सर्व गोष्टी हिंदुस्थानलाही जपानप्रमाणें साध्य करितां येतील. जपानची औद्योगिक प्रगति स्वातंत्र्य आणि सरकारी पाठिंबा यांपेक्षां इतर गोष्टींवरच किती तरी अवलंबून आहे. हें पाहिलें म्हणजे हिंदुस्थाननेंही प्रयत्न केल्यास पुष्कळ आशा आहे असें वाटतें.

* * *

नि. ६९८

# १२

# चीन-जपानचा ‘ प्रसंग ’ अथवा लढा

**श्वेतवर्णीयांची इभ्रत व जपानची चढाई —**

रूसो-जपानी युद्धामुळें जगाचें लक्ष जपानकडे वेधलें. आशियांतील एक चिमुकलें राष्ट्र यूरोपमधील एका मोठ्या साम्राज्याचा पराभव करूं शकतें ही गोष्ट आशियांतील राष्ट्रांना विशेष आशेची वाटली. यूरोपमधील राष्ट्रांनीं या विजयाकडे कौतुकानें पाहिलें. त्याचे दूरवर होणारे परिणाम त्यांना दिसले नाहींत. त्यानंतर मांचूरिया प्रकरणामुळें पुन्हा जपानकडे जगाचें लक्ष वेधलें गेले. या प्रसंगीं जपानचें चीनवर आक्रमण होत होतें आणि त्याला युरोपियन राष्ट्रांचा विरोध होता. परंतु गोऱ्या राष्ट्रांच्या विरोधाला न जुमानतां जपाननें आपला नियोजित कार्यक्रम पार पाडला. यूरोपमधील प्रमुख राष्ट्रांनीं उचलून धरलेल्या राष्ट्रसंघानें या प्रकरणीं विरोध केला होता आणि वेळीं प्रसंगीं त्यांच्याशींही चार हात करण्याची पाळी आली तरी जपानची तयारी होती. रूसो-जपानी युद्धाचे वेळीं जपानला कांहीं यूरोपियन राष्ट्रांचा नैतिक पाठिंबा होता. परंतु मांचूरिया प्रकरणीं निश्चित विरोध होता. तरीही जपाननें त्याला जुमानलें नाहीं. त्यामुळें आशिया-यूरोप या भाषेंत विचार करणाराला आशियाचें एक पाऊल पुढें पडल्यासारखें वाटलें. आशियांतील एक राष्ट्र युरोपमधील सामर्थ्यवान् राष्ट्रांचे संघालाही

विरोध करूं शकतें ही गोष्ट इतिहासांत नवीन झाली. त्या मानानें गोऱ्या राष्ट्रांची इभ्रत खालीं उतरली. मांचूरिया प्रकरणानंतर सहा वर्षांनीं उत्तर चीन प्रकरण सुरू झालें. या प्रकरणीं जपाननें युरोपियन राष्ट्रांच्या विरोधाला जुमानलेलें नाहीं, इतकेंच नव्हे तर कैक प्रसंगीं त्यांना अप्रत्यक्षपणें युद्धाचें आव्हान दिलें आहे. गोऱ्या लोकांचा अनेकवार अपमान, त्यांचेवर आक्रमण, बोटी बुडविणें, इत्यादि अनेक प्रकार करून जपाननें एक गोष्ट सिद्ध केली कीं आतां आशियन राष्ट्रें गोऱ्या राष्ट्रांना जुमानीत नाहींत, आव्हान देऊं शकतात.

**अतिपूर्व राजकारण व हिंदुस्थान** —

मांचूरिया आणि उत्तर चीन या प्रकरणांमध्यें चीनवर जपानचें आक्रमण चाललें आहे आणि आशियांत आर्थिक साम्राज्य स्थापण्याचा जपानचा हेतु आहे, या गोष्टी इतक्या उघड आहेत कीं त्यांविषयीं विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. परंतु या राजकारणांत पौर्वात्य व पाश्चिमात्य सर्व राष्ट्रांचा हात असल्याकारणानें तें वरवर दिसतें तितकें साधें व सोपें नाहीं. गेल्या शतकांतील जगाचें राजकारण त्याचेमागें आहे. यापुढेंही चीन-जपानसंबंधाचा परिणाम सर्व युरोपियन राष्ट्रें आणि अमेरिका यांचेवर होणार आहे, म्हणून जगांत या प्रकरणाचा इतका गाजावाजा चालला आहे. गोऱ्या राष्ट्रांना ही गोष्ट अपेक्षित अशीच वाटत होती. अमेरिका-यूरोपखंडांचे हितसंबंध चीन-मध्यें व पूर्व आशियांत रुतलेले असल्यामुळें या विषयावर त्यांच्या भाषांत अलोट वाङमय निर्माण झालेलें आहे. हिंदुस्थान मात्र चीन-जपानच्या इतक्या जवळ असूनही या अति-पूर्वेकडील राजकारणाविषयीं फार अज्ञानी आहे. त्याला कारणें आहेत. हिंदुस्थानचे स्वतःचे हितसंबंध तिकडे गुंतलेले नाहींत हें एक, आणि स्वतःच्या स्वातंत्र्याच्या चळवळीपलीकडे कोठें लक्ष देण्यास त्याला सवड नाहीं हें दुसरें. परंतु यापुढें अति-पूर्वेकडील राजकारणाची धग हिंदुस्थानला लागल्याशिवाय राहणार नाहीं, म्हणून आशियांत काय घडामोडी चालतात व आपणाला त्यांपासून काय सावधगिरी घेतली पाहिजे या दृष्टीनें प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास करणें आवश्यक आहे. केवळ ‘चीनवर



राजनिष्ठेचें स्थान–राजद्वार



शितोघरापुढें प्रार्थनावाचन

जपान स्वारी करितो ' इतकी ही साधी गोष्ट आहे असें समजून नुसता जपानचा निषेध करून स्वस्थ बसणें म्हणजे राजकरणांत भाबडेपणा दाखविण्यासारखें आहे.

**जपानचा निषेध कोणी करावा —**

जपान-चीन प्रकरणांत जपानकडे पाहण्याच्या दोन दृष्टी आहेत. पाश्चिमात्य राष्ट्रांचें राजकारण ज्या भूमिकेवरून चाललें आहे ती दृष्टि, म्हणजे आजचें रूढ राजकारण. इंग्लंड, फरान्स, अमेरिका, इटली, जर्मनी, या सर्वांचें धोरण थोडचा फार फरकानें तेंच आहे. वसाहती मिळवाव्यात, असतील त्या जबरदस्तीनें राखाव्यात, इतर देशांत आपलें भांडवल गुंतवावें, व भांडवलाचे संरक्षणाकरितां त्या देशावर थोडेंफार नियंत्रण ठेवावें, आणि बाजारपेठा मिळतील तितक्या काबीज कराव्यात. या दृष्टीनें पाहतां जपाननें पाश्चिमात्य राष्ट्रांचाच कित्ता गिरवला आहे. फक्त काळाचा फरक आहे. यूरोपचें पाप झालें आहे, जपानला करावयाचें आहे. 'ए सेंट हॅज् पास्ट, ॲण्ड ए सिनर हॅज् फ्यूचर.' पापें करून भागला, संन्यासमार्गाला लागला. अशी आज यूरोप-अमेरिकेची स्थिति झाली आहे.

यूरोप-अमेरिका जपानच्या धोरणाला विरोध करितात. पण जपाननें आपल्या अडचणी निवारणाकरितां काय करावें तें सांगत नाहींत.

दुसरी दृष्टि समाजवादी राष्ट्रांची. यांच्या दृष्टीनें विचार करितां जपानचा निषेध करणें क्षम्य आहे. कारण जपानला दुसरा विधायक मार्ग दाखविण्याची त्यांच्याजवळ योजना तरी आहे. जपानच्या वृत्तीला ही योजना कितपत मानवेल व रुचेल तो प्रश्न निराळा. कारण या मार्गानें जाण्यांत कांहीं संकटें आहेत तीं घेण्याला आज पुढारलेलीं इतर राष्ट्रें तयार नाहींत, तर जपाननें तरी कां तयार व्हावें असा प्रश्न स्वाभाविकच मनांत उभा राहतो.

**शेजारधर्माचा इतिहास —**

जपानचे पूर्वआशियांतील चीन-कोरिया वगैरेशीं फार पूर्वीपासून

राजकीय संबंध आलेले आहेत. कोणतींही दोन शेजारी राष्ट्रें, परस्परांशीं लढाया आणि तह करीत असतात, तोच शेजारधर्म चीन-जपान आजपर्यंत पाळीत आले आहेत. कोरियानें दक्षिण जपानमध्यें बंडाला प्रोत्साहन दिलें म्हणून जिंगो नांवाच्या जपानी राणीनें कोरियावर इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत स्वत: स्वारी केली होती. समुद्रावर चांचेगिरी करणारे जपानी लोक वारंवार कोरियाच्या व चीनच्या किनाऱ्यावर स्वाऱ्या करीत व या देशांकडून त्यांना तशीच परत भेटही मिळत असे. चीन-जपानमध्यें परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण करण्यामुळें उत्पन्न होणारें वितुष्ट कधींच थांबलें नसून तें आजपर्यंत चालत आलेलें आहे. शांततावाद बोलणाऱ्या कोणत्याही राष्ट्राला शेजारच्या राष्ट्राशिवाय इतरांशीं सख्य जोडतां येतें. शेजारच्या राष्ट्राशीं सुरू झालेलें वितुष्ट थांबणें कठिण असतें. कारण त्यांत प्रांत देण्याघेण्याचा प्रसंग येतो, आणि तेंच दोघांनाही नको असतें. तीच चीन-जपानची स्थिति आहे.

**चीन, जपान व रशिया यांचे पूर्वसंबंध—**

रशिया, चीन आणि जपान यांचे मध्यावर असलेल्या कोरियावर या तिन्ही राष्ट्रांचा डोळा असल्यामुळें कोरिया हा बरींच वर्षें तिघांच्या वितुष्टाला कारण होत होता. कोरियांत ढवळाढवळ करून चीन जपानला शह देई; रशियाचा प्रयत्न कोरिया रशियन साम्राज्याला जोडून घेण्याचा. जपानचें म्हणणें "कोरिया ही जपानवर उपसलेली कटचार आहे. ज्याचें हातांत कोरिया, त्याचे हातांत जपान. जपानच्या ताब्यांत कोरिया असल्याशिवाय जपानला सुरक्षितपणा नाहीं." शेवटीं १९१० मध्यें जपाननें कोरिया आपल्या राज्याला जोडून घेऊन स्वत:चे दृष्टीनें हें प्रकरण संपविलें.

१८९५ सालीं चिनी जपानी युद्ध झालें; १९०५ सालीं रूसो-जपानी युद्ध झालें; आणि १९०५ सालीं पुन्हां चिनी-जपानी युद्ध झालें. कर्मधर्मसंयोगानें या तिन्ही युद्धांत जपान विजयी झाल्यामुळें त्याला चीनकडून कांहीं प्रांत मिळाले व कांहीं प्रांतांत राजकीय, व्यापारी व आर्थिक हक्क मिळाले. हे प्रांत व हे हक्क परत मिळविण्याचा चीनचा प्रयत्न पुढें सुरू झाला. पाश्चात्य

राष्ट्रेंही या वेळीं चीनच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन त्यापासून अनेक सवलती मिळविण्याचा प्रयत्न करीत होतीं. त्याचप्रमाणें जपाननेंही चीनांत आपले हातपाय पसरण्याचा सारखा प्रयत्न चालू ठेविला. त्याविरुद्ध चीननें "जपानविरोधी बहिष्काराची" चळवळ सुरूं केली. हें एक जपानला मोठें निमित्त सांपडलें. चाळीस कोटी लोकांचें राष्ट्र जपानविरोधी भावनेनें भारलें गेलें तर जपानची काय स्थिति होईल, हा जपानी मुत्सद्यांचा विचार. त्याचा परिणाम चीन-जपान राजकारणावर झाला आहे.

आजच्या चीन-जपानच्या लढ्याचीं मुळें पूर्वीच्या रशिया-चीन-जपान राजकारणापर्यंत खोल गेलीं आहेत. झारशाहींतील रशियाचा प्रयत्न आशियाच्या पूर्व किनाऱ्यावर आपला अंमल बसवावा असा एकसारखा चालू होता. त्याला चीनचा व जपानचा सतत विरोध होत होता, पण प्रत्यक्ष लढून रशियाचा पराभव करण्याचें श्रेय जपाननें घेतलें. जपानचे अनेक वीर या लढ्यामध्यें मांचूरियांत धारातीर्थीं पडले म्हणून चीननें जपानला मांचूरियांत रेलवेच्या व इतर सवलती दिल्या. पुढें १९०५ मध्यें चीन-जपान युद्ध झालें त्यांतही तहाप्रमाणें कांहीं प्रांत चीनकडून जपानकडे गेले. यापूर्वीच्या इतिहासांत कोरियाचा उपयोग करून किंवा अन्य रीतीनें जपानला शह देण्याचा प्रयत्न चीन आणि रशिया दोघांकडूनही झाला. हीं दोन राष्ट्रें जपानच्या किनाऱ्याला जवळ आहेत तोंपर्यंत आपल्याला सुरक्षितता नाहीं; जपान, रशिया आणि चीन यांच्या मध्यावर नामधारी राष्ट्रें निर्माण करून त्यांना जपानच्या नियंत्रणाखालीं ठेविलें पाहिजे—अशा प्रकारचें धोरण जपानी मुत्सद्यांनीं व लष्करी अधिकाऱ्यांनीं त्या वेळीं बांधलें. तें धोरण १९३१ सालीं यशस्वी होऊन मांचूरियाचें 'स्वतंत्र' राज्य निर्माण झालें. 'स्वतंत्र' याचा अर्थ जपानला अनुकूल आहे तोंपर्यंत स्वतंत्र असा घ्यावयाचा.

**चीनचे अंतस्थ प्रश्न —**

मांचूरिया जपानचे तंत्राखालीं गेल्यापासून चीनमध्यें जपानविरोधी बहिष्काराची चळवळ अधिकच जोरानें सुरू झाली. क्रमिक पुस्तकांतून व इतर मार्गांनीं सर्व राष्ट्रांत जपानविरुद्ध लोकमत तयार करण्याचा प्रचार

चीननें चालविला. चीनमध्यें इंग्लंड, अमेरिका, जर्मनी वगैरे इतर राष्ट्रांनींही व्यापारी व राजकीय आक्रमण केलेलें आहे. परंतु त्या सर्वांचें शत्रुत्व एकदम घ्यावयास नको म्हणून चीननें आपल्या प्रचाराचा मोर्चा शेजाऱ्याकडे वळविला. उद्देश असा कीं राष्ट्रांत एकी घडवून आणण्याकरितां सर्व समाजाची शक्ति एकाद्या शत्रूकडे वळविली पाहिजे. त्या शत्रूच्या भीतीमुळें राष्ट्रांतील मतभेद नाहींसे व्हावेत व एकी घडून यावी. चाळीस कोटी लोकांत एकी घडवून आणणें हा हिंदुस्थानप्रमाणेंच चीनचाही मोठा महत्त्वाचा प्रश्न.

प्रसिद्ध देशभक्त सन्यत्सेन यानें १९११ सालीं चीनमध्यें राज्यक्रांति करून लोकसत्तात्मक राज्य स्थापन केलें. त्यापूर्वी सर्व देशभर बलाढ्य सरदार पसरले होते. प्रत्येकाचें स्वतंत्र सैन्य असे. त्याचा उपयोग परस्परांशीं लढण्याकरितांच विशेष होई. एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उगम झाला नव्हता. सन्यत्सेनच्या प्रयत्नामुळें एकसूत्रता येण्याला प्रारंभ झाला. परंतु चीनमध्यें पूर्णपणें एकी घडून आणणें फार कठिण काम होतें. प्रत्येक प्रांताचा आणि पुढाऱ्याचा सवता सुभा, सहकारिता नाहीं, एकसारखे कलह अशी स्थिति होती. हे मतभेद आणि हीं भांडणें यांत महायुद्धानंतर कम्यूनिझम्च्या उदयामुळें आणखी भरच पडली. चीनमध्यें राष्ट्रीय सरकार स्थापन झालें, त्याला कम्यूनिस्ट चिनी पुढाऱ्यांचा विरोध होऊं लागला. नानकिंग व कँटन येथील पुढाऱ्यांतही एकसारखीं भांडणें चालत. मांचूरिया प्रकरणामुळें थोड्या प्रमाणांत आपापलीं भांडणें चिनी लोक विसरून गेले आणि एकदिलानें लढले. परंतु मांचूरिया प्रकरणानंतरही कँटन व नानकिंग पुढारी यांची आणि कम्यूनिस्ट व राष्ट्रीय सरकार यांचीं भांडणें चालू झालीं. शेवटीं महत्प्रयासानें १९३६ मध्यें कँटन-नानकिंग पुढारी एक झाले. कम्यूनिस्ट व राष्ट्रीय सरकार यांच्यामध्येंही कांहीं तडजोड झाली. कम्यूनिस्टांनीं राष्ट्रीय सरकारचा पुढारी च्यँग कै शेक याला प्रथम पळवून नेलें व त्याच्याकडून कांहीं अटी कबूल करून घेऊन मग त्याला सोडून दिलें. या अटींमध्यें चीनांत कम्यूनिझम्चा प्रसार करण्याची अट आहे असें जपानी लोक सांगतात. चिनी लोक तें नाकबूल करितात. सारांश शेजारीं जपानमध्यें एवढी औद्योगिक आणि राजकीय प्रगति चालू असतां चीननें आपलें सामर्थ्य भांडणांत

खर्च केलें आणि अखेर जपानचें चक्र आलें तेव्हां त्याचे डोळे उघडले. पण फार उशिरा डोळे उघडल्यामुळें उपयोग झाला नाहीं.

**जपानला कारणें मिळालीं —**

चीनचा कम्यूनिस्टांशीं करार झाल्यामुळें जपानला आणखी कारण मिळालें. चाळीस कोटी लोकसंख्येचा चीन कम्यूनिस्ट झाला तर जपानचें काय होईल हा दुसरा विचार जपानी पुढाऱ्यांच्या मनांत आला.

मांचूरिया प्रकरणानंतर चीननें एकीचा प्रयत्न करून औद्योगिक आणि लष्करी सामर्थ्य मिळविण्याचा प्रयत्न केला. १९३२ ते १९३७ या पांच वर्षांत चीननें आपलें सामर्थ्य चांगलें वाढविलें. पण या सामर्थ्य-संपादनाबरोबर जपानविरोधी बहिष्काराची चळवळ सतत चालू होतीच. एकीकडे जपानशीं उघड शत्रुत्व धरून चीनची लष्करी तयारी चाललेली; एकीकडे जपानची लष्करी तयारी पूर्ण झालेली; आणि युरोपियन राष्ट्रें आपापल्याच अडीअडचणींत सांपडलेलीं, अशा स्थितींत एकच गोष्ट संभवनीय होती; ती म्हणजे चिनी–जपानी लढा. चाळीस कोटी चिनी लोकांना लष्करी दृष्टचा सामर्थ्यवान् होण्याची संधि दिली आणि पुढेंमागें जर चीनचा मोर्चा जपानकडे वळला तर छोटचा जपानचें काय होईल असा प्रश्न कोणाच्याही मनांत स्वाभाविकपणेंच आला असता. जपानला विरोध करण्याचा उघड हेतु धरून हें सामर्थ्य वाढविले जात होतें. म्हणून हा भावी अनर्थ मुळांतच थांबविणें योग्य आहे अशा हेतूनें चिनी-जपानी लढा सुरू झाला.

**चीनमध्यें युरोपियन चाणक्यनीति —**

चीनमध्यें पाश्चिमात्यांनीं आपला राजकीय, व्यापारी आणि प्रादेशिक व्याप खूप वाढविला आहे. हँगकाँग हें चिनी बंदर ब्रिटिशांच्या मालकीचें आहे. शांघायमध्यें सर्व युरोपियन-अमेरिकन राष्ट्रांनीं आपली हक्काची स्वतंत्र वसाहत स्थापन केलेली आहे. उद्योगधंदा आणि व्यापार या निमित्तानें इंग्लंड-अमेरिका इत्यादि राष्ट्रांचें भांडवल चीनमध्यें गुंतलेलें आहे. या सर्व आक्रमणाविरुद्ध चीननें वारंवार निष्फळ प्रतिकार केला. शेवटीं चीनच्या

प्रांतांत चाललेली आंतरराष्ट्रीय चुरस थांबविण्यासाठीं इंग्लंड-अमेरिका-फरान्स-जपान इत्यादि प्रमुख नऊ राष्ट्रांनीं १९२२ मध्यें वॉशिंग्टन येथें करार करून यापुढें चीनवर प्रांतिक आक्रमण करावयाचें नाहीं असें ठरविलें. यापूर्वी झालेलें ब्रिटिशांचें व इतरांचें आक्रमण कायमच राहिलें, त्याला बाध आला नाहीं. या करारानंतर प्रांतिक आक्रमण थांबलें पण भांडवली आक्रमणाला सुरुवात झाली. एकाद्या देशांत भांडवल घातलें म्हणजे त्या भांडवलाचे संरक्षणार्थ कांहीं राजकीय सवलती मिळविणें जरूरच असतें. महायुद्धानंतर चीनमध्यें इंग्लंड–अमेरिकेनें आपले हातपाय भांडवलाचे रूपानें पसरले. चीनची कामधेनू सर्वच राष्ट्रांना पाहिजे. प्रत्येकाचे मार्ग निराळे आहेत इतकेंच.

चीनची लष्करी तयारी जपानच्या विरुद्ध चालली होती. १९३७ नंतर आणखी पांच दहा वर्षे तयारीला मिळालीं असतीं तर चीननें जपानचा सहज प्रतिकार केला असता. पण पुढें मागें चीन जपानचा मित्र होऊन दोघेही गोऱ्या राष्ट्रांविरुद्ध उठले तर? तर सर्व गोऱ्या लोकांना चीनांतूनच काय सर्व आशिया खंडांतून पाय काढावा लागला असता. त्याकरितां चीन प्रबळ होणें म्हणजे गोऱ्या राष्ट्रांचेंही मरणच होतें. म्हणून चीनची तयारी झाली नाहीं तोंच चीन-जपानचा लढा सुरू होण्यांत व त्यामुळें दोघांच्याही सामर्थ्याची खच्ची होण्यांत गोऱ्या राष्ट्रांचा फायदा होता. चीनला जपान-विरुद्ध लढावयास लावण्यांत यूरोपचें राजकारण असावें असा स्वाभाविकच तर्क कोणीही करील. चीन-जपान दोघेही लढून दुर्बळ झाले म्हणजे युरोपियन राष्ट्रें न्याय तोडण्यास येतील व स्वतःच्या हितसंबंधांत विघ्न येणार नाहीं अशा रीतीनें निवाडा करतील असा भावी घटनेविषयीं अंदाज आहे.

**कम्यूनिझम् व जपानिझम्चा लढा —**

रशियाचे आणि जपानचे पूर्वापार संबंधही मोठ्या सलोख्याचे नाहींत. झारशाहीचा प्रयत्न रशियाच्या साम्राज्याची सीमा जपानपर्यंत भिडवावी असा होता. हें अस्वल आपल्या शेजारीं आल्यास आपल्याला केव्हांच गिळून टाकील या धास्तीनें त्याला चार हात दूर ठेवण्याचा जपानचा सारखा प्रयत्न

चालू आहे. रूसो-जपानी युद्ध त्यांतूनच निर्माण झालें, त्याकरितांच जपाननें कोरिया घेतला, आणि मांचूरियाचें नवीन राज्य त्याकरितांच निर्माण केलें. महायुद्धानंतर रशियांत बोल्शेव्हिकांची सत्ता स्थापन झाली. त्यांनीं आपला मतप्रचार जपान व चीनमध्यें सुरू केला. चीनचा एक प्रांत कम्यूनिस्ट झाला. जपानमध्येंही या विचाराचें वारें पसरलें. जपानमध्यें आधुनिक सुधारणा आली तरी राजसत्ता आणि आर्थिक समाजरचना या बाबतींत त्यानें पूर्वींचीच पद्धति चालू ठेविली. जपानमध्यें राजा म्हणजे देव. बोल्शेव्हिजम्चीं तत्त्वें राजसत्ता आणि जुनी समाजरचना यांना प्रतिकूल आहेत. म्हणून जपानी पुढाऱ्यांनीं बोल्शेव्हिक कल्पनांचा जपानमधून समूळ उच्छेद केला, आणि आपल्या देशांत हें वारें येऊं द्यावयाचें नाहीं असें ठरविलें.

चीनमध्यें कम्यूनिस्ट पक्ष आणि राष्ट्रीय सरकार यांचें संगनमत झाल्यामुळें चीन कम्यूनिस्ट होतो कीं काय अशी जपानला भीति पडली. कम्यूनिझम् आणि जपानिझम् यांत तीव्र विरोध आहे. सर्व चीन कम्यूनिस्ट झाला तर त्याचें आक्रमण जपानवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून चीनमधून विद्यमान राष्ट्रीय सरकार व त्याच्याशीं सहकार्य करणारे कम्यूनिस्ट या दोघांचाही निःपात करणें हें जपानचें धोरण निश्चित झालें आहे. चीन-जपान लढ्याच्या प्रारंभीं रशियानें अप्रत्यक्षपणें चीनला मदत सुरू केल्यामुळें मुळें जपानच्या संशयाला पुष्टीच मिळाली.

**वसाहतींकरितां तृष्णा —**

पूर्व आशियामध्यें युरोपियन लोकांचा प्रसार सोळाव्या शतकापासून झाला. तीनशें वर्षांत त्यांनीं पूर्वेकडील बहुतेक प्रदेशांत आपलें राजकीय आणि व्यापारी वर्चस्व स्थापन केलें. इंग्लंडनें हिंदुस्थान, ब्रह्मदेश व ऑस्ट्रेलिया घेतला; फरान्सनें इंडोचायना घेतला; डच लोकांनीं आपल्या देशाच्या बहात्तर पटीनें मोठा असा मुलूख जाव्हा-सुमात्रा इत्यादि दक्षिण बेटांत मिळविला; अमेरिकेनें फिलिपाईन बेटें घेतलीं; आणि चीनमध्यें या सर्वच राष्ट्रांनीं आपला तळ दिला. हें सर्व चालू असतां अडीचशें वर्षें जपाननें जगाशीं संबंध तोडला होता. १८६७ सालीं त्यानें सभोंवार पाहिलें

तों सर्व प्रदेशावर पाश्चिमात्यांनीं आक्रमण केलेलें त्याला दिसलें. जपानला आपल्या बेटाबाहेर संचार करण्याला भूमि राहिली नाहीं. जगांत पहिल्या प्रतीचें राष्ट्र व्हावयाचें तर वसाहती व साम्राज्य पाहिजे असा दंडक इंग्लंड-फरान्स-अमेरिकेनें घालून दिलेला. जपानला या राष्ट्रांच्या बरोबर येण्याची महत्त्वाकांक्षा, पण वसाहती मिळविण्याला वाव राहिला नाहीं. त्यानें मांचूरियामध्यें कांहीं हक्क मिळविले पण तेथेंही चीननें प्रतिकार करण्यास प्रारंभ केला. जपानच्या विकासाला क्षेत्र राहिलें नाहीं. वसाहतींच्या या स्पर्धेत आपण मागें पडलों; आतां तरी घाई केली पाहिजे असें जपानला वाटूं लागलें.

**आशियाचा अपमान जपानला झोंबला —**

स्वतःच्या वसाहती नाहींत म्हणून इतर देशांत जाऊन शांततेनें वसाहत करण्याचा जपानी लोकांनीं प्रयत्न केला. अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, इत्यादि विरळ वस्तीच्या मुलखांतून जपानी लोक पसरूं लागले. परंतु हे पीतवर्णीय लोक आपल्या देशांत नागरिक नकोत असें म्हणून अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया, इत्यादि सर्वांनीं जपानी रहिवाश्यांविरुद्ध कायदे पास केले आणि त्यांच्या प्रसारावर निर्बंध घातले. या एका गोष्टीनें मात्र स्वाभिमानी जपानी लोकांच्या अंगाचा दाह झाला. आशियांत वसाहत करणारे गोरे लोक आशियाटिक लोकांना मात्र आपल्या प्रदेशांत वस्ती करूं देत नाहींत हा अन्याय जपानी लोकांना फार झोंबला. कांहीं जपानी लोकांनीं या गोष्टीचा निषेध म्हणून अमेरिकन कौंसलच्या इमारतीपुढें हाराकिरी करून आपलें पोट फाडून घेतलें. गोऱ्या लोकांनीं आशियाटिक लोकांवर घातलेल्या बहिष्कारानें जपानी लोकांना जितकी चीड आली तितकी इतर कोणत्याच आशियांतील देशाला आली नाहीं. प्रत्येक जपानी माणसाच्या अंतःकरणांत ही गोष्ट शल्यासारखी बोंचत आहे. अगदीं जिव्हाळ्याची गोष्ट तो बोलूं लागला म्हणजे या प्रश्नावरील त्याच्या कडवट भावना व्यक्त झाल्याशिवाय राहात नाहींत. सर्व गोऱ्या लोकांना आशियांतून हांकलून दिलें पाहिजे; या बाबतींत इतर आशियाटिक राष्ट्रांनीं एक होऊन काम केलें पाहिजे;

जपाननें हें कार्य अंगिकारलें आहे त्याला हिंदुस्थाननें मदत केली पाहिजे; इत्यादि विचार प्रत्येक जपानी मनामध्यें खोल दडून बसलेले आहेत. जपानशीं प्रत्यक्ष संबंध आल्याशिवाय या विचारांची प्रखरता कळणें शक्य नाहीं.

पाश्चिमात्य राष्ट्रें जपानला आपल्या वसाहतींत पाय ठेवू देत नाहींत, आणि जपानला स्वतःच्या अशा वसाहती नाहींत. अशा स्थितींत वाढत्या लोकसंख्येची सोय कोठें तरी करणें जरूर आहे. म्हणून मांचूरिया, उत्तर चीन, इत्यादि भागांकडे जपाननें आपली दृष्टि वळविलेली आहे. आणि पुढें मागें आशियांतील गोऱ्या लोकांच्या वसाहतीकडे जपानचा मोर्चा वळणें कांहीं अशक्य नाहीं हें पाश्चिमात्य राष्ट्रें जाणून आहेत. त्या दृष्टीनें जपान प्रबळ होणें त्यांच्या अस्तित्वाला बाधक होईल. चीन-जपान युद्ध हें जपानची शक्ति खच्ची करण्याचें एक चांगलें साधन आहे असें आशियांत हितसंबंध असलेल्या गोऱ्या लोकांना वाटल्यास नवल नाहीं.

**बाजारपेठेंतील भांडण —**

वसाहतीमुळें जसा जपानचा गोऱ्या राष्ट्रांशीं विरोध आला तसाच व्यापारामुळेंही आलेला आहे. महायुद्धानंतरच्या काळांत जपानची औद्योगिक वाढ खूप झालेली आहे. आपल्या मालाच्या स्वस्ताईमुळें, आजपर्यंत गोऱ्या व्यापाऱ्यांनीं काबीज केलेल्या व्यापारी पेठांवर त्यानें आक्रमण सुरू केलें आहे. त्याचा परिणाम अर्थातच इंग्लंड-अमेरिकेंतील कारखान्यांवर होत आहे. हें असेंच चालू राहिल्यास जगाच्या व्यापारी पेठा जपानच्या ताब्यांत जाऊन आपल्याला दुकान गुंडाळावें लागेल; व्यापारी वर्चस्व गेलें कीं राजकीय वर्चस्वही खलास झालें, हें सत्य श्वेत राष्ट्रें जाणून आहेत. म्हणून श्वेत राष्ट्रांचें व जपानचें युद्ध सध्यां चीनमध्यें चालू आहे. चीन हें साधन आहे, साधनाचा उपयोग करणारे यूरोप-अमेरिकेंत आहेत.

**चीन-जपान भांडणांत लाभ कोणाचा ?—**

जपान ही आशिया खंडांतील वाढती शक्ति आहे. ती प्रबळ झाल्यास जगाच्या पूर्व भागावर स्वामित्व गाजविल्याशिवाय राहणार नाहीं. आज

पूर्व आशियांत गोऱ्या लोकांचें साम्राज्य आहे. इंग्लंड, फरान्स, हॉलंड, इत्यादि राष्ट्रांना आपल्या मायदेशाच्या किती तरी पटीनें मोठे असे प्रदेश आशियांत मिळालेले आहेत. त्यांना पुढें मागें जपानचा शह बसणारच. साम्राज्यसंपादनाचें तंत्र जपान पाश्चिमात्यांपासूनच शिकलेला आहे. त्याला विरोध करून मुळांतच खच्ची केलें तर श्वेत राष्ट्रांचें आशियांत वर्चस्व राहील. जपाननें आपलें सैन्य, आरमार आणि वैमानिक सामर्थ्य जगांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्राप्रमाणें वाढविलें आहे. पूर्वेकडे सध्यां स्वतंत्र व पुढें येण्यासारखीं दोन राष्ट्रें आहेत; जपान व चीन. त्यांच्यांत एकी झाली तर श्वेत राष्ट्रांचें आशियांतील अस्तित्व संपलें. त्यांच्यांत स्पर्धा लागली तर परस्परांचें सामर्थ्य कमी होऊन श्वेत राष्ट्रांचें वर्चस्व आहे तें कायम राहील. दोन राष्ट्रांत दुर्बल असेल त्याचा पक्ष घेऊन त्याला प्रत्यक्षपणें अथवा अप्रत्यक्षपणें मदत करावी. त्याला मदत करून प्रतिपक्षाचें सामर्थ्य कमी करावें आणि मदत केल्याबद्दल दुर्बल राष्ट्राकडून राजकीय व व्यापारी सवलती घेऊन आपला पाय अधिक रोवावा. श्वेत राष्ट्रांचें हें राजकारण प्रत्येक देशांत चाललें तेंच मोठ्या प्रमाणावर पूर्व आशियांत सध्यां चाललें आहे. "फूट पाडून राज्य करा" या राजनीतीचें चालू पिढींतील उदाहरण म्हणजे हा चीन–जपान लढा. चिनी-जपानी पुढाऱ्यांना आज हें धोरण कळत नसावें असें नाहीं. पण प्रत्येक देशाला असें वाटत आहे कीं आपण सध्यां परिस्थितीचा उपयोग करून घ्यावा, पुढें काय होईल तें होईल.

**लढ्याचें बहुविध स्वरूप —**

सारांश चिनी-जपानी लढा हा केवळ चीन आणि जपान यांच्यांत नसून त्यांत अनेक गुंतागुंती आहेत. एका अर्थानें जपान आणि इतर श्वेत राष्ट्रें यांच्यांत अतिपूर्वेकडील वर्चस्वाविषयींचा हा लढा आहे. दुसऱ्या अर्थानें तो चीन-जपान अथवा आशियाटिक राष्ट्रें आणि श्वेत राष्ट्रें यांच्यांतील लढा आहे. कारण श्वेत राष्ट्रांना चीन किंवा जपान कोणाचेंच सोयर सुतक नाहीं. तिसऱ्या एका दृष्टीनें तो बोल्शेव्हिझम् आणि जपानिझम् यांच्यांतील झगडा आहे. चौथ्या एका दृष्टीनें विचार केल्यास, तो इंग्लंड आणि अमेरिका

यांचा चीनमधील आर्थिक वर्चस्वाविषयींचा झगडा आहे. आज बाह्यतः इंग्लंड-अमेरिका मित्र असलेले दिसले तरी मुळांत दोन्ही देशांतील भांडवलशाहीचे चीनमधील हितसंबंधांत विरोध आलेले आहेत. त्या विरोधाला केव्हां तरी तोंड फुटेलच.

**साम्राज्यवाद्यांचें शिष्यत्व —**

चीन-जपानच्या लढ्यांत प्रत्येक बाजू आपापलें समर्थन करीत असते. प्रत्येकाच्या समर्थनांत सत्याचा आणि प्रचाराचा दोहोंचाही अंश असतो. जपानच्या बाजूनें त्याचें काय म्हणणें आहे तेंही समजून घेणें जरूर आहे. सर्व बाजूनें आपली नाकेबंदी झाल्याकारणानें केवळ नाइलाज म्हणून आपण हा मार्ग स्वीकारीत आहोंत असें जपानचें म्हणणें. जपान सध्यां अडचणीच्या स्थितींत आहे ही गोष्ट खरी. आतां या स्थितींतून बाहेर पडण्यास चीनवर आक्रमण केलें पाहिजे कीं दुसरा कांहीं मार्ग आहे याबाबत मात्र मतभेद होतील. तो राजकीय वेदांताचा प्रश्न आहे. या बाबतींत इंग्लिश-अमेरिकन-फ्रेंच-जर्मन इत्यादि राष्ट्रांच्या पावलावर पाऊल टाकून जपान चालला आहे.

**वाढती लोकसंख्या —**

वाढत्या लोकसंख्येला कोठें तरी वाव करून दिला पाहिजे हा जपानपुढें प्रश्न आहे. त्याची लोकसंख्या आतांपर्यंत वर्षाला दहा लाख किंवा दशवर्षाला एक कोटी याप्रमाणें वाढत आलेली आहे, आणि याच प्रमाणांत किंवा थोडी आगेमागें यापुढें कांहीं काळ तरी वाढत राहील. लोकसंख्यावाढीचें प्रमाण पुढील आंकड्यावरून लक्षांत येईल.—

जपानी लोकसंख्येची वाढ. (आंकडे लक्षांचे आहेत.)

| वर्ष | लोकसंख्या | जन्म | मृत्यु | वाढवा |
|---|---|---|---|---|
| १९२० | ५५९ | २० | १४ | ६ |
| १९३० | ६४४ | २० | ११ | ९ |
| १९३६ | ७०२ | २१ | ११ | १० |

जपानमध्यें लोकवस्ती अतिदाट झालेली आहे हें प्रवास करितांना लक्षांत येतें. शहरें व खेडेगांवें एकाला एक लागल्यासारखीं आहेत. तोकियोची वस्ती साठ लाख आणि योकोहामाची वस्ती सात लाख आहे. या दोन शहरांत फक्त वीसपंचवीस मैलांचें अंतर असून दोन्ही शहरें लोकवस्तीनें एकमेकांना जोडलेलीं आहेत असें वाटतें. तीच स्थिति ओसाका-कोबे या मोठ्या शहरांची आहे. त्यांची लोकवस्ती अनुक्रमें तीस लाख आणि दहा लाख आहे, पण शहरें रेल्वेनें अर्ध्या तासाचे अंतरावर आहेत. लहान गांवेंही अगदीं एकमेकांना जवळजवळ अशीं वसलेलीं आहेत. कांहीं ठिकाणीं दोन गांवांत फक्त नदीच्या पुलाइतकेंच अंतर असतें. लहानांत लहान शाळा पाहण्याचा प्रयत्न केला तर पांचशें मुलांची शाळा पाहतां येईल. लहान मुलांची संख्या मोठी आहे. नाटचगृहें, करमणुकी, इत्यादि ठिकाणीं ही गोष्ट विशेष लक्षांत येते.

**शेतकऱ्याची गरिबी—**

या वाढत्या लोकसंख्येला आतां जपानमध्यें वाव दिसत नाहीं. खेडेंगांवांत शेतीवर आधींच गर्दी झाली आहे. घरांतील एक मुलगा शतीवर निर्वाह करूं शकतो, इतरांना गांव सोडून जावें लागतें. प्रत्येक खेडयांतील बहुसंख्य तरुण मुलें व मुली घर सोडून कामधंद्याकरितां शहरांत गेलेलीं आढळतात. गेल्या दोन पिढयां शास्त्रीय सुधारणांमुळें शेतीचें उत्पन्न दुप्पट वाढलें आहे, तरी केवळ शेतांत होणाऱ्या उत्पन्नावर सर्व लोक जगणें दिवसेंदिवस अशक्य होत चाललें आहे असें स्पष्ट दिसतें. खेडयांतून अत्यंत गरिबीची स्थिति आढळून येते.

**व्यापारवाढीच्या प्रयत्नालाही बंधनें—**

शेतीवर सर्व लोक जगणें अशक्य असल्यामुळें उद्योगधंदे वाढविणें हा एक मार्ग उरला. त्या दृष्टीनें जपानी लोकांनीं गेल्या पिढींत खूप प्रगति करून आपले उद्योगधंदे वाढविले. आतां हा तयार झालेला माल कोठें तरी विकला गेला तरच उद्योगधंदे चालतील म्हणून जपाननें सर्व जगांतील

बाजारपेठा धुंडाळून आपला माल विक्रीस पाठविला. परंतु पाश्चात्यांच्या ताब्यांत ज्या पेठा होत्या त्या ठिकाणीं त्यांनीं जपानी मालाची आपल्या मालाशीं स्पर्धा होऊं नये म्हणून त्याच्यावर भारी जकाती लादल्या. या जकातींना तोंड देऊनही जपानचा माल आंत जाऊं लागला तेव्हां त्या अधिकच वाढविण्यांत आल्या. त्यामुळें जपानी मालाच्या विक्रीला अडचण होऊं लागली. उद्योगधंदे आणि व्यापार वाढवून त्या मार्गानें आपल्या लोकसंख्येचा प्रश्न जपानी सोडवूं लागले तरी श्वेत राष्ट्रांचा अडथळा होऊं लागला, तेव्हां स्वाभाविकच पुढचा विचार जपानी डोक्यांत आला.

आज बहुतेक बाजारपेठा श्वेतवर्णीयांनीं काबीज केल्या असून त्यांच्या अंमलाखालीं त्या आहेत. जपानच्या उद्योगधंद्यांना शाश्वती यावयाची असेल तर त्यांच्या हक्काच्या, मालकीच्या किंवा तत्समान अशा पेठा पाहिजेत. तीच स्थिति कच्च्या मालाची. आज हिंदुस्थानांतून कापूस मिळूं शकतो, उद्यां ब्रिटिश सरकारनें मनांत आणल्यास तो बंद होईल. कच्च्या मालाचे प्रदेश ताब्यांत असल्याशिवाय उद्योगधंद्यांना शाश्वती नाहीं. इंग्लंड, अमेरिका इत्यादि राष्ट्रांना स्वतःच्या बाजारपेठा व कच्चा माल उत्पादन करणारे प्रदेश आहेत. त्या राष्ट्रांचे बरोबर यावयाचें असेल तर जपानलाही बाजारपेठा व कच्चा माल असलेले प्रदेश पाहिजेत. अगदीं शेजारींच मांचूरियांत व उत्तर चीनांत असले प्रदेश आहेत. आज ते जपाननें हस्तगत न केले तर तेथें अमेरिकन आणि इंग्लिश भांडवल येत आहे. अशा स्थितींत ते प्रांत तांतडीनें आपल्या ताब्यांत घेण्याकरितां जपाननें हें प्रकरण धसाला लाविलें आहे.

अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया इत्यादि ठिकाणीं वसाहत करण्याला परवानगी नाहीं, स्वतःच्या वसाहती नाहींत, शेती वाढविण्याला वाव नाहीं, उद्योगधंदे वाढले तर श्वेत राष्ट्रें बाजारपेठा बंद करितात; अशा स्थितींत स्वतःच्या वाढीला दुसरा मार्गच उरला नाहीं असें जपानचें म्हणणें आहे.

**अनुभव घेऊन धोरण बांधलें—**

अडीचशें वर्षें एकांतवासांत राहिलेला जपान एकदम इतका आक्रमण-

शील आणि लढाऊ कसा झाला याचें प्रथम आश्चर्य वाटतें. परंतु अलीकडील पाऊणशें वर्षांतील जपानच्या परराष्ट्रसंबंधाचा इतिहास पाहिला म्हणजे जपानच्या धोरणाचा खुलासा होतो. १८५३ सालीं अमेरिकेनें लढाऊ जहाजें आणि तोफा यांचे जोरावर जपानकडून तह लिहून घेतला. त्यानंतर रशियानें आपल्या साम्राज्यांत जपानचा समावेश करण्याचा घाट घातला. चीननें कोरियामधून जपानमध्यें अस्वस्थता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. श्वेत राष्ट्रांनीं जपानच्या मालाला शक्य तेथें अडचणी उपस्थित केल्या. अर्थात् या सर्व बाबतींत जपान अगदीं निर्दोषीच होता असें नव्हे. पण शेजारच्या राष्ट्रांच्या अशा संबंधांतून जपानचें परराष्ट्रविषयक धोरण जन्माला येणें साहजिक आहे. मागील अनुभवावरून जपानी मुत्सद्यांनीं कांहीं गोष्टी आपल्या मनाशीं ठरविल्या असाव्यात.

अमेरिकेसारख्या राष्ट्रानें पुन्हा तोफांच्या जोरावर तह करून घेऊं नये इतकें जपानचें सामर्थ्य सतत तयार पाहिजे. त्या दृष्टीनें जपानचें सैन्य, आरमार आणि वैमानिक दल आज तयार आहे. रशियासारख्या राष्ट्राची जपानवर स्वारी होण्याची शक्यता नाहींशी केली पाहिजे. म्हणन कोरिया आपल्या ताब्यांत घेऊन मांच्यूकोचें संस्थान निर्माण केलें गेलें. शेजारचें राष्ट्र जपानवर स्वारी करण्याला समर्थ न होईल अशी काळजी घेतली पाहिजे. म्हणून चीनची लष्करी तयारी पुरी होते न होते तोंच उत्तर चीन प्रकरण धसास लागलें. कच्चा माल आणि बाजारपेठा यांबाबत पाश्चिमात्यांच्या आहारीं जाऊन उपयोगी नाहीं. जपानच्या हातांत या गोष्टी पाहिजेत. युद्धप्रसंगीं ज्या राष्ट्राजवळ स्वतःचा कच्चा माल असेल तेंच टिकाव धरील. म्हणून जवळच असलेला उत्तर चीनचा सुपीक मुलूख जपाननें आपल्या आटोक्यांत ठेवण्याचें धोरण ठरविलें. गेल्या शेंदीडशें वर्षांत श्वेत राष्ट्रांनीं चीनमध्यें सारखा धुमाकूळ घातला तरी चीनमध्यें कधीं एकी झाली नाहीं आणि परकीय आक्रमणाचा एकजुटीनें चीननें कधीं यशस्वी प्रतिकार केला नाहीं. आतां प्रादेशिक आक्रमण संपलें आहे पण भांडवली आक्रमण चालूच आहे. चीनला भांडवल पुरवून श्वेत राष्ट्रें तेथें आपला कायमचा तळ देऊन बसणार, आणि स्वतःच्या प्रदेशांत मात्र आशियाटिक लोकांना बंदी करणार.

त्यापेक्षां जपानी भांडवलवाल्यांच्या ताब्यांत चीन गेला तर काय वाईट, असा विचार जपानी मनांत येणें अगदीं साहजिक आहे.

उत्तर चीन प्रकरणाचे मागें इतका सर्व इतिहास आहे. रशिया, चीन, व श्वेत राष्ट्रें इतक्या सर्वांचीं पापपुण्यें या प्रकरणाचे तळाशीं आहेत. ज्या गोष्टी आजपर्यंत चीन-रशिया-इंग्लंड-अमेरिका इत्यादि राष्ट्रांनीं केल्या त्याच आतां जपान करीत आहे. धोरण तेंच, कर्ता मात्र बदलला.

**चीनचें भवितव्य काय ?—**

चीन प्रकरणांत जपानचें अंतिम उद्दिष्ट तरी काय असावें असा प्रश्न स्वाभाविकपणें मनांत येतो. "चीनचा प्रदेश आम्हांला जिंकावयाचा नाहीं." असें जपानी मुत्सद्दी कंठशोष करून सांगत असतात. त्यांत अंशतः सत्य आहे. चीनपासून जपानचे दृष्टीनें दोनतीन गोष्टींची अपेक्षा आहे तेवढ्या झाल्या म्हणजे जपानचें समाधान होईल.

जपानजवळ आज हुकमी कच्चा माल नाहीं. कापडाचा धंदा जपाननें फार मोठ्या प्रमाणावर वाढविला आहे, पण त्याकरितां हिंदुस्थानांतून व अमेरिकेंतून कापूस आणावा लागतो. उत्तर चीन कापसाचे दृष्टीनें फार सुपीक आहे. हिंदुस्थानच्या दुपटीनें पिकाचें प्रमाण तेथें आहे. याशिवाय इतरही कांहीं महत्त्वाचीं कच्चीं द्रव्यें चीनमध्यें आहेत तीं जपानला आटोक्यांत पाहिजेत. चीनची चाळीस कोट लोकसंख्या म्हणजे मोठी बाजारपेठ आहे. अलीकडे जपानवर बहिष्कार घालून चीननें जपानी मालाला बंदी केल्या-सारखें झालें आहे. ही जपानविरोधी राज्यपद्धति बदलून तिच्या ठिकाणीं जपानला अनुकूल अशी राज्यपद्धति स्थापावी अशी त्याची इच्छा आहे. चीन देश सध्यां फार मोठा आहे. त्याच्यांत लौकर एकी होत नाहीं त्यामुळें परकीय श्वेतवर्णीयांना फावतें. शिवाय एवढ्या मोठ्या चीनमध्यें एकी होऊन तो प्रबळ झाला तर जपानला शह मिळेल. म्हणून चीनचीं तीन चार स्वतंत्र संस्थानें करून तेथें जपानी मतानुवर्ती राज्यपद्धती स्थापन कराव्यात अशी जपानी योजना असल्याचें ऐकू येतें.

उत्तर चीनचा बराचसा भाग जपानचे ताब्यांत आल्याबरोबर तेथें औद्योगिक वाढ कशी करितां येईल, भांडवल कशा पद्धतीनें जमवावें, इत्यादि योजना होऊन ताबडतोब कामाला प्रारंभही झाला. चीनमध्यें गेलेल्या सैनिकांनीं जपानांत परत न येतां तेथेंच वस्ती करून राहावें अशीही एक योजना सुचविली जात आहे. यावरून चीनचा जपान काय उपयोग करील त्याचा अंदाज बांधतां येईल.

मांचूरियांत जपाननें स्वतंत्र संस्थान स्थापन केलें आहे त्याचें तंत्र असें आहे : सर्व अधिकारीपदांवर मांचूरियन लोक आहेत. परंतु त्यांच्या चिटणीसांचें काम करण्याला मात्र जपानी लोक आहेत. त्यामुळें बाह्यतः अधिकार मांचू लोकांचे हातांत असल्यासारखें दिसतें. परंतु आंतली योजना मात्र जपानला अनुकूल. अशा रीतीनें सर्व कारभार आहे. हें नवीन प्रकारचें साम्राज्य आहे.

जपानची योजना यशस्वी होऊन त्यानें चीनचीं तीन चार संस्थानें केलीं तर त्यांत मांचूरियाप्रमाणें राज्यपद्धती स्थापन होतील.

**जपान्यांची सात्त्विक समजूत**—

बाहेरच्या राष्ट्रांना जपानचें हें धोरण स्वार्थी दिसत असलें तरी जपानला त्याविषयीं सात्त्विकपणा वाटत आहे. राष्ट्रांतील बहुसंख्यांकांची तशीच वृत्ति आहे. चीनमधून पाश्चात्यांची हकालपट्टी करून त्यांच्या पिळणुकीपासून त्याचें रक्षण करणें हें जपानचें ध्येय आहे. जपान चीनचा मित्र असून चीनमधील सध्यांची श्वेतवर्णीयांना अनुकूल अशी राजवट मोडून त्या ठिकाणीं दुसरी राजवट स्थापन करणें व चीनची आमूलाग्र पुनर्घटना करणें हा उद्देश आहे. श्वेतवर्णीयांचें चीनमधील वर्चस्व नाहींसें झालें आणि जपानशीं मित्रत्वाचें नातें ठेवणारी राज्यपद्धति चीनमध्यें स्थापन झाली म्हणजे सर्व आशियाची एकी लौकरच घडून येईल. चीनमध्यें सध्यां बोल्शेव्हिकांनीं धुमाकूळ मांडला आहे. त्यांचा नायनाट केल्यानें आशियांत शांतता नांदेल. सारांश या चीन-जपान प्रकरणांतून आशियाची एकी आणि शांतता

निर्माण होईल अशी बहुजनसमाजाची समजूत आहे. रणांगणावर पडणाऱ्या वीरांनाही तसेंच वाटतें.

अमेरिकन-युरोपियन प्रांतांत प्रचार करावयाचा असेल त्या वेळीं जपानचीं कारणें निराळ्या दृष्टिकोणांतून मांडलीं जातात. चीनमध्यें सर्व युरोपियन राष्ट्रांचें भांडवल गुंतलें आहे. चीनला कम्यूनिस्टांचे तावडींतून सोडविलें तर सर्वांचें भांडवल सुखरूप राहील. किंबहुना जपाननें एकदां चीनमध्यें शांतता स्थापन केली म्हणजे अमेरिकन-युरोपियन लोकांनाही आपलें भांडवल तेथें गुंतवितां येईल. अशा मतांचा प्रचार पाश्चात्य राष्ट्रांत केला जातो.

**नेमस्त जपान्यांचें मत—**

जपानमध्यें नेमस्त वृत्तीचे लोक पुष्कळ आहेत. पण सध्यांचे प्रकरणीं सर्वांचें मत एकच आहे, कीं चीनमधील सध्यांची राज्यपद्धति बदललीच पाहिजे. चीनशीं सामोपचाराचें धोरण ठेवणारे कांहीं प्रधान होऊन गेले, त्यांनीं चीन-जपानचें सख्य जोडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत त्यांना यावें तसें यश आलें नाहीं. त्यामुळें त्यानंतर येणाऱ्या प्रधानमंडळानें स्वीकारलेल्या धोरणाला नेमस्तांनींही पाठिंबा दिला. चीनमधील सध्यांची जपानविरोधी राज्यपद्धति बदलण्याविषयीं सर्वांचें एकमत आहे. पण पुढें चीनशीं संबंध कसे ठेवावेत याविषयीं मात्र मतभिन्नता असण्याचा संभव आहे.

**ध्येयवाद्यांचें समाधान—**

श्वेत-श्वेतेतर वंश, आणि आशियाटिक व युरोपियन देश या भाषेंत विचार करणाऱ्या लोकांचाही ध्येयवाद चीन-जपान प्रकरणीं तृप्त होतो. चीनच्या मागें ब्रिटिश साम्राज्य आहे. जपानचा लढा चीनशीं चाललेला नसून चीनच्या मागें दडलेल्या इंग्लंडशीं चालला आहे. इंग्लंडला आपलें आशियांतील साम्राज्य टिकवावयाचें आहे म्हणून त्याची ही धडपड चालली आहे. सध्यांच्या चीनचा पराभव म्हणजे ब्रिटिश साम्राज्याचा पराभव आहे. चीनची जपानच्या मदतीनें पुनर्घटना झाली म्हणजे आशियाटिक राष्ट्रांत एकी घडवून आणणें सोपें जाईल; असें या लोकांना वाटतें.

**दोषाचा वाटा कोणाकडे किती ?—**

कार्यकारणमीमांसा या दृष्टीनें उत्तर चीन प्रकरणाची छाननी केली आहेच. गुणदोषप्रमाणाच्या दृष्टीनें विचार करितां कोणाकडे किती दोषाचा वांटा येतो असा प्रश्न आहे. चीनवर आक्रमण करण्यांत जपान दोषी आहे ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं. ती स्पष्टच आहे. पण दोषाचें प्रमाण काय आणि मूळ दोषी कोण असाही विचार करण्यासारखा आहे. आज इंग्लंड-अमेरिका-फरान्स इत्यादि देश भांडवलपद्धतीनें चालले आहेत त्यांचेंच अनुकरण जपाननें केलें आहे. भांडवलशाहीची पद्धति स्वीकारल्याबरोबर तिचे मागोमाग ज्या गोष्टी येतात त्याच जपान करीत आहे. किंबहुना भांडवलपद्धतीनें चालावयाचें झाल्यास याशिवाय दुसरा मार्गच जपानला राहिलेला नाहीं. स्वतःच्या अस्तित्वाकरितां त्याला हें धोरण स्वीकारावें लागलें आहे. तेव्हां भांडवलशाहीच्या भूमिकेवरून विचार करणारे लोक जपानला दोष देऊं शकणार नाहींत.

आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादाचे दृष्टीनें विचार केला तर मात्र जपान दोषी ठरतो. या भूमिकेवरून विचार केल्यास जपानला दुसरा मार्ग दाखवितां येतो हा फायदा आहे. परंतु जपानच्या परंपरा आणि विचार-सरणी यांपासून समाजवाद फार लांब आहे.

जगांत पहिल्या प्रतीचें सामर्थ्यवान् राष्ट्र म्हणून जगावयाचें असलें तर कसें झालें पाहिजे याचा कित्ता साम्राज्यवादी राष्ट्रांनीं घालून दिला आहे. जपान त्याचेंच अनुकरण करीत आहे. पाश्चात्यांच्या इतर गोष्टींबरोबर जपाननें साम्राज्यवादही उचलला. त्यांत जर दोष असेल तर तो गुरूचा आहे. मुळांतच सुधारणा झाली तर पुढेंही सुधारणा होईल. म्हणून इंग्लंड, फरान्स, हॉलंड, इत्यादि राष्ट्रांच्या साम्राज्यपद्धती नष्ट झाल्याखेरीज जपा-नला दोष देण्याला या राष्ट्रांना तरी तोंड नाहीं.

दोष देण्याचा हक्क चीनला असण्याचा संभव. पण मनांत असा विचार येतो कीं गेल्या पाऊणशें वर्षांत शेजारीं जपानी राष्ट्राची इतकी प्रगति होत असतां चीननें एकजूट केली नाहीं, आपलें सामर्थ्य वाढविलें नाहीं, व

स्वसंरक्षणाची तयारी केली नाहीं. ही त्याची खरोखर मोठी चूक झाली. चीनविषयीं सहानुभूति वाटेल. पण चाळीस कोट लोकसंख्येचा प्रचंड देश असून त्याला एकद्या लहान देशापुढें नमावें लागण्याची जरूरी पडावी ही गोष्ट कांहीं इष्ट नाहीं, असाही विचार मनांत येतो.

हें विधान केल्याबरोबर हिंदुस्थानचाही प्रश्न डोळ्यापुढें येतो. त्यानें या अतिपूर्व राजकारणापासून काय बोध घ्यावा ?

**हिंदुस्थानला बोध—**

दुर्बल राष्ट्राचा त्राता या जगांत कोणी नाहीं. अशीं राष्ट्रें एथिओपिया आणि चीन यांप्रमाणें समर्थाचे भक्ष्यस्थानीं आज ना उद्यां पडणार. प्रत्येक राष्ट्र आत्मसंरक्षण करण्यास तयार असेल तरच त्याचा निभाव लागेल. क्षत्रिय मनोवृत्ति आणि राष्ट्राकरितां आत्मार्पण करण्याची तयारी हे गुण जर नागरिकांत असतील तर तें राष्ट्र जगेल. हिंदुस्थानला जगवावयाचें असेल तर हे गुण समाजांत निर्माण केले पाहिजेत.

चीननंतर हिंदुस्थानची पाळी आहे. जपानी लोकांचें म्हणणें असें आहे कीं, चीननंतर हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना घालवून देण्याकरितां आम्ही येऊं. कदाचित् ते येतीलही, पण आल्यानंतर त्याचा मोबदलाही आपणांला द्यावा लागेल ! शिवाय इतरांनीं मिळवून दिलेलें स्वातंत्र्य टिकविणें कठिण आहे. तें स्वतःच मिळविलें पाहिजे. स्वातंत्र्य मिळवितांना तें टिकविण्याची शक्तिही आपोआप उत्पन्न होत असते.

★ ★ ★

**दोषाचा वाटा कोणाकडे किती ?—**

कार्यकारणमीमांसा या दृष्टीनें उत्तर चीन प्रकरणाची छाननी केली आहेच. गुणदोषप्रमाणाच्या दृष्टीनें विचार करितां कोणाकडे किती दोषाचा वांटा येतो असा प्रश्न आहे. चीनवर आक्रमण करण्यांत जपान दोषी आहे ही गोष्ट नाकारण्यांत अर्थ नाहीं. ती स्पष्टच आहे. पण दोषाचें प्रमाण काय आणि मूळ दोषी कोण असाही विचार करण्यासारखा आहे. आज इंग्लंड-अमेरिका-फरान्स इत्यादि देश भांडवलपद्धतीनें चालले आहेत त्यांचेंच अनुकरण जपाननें केलें आहे. भांडवलशाहीची पद्धति स्वीकारल्याबरोबर तिचे मागोमाग ज्या गोष्टी येतात त्याच जपान करीत आहे. किंबहुना भांडवलपद्धतीनें चालावयाचें झाल्यास याशिवाय दुसरा मार्गच जपानला राहिलेला नाहीं. स्वतःच्या अस्तित्वाकरितां त्याला हें धोरण स्वीकारावें लागलें आहे. तेव्हां भांडवलशाहीच्या भूमिकेवरून विचार करणारे लोक जपानला दोष देऊं शकणार नाहींत.

आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादाचे दृष्टीनें विचार केला तर मात्र जपान दोषी ठरतो. या भूमिकेवरून विचार केल्यास जपानला दुसरा मार्ग दाखवितां येतो हा फायदा आहे. परंतु जपानच्या परंपरा आणि विचार-सरणी यांपासून समाजवाद फार लांब आहे.

जगांत पहिल्या प्रतीचें सामर्थ्यवान् राष्ट्र म्हणून जगावयाचें असलें तर कसें झालें पाहिजे याचा कित्ता साम्राज्यवादी राष्ट्रांनीं घालून दिला आहे. जपान त्याचेंच अनुकरण करीत आहे. पाश्चात्यांच्या इतर गोष्टींबरोबर जपाननें साम्राज्यवादही उचलला. त्यांत जर दोष असेल तर तो गुरूचा आहे. मुळांतच सुधारणा झाली तर पुढेंही सुधारणा होईल. म्हणून इंग्लंड, फरान्स, हॉलंड, इत्यादि राष्ट्रांच्या साम्राज्यपद्धती नष्ट झाल्याखेरीज जपानला दोष देण्याला या राष्ट्रांना तरी तोंड नाहीं.

दोष देण्याचा हक्क चीनला असण्याचा संभव. पण मनांत असा विचार येतो कीं गेल्या पाऊणशें वर्षांत शेजारीं जपानी राष्ट्राची इतकी प्रगति होत असतां चीननें एकजूट केली नाहीं, आपलें सामर्थ्य वाढविलें नाहीं, व

स्वसंरक्षणाची तयारी केली नाहीं. ही त्याची खरोखर मोठी चूक झाली. चीनविषयीं सहानुभूति वाटेल. पण चाळीस कोट लोकसंख्येचा प्रचंड देश असून त्याला एकद्या लहान देशापुढें नमावें लागण्याची जरूरी पडावी ही गोष्ट कांहीं इष्ट नाहीं, असाही विचार मनांत येतो.

हें विधान केल्याबरोबर हिंदुस्थानचाही प्रश्न डोळ्यापुढें येतो. त्यानें या अतिपूर्व राजकारणापासून काय बोध घ्यावा ?

**हिंदुस्थानला बोध—**

दुर्बल राष्ट्राचा त्राता या जगांत कोणी नाहीं. अशीं राष्ट्रें एथिओपिया आणि चीन यांप्रमाणें समर्थाचे भक्ष्यस्थानीं आज ना उद्यां पडणार. प्रत्येक राष्ट्र आत्मसंरक्षण करण्यास तयार असेल तरच त्याचा निभाव लागेल. क्षत्रिय मनोवृत्ति आणि राष्ट्राकरितां आत्मार्पण करण्याची तयारी हे गुण जर नागरिकांत असतील तर तें राष्ट्र जगेल. हिंदुस्थानला जगवावयाचें असेल तर हे गुण समाजांत निर्माण केले पाहिजेत.

चीननंतर हिंदुस्थानची पाळी आहे. जपानी लोकांचें म्हणणें असें आहे कीं, चीननंतर हिंदुस्थानांतून ब्रिटिशांना घालवून देण्याकरितां आम्ही येऊं. कदाचित् ते येतीलही, पण आल्यानंतर त्याचा मोबदलाही आपणांला द्यावा लागेल ! शिवाय इतरांनीं मिळवून दिलेलें स्वातंत्र्य टिकविणें कठिण आहे. तें स्वतःच मिळविलें पाहिजे. स्वातंत्र्य मिळवितांना तें टिकविण्याची शक्तिही आपोआप उत्पन्न होत असते.

★ ★ ★

# १३

# युद्धकालीन धामधुमीचें जीवन

**' हजार टाके ' रक्षाबंधन—**

मोठ्या डिपार्टमेंट स्टोअरच्या दारापुढें पायरस्त्यावर एक तरुणी उभी आहे. तिच्या तोंडावर गांभीर्य, खिन्नता आणि संयम अशा मिश्र विकारांचें प्रतिबिंब पडलेलें दिसतें. हातामध्यें एक कापड असून त्यावर तांबड्या दोऱ्यानें कांहीं फुल्या मारल्या आहेत. सुईदोरा कापडाला लावलेला तसाच आहे. दुकानावरून जाणाऱ्या येणाऱ्या स्त्रियांच्यापुढें ती मोठ्या अदबीनें कमरेपासून लवून वाकते आणि सुईदोरा व तें कापड पुढें करिते. प्रत्येक स्त्री मोठ्या गंभीरपणानें थांबून त्या कापडावर एक फुली शिवते व पुढें चालते. मोठ्या घाईंत असलेली स्त्री देखील आपलें पाकीट बगलेंत मारून पळभर थांबेल व फुली शिवून मग पुढें जाईल. त्या कापडावर हजार फुल्या पडेपर्यंत हें असें चालेल. अशा रीतीनें मोठीं दुकानें, स्टेशन, करमणुकीचीं स्थानें, सार्वजनिक उद्यानें, भोजनालयें, इत्यादि ठिकाणीं हजारों मुली आणि स्त्रिया उन्हांत-पावसांत-बर्फांत उभ्या राहून जाणाऱ्या येणाऱ्या स्त्रियांचेकडून फुल्या काढून घेण्याचें काम करीत असतात. फुल्या देणाऱ्या घेणाऱ्या सर्व स्त्रिया हें काम मोठ्या गंभीरपणानें करीत असतात.

जपानमध्यें पूर्वापार " हजार टाकी " चा हा प्रकार आहे. आपल्या-

कडील "रक्षाबंधन" अथवा 'राखी' सारखीच कांहींशी कल्पना आहे. स्त्रियांनीं हजार टाके मारलेलें हें कापड रणांगणावर सैनिकांचेकडे पाठविलें जातें. सैनिकानें तें पाठीशीं बांधलें म्हणजे त्याला मृत्यु येत नाहीं अशी जुनी समजूत आहे.

पण आज अशा समजुतीकरितांच ही गोष्ट चालू असेल काय? प्रत्यहीं शिपायांच्या मृत्यूची वार्ता येत असतां दीड हात कापडामुळें ते अजरामर होत असतील अशी कल्पना असणें शक्य नाहीं. पण त्या पद्धतीचा दुसरा एक मानसिक परिणाम होत असतो. प्रत्येक स्त्री कापडावर फुली मारतांना आपला देश, त्या देशाकरितां लढणारे सैनिक आणि युद्धांत मिळणारें भावी यश यांचा विचार करीत असते. विजय मिळावा अशी इच्छा करीत असते. हें इच्छाशक्तीचें वातावरण आज सर्व जपानभर दिसत आहे. वर वर्णन केलेला हा इच्छानिदर्शक असा एक प्रकार आहे इतकेंच.

**कमरेला जपानी तलवार—**

कमरेला लांबलचक तलवार लावून चाललेले शेंकडों लोक जपानी शहरांतून दिसून येतात. आजच्या वैमानिक युद्धाच्या दिवसांत या तलवारींचा काय उपयोग होत असेल अशी शंका मनांत येते. परंतु थोडचा चौकशीनंतर समजतें कीं तलवार हें केवळ लढाईचें शस्त्र म्हणून कमरेला लाविलें जात नाहीं. क्षात्रवृत्तीचें निदर्शक चिन्ह म्हणून तें वापरलें जातें. जपानी खड्गाला 'निहोंतो' अशी संज्ञा आहे. पूर्वींचा सामुराई किंवा क्षत्रिय नेहमीं खड्ग बाळगीत असे. तीच प्रथा सध्यां जपानमध्यें सुरू झाली आहे. या खड्गांना लढाईच्या दिवसांत इतकी मागणी आली कीं तीं तयार करणाऱ्या खड्ग-कारांना रात्रंदिवस काम करावें लागे. ट्राम्वे, बस्, आगगाडी, नाटचगृहें, भोजनालयें, इत्यादि सर्व ठिकाणीं गणवेष केलेले आणि खड्ग धारण करणारे अनेक लोक दिसतात.

पुरुषांनीं शस्त्रधारी होऊन रणांगणावर जावें आणि स्त्रियांनीं त्यांना रक्षाकंकण बांधावें ही पूर्वेकडील समाजाची पूर्वापार रीत. तीच आजही जपानमध्यें दिसून येते.

**साम्राज्यसंपादन व साम्राज्यभंजन—**

युद्धकालीन जपानचें चित्र मोठें प्रेक्षणीय आहे. कांहीं तरी प्रसंग आल्याशिवाय समाजांतील गुण आणि दोष हे उत्कटपणानें दिसून येत नाहींत. शांततेच्या काळीं एकादा देश पाहण्यापेक्षां अशा आणीबाणीच्या काळीं पाहणें विशेष चांगलें. त्यामुळें स्वतंत्र राष्ट्रालाही आपलें स्वातंत्र्य टिकविण्याकरितां आणि राष्ट्रीय महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याकरितां किती परिश्रम करावे लागतात त्याची कल्पना येते. त्यावरून परतंत्र देशानें त्याचेपेक्षां किती तरी पटीनें अधिक श्रम आणि अधिक त्याग करावयास पाहिजे याचीही चांगली जाणीव होते.

साम्राज्यशाहीचा नाश होवो असा शाप आपण तोंडानें चटकन् देतों. पण हा तळतळाट खरा करण्याकरितां किती त्याग करावयास पाहिजे याची कल्पना असत नाहीं. साम्राज्य उभारणाऱ्यांना तें मिळवितांना किती बलिदान करावें लागतें, त्याची कल्पना साम्राज्य उलथून पाडूं इच्छिणारांना होणें जरूर आहे. त्यामुळें आपल्या कामाच्या प्रचंडत्वाची कल्पना त्यांना येईल. साम्राज्यसत्ता स्थापन करितांना जें बलिदान करावें लागतें त्याच्यापेक्षां किती तरी मोठें बलिदान सत्तारूढ साम्राज्य मोडण्याकरितां करावें लागेल. म्हणून साम्राज्यसंस्थेचे अभिमानी आणि द्वेष्टे या दोघांनींही साम्राज्यें स्थापन होत असतांना तो देखावा पाहाणें जरूर आहे. अशोक, अलेक्झांडर, झीझस, नेपोलियन वगैरेचीं साम्राज्यें होतीं असें आपण ऐकतों. इंग्लंड, फरान्स, हॉलंड, इत्यादि राष्ट्रांचीं साम्राज्यें स्थापन झालेलीं आपण पाहतों. रशियन आणि जर्मन साम्राज्यें आपल्या डोळ्यादेखत कोसळून पडलेलीं आपण पाहिलीं. आज जपानच्या आणि इटलीच्या साम्राज्यांच्या इमारती बांधल्या जात असतांना आपणांस पाहतां येतात. त्यांपासून बोध काय घ्यावयाचा हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा प्रश्न आहे.

**रणांगणावर जाणारांना निरोप—**

“बांझाय दाई निप्पोन. बांझाय! बांझाय! बांझाय!” (जपानचा

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ...........
ठाणे.



रक्षाबंधन अथवा हजारटाकी



अतिथिसत्कारार्थं उपहार

जयजयकार) अशा आरोळ्या जपानच्या प्रत्येक स्टेशनवर ऐकूं येत आहेत. शेंकडों सैनिक रोज जपानी बंदरांतून जात आहेत आणि परत येत आहेत. त्यांना निरोप देण्याकरितां आणि परत आलेल्यांचें स्वागत करण्याकरितां "बांझाय" या आरोळ्यांनीं सर्व जपानचें वातावरण दुमदुमून गेलें आहे.

प्रत्येक खेड्यापाड्यांतून एक एक दोन दोन शिपाई लढाईवर जात असतात. त्यांना स्टेशनवर पोंचविण्याकरितां शुभ्र पोषाखांतील स्त्री स्वयंसेविका, गणवेषधारी विद्यार्थी आणि इतर पांचपन्नास माणसें येतात पुढें अनेक स्टेशनांवर त्यांचें स्वागत करावयाला लोक तयार असतात. असा कार्यक्रम बोटींत पाय ठेवीपर्यंत चालतो.

शहराच्या एकाद्या भागांतून सैनिक जावयाचा असला कीं आजूबाजूचीं शेंदोनशें मित्रमंडळी त्याला निरोप देण्याकरितां एका मैदानांत जमतात. तेथें समाजांतील वृद्ध, पोक्त अथवा अधिकारी गृहस्थांचीं भाषणें होतात. नंतर बांझायच्या आरोळ्यांत स्टेशनांतून सैनिकांची गाडी सुटते. निरोप द्यावयास येणाऱ्या प्रत्येकाच्या हातांत सूर्यछाप जपानी राष्ट्रीय निशाण असतें. कांहीं वेळां स्टेशनचा सर्व प्लॅटफॉर्म या लोकांनीं भरून जातो.

प्रत्येक गाडीनें एक दोन एक दोन शिपाई जात असलेले दिसतात. कधीं-कधीं लांबच्या लांब आगगाडी सैनिकांनीं भरून चाललेली दिसते. जपानांतून जाणाऱ्या सैन्याच्या संख्येवरून रणांगणावर काय घडामोड चालली असेल त्याची कल्पना करावी लागते.

सैनिकाला निरोप देण्याकरितां येणाऱ्या मंडळींत त्याचे आईबाप, पत्नी, मुलेंमुलीं, इत्यादि कुटुंबीयही असतात. सर्वांची हंसतमुख चर्या पाहून असें वाटतें कीं हे सैनिक लढाईवर चालले आहेत कीं मजेखातर प्रवासाला निघाले आहेत. निरोप घेणारे कित्येक कदाचित् पुन्हा परतही येणार नाहींत. पण सार्वजनिक ठिकाणीं दुःखप्रदर्शन करणें हें जपानी स्वाभावाविरुद्ध आहे. म्हणून सर्व लोक आनंदी दिसतात.

**जखमी सैनिकांचें स्वागत—**

दक्षिण जपानांतील मोजी बंदरांत एक जहाज धक्क्याला लागलें होतें. धक्क्यावर पंचवीस मोठ्या मोटारगाड्या किंवा बसेस होत्या. प्रत्येक बसवर मोठी रेड क्रॉसची तांबडी फुली होती. आंतमध्यें बसण्याचें ऐवजीं निजण्याचीं बाकें होतीं. हातांत तांबडीं-पांढरीं निशाणें घेऊन गंभीर मुद्रा केलेले अधिकारी व इतरेजन उभे होते. पांढरें उत्तरीय घातलेल्या अनेक परिचारिका होत्या. जहाजांतून हळूहळू स्ट्रेचरवरून एकेक शिपाई खालीं येऊं लागला. सर्वांचे अंगावर हॉस्पिटलचे कपडे घातले होते. सैनिकांचे गणवेश नव्हते. बसमध्यें आणून सर्वांना निजविण्यांत आलें, कोणाचा हात गेला, कोणाचा पाय गेला, कोणाचें डोकें बांधलें आहे, कोणाची छाती बांधली आहे—अशा स्थितींतील सैनिकांना मोटारगाड्यांत निजवून त्या मोटारींना सर्व शहरांतून फिरविण्यांत आलें आणि नंतर त्या स्टेशनाकडे गेल्या.

रेल्वेंतून प्रवास करितांना प्रत्येक स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर एकदोन स्ट्रेचर आणन ठेविलेले दिसतात. त्या गांवचे जे शिपाई लढाईंत जायबंदी होऊन परत आले त्यांचेकरितां हे स्ट्रेचर.

**सैनिक येतात कोठून ?—**

हे सर्व सैनिक येतात कोठून ? लहान लहान गांवांतून शहराकडे येणाऱ्या प्रवाशांत एकदोन एकदोन सैनिक दिसतात. मुख्य केंद्रावर हे सर्व आले कीं एकाद्या बंदरांतून त्यांची रवानगी होते. विद्याखात्याच्या कचेरींत एकादे दिवशीं जावें तो युद्धावर जाणाऱ्या एकाद्या स्वयंसैनिकाला निरोप देण्याकरितां लोक जमलेले दिसतात. प्रत्येक कचेरींतून एकदोन माणसें तरी लढाईवर गेलेलीं आहेत. प्रत्येक शाळेंतील आणि कॉलेजांतील अध्यापकांपैकीं कांहीं लढाईवर गेलेले आढळतात. नॉर्मल स्कूल आणि कॉलेज या संस्थांतील प्रौढ विद्यार्थ्यांपैकीं कांहीं रणांगणावर गेलेले आहेत. सारांश खालपासून वरपर्यंत सर्व दर्जाचे लोक रणभूमीवर गेलेले आहेत. पण खालच्या वर्गांतील लोकांची संख्या फ़ार मोठी. बहुतेक सामान्य सैनिक शेतकरी

स्थल प्रत
सं. ..... नं. .....
ता. .....
ग्रा.मं.

वर्गांतून आलेले असतात. मध्यम वर्गीय सैनिकांत अनेक व्यवसाय करणारे स्वयंसैनिक दिसून येतात.

**सैनिकांच्या घरीं—**

रात्रीं अकरा वाजण्याची वेळ. तोकियो शहराच्या कोंपऱ्यांत चारखणी दुकानांत एक मध्यमवयाची स्त्री दिव्याच्या प्रकाशांत कंपोजिंग करीत बसली होती. तिच्या सावकाश खिळे जुळण्याच्या पद्धतीवरून तिला कामाचा सराव नसावा असें स्पष्ट दिसत होतें. बाजूला एक मूल होतें. शिवाय दुसरें तान्हें मूलही असल्याचें समजलें. ही स्त्री इतक्या उशीरां हें काम कां करीत होती ? तिचा पति लढाईवर गेला होता. लढाईवर जाणारे जपानी सैनिक पगार घेण्यास नाखुष असतात. आपण देशाकरितां लढतों, पगाराकरितां लढत नाहीं अशी त्यांची भावना असते. पती लढाईवर गेलेला. पगार नाहीं व दुसरें उत्पन्नाचें साधन नाहीं. म्हणून ही स्त्री मुलांच्या व स्वतःच्या पोषणाकरितां नवीन काम शिकून, जाग्रण करून आपल्या निर्वाहाची सोय करीत होती.

चिनी सैन्यांत मर्दुमकी करणाराला पैशाचें बक्षिस दिलें जातें. या गोष्टींतील रहस्य जपानी सैनिकांना कळत नाहीं. पराक्रमाबद्दल आणि देशसेवेबद्दल पैशाचें बक्षिस ही कल्पना त्यांना चमत्कारिक वाटतें.

जपानी सैनिकांची ही वृत्ति ओळखून सरकारनें आणि स्थानिक संस्थांनीं त्यांच्या कुटुंबीयांच्या निर्वाहाची सोय व्हावी म्हणून कांहीं नियम व योजना केल्या आहेत. स्थानिक स्वराज्यखात्याचें सार्वजनिक कामाचें एक खातें असतें, त्याच्या शाखा शहरांतील प्रत्येक विभागांत असतात. ज्या त्या विभागांतील सार्वजनिक कामाच्या खात्यानें आपल्या हद्दींतील सैनिकांच्या कुटुंबीयांच्या निर्वाहाची सोय झाली कीं नाहीं तें पहावयाचें असतें. हेंच काम पाहाण्याकरितां स्थानिक स्त्रियांचा संघही असतो. त्यामुळें पुरुष लढाईवर गेला तरी समाज त्याच्या कुटुंबाची काळजी घेतो. सैनिकाला मागली चिंता राहात नाहीं.

**गांवांतील दृश्य—**

शहरांत आणि खेडयांत कांहीं घरांवर उंच राष्ट्रीय निशाणें लाविलेलीं असतात. ज्या ज्या घरांतून एकादा सैनिक लढाईवर जातो त्या त्या घरावर हें चिन्ह लाविलें जातें. हजार पांचशें वस्तीचें एकादें खेडेगांव पाहिलें तरी त्यांत दोन तीन घरांवर तरी हीं उंच निशाणें लाविलेलीं दिसतील.

शिवाय प्रत्येक घरावर दाराचे दोन्ही बाजूंस दोन लहान जाहिराती लाविलेल्या दिसतात. अगदीं लहान सहान गांवांतही त्या आहेत. एका बाजूच्या जाहिरातीवर—" राष्ट्रीय वृत्तीनें देशाची एकजूट करा " असा मजकर असतो. दुसरे बाजूला— " आशियांत शांतता प्रस्थापित करण्या-करितां जपान लढत आहे " अशीं वाक्यें असतात. त्यामुळें देशांतील कोना-कोंपऱ्यांत लढाईची वार्ता पोंचली असून अंतःकरणानें सर्व देश एकजीव झाला आहे. वेळप्रसंगीं वाटेल तें करण्याची त्याची तयारी आहे.

**रजपूतांसारखें शौर्य—**

जपानी लोकांचा इतिहास म्हणजे रजपूतांच्या इतिहासासारखा आहे. दोघांची वृत्ति एकाच प्रकारची. लढाईवर जावयाचें म्हणजे प्राणाची किंवा कुटुंबाची शिपायाला पर्वा नाहीं, आणि स्त्रियांनाही स्वतःच्या सुखाची अपेक्षा नाहीं. लढाईवर गेलेल्या पतीनें व पुत्रानें आपली काळजी करूं नये म्हणून आत्महत्या करणाऱ्या स्त्रिया आणि माता जपानांत आहेत. समोर मृत्यू दिसत असतां हातांत प्राण घेऊन वाटेल त्या संकटांत उडी घालण्यास जपानी शिपाई तयार असतो. अशी एक हकीकत सांगतात कीं नाविक युद्धामध्यें शत्रूचें जहाज अचुक फोडण्याची युक्ति जपानी लोकांनीं काढली आहे. जहाजावर टारपेडोचा गोळा सोडल्यानंतर तो ज्या रेषेंत जातो ती चुकवून जहाज वाचवितां येते. जपानी लोकांनीं " मानवी टारपेडो " काढला आहे. त्यांत या गोळ्याबरोबर एक सैनिक जातो. आणि जहाजानें गोळ्याचा मार्ग कितीही चुकविला तरी जहाजाच्या हालचालीप्रमाणें गोळ्याची दिशा बदलून तो गोळा जहाजावर आपटतो, गोळ्याबरोबर जाणाऱ्याच्या शरी-

राच्या चिंधड्या होतात, आणि शत्रुच्या जहाजाचे तुकडे होतात. हा जपानी सैनिकांचा स्वभाव आहे.

**संरक्षणाची रंगीत तालीम**---

सध्यांची लढाई जपानपासून हजार दीड हजार मैल दूर चीनमध्यें चालली आहे. पण शत्रूचा हल्ला जपानवर केव्हांही आला तरी त्याची तयारी आहे. कोणतींही दोन राष्ट्रें एकदम आलीं तर त्यांच्यांशीं लढण्याची आमची नेहेमीं तयारी आहे, असा आत्मविश्वास प्रत्येक जपानी नागरिकाला आहे. जपानच्या किनाऱ्यावर ठिकठिकाणीं (फॉर्टिफाइड झोन) संरक्षित प्रदेश आहेत. त्या ठिकाणीं छायाचित्रें घेण्याची परवानगी नसते. समुद्रांतून किंवा हवेंतून शत्रूचा हल्ला आला तरी एका क्षणांत तोफांच्या सोंडा वर होऊन त्यांतून आगीचा वर्षाव होईल आणि शत्रू भाजून निघेल. एकादा शत्रूचा हल्ला खरोखरीचा यावा म्हणजे आपली ही सर्व तयारी आपल्याला कसोटीला तरी लावून पाहातां येईल असें पुष्कळ वेळां जपानी लोकांना वाटतें.

वैमानिक हल्ल्यापासून बचाव कसा करावा याची रंगीत तालीम दर महिन्याला होते. एक सप्ताह या कार्यक्रमाकरितां राखून ठेविलेला असतो. त्यावेळीं शहरांत वाटेल तेव्हां दिवे मालवून काळोख केला जाईल अशी सूचना असते. अशा वेळीं रस्त्यांत व सार्वजनिक ठिकाणीं काळोख असतो. अगदीं अंधुक अशा अधोमुख प्रकाशांत ट्रामवे, बसेस, मोटारी इत्यादि रहदारी सुरू असते. घरांत कचेऱ्यांत व दुकानांत सर्वत्र कामें चालूं ठेवावयाचीं पण बाहेरून यत्किंचितही प्रकाश दिसतां कामा नये अशी सक्त ताकीद असते. शत्रूच्या विमानाची सूचना देण्याचा ठराविक शिंगध्वनि असतो तो झाल्याबरोबर पुनः सूचना मिळेपर्यंत अगदीं संपूर्ण काळोख करावयाचा. शत्रूचीं विमानें गेल्याची सूचना मिळाली कीं पुनः दिवे लावावयाचे. शहरांत स्वयंसेवक दळ स्थापन झालेलें असतें. विमानांतून गोळा पडून अपघात झालाच तर घराची आग विझविणें, जखमी झालेल्यांना दवाखान्यांत नेणें, प्रथमोपचार करणें इत्यादि कामाचें वळण लोकांना लाविलें जातें. विषारी धुराचा मारा झाला तर कसें संरक्षण करावें याचीही तालीम दिली जाते.

प्रत्येक शाळा, कॉलेज, कचेरी इत्यादि सार्वजनिक ठिकाणीं हें सर्व शिक्षण देण्यांत येतें.

प्राथमिक शाळेंत हस्तव्यवसायाचे तासांत विद्यार्थी धुरापासून संरक्षण करण्याकरितां कागदी टोप करीत असलेले दिसतील. मुलींच्या शाळेंत शिवणकामाच्या तासाला सैनिकांचे कपडे शिवले जातात. लेखनाच्या तासांत विद्यार्थी रणांगणावरील शिपायांना समाधानाची व उत्तेजनाचीं पत्रें लिहितात. चित्रकलेच्या तासांत ते शिपायांना युद्धकालीन जपानी परिस्थितीचीं चित्रें काढून पाठवितात. अशा रीतीनें सर्वत्र युद्धाचें आणि तयारीचें वातावरण दिसून येतें.

**कामाचे तास—**

आणीबाणीच्या वेळीं देशांतील प्रत्येक व्यक्तीकडून शक्य तें आणि शक्य तितकें काम करून घ्यावें लागतें. कामाचे तास आणि वैशिष्ट्य वगैरे सर्व नियम धाब्यावर बसवावे लागतात. कारखान्यांत एरव्हीं साडेआठ ते दहा तास काम करणाऱ्या मजूरांना आतां बाराबारा तास खपावें लागतें. हजारों सैनिक रणक्षेत्रावर गेले आहेत हें सर्वच कांहीं धंदेवाईक सैनिक नाहींत. कामगार, शेतकरी, शिक्षक, कारकून, प्रोफेसर, डॉक्टर, अधिकारी, विद्यार्थी इत्यादि सर्व दर्जाचे लोक युद्धावर गेले आहेत. त्यांचीं कामें अर्थात् मागें राहिलेल्या लोकांना करावीं लागतात. त्यामुळें स्वतःचें काम करून शिवाय दोन तीन तास जादा काम प्रत्येकाला करावें लागतें.

**पुरुषी स्त्रीची वीरश्री—**

जन्मभर कलावंतिणीचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यक्तीनें एक दिवस सैन्यांत नांव नोंदविलें आणि लढाईवर जाण्याची तयारी केली. सेइकिची यागीसावा हा पुरुष होता, परंतु लहर म्हणून तो स्त्रीवेषांत राहून नृत्य-संगीतादि साधनानें लोकांची करमणूक करीत असे. लोकांचा समज ही व्यक्ति खरोखरच स्त्री आहे. युद्ध सुरू झाल्याबरोबर राजश्रींच्या अंगांत वीरश्री संचारली आणि हातांतील सारंगी टाकून त्यानें संगीन धरली. या

कथेंत विनोद आहे आणि राष्ट्रीय स्वभावही आहे. रंगेलपणा अणि तीव्र कर्तव्यबुद्धि या दोन गोष्टी जपानी स्वभावांत एकत्र राहूं शकतात. जपान-यूरोप प्रवास करणाऱ्या कातोरी मारू नांवाच्या आगबोटीवर ××× नांवाचा मध्यम वयाचा कप्तान होता. जगांतील पंचमहासमुद्रांतील अनेक तुफानी वादळांतून त्यानें मोठ्या धैर्यानें अनेक प्रवास केले असतील. परंतु इतकी सर्व जबाबदारी सांभाळूनही प्रवाशांच्या करमणुकीकरितां ही स्वारी स्त्रीवेषानें कधीं जपानी पद्धतीचें नृत्यही करून दाखविते! हा प्रत्यक्ष अनुभव आहे.

**स्त्रीपोलिसांची नवी योजना--**

जपानमधील पुरुषवर्गाला युद्ध क्षेत्रांतील अनेक कामांकरितां मागणी आहे. तेव्हां मनुष्यबळाची कमतरता भरून काढण्याकरितां स्त्रिया पुढें आल्या आहेत. तोकियोमध्यें शहराचे पोलीसांपैकीं कांहीं रणक्षेत्रावर गेले आहेत आणि कांहीं स्थानिक संरक्षणक्षेत्रांत गुंतले आहेत. म्हणून त्यांची नेहेमींचीं कामें करण्याकरितां आतां स्त्रियांची भरती करण्यांत आलेली आहे. पोलीसचीं सामान्य कामें स्त्री-पोलीस करतील. नेहेमींचे पोलीस युद्धविषयक कामें करतील.

कांहीं शहरांत आणि विद्यालयांत मुलींना लष्करी शिक्षण देण्यालाही प्रारंभ झालेला आहे. जपानच्या बाहेरील रणक्षेत्रांत पुरुषवर्ग गुंतला तर स्थानिक संरक्षणाचें काम सशस्त्र स्त्रियांनीं करावें अशी योजना निघणें कांहीं असंभवनीय नाहीं.

**सैनिकांना घरचे आहेर—**

सैनिक रणांगणावर लढतात पण घरीं राहिलेले लोकही कांहीं स्वस्थ बसलेले नाहींत. प्रत्येकाला कांहींना कांहीं युद्धविषयक काम आहेच. दुपारचे वेळीं सुखवस्तु स्त्रिया एकत्र जमून प्रथमोपचाराचें साहित्य तयार करीत असतात; कांहीं कपडे शिऊन पाठवितात; कांहीं खाऊ करून देतात. एकाद्या संघांतील स्त्रिया घरोघर फिरून सैनिकांकरितां "भेटी" गोळा करितात.

प्रत्येक घरून एक भेटीदाखल गांठोडें जातें. त्यांत कपडे, साबण, खाऊ, फ़ोटो, पुस्तक, कविता, किंवा इतर उपयोगी आणि करमणुकीच्या वस्तू सैनिकांकरितां घातलेल्या असतात. पाठविणाराचें नांव व चित्र आंत असतें. हीं सर्व भेटींची गांठोडीं रणांगणावर पाठविण्यांत येतात आणि तेथें प्रत्येक शिपायाला जसें येईल तसें एकएक गांठोडे दिलें जातें. तें सोडून प्रत्येकाला काय मिळालें आहे तें पाहाण्यांतही मजा असते. एकादे वेळीं अगडबंब देहाच्या शिपायाला लहान मुलाचें गलुतें, टोपडें आणि चोखणें सांपडतें, त्यावेळीं एकीकडे तोफांच्या फैरी झडत असतांनाही सैन्यांत हास्याचे फवारे उडत असल्यास नवल नाहीं.

**संशोधक शास्त्रज्ञांची कामगिरी—**

चीन-जपान प्रकरणांत जपानचें यश त्याच्या शास्त्रीय संशोधकांवर अवलंबून आहे ही गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे. अहोरात्र विचार आणि प्रयोग करून अनेक प्रकारचें साहित्य बनविण्याचे प्रयत्न प्रयोगशाळेंत चालूं आहेत. कच्चा माल मिळण्याकरितां जपान इतर देशांवर अवलंबून आहे. पुढें मागें जागतिक युद्ध सुरूं होऊन या मालाची आयात बंद झाली तर काय करावें या प्रश्नाचा विचार आधींपासूनच चालूं आहे. त्याचप्रमाणें शस्त्रास्त्रांच्या सामग्रीमध्यें जगांतील उपलब्ध साधनांपेक्षां आपल्याला अधिक सुधारणा काय करितां येतील त्याचेही अनेक प्रयोग चालू आहेत. विमानें, तोफा, दारूगोळा, धूर, जहाजें इत्यादि बाबतींत थोडी जरी सुधारणा झाली तरी आजचे काळांत शत्रूपक्षावर मात करितां येते. त्या दृष्टीनें सध्यां जपानमध्यें अतिशय मोठ्या प्रमाणवर संशोधन चालू आहे. एक विमानविद्येची शाखा घेतली तरी तिचें संशोधन करणाऱ्या अद्ययावत् साधनसामग्रीच्या किती तरी खाजगी, सरकारी आणि व्यापारी संस्था आहेत.

कृत्रिम द्रव्यें करण्याचें संशोधनही मोठ्या प्रमाणावर चाललें आहे. गॅसोलीन बाहेरून येण्याचे बंद झालें तरी कोळशापासून तेल काढण्याचें संशोधन पुरें झालेलें असल्यामुळें लौकरच मोठमोठे कारखाने निघन तेलाचे बाबतींत स्वावलंबनाचा प्रयत्न होईल. कापूस आणि लोंकर यांचे ऐवजीं कृत्रिम द्रव्य

(स्टेपल फायबर) शोधन काढलेलें आहे. त्याचे कपडेही प्रदर्शनांत दिसतात. तांब्याचे ऐवजीं अॅल्युमिनम् कठिण करून वापरण्याची क्रिया साध्य झाली आहे. सल्फेट अमोनियाचे ऐवजीं नायट्रेट अमोनिया, जनावरांचे कातड्या-ऐवजीं जलचर प्राण्यांचीं कातडीं इत्यादि अनेक प्रतिद्रव्यांचा उपयोग कर-ण्याचा प्रयत्न चालला आहे. अशा रीतीनें अनेक नवीन द्रव्यांचें संशोधन एकसारखें होत आहे.

वायां जाणाऱ्या द्रव्यांचा उपयोग कसा करितां येईल त्याचेही प्रयोग शास्त्रज्ञ करीत आहेत. टाकून दिलेले रबर आणि कपड्यांतील सूत यांचा उपयोग करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यामुळें जपानांत कोणतीही वस्तू वाया जाणार नाहीं अशी स्थिति येईल.

**पोलादी आरशाची भेट—**

प्रत्यक्ष युद्ध सामुग्रीचे दृष्टीनेंही महत्त्वाचे प्रयोग चालले आहेत. त्यांत होंदा नांवाच्या शास्त्रज्ञानें अभेद्य पोलाद शोधून काढलें आहे. या पोलादी पत्र्यांतून गोळी आरपार जाऊं शकत नाहीं. सैनिकांचीं शिरस्त्राणें करण्या-करितां त्याचा उपयोग केला जातो. विद्यापीठांत इंग्लिश वाङमय शिकवि-णाऱ्या एका अध्यापकाचा स्नेही नातेवाईक लढाईवर जावायचा होता. त्याला जातांना भेट म्हणून वरील अभेद्य पोलादापासून दोन आरसे तयार करून त्या अध्यापकानें दिले. उद्देश हा कीं आरसा म्हणून त्यानें कोटाच्या वरच्या खिशांत तो ठेवावा आणि त्यामुळें स्वाभाविकच निदान काळजाचें तरी गोळी-पासून संरक्षण व्हावें. ही युक्ति कां करावी लागली? आरसा ठेवण्यापेक्षां छातीवर कवच कां घातलें नाहीं? त्याचें कारण असें.—

जपानी सैनिकाला लढाईवर जातांना अंगांत चिलखत घालणें कमी-पणाचें वाटतें. रणावर जावयाचें आणि मृत्यूला भ्यावयाचें—या वृत्तींत त्यांना विरोध वाटतो. म्हणून पुष्कळ सैनिक चिलखत मिळण्यासारखें असूनही तें घालीत नाहींत. त्यामुळें आरशाच्या निमित्तानें आपल्या स्नेह्याचें काळीज सांभाळण्याचा प्रयत्न वरील अध्यापकानें केला.

**शृंगारिक कीं वीररसात्मक**—

कला आणि करमणुकी या क्षेत्रांवर स्वतंत्र राष्ट्रांतही कसें पारतंत्र्य येतें तें पाहाण्यासारखें आहे. लढाईला तोंड लागल्याबरोबर गृहमंत्र्यानें सिनेमा आणि ग्रामोफोन रेकॉर्ड कंपन्यांच्या चालकांना बोलावून घेतलें. राष्ट्रीय आणीबाणीच्या वेळीं राष्ट्रीय वृत्तींना पोषक अशा प्रकारच्या गोष्टींचे चित्रपट आणि तत्सदृश संगीत त्यांनीं निर्माण केलें पाहिजे; तसें न केल्यास त्यांच्या धंद्यावर नियंत्रण पडेल असें त्यांना बजावण्यांत आलें. चित्रपट-वाल्यांनीं वीररसाला पोषक अशा कथानकांचे पट तयार करावेत; ग्रामोफोन रेकॉर्ड कंपन्यांनीं शृंगारिक संगीताचीं गाणीं निर्माण न करितां चालू प्रसंगाला अनुकूल असें संगीत प्रसृत करावें; शृंगारिक पदांच्या रेकॉर्डस् नाहींशा करून टाकाव्यात, अशा प्रकारच्या हुकूमवजा सूचना सरकारी कचेरींतून निघाल्या-बरोबर त्यांचा करमणुकीच्या क्षेत्रांत लगेच परिणाम झाला.

**'युद्धाकरितां कला'**—

जपानी बोलपटगृहांत सामान्यपणें रोज तीन कथानकें लागोपाठ दाखविण्यांत येतात. त्यांतील दोन जपानी व एक पाश्चिमात्य असतें. लढाई सुरूं झाल्यानंतर जपानी कथानकांपैकीं एक कथानक ऐतिहासिक देशभक्तिपर किंवा युद्धकथात्मक असें दिसूं लागलें. रूसो-जपानी युद्धापैकीं एकादा प्रसंग, देशभक्त नोगीचें चरित्रांतील कथाभाग किंवा उत्तर चीनमधील एकादी काल्पनिक गोष्ट घेऊन त्यावर बोलपट तयार होऊं लागले. याशिवाय प्रत्येक बोलपटगृहांत युद्धवार्तांचे ताजे प्रसंगपटही दाखविले जातात त्यामुळें आबाल-वृद्धांना आपल्या गांवांत राहून चीनमध्यें चाललेले प्रकार पहावयास सांपडत. अर्थात् हे सर्व चित्रपट जपानला अनुकूल असेच असतात हें मुद्दाम सांगण्याची जरूरी नाहीं.

वीररसात्मक पदें तयार व्हावींत म्हणून वर्तमानपत्रें व ग्रामोफोन कंपन्या इत्यादिकांनीं स्पर्धा लावून पदें मागविलीं. त्यांपैकीं जीं उत्कृष्ट ठरलीं त्यांचा गायनप्रारंभ मोठ्या थाटानें हजारों श्रोत्यांच्या सभांतून करण्यांत आला.

नंतर त्यांचीं रेकॉर्ड्स् प्रसिद्ध झालीं. त्यामुळें सर्व देशांत या नवीन वीररसात्मक पदांचा संचार झाला.

गद्य आणि संगीत नाटकें व ऑपेरा यांच्यावरही लढाईच्या वातावरणाचा परिणाम झाला. जपानी नाटचगृहांत एकाच दिवशीं दोनतीन प्रयोग दाखविण्यांत येतात. त्यांपैकीं एक भाग प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणें युद्धाला धरून असावयाचा. सारांश चित्रपट, बोलपट, ग्रामोफोन रेकॉर्ड, रंगभूमि इत्यादि सर्व साधनांचा उपयोग लोकांच्या इच्छेनें अथवा सरकारी वजनामुळें, वीररसाचें आणि देशभक्तीचें पोषण करण्याचे कामीं होऊं लागला.

**नटव्या मुलींची गैरसोय—**

पाश्चिमात्य पद्धतीच्या करमणुकींचा प्रचार मोठ्या शहरांमध्यें झालेला आहे. तोकियोसारख्या शहरांत नृत्यगृहें आणि मदिरालयें (डान्सिग हॉल व काफे) अलीकडे स्थापन झालेलीं आहेत. लढाईच्या निमित्तानें त्यांच्यावरही बंधनें घालण्यांत आलीं. नऊ वाजण्याचे आंत नृत्यालयें आणि अकरा वाजण्याचे आंत मदिरालयें बंद झालीं पाहिजेत असे हुकूम सुटले. वरील ठिकाणीं वावरणाऱ्या स्त्रियांचे कपडे कसे असावेत यासंबंधीं सरकारी सूचना मिळाल्या. फार दिखाऊ किंवा उत्तान स्वरूपाचे किमोनो आणि झगे असू नयेत असा नियम करण्यांत आला.

करमणुकीप्रमाणेंच फॅशनवरही निर्बंध घालण्यांत आले. अमेरिकन पद्धतीनें केस कांपून कुरुळे करण्याची पद्धति कांहीं नटव्या मुलींमध्यें आलेली होती. ज्या ठिकाणीं हा विशिष्ट केशशृंगार केला जात असे तीं दुकानें बंद करण्यांत आलीं.

**युद्धकालीं मतस्वातंत्र्याच्या मर्यादा—**

मतस्वातंत्र्य या दृष्टीनें जपान हा जर्मनी-इटली-रशिया या देशांचे तत्त्वाचा आहे. प्रचलित राजकीय पद्धतीविरुद्ध मतप्रदर्शनाला तेथें फारसा वाव नाहीं. जपानला विशेषतः कम्यूनिझम्ची फार धास्ती वाटते. या मताच्या प्रचाराचा अतिशय जारीनें बंदोबस्त केलेला आहे. त्यांत लढाईच्या

धामधुमींत तर विरोधी मतांवर कडक नियंत्रण असावें ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे.

वृत्तपत्रें, सभा, रेडियो इत्यादि सर्व मतप्रचाराचे साधनांवर सरकारी नियंत्रण आहे. शांततेच्या काळींही तें असतें; युद्धकाळीं विशेष. युद्धविषयक वार्ता किंवा चित्र लष्करीखात्याच्या परवानगीशिवाय देतां येत नाहीं. वृत्तपत्रें आपला मतभेद अतिशय सौम्य आणि नाजूक शब्दांनीं व्यक्त करितात. रेडिओचें श्रवणसामर्थ्य जपानपुरतेंच मर्यादित आहे. जपानी लोकांना फक्त जपानी कार्यक्रम ऐकतां येतात. जगांतील इतर देशांचे कार्यक्रम ऐकतां येतील असा रेडियो घेणें झाल्यास सरकारी खास परवाना लागतो. तो परदेशीयांना मिळू शकतो. जपानी लोकांना मिळणें कठीण जातें. त्यामुळें जपानबाहेर काय बोललें जातें तें फारसें ऐकतां येत नाहीं. जपानी रेडियोस्टेशनवरून येईल तीच बातमी.

**विरोधाची टीका नको—**

लेखन, भाषण, किंवा इतर साधनांनीं प्रचलित लष्करी अथवा सरकारी परराष्ट्रीय धोरणावर कोणी टीका केली तर ती सरकारला खपत नाहीं. असें लेखन जप्त होतें आणि लेखक कामावरून बडतर्फ केला जातो. प्रो. यानाईहारा नांवाचे अध्यापक तोकियो सरकारी विद्यापीठांत काम करीत होते. " वसाहतींची राज्यव्यवस्था " या विषयाचे ते अधिकारी तज्ज्ञ आहेत. त्यांच्या कांहीं लेखांमुळें आणि वर्गांतील व्याख्यानांमुळें त्यांना राजीनामा द्यावा लागला. असे प्रसंग अमेरिकेंतही होतात.

**परदेशांत मतप्रचार—**

चीन-जपान लढा सुरू झाल्यापासून चीननें परदेशांत चांगला प्रचार केला. त्या मानानें जपानी लोक मागें पडले. भाषण आणि लेखन यांतही चिनी लोक जपान्यांपेक्षां अधिक हुशार. हें वैगुण्य जपानी लोकांना भासूं लागलें. साऱ्या जगभर जपानविरुद्ध प्रचार सुरू झाला. म्हणून जपाननेंही आपल्या-बाजूनें चीनविरुद्ध प्रचार सुरू केला. परदेशी लोकांकरितां रेडियोवरून

खास कार्यक्रमांची योजना करण्यांत आली. जपानमधून अनेक संपादक, मुत्सद्दी, व्यापारी, कारखानदार आणि पुढारी यांनीं अमेरिका व यूरोपमध्यें जाऊन व्याख्यान-लेखनरूपानें जपानची बाजू जगापुढें मांडली. जपानविषयीं अनुकूल लेख लिहिणाऱ्या गोऱ्या लेखकांच्या लेखांना अधिक प्रसिद्धी दिली गेली. अशा रीतीनें चीन आणि जपान या दोघांचाही प्रचार यूरोप-अमेरिकेंत सुरू झाला.

स्वतंत्र शिरजोर राष्ट्रालाही परदेशी प्रचाराची इतकी जरूरी वाटते.

**शत्रूशीं वर्तन—**

जपानमध्यें व्यापार व उद्योगधंद्याचे निमित्तानें अनेक चिनी लोक आहेत. त्यांचीं दुकानें आहेत, घरेंदारें आहेत, देवळें आहेत, शाळा आहेत. एकीकडे चीन-जपानचा निकराचा लढा चालला असला तरी खुद्द जपान-मधील चिनी लोकांच्या केसालाही धक्का लागलेला नाहीं. त्यांचे सर्व व्यव-हार शांततेच्या काळीं चालत तसेच सुरळीत चालले आहेत. ही गोष्ट जपानी लोक मोठ्या स्वाभिमानानें सांगतात. कारण चीनमध्यें जपानी लोकांना इतक्या सुरक्षितपणें ठेविलें जात नाहीं. जपानी लोक शांतताप्रिय आहेत या मताचा प्रचार करण्यालाही वरील गोष्टीचा उपयोग होतो.

चीनमध्यें जपानी सैनिकांनीं व अधिकाऱ्यांनीं केलेल्या परोपकारी कृत्यांनाही जपानी वृत्तपत्रांत बरीच प्रसिद्धी दिली जाते. युद्धप्रदेशांत शांतता प्रस्थापित झाल्यानंतर गोरगरिबांना अन्नदान करणें, लहान मुलांना खाऊ देणें, म्हाताऱ्यांना मदत करणें इत्यादि गोष्टी जपानी शिपाई करितात अशा प्रकारचीं बातमीपत्रें मधून मधून छापलीं जातात. चिनी रयतेची मर्जी संपादन करण्याकरितां या गोष्टी केल्या जात असतील असें वाटतें. प्रचाराचे कामींही त्यांचा उपयोग होतो.

**आर्थिक दूरदृष्टीच्या योजना—**

चालू लढाईचें जागतिक महायुद्धांत केव्हां रूपांतर होईल त्याचा नेम नाहीं हें जपान जाणून आहे. असें दीर्घकालीन युद्ध झालें तर आर्थिक दृष्टीनें

जपान टेकीस येईल अशी इतर राष्ट्रांची समजूत आहे. ही समजत खोटी पाडण्याकरितां जपाननें अगदीं प्रारंभापासून शिस्तवार योजना आणि प्रयत्न चालविले आहेत. जपानमधील युद्धकालीन अर्थशास्त्र हा एक स्वतंत्र अभ्यासाचाच विषय होईल.

आपल्याला दीर्घकालपर्यंत टिकाव धरला पाहिजे या धोरणानें जपाननें पहिल्यापासूनच आर्थिक नियंत्रण चालविलें आहे. पहिलें नियंत्रण उद्योग-धंदे आणि कारखाने यांवर पडलें. पक्का माल आणि युद्धाची साधनसामुग्री या दृष्टीनें जे कारखाने पुढेंमागें उपयोगी पडण्यासारखे होते त्यांच्या व्यवहारावर सरकारी नियंत्रणें पडलीं. त्याकरितां "वॉर इंडस्ट्रीज् मोबिलायझेशन् लॉ" मंजूर करण्यांत आला. वाटेल त्यावेळीं या कारखान्यांतून शस्त्रास्त्रें निर्माण करितां यावीत, त्याचबरोबर नेहेमींचें उत्पादनही चालू राहावें, आणि या दृष्टीनें कारखान्यांत जरूर तो फेरबदल करितां यावा, हाच नियंत्रणाचा हेतू आहे. महायुद्ध चालू झाल्यास बाहेरचा कच्चा माल बंद होईल. तो कृत्रिम रीतीनें निर्माण करितां यावा याकरितां खास नियम करून नवीन कारखान्यांना सवलती देण्याचीही योजना करण्यांत आली.

**नियंत्रण आणि सहकार्य—**

युद्ध चालू असेपर्यंत भलत्याच क्षेत्रांत भांडवल अडकून पडूं नये आणि उपयुक्त उद्योगधंद्यांना भांडवलाची अडचण पडूं नये म्हणून सरकारनें "टेंपररी फंड ॲडजस्ट्मेंट लॉ" नांवाचा कायदा मंजूर केला. त्या योगानें जुन्या कारखान्यांची वाढ, नवीन कारखाने काढणें इत्यादि कामाकरितां लागणाऱ्या भांडवलावर नवीन नियमांचें नियंत्रण आलें. युद्धकालाला उपयोगी अशा उद्योगधंद्यांना भांडवल कमी पडूं नये हा त्यांचा मुख्य उद्देश आहे.

परदेशांतील माल जपानमध्यें फार येऊं नये याकरितां आयात मालाचे प्रमाण खूप कमी करण्यांत आलें. त्यांत परदेशीं चित्रपटांनाही बंदी झाली. आयातीच्या नियंत्रणामुळें दोन फायदे व्हावेत असा उद्देश. आयात व निर्यात माल यांच्यांत मेळ बसावा हा एक, आणि आयातीवरील निर्बंधामुळें स्थानिक उत्पादनाला उत्तेजन मिळावें हा दुसरा.

आर्थिक धोरणांत सुसंगतता राहावी याकरितां सरकार व कारखानदार-व्यापारी यांच्यांत पूर्ण सहकारिता असणें जरूर आहे. हें तत्त्व ओळखून उद्योगधंदे, व्यापार, विमा इत्यादि विषयक अनेक संघांनीं एक "लीग ऑफ इकॉनॉमिक कोऑपरेशन" (आर्थिक सहकार संघ) स्थापन केली. त्यामुळें कारखानदारांना आणि सरकारला सल्ला मसलत देणारी एक अधिकारी संस्था निर्माण झाली.

आर्थिक जीवनविषयक या सर्व घडामोडी चालत असतांना एक गोष्ट विशेष नजरेस येई. सरकार आणि लोक या दोघांच्याही ठिकाणीं आपण एक आहोंत आणि या आणीबाणीच्या प्रसंगीं परस्परांचे सहकार्यानें वागलें पाहिजे ही भावना स्पष्टपणें दिसून येत होती. सरकारी कायद्यामुळें पडणाऱ्या नियंत्रणाविरुद्ध लोकांनीं तक्रार केली नाहीं आणि शक्य तेथें लोकांचें सहकार्य घेण्याची संधि सरकारनेंही वायां दवडली नाहीं.

**जपान किती टिकाव धरील—**

चिनी-जपानी युद्धाला प्रारंभ झाल्यावर जपानच्या आर्थिक परिस्थितीवर थोडा परिणाम झाला. वस्तूंचे बाजारभाव वाढले. खाद्यवस्तूंचे भाव शेंकडा दहा टक्क्यांनीं चढले. शेतकरी वर्गापैकीं बरेच लोक रणावर गेल्यामुळें शेतीविषयक उत्पादनांत थोडी तूट आली. चीनशीं सुरू असलेला व्यापार बंद पडल्यामुळें कांहीं कारखान्यांना काम कमी पडलें. उलट युद्धविषयक सामग्री तयार करणाऱ्या कारखान्यांचें काम वाढलें. कामकरी वर्गाला चांगलें वेतन मिळूं लागलें. औद्योगिक संस्थांतून बाहेर पडण्यापूर्वींच विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळूं लागल्या. यांत्रिक कामें करणारांना चांगली मागणी निर्माण झाली.

एकसारखें युद्ध चालूं राहिलें तर जपान किती वेळ टिकाव धरील असा प्रश्न अनेकांचे मनांत येतो. आजच्या स्थितीवरून अंदाज करितां तीन वर्षें तरी तो सहज टिकाव धरूं शकेल असें वाटतें. पण जपानची सहनशक्ति अमर्याद आहे. आणीबाणीचीच वेळ आली तर व्यक्तीचा सर्व पैसा राष्ट्राचा आहे आणि प्रत्येक व्यक्ती राष्ट्राची आहे.

युद्धकालीन जपान हा असा आहे.

* * *

# १४

# बुद्ध-शिंतो-येशू यांचा संसार

**जपानांत त्रिसुपर्ण—**

सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । तेजस्विनावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥ हा त्रिसुपर्णांतील मंत्र शब्दशः येथें उच्चारला जातो, त्याचें आचरण जपानमध्यें पाहावयास सांपडतें. तेथें बौद्धधर्माचे तेरा पंथ, शिंतोधर्माचे तेरा पंथ आणि ख्रिस्ती धर्माचे पंचवीस पंथ या सर्वांचा संसार सुखानें, सहकारितेनें आणि सहिष्णुतेनें चाललेला आहे. एकत्र खाणें-पिणें, ज्ञान मिळविणें, पराक्रम करणें व द्वेष न करणें ही त्रिसुपर्णांतील इच्छा जपानमध्यें सिद्ध झालेली दिसते.

तोकियोमध्यें, जपान सर्व धर्म मंडळ, नांवाची संस्था आहे, या संस्थेचें वार्षिक संमेलन होत असतें. त्यांत शिंतो, बुद्ध, ख्रिस्ती व इस्लामी अशा सर्व धर्मांचे व पंथांचे चाळीस पन्नास सभासद येतात. त्यांपैकीं तीनचतुर्थांश सदस्यांचे अंगावर पाश्चात्य पद्धतीचा सूटबूटटोपीचा पोषाख असतो. बाकीचे एकचतुर्थांश जपानी देशीय पोषाखांत असतात. सर्वजण पाश्चात्य पद्धतीनें मोठ्या टेबलाभोंवतीं बसून एकत्र भोजन करितात. त्यांत शाकाहारी व मांसाहारीही एकत्र बसतात. फक्त शाकाहाऱ्यांचे भोजनांत कांहीं पदार्थ निराळे असतात. बाकीच्या कांहीं शाकाहारी वस्तू दोघांचेही भोजनांत

सारख्याच असतात. भोजनोत्तर सर्व सभासद एकत्र बसतात आणि त्या त्या काळीं जो प्रचलित विषय असेल त्याचा धर्माशीं कसा संबंध पोंचतो या दृष्टीनें विचार करितात. उदाहरणार्थ, चिनी-जपानी युद्ध सुरूं झालें तर चीनमधील बुद्ध व ख्रिस्ती धर्मीयांशीं आपणांला कशा प्रकारचें सहकार्य करितां येईल, असा विषय असूं शकेल. सारांश राष्ट्रीय घडामोडींत सव धर्मांनीं व पंथांनीं एक दिलानें, सहकारितेनें, व समतेच्या भावनेनें भाग घेतला पाहिजे ही वृत्ति दिसून येते. जपानमधील धर्म व धर्मोपदेशक बाह्य स्वरूपानें, आचारानें व विचारानें किती नवीन झाले आहेत याची कल्पना वरील विवेचनावरून येईल.

त्यांचा धर्म आणि देवळें हीं देखील कार्याचे दृष्टीनें आधुनिक झालीं आहेत असें दिसून यईल. जपानमधील धर्म काळ ओळखतो आणि काळाप्रमाणें जमवून घेतो, म्हणून जिवंत राहातो.

**धर्मांतर म्हणजे समाजांतर नाहीं—**

एकाच घरांत बौद्ध, शिंतो व ख्रिस्ती माणसें राहूं शकतात हें चिनी व जपानी धार्मिक जीवनाचें वैशिष्ट्य आहे. धर्म ही वैयक्तिक श्रद्धेची, मताची व आचाराची बाब आहे. धर्माचा समाजसंघाशीं अपरिहार्य असा संबंध नाहीं. धर्म बदलला म्हणजे भोंवतालचा समाज किंवा घर बदलण्याची जरूरी नाहीं. मतें व श्रद्धा बदललीं एवढाच अर्थ. त्यामुळें पति-पत्नी, बाप-मुलें, बहिण-भाऊ यांचे धर्म वेगवेगळे असूनही ते एका घरांत एकत्र राहातात, एकत्र जेवतात, व कौटुंबिक आणि सामाजिक असे सर्व व्यवहार नित्याप्रमाणें करितात. धर्मांतरामुळें कुटुंबांतर किंवा समाजांतर होत नाहीं. एकाच कुटुंबांत दोन किंवा अधिक धर्म अथवा पंथ राहूं शकतात.

विनोदानें असें म्हणतां येईल कीं जपानी हा जन्मतः शिंतो असतो, कारण तो धर्म जन्माबरोबरच येतो; मध्यमवयांत ख्रिस्ती असतो, कारण ख्रिस्ती स्तोत्रांतील पदें मुक्तकंठानें व मजेनें गातां येतात; आणि शेवटीं वार्धक्यांत बौद्धधर्मीय असतो, कारण मरतांना "नामो आमिदा बुत्सु" (नमो बुद्धाय) असें म्हणून प्राण सोडतो.

**धर्माची जाहिरात नाहीं—**

सामाजिक जीवनांत व्यक्ति धर्माचें चिन्ह धारण करीत नाहीं. पोषाख अथवा इतर बाह्य उपाधीवरून हा मनुष्य बौद्ध, शितो किंवा ख्रिस्ती आहे असें समजण्याचें कांहींच साधन नाहीं. व्यक्तीचा पोषाख जपानी असेल किंवा पाश्चिमात्य पद्धतीचा असेल. यापेक्षां पोषाखांत अशी धार्मिक खूण नाहीं. फक्त धर्मोपदेशक व उपाध्याय यांचे वस्त्रांत वैशिष्टच असतें. या एकजात वस्त्र पद्धतीमुळें रोजच्या सामाजिक जीवनांत धार्मिक भेदभावनांची व सामाजिक अलगपणाची जाणीव राहात नाहीं. धार्मिक गोष्टींची चर्चाच निघाली तर एकमेकांचा धर्म समजेल. एरव्हीं ती गोष्ट प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्यामीं राहील. धर्म ही आध्यात्मिक व वैयक्तिक बाब आहे याचें सत्य जपानी समाजांत पटतें.

शिक्षणसंस्थांनीं मुलांकरितां व मुलींकरितां गणवेशाची पद्धति सक्तीनें ठेविली आहे. वयस्क समाजाच्या चालीरीतींत एकजातपणा आणण्याचे दृष्टीनें, आणि समाजांतील धार्मिक, प्रांतिक व जातीय भेदभावनांच्या जाणीवेचा सामाजिक जीवनांत विसर पाडण्याचे दृष्टीनें, या पद्धतीचा फार चांगला परिणाम होतो हा अनुभव लक्षांत घेण्यासारखा आहे. भेदांची जाणीव कमी झाली कीं समाजांतील एकनिष्ठा त्या प्रमाणांत अधिक वाढते व एकजूट होते.

**तीन धर्म व एकावन्न पंथ—**

जपानमधील बहुसंख्य लोक धर्मानें बौद्ध आहेत. अल्पसंख्याक लोक ख्रिस्ती आहेत. शितो हा पूर्वजपूजेचा धर्म असल्यामुळें प्रत्येक जपानी नागरिक जन्मतःच शितो असतो. त्याची दीक्षा घ्यावी लागत नाहीं. परंतु विशिष्ट प्रकारचे शितोपंथ आहेत ते स्वतंत्र धर्माप्रमाणेंच आहेत.

प्रत्येक धर्मांत असलेले पंथ व त्यांचे अनुयायी यांची साधारण कल्पना पुढील आंकडयांवरून येईल.

| धर्म | पंथ | देवालयें | धर्मोपाध्याय | अनुयायी |
|---|---|---|---|---|
| शितो | १३ | १५११३ | १ लक्ष | १६५ लक्ष |
| बुद्ध | १३ | ७१०३२ | ८७ हजार | ४११ लक्ष |
| ख्रिस्ती | २५ | ३०४ | ३॥ हजार | ४३ लक्ष |

वरील माहितीवरून एक गोष्ट लक्षांत येईल कीं जपानमध्यें तीन धर्म आहेत आणि एकूण धर्मपंथ एकावन्न आहेत! त्यांत ख्रिस्ती धर्माचेच पंथ निम्मे आहेत. बहुसंख्य अनुयायी वर्ग बौद्धधर्मीय आहे. इस्लामी धर्माचा फारसा कोठें प्रचार नाहीं. कांहीं परदेशी लोक इस्लामी आहेत पण ते नागरिक नसावेत.

**शितो-बुद्धाची भेट व समेट—**

बहुजनसमाजांत धार्मिक बाबतींत सहिष्णु व उदार वृत्ति पूर्वीपासूनच होती व आजही आहे. परंतु धर्मोपाध्यायांचे ठिकाणीं मात्र ती अलीकडे अनुभवानें आली आहे, पूर्वी नव्हती. जपानच्या धार्मिक इतिहासांत धर्म-कलहांची परंपरा आहे, नाहीं असें नाहीं. कोणताही नवीन धर्म आला तो जुन्याशीं कांहीं काल स्पर्धा करून राहिला, आणि नंतर दोघेही देवघेव करून एकरूप झाले. असा सामान्यपणें धार्मिक इतिहास आहे.

अगदीं प्रारंभीं निसर्गाची आणि पूर्वजांची पूजा सुरू झाली. हाच शितोधर्म. शितोधर्मांत तत्त्वज्ञान नाहीं, फक्त आचार व संस्था आहे. पुढें सहावे शतकांत बौद्ध धर्माचा प्रवेश झाला. हिंदुस्थानमधून चिनांत, चिनांतून कोरियांत व कोरियांतून जपानमध्यें बौद्धधर्मानें प्रवास केला. त्याचा प्रसारही त्वरित झाला. बुद्धाची सुंदर, दयार्द्रमुखी, अभयहस्ती अशी मूर्ति; बुद्धपूजेचा आकर्षक विधि; देवालयांतील फुलें, कमळें, धूपदीप इत्यादि सदभिरुचिपूर्ण वातावरण, उपाध्यायांचीं आकर्षक वस्त्रें, आणि उदात्त मनाला अधिक उदात्त करणारे बुद्धाचे विचार या सर्वांचा जपानी मनावर फार पगडा बसला, आणि अल्पावधींत त्याचा देशभर प्रसार झाला. राज-घराणें, सरदारघराणीं, सामान्य लोक, सर्वांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला.

विशेषत: स्त्रीवर्गावर तर बौद्धधर्मानें मोहनी टाकली. अनेक राण्या व सरदारणी यांनीं भिक्षुणींची दीक्षा घेतली.

शितोच्या पुढाऱ्यांनीं कांहीं काळ प्रतिकार करून पुढें बौद्ध धर्म मान्य केला. कांहीं राजांनीं व महंतांनीं बुद्ध आणि शितो यांचा समन्वय घालण्याचाही प्रयत्न केला. शेवटीं बुद्ध मंदिरें आणि शितो मंदिरें हीं शेजारींशेजारीं स्थापन होऊं लागलीं. अशा रीतीनें देशी व परदेशीय धर्मांचें ऐक्य झालें. कांहीं कडवट वृत्तीच्या अल्पसंख्याक धर्मोपाध्यायांखेरीज इतरांनीं शितो व बौद्ध हे दोन्ही धर्म मान्य केले आहेत.

१८६७ सालच्या राजकीय पुनर्घटनेनंतर कांहीं शितो पुढाऱ्यांनीं पुन्हा बौद्ध धर्म दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पण बहुजन समाजांत त्याचा इतका प्रसार झालेला आहे कीं या प्रयत्नांचा कांहीं परिणाम झाला नाहीं.

**ख्रिस्ती उपदेशक गोव्याहून गेला—**

बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून आला, त्याप्रमाणेंच पहिला ख्रिस्ती शिष्यही हिंदुस्थानांतूनच शिकून आला हा योगायोग लक्षांत घेण्यासारखा आहे! आंजीरो नांवाचा जपानी गोव्याला येऊन झेवियर साधूपाशीं ख्रिस्ती धर्म शिकून जपानांत गेला. आणि नंतर तेथें त्यानें त्याचा प्रसार केला. १५४९ च्या सुमाराला ख्रिस्ती धर्माचा जपानांत प्रसार झाला व पाऊणशें वर्षांत लोकांनीं त्याचें चांगलें स्वागत केलें. धर्म ही श्रद्धेची बाब असल्यामुळें आणि धर्मांतरामुळें समाजांतर होत नसल्यामुळें कोणत्याही धर्माचें जपानमध्यें स्वागत झालेलें दिसतें. पुढें ख्रिस्ती लोकांनीं आपलें काम धर्मांतरापुरतेंच मर्यादित ठेविलें नाहीं. धर्मामागें राजकारण येऊं लागलें. त्याबरोबर जपानी लोकांचे डोळे उघडले. धर्मांतर ही राज्य घेण्यापूर्वीची पहिली पायरी आहे असें राज्यकर्त्यांच्या लक्षांत आल्याबरोबर त्यांनीं ख्रिस्ती मिशनरी, त्यांचे व्यापारी आणि इतर लोक या सर्वांची देशाबाहेर हकालपट्टी केली, आणि अडीचशें वर्षें आपले दरवाजे बंद केले. ख्रिस्ती धर्मप्रचारकांवरील जपान्यांची श्रद्धा उडाल्याबरोबर त्यांनीं अत्यंत निष्ठुरपणानें सर्व मिशनऱ्यांचीं

व त्यांच्या अनुयायांचीं पाळेंमुळें खणून काढलीं. हा इतिहास वाचला कीं गोऱ्या लोकांचे अंगावर कांटा उभा राहतो असें ते म्हणतात !

हिंदुस्थानांतील ख्रिस्ती धर्मांतराचा इतिहास वाचला म्हणजे हिंदूंच्या अंगावर काटा उभा राहतो ! काय विरोधी योगायोग आहे !

मेइजी युगाला सुरुवात झाल्यानंतर जपाननें पाश्चिमात्यांच्या सर्वच गोष्टींना प्रवेश दिला त्याबरोबर पुन्हा धर्मही आला. परंतु सतराव्या शतकांत जी ख्रिस्ती जपान्यांची लोकसंख्या होती त्यापेक्षां आज कमी आहे. आतां मिशनऱ्यांना पूर्वीच्या पद्धतीनें काम करितां येत नाहीं; शांततेनें व सामोपचारानें करावें लागतें. पूर्वीच्या पद्धतींत ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं बौद्धधर्मीयांचा छळ करण्याचें धोरण ठेविलें होतें.

**मिशनरी व धर्मांतर—**

आजही जपानमध्यें ख्रिस्ती व बौद्धमिशनरी संस्था असून धर्मांतराचा प्रचार होत आहे. परंतु मिशन संस्थांचें पुढारीपण युरोपियन अमेरिकन लोकांचेकडे नसून जपानी लोकांचेकडेच आहे. जपानी ख्रिस्ती मिशनरी आपण होऊनच ख्रिस्ती धर्माचा प्रसार करितात. त्यामुळें त्याचें राजकीय स्वरूप नाहींसें होऊन केवळ धार्मिक रूप राहिलें आहे. धर्मांतरें होत असलीं तरी धर्मांतराची चळवळ नाहीं. श्रद्धा आणि तत्त्व पालटलें तर विचारी मनुष्य धर्मांतर करूं शकतो. धर्मांतरामुळें कुटुंब किंवा समाज बदलत नसल्यामुळें त्याचा विशेष गाजावाजाही होत नाहीं. पण एकंदर धर्मांतरांची संख्याही फार कमी आहे. कारण संख्या वाढविण्याकडे धर्मपंथांचा कल राहिलेला नाहीं.

**सरकारला धर्म नाहीं—**

सरकारला धर्म नाहीं. धर्मपंथांचे बाबत सरकार निःपक्षपाती आहे. शिक्षणपद्धतींत धर्मविषयाचा समावेश झालेला नाहीं. पितृपूजात्मक शिंतो धर्म आहे, तो मात्र राजघराण्याकडून व सरकारकडून पाळला जातो. पण या बाबतींत पुन्हा कलह सुरू झाले होते. ख्रिस्ती लोकांनीं शिंतो धर्माशीं

विरोध मांडला तेव्हां सरकारनें एक चौकशीमंडळ नेमून अखेर असा निर्णय दिला कीं शितो हा सरकारी धर्म नसून राष्ट्रीय आचार आहे. राष्ट्रीय पूर्वजांची व विभूतींची पूजा करणें ही गोष्ट राष्ट्रीय आचारांत येते. तेव्हांपासून हा वाद मिटला आहे. नाहीं तर ख्रिस्ती शिक्षक व विद्यार्थी शितो समाधीपुढें कमर वांकविण्यास तयार नव्हते. सर्व शाळांना राष्ट्रीय आचार म्हणून हा उपक्रम आवश्यक आहे, त्यामुळें हा वाद उपस्थित झाला होता.

शिक्षणखात्यामध्यें एक विभाग धार्मिक खात्याचा आहे. शितो, बौद्ध व ख्रिस्ती धर्मांच्या कारभारविषयक बाबतींत वांधा उपस्थित झाला तर तो या खात्याकडे येतो. धार्मिक वाद तडजोडीनेंच सोडविले जातात. हे वाद जगाच्या वेशीवर टांगून आपापसांतील दुहीचें प्रदर्शन जपानी लोक करीत नाहींत. धर्मकलहाचीं कांहीं उदाहरणें सांगा असें एका जपानी तरुणाला विचारलें असतां तो म्हणाला,—"या गोष्टी राष्ट्रीय अब्रूच्या आहेत. त्या आम्ही परकीयांचे कानापर्यंत जाऊं देत नसतों."

**शितोघर व समाधी—**

प्रत्येक घरांत भिंतीवर उंच जागीं शितोघराचा (कामीदान) एक देव्हारा असतो. त्याला गवताचा दोर व कागदाच्या घड्या यांनीं शृंगारलेलें असतें. त्याचे आंत शितो देवता, पूर्वजांचीं नांवें लिहिलेल्या फळ्या, उपायन ठेवण्याचा चौरंग इत्यादि वस्तू असतात. शितोचीं सार्वजनिक समाधिमंदिरें व उद्यानें भव्य आणि निसर्गरम्य अशीं आहेत. सरकारकडून त्यांचें संगोपन केलें जातें. उद्यानांत, टेकडीवर, जलवेष्टित बेटांत अशा रम्य ठिकाणीं या समाधी बसविलेल्या आहेत. तेथें धर्मोपाध्याय असतात. लाखों लोक प्रतिवर्षीं या समाधींचे दर्शनाकरितां जातात. शाळेच्या प्रवासक्रमांत समाधिदर्शन ही एक आवश्यक बाब आहे. राष्ट्रीय भावनेचें संगोपन आणि समाजांत ऐक्य निर्माण करण्याचे दृष्टीनें शितोसमाधींचें महत्त्व जपानांत फार आहे.

**ख्रिस्ती विचाराची छाप—**

ख्रिस्ती धर्माची लोकसंख्या फारशी नसली तरी ख्रिस्ती विचारांची

छाप जपानी समाजावर फार आहे. विशेषतः सामाजिक सुधारणेच्या बाबतींत ख्रिस्ती मिशनऱ्यांचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति बौद्ध धर्मप्रचारकांमध्येंही दिसून येते. ख्रिस्तांचे अनुयायी यूरोपमधील धर्मपीठांना प्रमाण मानतात. परंतु श्वेत श्वेतेतर वाद उपस्थित झाल्यापासून आशियांत स्वतंत्र ख्रिस्ती धर्मपीठ स्थापन करावें व यूरोपपासून आपला संबंध तोडावा असा एक विचार चालला आहे. दुसराही एक असा विचार आहे कीं महायान बौद्ध धर्माप्रमाणें महायान ख्रिस्ती धर्माची स्थापना करावी.

**बौद्ध सूत्रें व अवतार**—

बौद्ध धर्माचा परिणाम जपानच्या सर्व जीवनावर झालेला आहे. हिंदुस्थानांतून जो बौद्ध धर्म गेला त्यांत कांहीं फरक जपाननें केलेला आहे.

मूळ बौद्ध धर्म नास्तिकवादी आहे. पण जपानमध्यें बुद्ध हाच परमेश्वर किंवा अवतार समजला जातो. बौद्ध धर्मावर शितोच्या पितृपूजेचा व कन्फ्यूशियन राजनिष्ठेचा परिणाम होऊन बौद्ध धर्मी लोक देशनिष्ठ व राजनिष्ठ वनले. जपानी सम्राट् हा "धर्मकाय बुद्ध" किंवा देवाचा पृथ्वीवरील अवतार झाला. बाकी तत्त्वज्ञान या दृष्टीनें मूळांत फारसा बदल झालेला नाहीं. कारण सामान्यपणें बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा फारसा अभ्यास सामान्य जनांत नाहीं. बौद्ध धर्मीय विद्यापीठांतून मात्र बुद्धतत्त्वज्ञानाचें पद्धतशीर अध्ययन होतें.

पुनर्जन्म, कर्मफल, मुक्ति आणि कर्मनियंता हीं तत्त्वें जपानी बौद्ध धर्मात प्रचलित आहेत. मुक्ति मिळविण्याकरितां ध्यान करून आत्मशक्ति वाढवावी हा एक मार्ग; किंवा "नमो आमिदा बुत्सु" असा मंत्रोच्चार (नामस्मरण) वारंवार करीत राहावें हा दुसरा मार्ग. ज्या काळीं हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म उत्तरेकडे आशियांत गेला त्या काळीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या तत्त्वांचा व धर्माचारांचा परिणाम जपानवर झालेला दिसून येतो. त्यामुळें हिंदुस्थानांत व जपानांत आज प्रचलित असलेल्या अनेक गोष्टींत साम्य दिसतें.

महायान पंथांतील "प्रज्ञाप्रमित हृदयसूत्र" (हान्याशिंगो), शुरंगम

सूत्र (दाई हिश्यू), आमितापसूत्र (आमिदाक्यो), त्रिपुरसूत्र, विमलकीर्ति-सूत्र, इत्यादि सूत्रांचीं नांवें जपानांत ऐकूं येतात. यांपैकीं कांहींचे संस्कृत अथवा पाली उच्चार चिनी भाषेंत लिहिलेले आहेत; कांहींचीं चिनी भाषांतरें झालीं आहेत; कांहींचीं जपानी भाषांतरें झालीं आहेत. हिंदुस्थानांत जन्मास आलेलीं परंतु आज लुप्त झालेलीं अनेक बुद्धसूत्रें जपानमध्यें चिनी भाषेंत आहेत असें एका जपानी संस्कृत अध्यापकानें सांगितलें.

बुद्धाचे अवतार म्हणून अनेक देवतांचीं नांवें जपानांत ऐकूं येतात. अवलोकितेश्वर, आर्याचलानन, वैरोचन, महाश्री, अमोघपाश, विरूपाक्ष, विरूधक, इत्यादि अनेक संस्कृत नांवें बुद्धावताराच्या मूर्तींना दिलेलीं असून त्यांना जपानी प्रतिशब्दही आहेत.

**नामसंकीर्तन व दिंड्या—**

बहुजन समाजाकरितां नामसंकीर्तनाचा धर्म आहे. इकडे जसे देवालयांचे मोठे उत्सव होतात तसेच जपानमध्येंही होतात. त्या वेळीं विशिष्ट मंत्रोच्चार करीत अनेक भक्तांच्या दिंड्या लांबलांबून येतात. मोठी यात्रा भरते. देवापुढें पैशाची रास पडते. तोकियोमध्यें प्रतिवर्षी निचिरेन साधूच्या जयंतीनिमित्त ओएशिकी उत्सव होत असतो. त्याकरितां "नाम्यांहो रेंग्येक्यो" (ज्ञानबा तुकारामसारखा एक स्तोत्राचा जयजयकार) असा गजर एका डफाच्या तालावर करीत हजारों दिंड्या येतात. सर्वांचे पोषाख पांढरे असतात. प्रत्येक दिंडीबरोबर एक उंच कागदी मनोरा असतो तो लहान डोल्यासारखा दिसतो. अशी लाखो लोकांची यात्रा जमते. सर्व लोक देवापुढें जाऊन प्रणाम करतात, पैसे टाकतात, आणि प्रदक्षिणा करून परत जातात. देवळाचे आवारांत बौद्ध भिक्षु चित्रविचित्र रंगांचीं वस्त्रें परिधान करून वेदपठनाप्रमाणेंच खोल घोगऱ्या आवाजांत स्तोत्रपठन करितात. भक्त लोक परत जातांना कांहीं वस्तू प्रसाद म्हणून बरोबर नेतात. या यात्रेंत साहेबासारखा पोषाख घातलेले पुरुष, क्वचित् मडमासारखा झगा घातलेल्या स्त्रिया, सुशिक्षित लोक हे देखील सामील होतात.

जपानमधील सामान्य लोकांचा हा धर्म आहे.



समाधिस्थानाचें प्रवेशद्वार



बुद्धमंदिराचें प्रवेशद्वार

**कौटुंबिक धर्म**—.

प्रत्येक घरांत एक सुंदर बुत्सुदान किंवा बुद्ध घराचा काळा लाकडी देव्हारा असतो. त्यांत लहान बुद्धप्रतिमा, कांहीं स्तोस्त्रें, पूजा-नैवेद्य-साहित्य इत्यादि वस्तू ठेविलेल्या असतात. पूजेचें काम घरांतल्या म्हातारीकडे किंवा घरमालकिणीकडे असतें. रोजच्या धार्मिक कार्यक्रमांत स्तोत्रवाचन, प्रार्थना, नमस्कार, नैवेद्य दाखविणें, धूप किंवा उदबत्त्या लावणें इत्यादि गोष्टी येतात. सकाळीं विशेष वस्त्र अंगावर घालून स्तोत्रवाचन, भोजनापूर्वी नमस्कार, व निजण्यापूर्वी धूप लावणें असा सामान्यपणें दिनक्रम असतो.

महत्त्वाचे धार्मिक उत्सव किंवा विधी वर्षांतून चारपांच वेळां केले जातात. त्यांपैकीं पहिला श्राद्धाचा विधि (ओबोन) असतो. सर्वपितृदिन म्हणून जुलैमध्यें तारीख तेरा ते सोळा हे दिवस ठरलेले असतात. त्या दिवशीं बौद्ध उपाध्याय घरीं येऊन स्तोत्रपठन करितात. त्यांना भोजन व दक्षिणा दिली जाते. जवळचे नातेवाईक वगैरे बोलावून त्यांनाही मिष्टान्न भोजन दिलें जातें. एप्रिल, मार्च व डिसेंबर या महिन्यांत भगवान् बुद्धाचे जन्मोत्सव (हानानोही), निर्वाणोत्सव व ज्ञानप्राप्ति उत्सव असे होतात. त्या वेळीं देवळें सुशोभित केलीं जातात व तेथें धर्मोपदेशकांचें प्रवचन ऐकण्याकरितां लोक जमतात.

बौद्ध धर्मामध्यें कौटुंबिक संस्कारही आहेत. जन्म, विवाह आणि मृत्यु हे संस्कार धर्मोपाध्यायांकडून मंत्रयुक्त केले जातात. याशिवाय नैमित्तिक प्रसंगीं प्रवासगमन, कार्यारंभ, घर बांधणें, विशेष संकट इत्यादि कारणांकरितां घरीं उपाध्याय बोलावून स्तोत्रपठन व प्रार्थना हे कार्यक्रम केले जातात.

वर जो कौटुंबिक धर्म सांगितला आहे तो श्रद्धामानानें आचरणांत आणला जातो. सुशिक्षितांचा धर्म काय आहे, असें अनेक धर्मोपाध्यायांना विचारतां समाजांत उदासीनतेची स्थिति आहे असें समजतें. एका मोठ्या देवालयाचे प्रमुख धर्मोपाध्याय म्हणाले, " खरें सांगावयाचें झालें तर बहुतेक सुशिक्षित वर्ग उदासीन आहे असें म्हणावें लागेल." समाजशास्त्राचे एक अध्यापक या विषयासंबंधीं बोलतांना म्हणाले, "मध्यम वर्गातील

सुशिक्षित लोक बौद्ध धर्म गृहीत धरतात. तत्त्वांचा प्रश्न त्यांच्या मनांत कधीं येतच नाहीं. त्यामुळें धर्माकडे ते चिकित्सक बुद्धीनें पाहात नाहींत."

**भव्य बुद्धमंदिरें—**

बुद्धाचीं देवळें भव्य, विस्तीर्ण, स्वच्छ, सुशोभित, अशीं असून त्यांच्या भोंवतीं सुंदर उद्यानें व मैदानें यांची योजना केलेली असते. शिल्पकला-विषयक जपानी अभिरुचि देवालयांत दिसून येते. नेहमीं भूकंपाचीं व अग्नीची भीति असल्यामुळें देवळांची उंची फारशी नसते; जपानमध्यें शिल्पकलेकरितां लाकूड प्रामुख्यानें वापरलें जातें. त्यामुळें देवालयांची शिल्पकला एका विशिष्ट पद्धतीनें वाढलेली आहे. लांबून देवळाकडे पाहिल्याबरोबर एकदम लक्षांत येणाऱ्या गोष्टी म्हणजे उंच व बांकदार असें मोठें छप्पर आणि मध्यावर जपानी पद्धतीची कमान या होत. देवळाचे आंत सर्वत्र चटया पसरलेल्या असतात. हजारों माणसें बसतील अशी मोकळी जागा असते. मध्यावर गाभाऱ्यांत बुद्धाची सुंदर मूर्ति असून तिच्यापुढें पितळेचीं कमळें व धूपदान इत्यादि वस्तू असतात. मूर्तीपासून वीस पंचवीस हातांवर तिन्ही बाजूंस कठडे असतात, तेथपर्यंत कोणींही यावें. परंतु त्याचे पलीकडे कोणालाही जाण्याची परवानगी नसते. देवळांत जातांना पादत्राणें बाहेर काढून ठेवावीं लागतात.

**मठांतील शिक्षण—**

कांहीं धर्मपंथांच्या देवालयांना जोडून भिक्षूंचे मठ असतात. झेन, रिन्झाई, सोतो व ओबाकू या पंथांचे मठ आहेत. त्यांतील झेन पंथानें मठांतील मानसिक शिक्षणाकडे विशेष लक्ष दिलें आहे. झेन शब्द संस्कृत ध्यान शब्दावरून आलेला आहे. देवळांना जोडून पण अलग व शांत ठिकाणीं हे मठ असतात. तेथें भिक्षू येऊन शिक्षण घेतात. शिक्षणांत ध्यान, शारीरिक काम आणि भिक्षा असे तीन मुख्य भाग आहेत. ध्यान करून मानसिक शांति मिळविणें, काम करून ऐच्छिक सुखेच्छा नाहींशी करणें, आणि भिक्षा मागून अहंकार नाहींसा करणें असे या शिक्षणाचे उद्देश आहेत. कमींत कमी तीन वर्षें, अधिकाधिक जन्मभर, असें हें शिक्षण घेतलें जातें. शिक्षण पूर्ण झाल्यावर

भिक्षु देवालयाची व्यवस्था पाहण्यास लायक होतो. या मठांत विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी देखील आध्यात्मिक शिक्षणाकरितां येतात ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

मठांतील राहणी साधी असते. शिस्त, साधेपणा, स्वावलंबन, शांतता, विनय व सेवावृत्ति हे गुण तेथील वातावरणांत असल्यासारखे वाटतात. हे मठ पाहून आपल्याकडील एकाद्या गुरुकुलाची आठवण होते.

**झेनपंथीय ध्यानमार्ग—**

झेन या पंथांतील ध्यानपद्धति मोठी मनोरंजक आहे. ध्यानमंदिराची इमारत एका बाजूला शांत अशा स्थानीं असते. चारी बाजूंनीं भिंती, भिंतीला लागून ओटे, आणि मध्यावर एक चबूतऱ्यावर बुद्धाची मूर्ति अशी रचना असते. ओटयावर प्रत्येक भिक्षूला बसण्याकरितां एकेक उशी असते. या उशीवर कमलासन घालून ध्यानस्थ बसावयाचें. अर्ध्या अर्ध्या तासानें घंटा-नाद होतो त्यावेळीं ध्यान मोडून शरीरधर्म उरकून यावयाचे; मध्यंतरीं हालावयाचें नाहीं. सर्वांवर देखरेख ठेवण्याकरितां एक दंडधारी भिक्षु असतो, मुठींत अडीच तीन हात लांबीचा एक काष्ठदंड घेऊन तो बुद्धापुढें धरून प्रणाम करतो आणि नंतर तो दोन्ही मुठींत ताठ उभा धरून ध्यानस्थ भिक्षूंच्या मधून फिरतो. एकादा भिक्षु निद्रा किंवा दुर्लक्ष करीत असलेला दिसला कीं त्याच्या खांद्यावर दंडानें सप्कन् प्रहार करून, पुन्हां दंड दोन्ही हातानें आडवा धरून कमरेपासून लवून प्रहार झालेल्या भिक्षूला नमस्कार करतो, व पुन्हां आपल्या कामाला लागतो. ही ध्यानाची पद्धति देवालयांना जोडून असलेल्या साध्या विद्यालयांत किंवा इतर सामान्य शाळांतही सुरू झालेली आहे. लौकरच सर्व शाळांत तिचा प्रारंभ होईल असें वाटतें. कारण जें जें खास जपानी आहे तें तें सर्व शिक्षणांत समाविष्ट व्हावयाचें आहे.

ध्यान करणाऱ्या भिक्षूंना कांहीं विशिष्ट प्रश्न किंवा विचार ध्याना-करितां दिला जातो. त्यांना मार्गदर्शन करणारा एक मुख्य भिक्षु असतो.

**भिक्षुणींचा मठ—**

स्त्रियांचे करितांही कांहीं मठ जपानमध्यें आहेत. असा एक मठ कियोतोमध्यें फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. कांहीं बुद्ध देवालयें अशीं आहेत कीं तीं फक्त स्त्रियांकरितांच असल्यानें तेथील व्यवस्थेचें सर्व कामही स्त्रियाच करितात. पुरुषांचा संबंध येत नाहीं. या कामाकरितां भिक्षुणी तयार करण्याचें काम कांहीं मठांत चालतें. मठाचें आधिपत्य एका भिक्षुणीकडेच असतें.

भावी आयुष्यांत देवालयाची व्यवस्था पाहूं इच्छिणाऱ्या, किंवा आयुष्यांत अनन्यगतिक व विरक्त झालेल्या अशा मुली व स्त्रिया या मठांत येतात. त्यांत पंधरासोळापासून तीसचाळीस पर्यंत वय असलेल्यांचा समावेश झालेला दिसतो. मठांत धार्मिक व ऐहिक दोन्ही प्रकारचें शिक्षण दिलें जातें. धार्मिक शिक्षणांत देवालयाची व्यवस्था पाहण्यास लागणारे स्तोस्त्रपठन, पूजाविधि, देवालयमंडन इत्यादि विषय येतात. शिवाय दुय्यम शाळेच्या दर्जाचें इंग्लिश गणित, विज्ञान, इतिहास व भूगोल हेही विषय शिकविले जातात. मधून अधून ऐकूं येणारे संगीताचे आलाप, हास्याचा ध्वनि, व पुरुषप्रेक्षकांकडे जिज्ञासेनें फेंकलेली अपांगदृष्टि—यांवरून मठांतील जीवन व शिक्षण अगदींच रुक्ष असेल असें वाटत नाहीं.

सर्व भिक्षुणींनीं मुंडन केलेलें असतें. वस्त्रें काळीं असतात. दुय्यम शिक्षणाचे विषय शिकविण्याकरितां पुरुष शिक्षक येतात. अशा प्रकारचे खास भिक्षुणींच्या करितां चालविलेले चारपांच मठ जपानांत आहेत.

**ग्रॅज्युएट बौद्ध भिक्षू—**

जपानी बौद्ध भिक्षूचें शिक्षण आधुनिक पद्धतीनें झालेलें असतें. बौद्धधर्माचीं अनेक विद्यापीठें तोकियो, कियोतो वगैरे ठिकाणीं आहेत. या विद्यापीठांत धर्म, तत्त्वज्ञान, तुलनात्मक धर्म, या विषयांखेरीज आधुनिक विद्यापीठाचे विषयही शिकविले जातात. अशा प्रकारें विद्यापीठांतील आधुनिक शिक्षण झाल्यावर विद्यार्थी एकाद्या मठांत कांहीं वर्षं आध्यात्मिक

शिस्तीचें शिक्षण घेतो व नंतर एकाद्या देवालयाचा अधिकारी होतो. अगदीं जुने व वृद्ध असे कांहीं धर्मोपाध्याय अशिक्षित आहेत. पण नवीन पिढी सुशिक्षित व नव्या विचारांची आहे. जपानमध्यें बौद्ध धर्म जिवंत राहिला याचें कारण बुद्ध विद्यापीठांतून आधुनिक ज्ञान घेतलेलें व मठांत आध्यात्मिक अनुभव घेतलेले धर्मोपाध्याय त्याचे नेते आहेत. बौद्ध धर्म, तत्त्वज्ञान, तुलनात्मक धर्म इत्यादि विषयांचें शिक्षण देण्याकरितां तोकियो, कियोतो, नागोया इत्यादि ठिकाणीं सहा विद्यापीठें व शिवाय सहा महाविद्यालयें आहेत. याशिवाय इतर आंठ विद्यापीठांत बौद्ध धर्माच्या अभ्यासाकरितां स्वतंत्र शाखा आहेत.

पूर्वीं भिक्षूंना मांसाशन व विवाह यांची परवानगी नव्हती. पण अलीकडे हे निर्बंध सैल झालेले असून बहुतेक भिक्षु विवाह करितात व मांसाशनासंबंधीं निर्बंध फारसे पाळीत नाहींत. समाजांत झालेल्या संक्रमणाला धरून भिक्षूंमध्येंही बदल झाला आहे.

**देवालयांचें व्यापक समाजकार्य—**

बुद्ध देवालयांचें काम केवळ प्रवचन व पूजा यांपुरतेंच मर्यादित नाहीं. देवालयाचे भोंवतालीं असलेल्या सर्व समाजाचा शैक्षणिक, धार्मिक, आरोग्यविषयक व इतर दृष्टीनें उद्धार करण्याचें काम बुद्ध देवालयांनीं घेतलेलें आहे. किंबहुना एकेक देवालय म्हणजे अनेक संस्थांचा संघच आहे. या संस्थांवर हजारों येन प्रतिवर्षीं खर्च होत असतात. सार्वजनिक हिताचीं व परोपकाराचीं कामें करण्याची परंपरा बौद्ध धर्मांत फार जुनी आहे. तिचाच अलीकडे उद्धार झालेला आहे.

कियोतोमध्यें निशिहोंगांजी नांवाचें शिनशूपंथाचें मोठें देवालय आहे. त्यानें सार्वजनिक परोपकाराच्या संस्था चालविल्या आहेत तशाच इतर अनेक देवालयांना जोडून चाललेल्या आहेत. त्यावरून बौद्धधर्मीय भिक्षूंनीं किती व्यापक स्वरूपाचें सार्वजनिक काम अंगावर घेतलें आहे याची कल्पना येईल.

कियोतोमधील एका देवालयाला जोडून चाललेलीं कामें पुढें दिलीं आहेत.

| संस्था | किती वर्षें |
|---|---|
| मुलींचें हायस्कूल | ५१ |
| वयस्क महिलांचें महाविद्यालय | १० |
| दवाखाना | ६ |
| उनाड मुलांकरितां सुधारणा शाळा | १० |
| तुरुंगांतून बाहेर पडणारांना मदत व मार्गदर्शन | ७ |
| रविवारचे वर्ग | ५० |
| बालचर संघ | १२ |
| तरुण संघ | ३० |
| भिक्षूंकरितां रात्रीच्या शाळा | २० |
| स्त्रीसंघ–कन्यासंघ | अतिप्राचीन. |

मुलींच्या हायस्कुलांत १३०० विद्यार्थिनी आहेत. या संस्थांचें काम मुख्यत: बौद्ध भिक्षूच करितात. कांहीं इतर कार्यकर्ते लोक आहेत. या संस्थांचा खर्च भागविण्याकरितां देवालयाचें उत्पन्न खर्च केलें जातें. त्यांत निम्मा खर्च भागतो, निम्मा देणग्यांतून भागविला जातो. याशिवाय कारखाने, डॉक्यार्ड, तुरुंग, पोस्ट ऑफीस, पोलीस ऑफीस इत्यादि ठिकाणीं प्रवचन व उपदेश करण्याकरितां बौद्ध भिक्षू फिरत असतात.

याप्रमाणें लोक देवालयांत आले नाहींत तर देवालय त्यांचेकडे जातें !

कोलंबो व हिंदुस्थानांतील बौद्ध धर्म आणि मठ पाहून गेलेले एक सुशिक्षित बुद्ध भिक्षु कियोतोमध्यें आहेत. इकडील भिक्षूविषयीं ते म्हणाले :

" सीलोन-बर्मांतील भिक्षु ऐहिक गोष्टी व व्यवहार यांविषयीं उदासीन आहेत; थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास, ते आळशी आहेत. बोलण्याचा राग मानूं नका. त्यांचीं देवालयें अस्वच्छ असतात. जपानी भिक्षू अधिक व्यावहारिक व सार्वजनिक काम करणारे आहेत. हिंदुस्थानांत परोपकाराचीं कामें सामान्य लोक करितात. भिक्षू त्यांपासून अलिप्त राहतात. "

**धर्मांची सहकारिता—**

ख्रिस्ती चर्चला जोडून अशाच प्रकारचें सार्वजनिक काम चाललें आहे.

ऱ्या धर्माच्या शिक्षणसंस्थाही अनेक आहेत. विशेषतः स्त्रीशिक्षणाचे क्षेत्रांत ख्रिस्ती संस्थांनीं प्रगति केलेली आहे.

बौद्ध आणि ख्रिस्ती विद्यापीठांचें सहकार्य चांगलें आहे. तुलनात्मक धर्माभ्यासाचे सोयीकरितां अध्यापकांची देवघेव वारंवार केली जाते.

शिंतो, बौद्ध आणि ख्रिस्ती धर्माच्या पुढाऱ्यांनीं चालविलेल्या शैक्षणिक व सार्वजनिक कामाची कल्पना पुढील आंकडयांवरून येईल.

| धर्म | लोकसंख्या | सार्वजनिक संस्था |
|---|---|---|
| बौद्ध | ४ कोटी | ५००० |
| शिंतो | १।।। कोटी | १५० |
| ख्रिस्ती | ३ लक्ष | १५०० |

याशिवाय बौद्ध पुढाऱ्यांनीं अमेरिका, चीन, मांचूरिया, हवाई, सयाम इत्यादि भागांत मंदिरें, संस्था, धर्मोपदेश इत्यादि स्वरूपाचें काम चालविलें आहे.

**तरुणांचा धर्म—**

"तुमचा धर्म कोणता" असें अनेक जपानी तरुणांना विचारलें तर पुष्कळ वेळां असें उत्तर मिळेल कीं "मी अजून धर्म घेतला नाहीं" 'धर्म घेणें' हें काय प्रकरण आहे तें तिऱ्हाइताला कळत नाहीं. धर्म घेतला नाहीं याचा अर्थ धर्माविषयीं विचार केला नाहीं असा घ्यावयाचा.

जपानी शिक्षणपद्धतींत धर्माचा समावेश केलेला नाहीं. आधुनिक जपान तयार करण्याकरितां भौतिकशास्त्रांवर विशेष भर देण्यांत आला. त्यामुळें धर्माविषयीं उदासीन आणि जडवादी तरुण पिढी बाहेर पडूं लागली. शिक्षणपद्धतीचा हा दोष आतां जपानी पुढाऱ्यांचे लक्षांत आलेला आहे. यापुढें कोणत्या स्वरूपांत धार्मिक शिक्षण देतां येईल याविषयीं त्यांचा विचार चाललेला आहे.

खुद्द तरुण पिढींतही या दोषाची जाणीव झालेली आहे. विद्यापीठांतून आतां धर्माभ्यासमंडळें निघत आहेत. धर्म व तत्त्वज्ञान या विषयांकडे विद्यार्थी आस्थेवाईकपणानें पाहूं लागले आहेत.

**पुनर्घटना झाली म्हणून जगला—**

मेइजी पुनर्घटनेचे सुमारास जपानी बौद्ध धर्म नाहींसा होण्याचे मार्गाला लागला होता. पण त्यावेळीं पुढाऱ्यांनीं जागें होऊन आधुनिक कालाकडे नजर टाकली आणि आपल्या धर्मसंघटनेंत आवश्यक अशी प्रगति केली. त्यांनीं आपले लोक निरीक्षणासाठीं परदेशीं पाठविले, आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा घेऊन धर्माची पुनर्घटना केली, म्हणून तो आजच्या स्थितींत जिवंत आहे. विद्यालयें विद्यापीठें आणि मठ यांचें साहाय्यानें आधुनिक पद्धतीचे ज्ञानी व कर्मसंपन्न धर्मोपदेशक बाहेर पडत आहेत. देवालयें केवळ पूजाअर्चा यांत गुंतून राहिलीं नसून समाजांत जाऊन परोपकाराचीं कामें करीत आहेत. हिंदुस्थानांतील आर्यसमाजाची संघटना कांहींशीं या धर्तीवर आहे.

धर्म जगवावयाचा असेल तर काय केलें पाहिजे तें जपानी बौद्ध गुरूंनीं दाखविलें आहे.

* * *

नि. ६७८

१५

# राष्ट्रवृत्तीची मूस—जपानी शिक्षण

**हिंदी शिक्षकाला प्रश्न—**

" हिंदुस्थानमधील मुख्य अध्यापक विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्रीय ब्रीद ठसविण्याकरितां काय करीत असतात ? "

जपानी शाळेंतील एका मुख्य अध्यापकानें वरील प्रश्न एका हिंदी शाळेंतील मुख्य अध्यापकाला विचारला ! खरोखर, या प्रश्नाला काय उत्तर आहे ?

आजचा जपानी समाज जपानच्या राष्ट्रीय शिक्षणांतून उत्पन्न झालेला आहे. शिक्षणाचें मुख्य ध्येय राष्ट्रसंवर्धन हें आहे, या गोष्टीची सतत जाणीव जपानी मुख्य अध्यापक व शिक्षक यांच्या ठिकाणीं असलेली दिसून येते. विशेषत: प्रत्येक शिक्षणसंस्थेच्या मुख्य चालकाच्या ठिकाणीं ही दृष्टि उत्कट स्वरूपांत असल्याचें प्रथम निदर्शनास येतें. शाळेंतील कारभाराचा प्रत्येक तपशील आखतांना जपान आणि जपानचें राष्ट्रीय भवितव्य हे विचार प्रामुख्यानें त्याचे नजरेपुढें असतात.

**राष्ट्रीय जीवनाचा पाया—**

आधुनिक जपानचा पाया शिक्षणानें घातला. आजच्या राष्ट्रीय

वैशिष्टयाचीं बीजें शाळेंत दिसून येतात. प्रत्येक नागरिकावर सहा वर्षें प्राथमिक शिक्षणाचा संस्कार होत असतो. हा संस्कार केवळ अक्षरओळख आणि काऊचिऊच्या गोष्टी यांचा नसतो ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. जपानी नागरिकाला राष्ट्रीय स्वभावाचे काय गुण आवश्यक आहेत, विचार व माहिती या दृष्टीनें प्रत्येकाचें किमान भांडवल किती असलें पाहिजे, आचार संवयी व शिस्त यांचें वळण प्रत्येक जपानी स्त्रीपुरुषाला किती प्रमाणांत पाहिजे, या सर्व गोष्टींचा विचार करून शिक्षणाची योजना झालेली आहे. म्हणून शिक्षण म्हणजे केवळ भाषा, गणित, इतिहास, भूगोल या विषयांची परीक्षा नाहीं. राष्ट्रीय पुनर्घटनेंतील एक महत्त्वाचें अंग या नात्यानें शिक्षणाची योजना झाली, तिचा योग्य तो परिणाम झाला, आणि आजही चांगला उपयोग होत आहे. राष्ट्रसंवर्धनाचे कामीं शिक्षणाचा उपयोग कसा करून घेतां येतो तें जपानच्या शिक्षणपद्धतीवरून चांगलें स्पष्ट होतें.

**शालागृहाचें प्रथमदर्शन—**

जपानी शाळांचें बाह्यस्वरूप पाहिल्याबरोबरच त्यांचें देशाच्या घडामोडींत अगदीं महत्त्वाचें स्थान आहे ही गोष्ट लक्षांत येते. लहानमोठ्या शहरांत एकाद्या उंच इमारतीच्या गच्चीवरून शहराकडे पाहिल्याबरोबर शाळांच्या इमारती एकदम नजरेंत भरतात. कारण इतर घरांच्या मानानें या इमारती प्रशस्त, मोठ्या, आणि विशेष स्वरूपाच्या अशा असतात. प्राथमिक शाळेंतील शिक्षकही पाश्चिमात्य पद्धतीच्या पोषाखांत असतात. शहरांतच नव्हे तर लहान वस्तीच्या शाळेंतही तीच स्थिति असते.

शाळेच्या इमारतींत जागेचें दारिद्र्य दिसत नाहीं. मुख्य अध्यापकाचें कार्यालय प्रशस्त आणि भारदस्त असें दिसतें. भेटीस येणाऱ्या पाहुण्यांच्या करितां एक किंवा दोन स्वतंत्र खोल्या असतात. तेथें व मुख्याच्या खोलींत मखमलीच्या खुर्च्या किंवा कोचें ठेविलेलीं असतात. खोलींतील फर्निचर श्रीमंती थाटाचें असतें. खेड्यांतील शाळांतूनही त्या त्या मानानें हा थाट चांगला दिसून येतो. सरकारी विद्यापीठामध्यें मुलांना बसण्याकरितां ठेविलेल्या खुर्च्यांवरही हिरव्या मखमलीच्या गाद्या आहेत. प्राथमिक शाळेंत संगीत

कलेचा वर्ग किंवा सभागृह यांतील खुर्च्यांवरही हिरव्या मखमलीच्या गाद्या असतात. वर्गामध्यें प्रकाशाची व हवेची योजना चांगली असते. शाळेला जोडूनच क्रीडांगणें असतात. १९२४ च्या धरणीकंपानंतर अलीकडे जीं नवीन शाळागृहें झालेलीं आहेत तीं शिल्परचना व साहित्यसामग्री या दृष्टीनें अमेरिका व रशिया या देशांतील अद्ययावत् शाळांप्रमाणें आहेत. कांहीं इमारतींची एका बाजूची भिंत केवळ काचांचीच केलेली असते. त्यांतून भरपूर प्रकाश व सूर्यकिरण यांचा प्रवेश होतो. कांहीं इमारती सीमेंट काँक्रीटच्या बांधलेल्या आहेत. एकेका इमारतींत हजार दोन हजार विद्यार्थ्यांची सोय केलेली असते.

**व्यायामाच्या सोयी—**

शाळेच्या इमारतींत एकदम डोळ्यांत भरण्यासारख्या जागा म्हणजे व्यायामशाळा, सभागृहें व शास्त्रीय प्रयोगशाळा या होत. जपानी शिक्षणाचीं बाह्य वैशिष्टचें या जागांचे रूपानें दिसून येतात. शारीरिक शिक्षण, सामुदायिक ब्रीदाचें आरोपण, आणि प्रायोगिक कामाचें वळण या तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. शारीरिक शिक्षणाचीं मंदिरें भव्य असून त्यांतील साहित्यसामुग्रीही भरपूर असते. मुलींच्या शाळेंतही व्यायामगृहें उत्कृष्ट आहेत. जपानी आणि परदेशी दोन्ही व्यायामाकडे लक्ष दिलें जातें. जपानी कुस्ती व द्वंद्व (फेन्सिग) हे खेळ मुलांना सक्तीचे आहेत. त्याखेरीज उंची व चपलता वाढण्याकरितां अनेक व्यायामांची व व्यायामसाहित्याची योजना केलेली आहे. क्रीडांगणें, पोहण्याचे तलाव, लष्करी शिक्षणाचें साहित्य, आरोग्यमापनाचीं विविध प्रकारचीं यंत्रें, इत्यादि सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे शारीरिक शिक्षणाला किती महत्त्व दिलें जातें तें समजतें.

**सभागृह व प्रयोगशाळा—**

शाळेंतील सर्व विद्यार्थी व शिक्षक एकदम एकत्र जमूं शकतील अशी जागा प्रत्येक शाळेमध्यें असते. प्रातःकालीं शाळा जमण्यापूर्वी सर्व विद्यार्थी व शिक्षक राष्ट्रगीत म्हणून राजाला प्रणाम करितात. प्रत्येक शाळेंत एका

खास जागेंत राजाराणींचीं छायाचित्रें अत्यंत काळजीनें व आदरानें जपून ठेविलेलीं असतात. विशिष्ट प्रसंगींच त्यांचें अनावरण होतें. एरव्हीं फक्त त्या दिशेकडे तोंड करून प्रणाम केला जातो. राष्ट्रीय महोत्सव, प्रासंगिक सभा, व दैनिक प्रार्थनेच्या वेळचें प्रवचन या कार्यक्रमांचें राष्ट्रीय शिक्षणांत फार महत्त्व आहे. त्याकरितां सभागृहाचा चांगला उपयोग होतो.

प्रयोगशाळांच्या साधनसामग्रीवर जपानी शाळांनीं अतोनात पैसा खर्च केला आहे. प्राथमिक शाळेंतही चांगली प्रयोगशाळा असते. माध्यमिक व उच्च शिक्षणसंस्थांमध्यें तर या खात्याकडे पुष्कळच पैसा खर्च केला जातो. विज्ञान, रसायन, गृहशास्त्र, वनस्पतिशास्त्र, इत्यादि प्रत्येक शाखेकरितां स्वतंत्र प्रयोगशाळा असतात. विज्ञानशास्त्र शिकविणाऱ्या शिक्षकाची खोली म्हणजे एक प्रयोगशाळा व प्रयोगवस्तुसंग्रहच असतो. औद्योगिक व धंदेशिक्षणाच्या संस्थांमध्यें त्या त्या धंदेशिक्षणाला योग्य अशी भरपूर यंत्रसामग्री असते. सारांश आधुनिक शास्त्रें व त्यांचे प्रयोग यांना जपानी शिक्षणांत प्रमुख स्थान आहे.

**साहित्याचें वैपुल्य—**

अध्यापनाकरितां लागणाऱ्या साहित्याचें सर्व शाळांत वैपुल्य आहे. लहान खेड्यांतील शाळेंतही अध्यापनसाहित्य चांगलें असतें. क्रमिक पुस्तकांतील धडे शिकविण्याकरितां लागणारीं मोठीं चित्रें, नकाशे, वनस्पती, प्राणी, लहान प्रदर्शनें, दृष्टिशिक्षणाचीं यंत्रें व चित्रसंग्रह, इत्यादि साहित्य बहुतेक शाळांतून भरपूर आहे. शिक्षणांत जपाननें काटकसर केलेली नाहीं. सरकार व स्थानिक स्वराज्यसंस्था यांचे तिजोरींतून शिक्षणाकरितां बराच पैसा खर्च होतो. त्यांतून जें कमी पडतें तें पालक भरून काढतात. प्रत्येक शाळेला जोडून एक पालकसंघ असतो. आपल्या शाळेकरितांच रेडियोची साधनसामग्री, आरोग्यविषयक वस्तू, सुटीच्या दिवसांत समुद्रकांठाजवळ किंवा डोंगरावर विद्यार्थ्यांना राहाण्यासारख्या जागा इत्यादि गोष्टींकरितां पालकवर्ग स्वतः वर्गणी करून पैसे देतात. सारांश तेथील पालक, नागरिक आणि सरकार या सर्वांचे सहकारितेमुळें जपानचें शिक्षण संपन्न झालें आहे.

हिंदुस्थानांत व यूरोपमध्यें अनेक वर्षे जपानचे वकील असलेल्या एका गृहस्थानें असे उद्‌गार काढले कीं "जपानी प्राथमिक शाळेसारखी एकही शाळा मला हिंदुस्थानांत आढळली नाहीं." इकडील कांहीं खाजगी शाळा जपानी शाळेच्या तोडीच्या आहेत यांत शंका नाहीं. पण जपानमध्यें त्या सार्वत्रिक आहेत आणि येथें अपवादात्मक आहेत, इतका फरक आहे.

**आधुनिक शिक्षणाचा पाया—**

१८६७ मध्यें राजकीय क्रांति होऊन मेइजी राजा अधिकारारूढ झाला. त्यानें ज्या अनेक सुधारणा केल्या त्यांत शिक्षणक्रांति ही अत्यंत महत्त्वाची सुधारणा होती. १८७२ मध्यें जपानच्या आधुनिक शिक्षणाला प्रारंभ झाला. इंग्लंडमध्यें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचाही आरंभ याच सुमाराला झाला. प्राथमिक शिक्षण आणि साक्षरता या क्षेत्रांत जपाननें आघाडी मारली आहे. साक्षर नागरिकांचें शेंकडा प्रमाण साडेनव्याण्णवपर्यंत आहे. माध्यमिक, उच्च व औद्योगिक शिक्षण यांतही जपाननें इतर पाश्चिमात्य राष्ट्रांइतकीच प्रगति केलेली आहे.

नवीन शिक्षणपद्धतीचा पाया १८७२ सालीं घातला गेला त्यावेळीं सरकारी प्रसिद्धीपत्रकांत पुढील संदेश होता—"शिक्षण फक्त सामुराई वर्गानेंच घ्यावें अशा समजुतीनें आतांपर्यंत शेतकरी, कामकरी, व्यापारी आणि स्त्रिया यांनीं तिकडे दुर्लक्ष केलें. यापुढें कोणत्याही समाजांत निरक्षर कुटुंब असतां कामा नये, आणि कोणत्याही कुटुंबांत निरक्षर व्यक्ति असूं नये. प्रत्येक पालकानें न चुकतां मुलाला शाळेंत पाठवावें. यापूर्वी लोक शिक्षणाच्या खर्चाकरितां आणि मुलांच्या अन्नवस्त्राकरितां सरकारवर अवलंबून राहात. यापुढें प्रत्येक माणसानें आपण होऊन इतर सर्व गोष्टींच्या आधी शिक्षणाला प्राधान्य दिलें पाहिजे." अशा रीतीनें आधुनिक शिक्षणाला प्रारंभ झाला.

**नीति शिक्षणाचा पाया—**

पाश्चिमात्य शिक्षणाला प्रारंभ होऊन एक पिढी तयार होते न होते तोंच तिचे नैतिक दुष्परिणाम समाजनेत्यांचे नजरेस येऊं लागले. पूर्वीचे

सामाजिक व नैतिक निर्बंध शिथिल झाले. नवीन निर्बंध निर्माण झाले नाहींत. मेइजी राजानें ही परिस्थिति पाहून राष्ट्राला आपल्या मूळ स्वरूपाची व भावी कार्याची ओळख करून देण्याकरितां एक आज्ञापत्र काढलें. या आज्ञापत्रांत सूत्ररूपानें आधुनिक जपानी शिक्षणाची तत्त्वें व वेदांत यांचा निर्देश केलेला आहे. किंबहुना नवीन शिक्षणपद्धतीची ती स्मृतिच आहे अशा पवित्र भावनेनें प्रत्येक शिक्षणसंस्थेमध्यें हें आज्ञापत्र ठेविलें जातें. वार्षिक समारंभाचे वेळीं अगदीं गंभीरपणानें, आदरानें, आणि ठराविक विधीपूर्वक मुख्य अधिकाऱ्याकडून या सूत्रांचें वाचन होतें. क्रमिक पुस्तकें, शिक्षणशास्त्रावरील ग्रंथ इत्यादि सर्वांचा प्रारंभ करितांना या आज्ञासूत्रांचा श्रीगणेशा केला जातो. गेल्या साठसत्तर वर्षांचा शिक्षणेतिहास, आजच्या शिक्षणपद्धतीचें तत्त्व, आणि शिक्षणवाढीची भावी दिशा यांचीं कल्पना येण्यास या मेईजी आज्ञापत्राचा चांगला उपयोग होईल—"प्रजाजनहो, लक्षांत घ्या. आपल्या पूर्वजांनीं या साम्राज्याचा पाया घातला, तसाच सद्‌गुणांचाही पाया घातला. राजनिष्ठा आणि पितृनिष्ठा हे गुण आज अनेक पिढ्या चालत आलेले आहेत. आपल्या राज्याचें हेंच वैशिष्ट्य आहे. तोच आपल्या शिक्षणाचा पाया आहे. प्रजाजनहो, मातापित्याशीं निष्ठेनें वागा, बंधुभगिनींवर प्रेम करा; पतिपत्नींनीं सलोख्यानें व मित्रांनीं प्रामाणिकपणें वागावें; विनयानें आणि परिमितपणानें वागा; सर्वांशीं उदारपणानें वागा; विद्या आणि कला यांचा विकास करून बौद्धिक आणि नैतिक सामर्थ्य वाढवा; सार्वजनिक हिताकडे लक्ष द्या; राज्यघटना आणि कायदा यांना मान द्या; वेळ आली तर देशाकरितां आत्मार्पण करा; + + हा अनादिअनंत मार्ग आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेला आहे; त्याचे अनुकरण राजांनीं व प्रजांनीं केलेलें आहे व करावें. आमची अशी इच्छा आहे कीं प्रजेनें व आम्हीं अशा उभयतांनीं या मार्गावर श्रद्धा ठेवून वागावें व सद्‌गुण संपादन करावेत."

पाश्चिमात्य शिक्षणानें उत्पन्न होणाऱ्या जडवाद, बुद्धिवाद, उपयुक्ततादृष्टि, संशयवृत्ति इत्यादि दोषांना कांहीं प्रमाणांत प्रतिबंध करण्याचें काम या आज्ञापत्राकडन झालें; जडवादी शिक्षणाला नीतितत्त्वांची छटा कांहीं प्रमाणांत तरी आली.



शरीरसंवर्धन

सं. नं.
ता.



उंची वाढविणारे व्यायाम

**अनुकरणामुळें विविधता—**

जपानमध्यें शिक्षणसंस्थांची विविधता अतिशय आहे. जगांतील एकाद्या देशांत विशिष्ट प्रकारची शिक्षणसंस्था असली कीं तिची प्रतिकृति जपानमध्यें झालेली आढळून येते. यूरोप व अमेरिका यांच्या शिक्षणपद्धतींतून व शैक्षणिक वाङमयांतून चांगल्या पद्धती घेऊन जपाननें आपल्या शिक्षण-पद्धतींत संपन्नता आणलेली आहे. या अनुकरणांत त्यानें आपल्या देशाला उपयुक्त काय ही दृष्टि सतत ठेविली. प्रारंभीं शिक्षणपद्धतीची रचना फ्रेंच पद्धतीप्रमाणें झाली. नंतर तिच्यावर अमेरिकन विचारांचें प्रतिबिंब पडलें. आतां जर्मनींतील शैक्षणिक विचारांचा परिणाम जपानी शिक्षणावर होऊं लागला आहे. शैक्षणिक पद्धतींचें आणि तंत्रांचें अनुकरण करितांना जपानी शिक्षणाधिकाऱ्यांनीं अगदीं व्यावहारिक दृष्टि ठेविलेली दिसून येते. विशिष्ट पद्धति किंवा नवीन तत्त्व यांचा स्वीकार करावा कीं नाहीं याची तात्त्विक भवति न भवति इतर देशांत चालू असते. तोंपर्यंत जपानी लोक या वादांतील सार काढून त्याची व्यावहारिक अंमलबजावणी आपल्या शिक्षणांत करून टाकतात. परीक्षापद्धति, सद्‌शिक्षण, व्यवसायमार्गदर्शन इत्यादि अनेक बाबतींत जपानी शिक्षणाधिकाऱ्यांनीं आपली दृष्टि अधिक व्यावहारिक ठेविलेली दिसून येते.

**केंद्रीभूत कारभार—**

शिक्षणाचीं सर्व सूत्रें विद्याखातें (मोंबूशो) आणि शिक्षणमंत्री यांच्या हातांत असतात. अगदीं मर्यादित प्रमाणांत केवळ अंमलबजावणीचा अधिकार प्रांतिक व स्थानिक स्वराज्याकडे दिलेला आहे. अभ्यासक्रम, शिक्षकांचा दर्जा, पगाराचें प्रमाण, शिक्षणाचें धोरण, साहित्यसामग्री, इत्यादि बहुतेक तपशील देखील विद्याखात्याकडून ठरविले जातात. कोणत्या दर्जाच्या व किती शाळा प्रांतिक आणि स्थानिक सरकारनें काढाव्यात त्याचे नियम ठरलेले आहेत. त्याप्रमाणें संस्था काढून त्यांची आर्थिक व्यवस्था पाहणें आणि विद्याखात्याच्या नियमांची अंमलबजावणी करणें हीं कामें प्रांतिक सरकार व स्थानिक स्वराज्यसंस्था यांचेकडे दिलेलीं आहेत. सारांश सर्व

अधिकार विद्याखातें व शिक्षणमंत्री यांचे हातांत केंद्रीभूत झालेला आहे. त्यामुळें शिक्षणांत एकसूत्रीपणा व सारखेपणा आला आहे. थोड्या काळांत बरीच प्रगति करावयाची असल्यामुळें आणि लोकसत्तात्मक पद्धतीनें काम करण्याचें वळण जनतेला नसल्यामुळें जपाननें या पद्धतीचा स्वीकार केला. फरान्स, जर्मनी, इटली व रशिया यांच्या शिक्षणांत ज्या प्रकारची केंद्रीभूत सत्ता आहे तशीच जपानमध्येंही आहे.

खाजगी आणि सरकारी अशा दोन प्रकारच्या संस्था जपानमध्यें आहेत. साहित्यसामग्रीची संपन्नता आणि नवीन सुधारणा या दृष्टीनें सरकारी संस्था चांगल्या दर्जाच्या आहेत. खाजगी संस्थांचें काम विशेषतः स्त्रीशिक्षण व धार्मिक विद्यापीठें या या क्षेत्रांत चांगलें चाललें आहे. कांहीं माध्यमिक शिक्षणाच्या क्षत्रांत खाजगी शाळांचें काम चांगलें आहे, पण त्यांची संख्या फार थोडी आहे.

**विद्यार्थ्यांच्या सोयी—**

प्रत्येक व्यक्तीला तिच्या स्वाभाविक आवडीप्रमाणें व जरूरीप्रमाणें शिक्षण घेतां यावें अशा प्रकारची विविधता आणि लवचीकपणा जपानी पद्धतींत आहे. बाह्यतः पाहिलें असतां या शिक्षणांत फार बंधनें व शिस्तखोरपणा असावा असें वाटतें. परंतु तपशीलाचा अभ्यास केला म्हणजे बंधनें आणि शिस्त यांच्या चौकटींतही वैयक्तिक वाढ आणि जरूरी यांना पुष्कळच वाव दिलेला आहे असें दिसून येतें. सर्वच अभ्यासक्रम सर्वच विद्यार्थ्यांना आवश्यक अशा प्रकारची सक्ती नसते. व्यक्तीला आपल्या आवडीप्रमाणें जरूर ते विषय जरूर त्या प्रमाणांत घेतां येतात. प्रत्येक शाळेंत विषयांची विविधता असते, आणि शिक्षणपद्धतींत शाळांची विविधता असते. या विविधतेच्या पोटांत पुनः व्यक्तीला आपल्या लायकीप्रमाणें व कुवतीप्रमाणें झेपेल इतक्याच विषयांची निवड करितां येते. प्रवेश होतांना अमुक एक शिक्का असलेलेच विद्यार्थी घ्यावयाचे असा निर्बंध नसून, त्या अभ्यासक्रमाला योग्य अशा दर्जाचे कोणतेही विद्यार्थी घेण्याची मुभा चालकाला असते. विद्यार्थी बाहेर पडतांना सर्वांनीं एकच प्रकारचा छाप मारून घेतला पाहिजे अशी

सक्ती नसते. वैयक्तिक तडजोडीला पुष्कळ वाव असतो. सारांश शिक्षण-पद्धतीची सत्ता जरी केंद्रीभूत अशी आहे तरी प्रत्यक्ष व्यवहारांत प्रत्येक शाळेला कांहीं स्वातंत्र्य आहे; या स्वातंत्र्याचा फायदा विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी दूर करण्याकडे करितां येतो. हें जपानच्या शिक्षणकारभाराचें वैशिष्ट्य आहे.

**बालशिक्षण—**

बालोद्यानपद्धतीच्या शाळा पुष्कळशा खाजगी आहेत, कांहीं स्थानिक स्वराज्यानें सार्वजनिक संस्थांनीं, धार्मिक संघांनीं व परोपकारी मंडळांनीं चालविलेल्या आहेत. त्यांत तीन ते सहा वर्षांच्या मुलांचें शिक्षण होतें. हें शिक्षण सक्तीचें नाहीं. पालकांच्या इच्छेवर अवलंबून आहे.

सहा ते बारा या वयांत मात्र सक्तीचें प्राथमिक शिक्षण सर्वत्र आवश्यक आहे. अगदीं एका बाजूला पडलेलीं डोंगराळ मुलखांतलीं किंवा समुद्रकांठचीं खेडीं घेतलीं तरी तेथें देखील सक्तीच्या शिक्षणाच्या शाळा काढलेल्या आहेत. सार्वत्रिक शिक्षणांत जपाननें फार चांगली प्रगति केलेली आहे.

तीन यत्तांपर्यंत मुलें व मुली एकत्र शिकतात. त्यानंतर मात्र मुलांचे व मुलींचे वर्ग निरनिराळे असतात. प्राथमिक शिक्षणाचीं क्रमिक पुस्तकें देशांत सर्वत्र सारखींच आहेत. अभ्यासक्रमही सर्व शाळांना एकच आहे. त्यामुळें प्राथमिक शिक्षणांतून ठराविक पद्धतीचे नागरिक निर्माण होतात. केवळ साक्षरतेचें नव्हे, तर राष्ट्रीय स्वभावाचें शिक्षण देण्याचें आणि जपानी नागरिक तयार करण्याचें काम प्राथमिक शाळांचें आहे.

सहा वर्षांचें शिक्षण पूर्ण झाल्यावर कांहीं विद्यार्थी दोन किंवा तीन वर्षें उच्च प्राथमिक शिक्षण घेतात. यांत हातकामाला प्राधान्य दिलेलें असतें. ज्यांना दिवसां शाळेंत येतां येत नाहीं अशा मुलांमुलींकरितां रात्रीच्या शाळा आहेत, त्यांना 'युवक शाळा' (यूथ स्कूल) अशी संज्ञा आहे. या शाळेंत मुलांना लष्करी शिक्षण, व्यवसायविषयक ज्ञान व सामान्यज्ञान हे विषय

असतात. मुलींना गृहशिक्षण, व्यवसायविषयक ज्ञान व सामान्य ज्ञान हे विषय शिकविले जातात.

**माध्यमिक व उच्च शिक्षण—**

सहा वर्षाचें प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर अनेक प्रकारच्या माध्यमिक शिक्षणसंस्था आहेत त्यांत बौद्धिक अथवा व्यावहारिक शिक्षण दिलें जातें. प्रत्येक शाळा आपापली प्रवेशपरीक्षा घेते आणि अखेर परीक्षा घेऊन लायकीचें शिफारसपत्र देते. त्यामुळें एकाच पद्धतीच्या परीक्षेंतून हजारों विद्यार्थी बाहेर पडतात किंवा धडपडतात असा अनिष्ट प्रकार जपाननें टाळला आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शेंकडा दहा विद्यार्थी माध्यमिक शाळांत (मिडल स्कूल) जातात. तेथें कांहीं व्यवसायप्रधान शिक्षण घेतात; कांहीं वाङमय व शास्त्रें यांचें शिक्षण घेऊन पुढें उच्च शिक्षणाकडे जातात. माध्यमिक शाळांचा पांच वर्षांचा अभ्यासक्रम झाल्यावर पुढें चार वर्षें उच्च विद्यालयांत (हायर स्कूल) शिकून नंतर विद्यापीठांत जातां येतें. 'हायर स्कूल' ही संस्था माध्यमिक शाळा आणि विद्यापीठ यांचा सांधा जोडून देणारी आहे. उच्च शिक्षणाला योग्य असेच विद्यार्थी या शाळेंत निवडले जातात. जपानमध्यें अशीं बत्तीस विद्यालयें आहेत.

उच्च विद्यालयाचें शिक्षण झाल्यावर त्यांतील निवडक विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश मिळतो. तेथें तीन किंवा चार वर्षें अभ्यास करणाराला पहिली पदवी 'गाकुशी' दिली जाते. ती इकडील एम्. ए. या पदवीला समान अशी असावी. त्यानंतर दोनतीन वर्षें संशोधन करून चांगला ग्रंथ लिहिणाराला 'हाकुशी' (डॉक्टर) ही पदवी मिळते. एकूण पंचेचाळीस विद्यापीठें असून त्यांतील अठरा सरकारी व बाकीचीं सार्वजनिक किंवा खाजगी आहेत. एक किंवा अनेक महाविद्यालयांचें विद्यापीठ होऊं शकतें. इंपीरियल युनिव्हर्सिटीमध्यें मात्र सर्व विषयांचीं महाविद्यालयें असतात. बौद्धिक आणि औद्योगिक उच्च शिक्षणाकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर नोकरी–बेकारीचे प्रश्न टाळण्याचे दृष्टीनें नियंत्रण ठेवण्याचा सरकारी प्रयत्न असतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
२१९
ठाणे.

**औद्योगिक संस्था—**

माध्यमिक (मिडल् स्कूल) शिक्षणाकडे अगदीं मर्यादित विद्यार्थी जातात. बाकीचे बहुसंख्य विद्यार्थी प्राथमिक शिक्षणानंतर अनेक प्रकारच्या औद्योगिक शिक्षणसंस्थांमध्यें विविध व्यवसायांचें शिक्षण घेतात. या शिक्षणांत विषय, धंदे, कालमर्यादा, अभ्यासक्रम इत्यादि दृष्टीनें फार विविधता आहे. परंतु प्रत्येक विद्यालयांत अगदीं निवडक असेच विद्यार्थी घेतले जातात. प्रविष्ट विद्यार्थ्यांना त्यांच्या जरूरीप्रमाणें अभ्यासक्रम घेतां यावा इतका लवचिकपणा नियमांत आहे.

औद्योगिक शिक्षणांत देशामध्यें प्रचलित असलेल्या सर्व लहानमोठ्या उद्योगधंद्यांचा समावेश केलेला आहे. यांत्रिक, शेतकी, व्यापारी, नाविक, मच्छीमारी व इतर धंदे यांकरितां विद्यालयें असून त्यांत दोन वर्षांपासून चार पांच वर्षांपर्यंतचे अभ्यासक्रम असतात. औद्योगिक शाळांत साहित्य-सामग्री उत्कृष्ट दर्जाची आहे. मुलांच्या शिक्षणाला व्यावहारिक वळण लाविलेलें असून प्रत्यक्ष वस्तू निर्माण करण्याची संधि त्यांना दिली जाते. त्यामुळें विद्यालयांतून बाहेर पडण्यापूर्वींच त्यांना कारखान्यांची मागणी येते. औद्योगिक शिक्षणाबरोबर सर्वसामान्य बौद्धिक शिक्षणाचेही विषय असतात हें जपानी धंदेशिक्षणाचें वैशिष्ट्य आहे. बौद्धिक व औद्योगिक यांची अगदीं फारकत केलेली नाहीं. कोणत्याही अवस्थेंतील धंदेशिक्षणाला जोडून कांहीं तास बौद्धिक शिक्षणाचे असतात. शिस्त आणि लष्करी शिक्षण या गोष्टी औद्योगिक शाळांतही आहेत. जपानी कामगारांना राष्ट्रीय वृत्तीनें काम करण्याची बाळगोळी या विद्यालयांतील शिक्षणामार्फत दिली जाते.

**गृहिणी मातांचें शिक्षण—**

मुलींचें व स्त्रियांचें शिक्षण प्राथमिक शिक्षणानंतर भिन्न संस्थांमध्यें व भिन्न स्वरूपाचें असतें. त्यांत निम्मा वेळ बौद्धिक शिक्षणाला व निम्मा गृहशास्त्रविषयक शिक्षणाला दिला जातो. गृहशास्त्रांत स्वयंपाक, शिवणकाम, वस्त्रधावन, रंगकाम, व ललितकला इत्यादि विषयांचा समावेश होतो. या विषयांकरितां आधुनिक साहित्यसामग्रीनें भरलेल्या प्रयोगशाळा आहेत.

प्रत्येक विषय जपानी व पाश्चिमात्य अशा दोन्ही पद्धतींनीं शिकविला जातो. उत्तम गृहिणी आणि माता तयार करणें हा मुलींच्या शिक्षणाचा संकल्प आहे आणि तो चांगला सिद्धीस जातो हें जपानी गृहरचनेकडे पाहिलें म्हणजे लक्षांत येतें. शारीरिक शिक्षणाची व्यवस्था चांगली असते. खेळामध्यें जपानी मुली मुलांप्रमाणेंच चपळ आणि उत्साही आहेत. सौजन्य आणि सभ्याचार शिकविण्याकरितां खास वर्ग असतात. त्यामुळें जपानी स्त्रियांमध्यें सौजन्य, मार्दव, इत्यादि गुणांचा उत्कर्ष झालेला आहे. एकदोन अपवाप सोडून दिल्यास मुलांच्या विद्यापीठांत मुलींना जाण्याची बंदी आहे हें स्त्रीशिक्षणांतील फार मोठें वैगुण्य आहे. माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर स्त्रियांचीं महाविद्यालयें व विद्यापीठें आहेत परंतु त्यांचा बौद्धिक दर्जा मुलांच्या संस्थांपेक्षां कमी प्रकारचा आहे. वाङमय, गृहशास्त्र, वैद्यकी, व्यापार, इत्यादि अनेक विषय शिकण्याकरितां उच्च शिक्षणाच्या खास स्त्रियांच्या अशा अगदीं स्वतंत्र संस्था आहेत.

**जपानी शिक्षणाचें वैशिष्टच—**

अभ्यासक्रमांतील वैशिष्टच म्हणून कांहीं गोष्टींचा निर्देश करण्यासारखा आहे. नीतिशिक्षण हा विषय प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंत असतो. या विषयाचे साधनानें जपानी राष्ट्रीयत्वाच्या कल्पना तरुणपिढीला दिल्या जातात. शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष खालपासून वरपर्यंत दिलेलें आहे. त्यांत राष्ट्रसंरक्षणाचे दृष्टीनें बारा वर्षानंतर प्रत्येक मुलाला लष्करी शिक्षण दिलें जातें. विद्यापीठापर्यंतचें सर्व शिक्षण जपानी भाषेंतून दिलें जातें. त्याकरितां विपुल ग्रंथसंपत्ति निर्माण झालेली आहे. अभ्यासक्रमांत शास्त्रीय विषय, हस्तव्यवसाय व प्रयोग यांवर विशेष भर आहे. शास्त्रीय विषयांत व्यावहारिक गोष्टींकडे अधिक लक्ष दिलें जातें.

शाळेंत शिस्तीचें वातावरण दिसून येतें. विद्यार्थी शिक्षकांना अतिशय आदरानें प्रणाम करितात. शिक्षक विद्यार्थ्यांपासून फार अलिप्त राहतात. गुरुशिष्यसंबंधांत जिव्हाळ्यापेक्षां शिस्त अधिक आहे. लहानमोठ्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश (युनिफॉर्म) वापरणें आवश्यकच असतें. त्यामुळें

मुलांना किंवा मुलींना विद्यार्थी अवस्थेंत दिखाऊ पोषाख आणि नखरेलपणा करितां येत नाहीं. • महाविद्यालयांत जाईपर्यंत मुलांना केस राखतां येत नाहींत. मुलींनाही 'बॉबिंग' करितां येत नाहीं. सोळा वर्षांपर्यंत पालक, शिक्षक व पोलीस यांची विद्यार्थ्यांचे नीतिविषयक वर्तनावर देखरेख असते. राष्ट्रीय उत्सव, समारंभ, निशाणाला प्रणाम, राष्ट्रगीतगायन, राजदर्शन, इत्यादि कार्यक्रमांचा उपयोग राजनिष्ठा व देशनिष्ठा या भावनासंवर्धनाकडे केला जातो. शहरांत व बाहेर सहली आणि प्रवास वर्षभर चालू असतात. ऐतिहासिक स्थानांचें दर्शन घेणें हा अभ्यासक्रमांतीलच एक महत्त्वाचा भाग आहे. शाळेंत प्रवेश झाल्याबरोबर राजगृहदर्शन व शिक्षण पूर्ण झाल्यावर राज्यसंस्थापक पूर्वजांच्या समाधीचें दर्शन असे कांहीं कार्यक्रम ठरलेले असतात. सारांश अभ्यासाइतकेंच महत्त्व व्यापक संस्कारांचे कार्यक्रमांनाही आहे.

**स्वतंत्र विचार नाहीं व नको—**

जपाननें अगदीं थोड्या अवधींत विविधतापूर्ण आणि व्यापक अशी शिक्षणपद्धति उभी केलेली आहे. सर्व पाश्चिमात्य देशांतील उत्कृष्ट अशा पद्धतींचा शिक्षणांत समावेश झाला आहे. बाह्य स्वरूपांत कोणत्याही अमेरिकन किंवा युरोपियन शाळेच्या तोडीस तोड देण्याइतकी सिद्धता जपानी शाळांनीं केलेली आहे. परंतु बाह्य स्वरूपांत व साहित्यसामग्रींत जी आधुनिक सुधारणा झालेली आहे त्या मानानें अध्यापनपद्धति मागासलेली आहे. शिक्षकानें पढवावें व मुलांनीं घोटावें असाच प्रकार चाललेला दिसतो. त्यामुळें मुलांमध्यें स्वतंत्र विचारशक्ति निर्माण होत नाहीं. जपानी मुलांना माहिती खूप असते, त्यांचें वाचनही दांडगें असतें, परंतु सामान्य जपानी माणूस स्वतंत्र विचारांत लंगडाच ठरतो. त्या मानानें हिंदी शिक्षक अधिक पुढारलेले आहेत. परंतु राष्ट्रीय भावनेंत जपानी शिक्षक अधिक जागरूक आहेत.

आजच्या जपानला बेफाम स्वतंत्र विचार करणाऱ्या, निष्क्रिय प्रामाणिक मतभेद बाळगणाऱ्या, आणि शाब्दिक बडबड करणाऱ्या बौद्धिक वृत्तीच्या तरुणांपेक्षां निष्ठावंत, आज्ञाधारक, श्रद्धावंत आणि क्रियावान अशा तरुणां-

चीच अधिक जरूर होती. तें काम शिक्षणपद्धतीनें आतांपर्यंत यशस्वी रीतीनें केलेलें आहे.

जपानी शिक्षणांत स्वतंत्र विचारही आहे, नाहीं असें नाहीं. परंतु राज्यकर्त्यांना आज स्वतंत्र व प्रस्थापित सत्तेला बाधक असे विचार नको आहेत. समाजवादी किंवा क्रांतिकारक विचाराचे विद्यार्थी आणि अध्यापक यांवर फार नियंत्रण घातलें जातें. १९२५ नंतर अशा विद्यार्थ्यांचा एक स्वतंत्र वर्ग करून त्यांना राष्ट्रीयत्वाचें शिक्षण देऊन त्यांचा समाजवाद धुऊन काढला गेला. अशा रीतीनें विद्यार्थी वर्ग धुवट झाला. पण समाजवादाचीं बीजें अध्यापकवर्गांत राहिलींच. म्हणून चीन-जपानचा लढा चालू असतां अशा अनेक अध्यापकांना विद्यापीठांतून कमी करण्यांत आलें. सारांश सध्यां आणीबाणीच्या काळांत जपानी शिक्षणांत स्वतंत्र विचारांना वाव नाहीं, निश्चित विरोध आहे. जर्मनी, इटली, रशिया व कांहीं प्रमाणांत अमेरिका इंग्लंड, हिंदुस्थान इत्यादि देशांतही हीच परिस्थिति आहे.

पद्धति आणि तंत्र या दृष्टीनें परिणामकारक परंतु स्वतंत्र विचाराचे दृष्टीनें सदोष, असें जपानी शिक्षणाचें सूत्ररूपानें वर्णन करितां येईल.

* * *

# १६

# जपान-हिंदुस्थानचा पाश्चात्यांना पाहुणचार

**पूर्व आशियांत स्वतंत्र कोण—**

पूर्व आशियाचे नकाशाकडे नजर टाकली तर असें दिसतें कीं प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें सर्वच देश श्वेतवर्णीयांचे वर्चस्वाखालीं आहेत. फक्त जपान स्वाभिमानानें, स्वातंत्र्यरक्षण करून आणि श्वेत राष्ट्रांना आव्हान देऊन आपले हातपाय पसरीत आहे. गेल्या दोनतीन शतकांमध्यें गोऱ्या राष्ट्रांचे संबंध आशिया-आफ्रिका-अमेरिका-ऑस्ट्रेलिया, इत्यादि अनेक खंडांत आले. या प्रत्येक ठिकाणीं स्थानिक लोकांवर हुकमत चालवून श्वेतवर्णीय देश तेथील मालक झालेले आहेत. पूर्व आशिया खंडांत हिंदुस्थान व ब्रह्मदेश ब्रिटिशांचे नियंत्रणाखालीं आहे; इंडोचायनामध्यें फरेंच लोक मालक आहेत; जावा, सुमात्रा इत्यादि दक्षिण बेटें डच लोकांच्या मगरमिठींत आहेत; फिलीपाईन बेटें अमेरिकेच्या तंत्राखालीं आहेत; आणि चीन हा अप्रत्यक्ष-रूपानें अमेरिका व इंग्लंड यांच्या छापेखालीं आहे. सयाम स्वतंत्र दिसत असला तरी त्याचेवर ब्रिटिश साम्राज्याचें अप्रत्यक्ष वजन आहे.

सोळाव्या शतकाचे अखेरीस व सतरावे शतकाचे प्रारंभीं श्वेत राष्ट्रें पूर्व आशियांत व्यापार करण्यास आलीं. फरेंच, पोर्तुगीज्, स्पॅनिश, डच, ब्रिटिश इत्यादि सर्वांच्या ईस्ट इंडिया कंपनीसारख्या व्यापारीसंस्था निघाल्या

आणि व्यापाराचे मिषानें सर्वांनीं निरनिराळचा देशांत आपले हातपाय पसरले. आज या राष्ट्रांचीं आशियांतील साम्राज्यें युरोपमधील त्या देशांच्या मानानें किती तरी पटीनें मोठीं आहेत याची सामान्य वाचकाला कल्पनाही नसेल. डच लोकांचेंच दक्षिण बेटांतील साम्राज्य घेतलें तर तें हॉलंडच्या बहात्तर पटीनें मोठें आहे.

**आशियांतील साम्राज्यशाही—**

या साम्राज्यांतील कारभार किती सहानुभूतीनें अथवा कठोरतेनें चालतो याची जगाला वार्ताही नाहीं. हिंदुस्थानसारखा देश मोठा असल्या-कारणानें येथें जुलूम झाला तर तो जगाच्या वेशीवर मांडतां येतो. या जुल-माचा आरडाओरडा करणारीं व जगाचे डोळचांत भरणारीं गांधी-टागोरां-सारखीं चार माणसें आज हिंदुस्थानजवळ आहेत या दृष्टीनें तो भाग्यवान् आहे. पण हें भाग्य आशियाखंडांतील इतर गुलामराष्ट्रांना कोठें आहे? जावा-सुमात्रा इत्यादि बेटांत द्रव्यलोभी, पाषाणहृदयी आणि स्वार्थैकदृष्टीचे डच लोक कशा रीतीनें कारभार करितात याची आशियांतील इतर देशांना दाद तरी आहे काय? दरवर्षीं किती देशभक्तांना साध्या गोष्टींकरितां तुरुंगांत किंवा काळचापाण्यावर पाठविलें जातें याची हिंदी लोकांनाही माहिती नाहीं. एका संस्कृतीचे दोन समाज असून परस्परांविषयीं इतकें अज्ञान! फ्रेंच इंडोचायनांतील जुलमी कारभाराचा बाहेर बभ्रा होऊं नये म्हणून कित्येक मार्मिक प्रवाशांना सरहद्दीवरूनच परत जावें लागतें. हाँगकाँग आणि शांघाय या चीनच्या बंदरांत आज श्वेत राष्ट्रें मालक आहेत, चिनी लोक त्यांचे नोकर आहेत. याच चीनला त्याचे इच्छेविरुद्ध ब्रिटिश व्यापा-ऱ्यांनीं शंभर वर्षें अफू चारून कमकुवत केलें. आतां त्याच चीनला दारूगोळा व शस्त्रास्त्रें विकून श्वेत व्यापारी, आपले खिसे गरम करीत आहेत. चीन-करितां केवळ शाब्दिक सहानुभूतीची वाफ दवडणारीं श्वेत राष्ट्रें त्याच्या बाजूनें बोटही वर उचलण्यास तयार नाहींत.

**श्वेत-श्वेतेतर संबंधाचा इतिहास—**

आशियाखंडाचा इतिहास लिहितांना श्वेत-श्वेतेतरसंबंधाचें हें प्रकरण

कितीही सहानुभूतीनें व हळुवार मनानें लिहिलें तरी गोऱ्या लोकांनीं केलेल्या व चालविलेल्या ज्या शिरजोरीविषयीं शांत माणसाच्या मनाचाही संताप झाल्याशिवाय रहाणार नाहीं. म्हणूनच इतक्या जुलमांतून एक आशियाटिक राष्ट्र तरी स्वतंत्र राहूं शकतें याचें कौतुक वाटते. जपानची चीनविरुद्ध चाललेली मोहीम पाहून एकीकडे वाईट वाटतें यांत शंका नाहीं. परंतु त्याचबरोबर गोऱ्या राष्ट्रांच्या डोळ्याला डोळा, संगीनीला संगीन, विमानाला विमान, आणि शब्दाला प्रतिशब्द भिडवून वागणारें आशियांतील एक तरी राष्ट्र आहे याविषयीं अभिमान वाटतो. आज ना उद्यां चिनी-जपानी लोक दोस्त होतील. अशी दोस्ती घडवून आणण्याचा हिंदुस्थानसारख्या तिऱ्हाईत राष्ट्रांनीं प्रयत्न करावा. त्यांच्या द्वेषाच्या आगींत तेल ओतूं नये. पुढें मागें हिंदुस्थान, चीन व जपान या तिन्ही राष्ट्रांना एक होऊन आशियाचें स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. पूर्व आशियांतून ब्रिटिश, डच, फ्रेंच आणि अमेरिकन साम्राज्यें नष्ट झाल्यावांचन शांततावाद आणि आंतरराष्ट्रीयत्व या केवळ तोंडच्या वाफा आहेत. ज्यांची तळी गार झालेली आहे अशांनीं इतरांना उगी ठेवण्याकरितां काढलेलीं तीं खेळणीं आहेत. आशियांतील आणि आफ्रिकेंतील तद्देशीय लोक स्वतंत्र झाल्याशिवाय जगांत शांतता नांदणें शक्यच नाहीं. जपानचा श्वेतराष्ट्रांशीं विरोध उत्पन्न झाल्यामुळें श्वेतवर्णी-यांच्या श्रेष्ठतेला उतरती कळा लागली आहे. त्या प्रमाणांत आशिया-आफ्रिकेंतील स्थानिक लोकांना आत्मविश्वास वाटूं लागेल. हा आत्मविश्वास भावी स्वातंत्र्याचा पाया आहे. वाईटांतून चांगलें निघतें; त्याप्रमाणें चिनी-जपानी लढ्यांतून श्वेतेतर वर्णाचा आत्मविश्वास हें रत्न बाहेर पडलें तर जागतिक प्रगतीच्या दृष्टीनें एक पाऊल पुढें पडल्यासारखें होईल.

श्वेतराष्ट्रांचा संबंध आला असतां इतर राष्ट्रें गुलाम झालीं, आणि जपानच स्वतंत्र कसा राहिला या गोष्टीचा खोल विचार करणें जरूर आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांशीं जपाननें आणि इतर आशियाटिक राष्ट्रांनीं, किंवा जपाननें आणि हिंदुस्थाननें ठेविलेल्या धोरणांत काय फरक आहे त्याची तुलना मनोरंजक, बोधप्रद, व भावी मार्ग दाखविणारी होईल.

**पाश्चात्य 'रानटी' लोक—**

श्वेत राष्ट्रांचा संबंध आला त्या वेळेपासूनच जपानी लोकांच्या ठिकाणीं आपल्या श्रेष्ठत्वाची कल्पना रूढ झालेली होती. अगदीं प्रारंभीं जपानी भाषेंत श्वेत लोकांना 'बार्बेरियन' म्हणजे रानटी किंवा असंस्कृत या विशेषणानें संबोधीत असत. त्यांना वागणूकही त्याच प्रकारची मिळत असे. गोरे लोक आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहेत या वृत्तीनें जपानी लोकांनीं त्यांना कधींच वागविलें नाहीं किंबहुना कांहीं वेळां तर अगदीं अपमानास्पद अशा रीतीची वागणूक सहन करून युरोपियन लोक जपानमध्यें राहिले. जपानी बंदरांत व्यापाराकरितां आलेल्या व राहिलेल्या गोऱ्या लोकांकडून पोरखेळ करवून घेऊन जपानी लोक आपली करमणूक करीत असा प्रारंभींचा इतिहास आहे.

आपले शिष्टाचार आणि रीतिरिवाज यांचें गोऱ्या लोकांनीं उल्लंघन केलें तर जपानी लोक यांना कधीं क्षमा करीत नसत. याकोहामांतून एकदां एका सरदाराची मिरवणूक जात असतां कांहीं साहेबांनीं या मिरवणुकीपुढें साष्टांग नमस्कार घातला नाहीं म्हणून या अपमानाबद्दल शिपायांनीं त्यांना तेथल्या तेथें ठार केलें! गोऱ्या माणसाच्या गोऱ्या शरीराला जपानी लोकांनीं कधींच फारशी किंमत दिली नाहीं. सोळाव्या शतकापासूनचा हा इतिहास आहे, अलीकडला नाहीं. युरोपियन मिशनरी लोक जेव्हां कायदा मोडून वागूं लागले, तेव्हां जपानी राज्यकर्त्यांनीं त्यांना क्रूसावर चढविलें. १८५३ सालापासून गोऱ्या लोकांना कायदेशीरपणें जपानांत संचार करितां येऊं लागला. पण याच सुमारास गोऱ्या लोकांविरुद्ध जपानी लोकमत अतिशय प्रक्षुब्ध झालेलें होतें. सामुराई वीरांनीं गोरा माणूस दिसेल तेथें मारावा अशी स्थिति झालेली होती. शस्त्रास्त्रें आणि युद्धसामग्री यांची चांगली तयारी नव्हती, तरीही जपानी सरदारांनीं गोऱ्या लोकांकडून अपमान सहन करून घेतले नाहींत; असेल त्या साधनांचा उपयोग करून त्या लोकांनीं स्वाभिमानानें प्रतिकार केला. १८६३ सालीं तोकियोंतील इंग्लिश आणि अमेरिकन वकिलात जाळून टाकण्यांत आली. कामाकुरा येथें कांहीं ब्रिटिश

अधिकाऱ्यांचे खून झाले. शेवटीं जपानी सरकारनें कायदा करून हे अत्याचार थांबविले तेव्हां गोरे लोक सुरक्षितपणें व्यापार करूं शकले.

**जपानची सावधानता—**

हिंदुस्थानांत गोरे आले आणि व्यापार करून अखेर मालक झाले. तरी येथील राजांना हे लोक कोठून आले, काय उद्देशानें आले, याची फारशी दादही नव्हती. याचे उलट जपानी लोकांनीं पहिल्यापासून सावधानपणा राखल्यासारखा दिसतो. युरोपियन मिशनरी जपानमध्यें येऊं लागल्याबरोबर १५८२ सालीं एका सरदारानें पोपकडे आपले शिष्टमंडळ पाठविलें. पुढें या मिशनऱ्यांचे विषयीं अधिक माहिती काढण्याकरितां इयेयासू नांवाच्या वजीरानें १६१५ मध्यें यूरोपांतील इंग्लंड, हॉलंड व जर्मनी या देशांत आपले गुप्त हेर पाठविले. त्यांनीं जी माहिती आणली तिच्या आधारावर जपाननें गोऱ्या लोकांशीं आपलें धोरण बांधलें. युरोपियन लोक धार्मिक मतभेदामुळें एकमेकांवर जुलूम करून माणसें जिवंत जाळतात; पोपच्या हातांत राजांना तक्तावर बसविण्याची आणि पदच्युत करण्याची सत्ता आहे; धार्मिक कलहानें जर्मनीसारखा देश दुर्बल झाला; कोपर्निकस आणि ब्रूनो या शास्त्रज्ञांना धर्माधिकाऱ्यांनीं सत्यकथनाबद्दल जिवें मारलें—अशा प्रकारची बातमी या गुप्त हेरांनीं जपानी राज्यकर्त्यांना दिली. त्यामुळें वरून साधू दिसणाऱ्या या मिशनऱ्यांचें पोटांत किती क्रूरता आणि राजकीय डाव आहे याची जपानी लोकांना कल्पना आली. युरोपियन लोक जर ख्रिस्ती लोकांचा इतका छळ करितात तर आपण करायला काय हरकत आहे अशा विचारानें इयेयासू वजीरानें मिशनरी लोकांचा अनन्वित छळ केला, आणि त्यांची देशाबाहेर हकालपट्टी केली. यूरोपमधून माहिती आणवून त्यानें युरोपियन लोकांचेंच अनुकरण केलें.

याच सुमाराला सुरतेंतील इंग्रजांची वखार भरभराटीस येत होती. पुढें १८६० चे सुमारास पुनः युरोपियन लोकांचा अधिक प्रसार जपानमध्यें होऊं लागला, तेव्हां यांना प्रतिकार करावा कीं तात्पुरतें नमतें घ्यावें हें ठरविण्यापूर्वी राज्यकर्त्यांनीं १८६२ सालीं अमेरिकेंत व युरोपांत आपलें

चौकशीमंडळ पाठविलें. त्यानें पाहाणी करून सल्ला दिला कीं पाश्चात्यांची लढाईची तयारी चांगली आहे. जपान त्यांना इतक्यांत तोंड देऊं शकणार नाहीं. तेव्हां जपानी मुत्सद्यांनीं शांततेचे तह करून युद्धाच्या तयारीचा पाया घातला !

'सावधान असावें सर्व ठायीं' या उपदेशाचें अनुकरण जपानी मुत्सद्यांनीं प्रथमपासून अखेरपर्यंत केलेलें दिसतें. मराठ्यांच्या इतिहासांत नाना फडणिसांचा या दृष्टीनें थोडा प्रयत्न झालेला लौकिक माहितींत आहे. इतर हिंदी राज्यकर्त्यांनीं युरोपियन लोकांविषयीं जागरूकता दाखविल्याचा उल्लेख फारसा उपलब्ध नाहीं.

जपान स्वतंत्र कां आणि हिंदुस्थान परतंत्र कां याचें उत्तर सोपें आहे. आम्हीं 'सावधान' हा मंत्र घोकतों, जपानी लोक त्याची कृति करितात. सावधानता आणि जागरूक वृत्ति यांचा राष्ट्राचे इतिहासावर फार मोठा परिणाम होतो.

**साहेबावर नियंत्रण—**

या सावधानतेमुळें पाश्चिमात्यांचे संचारावर जपानी लोक नियंत्रण घालूं शकले. गोरे लोक नुसते व्यापार करूनच थांबत नाहींत तर आपल्या धर्मांतही ढवळाढवळ करितात, आणि धर्माच्या नांवाखालीं राजकारण करूं पाहातात. ही गोष्ट लक्षांत आल्याबरोबर ब्रिटिश, फरेंच, पोर्तुगीज, स्पॅनिश इत्यादि सर्व व्यापाऱ्यांना आणि मिशनऱ्यांना जपानच्या बाहेर घालवून देण्यांत आलें. १६२७ च्या आगेंमागें हे निर्बंध निरनिराळ्या वेळीं लादले गेले. फक्त डच लोकांना व्यापाराची परवानगी होती. पण ती एका बंदरापुरतीच मर्यादित होती. त्या लोकांनीं कोठपर्यंत जावें व कोठें जाऊं नये याचे निर्बंध होते. देशांत वाटेल तेथें संचार करावा अशी त्यांना मुभा नव्हती.

गोऱ्या लोकांवर नियंत्रण घालून जपानी लोक स्वस्थ बसले नाहींत सालोसाल युरोपियन राजकारणाविषयीं माहिती ते मिळवीत होते. डच

लोकांना व्यापाराची सवलत देऊन त्याच्या मोबदल्यांत जपानी लोकांनीं युरोपियन व आशियाटिक राजकारणाविषयीं पुष्कळ माहिती मिळविली. दर वर्षी डच लोकांनीं एक अहवाल सादर करावा अशी त्यांचेवर सक्ती होती. या अहवालांत यूरोप आणि आशिया खंडांतील व्यापारी आणि राजकीय परिस्थितीचें समालोचन असे. या सर्व माहितीचा उपयोग जपानी राज्य-कर्त्यांना चांगला झाला असावा. परकीयांविषयीं प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष माहिती मिळविण्याची शक्य ती खटपट जपानी लोकांनीं केली व त्याप्रमाणें आपलें धोरण आंखलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**नवीन ज्ञानाची जिज्ञासा—**

सावधानपणा आणि उत्कट जिज्ञासा या दोन गुणांच्या जोरावर जपानी लोक जिवंत राहिले. पाश्चिमात्य लोकांवर त्यांनीं जरी नियंत्रण घातलें होतें तरी त्यांच्यापासून मिळणाऱ्या ज्ञानावर बहिष्कार घातला नाहीं. किं-बहुना हें नवीन ज्ञान अतिशय जिज्ञासेनें आणि उत्सुकतेनें त्यांनीं आत्मसात् केलें. डच लोकांची वसाहत ज्या ठिकाणीं होती तेथें अनेक जपानी लोक जात व माहिती मिळवीत. कांहीं दुभाष्यांनीं डच भाषेचा अभ्यास केला. पुढें डच लिपि शिकून कांहीं पुस्तकांचीं भाषांतरें करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. सुरवातीस भाषांतर करण्याकरितां एक भाषांतरकार मंडळ बसे. दिवसाचे अखेरीस कोशाचे साहाय्यानें कांहीं शब्दांचें किंवा वाक्यांचें भाषांतर पुरें होई ! प्रारंभीं वैद्यकीय ग्रंथांचीं भाषांतरें झालीं. नंतर विज्ञानशास्त्रें जपानी भाषेंत आलीं. सारांश पहिल्यापासूनच शास्त्रें आणि तंत्रें यांकडे जपानी विद्वानांनीं अधिक लक्ष दिलें असें दिसतें.

डच लोकांचें एक शिष्टमंडळ दरसाल वजिराचे भेटीस व त्याला वार्षिक अहवाल देण्यास जाई. वाटेंत ज्या ज्या ठिकाणीं या शिष्टमंडळाचा तळ पडे, त्या त्या ठिकाणीं त्यांच्याभोंवतीं जपानी विद्वान् आणि जिज्ञासू यांची गर्दी जमत असे. त्या वेळीं पाश्चिमात्य भाषा, विद्या, संस्कृति आणि शास्त्रें यांच्याविषयीं शक्य ती माहिती जपानी लोक मिळवीत असत. असें सांगतात कीं जपानी लोकांना पाश्चिमात्य भूगोल, राजकारण व समाज

चौकशीमंडळ पाठविलें. त्यानें पाहाणी करून सल्ला दिला कीं पाश्चात्यांची लढाईची तयारी चांगली आहे. जपान त्यांना इतक्यांत तोंड देऊं शकणार नाहीं. तेव्हां जपानी मुत्सद्यांनीं शांततेचे तह करून युद्धाच्या तयारीचा पाया घातला !

'सावधान असावें सर्व ठायीं ' या उपदेशाचें अनुकरण जपानी मुत्सद्यांनीं प्रथमपासून अखेरपर्यंत केलेलें दिसतें. मराठ्यांच्या इतिहासांत नाना फडणिसांचा या दृष्टीनें थोडा प्रयत्न झालेला लौकिक माहितींत आहे. इतर हिंदी राज्यकर्त्यांनीं युरोपियन लोकांविषयीं जागरूकता दाखविल्याचा उल्लेख फारसा उपलब्ध नाहीं.

जपान स्वतंत्र कां आणि हिंदुस्थान परतंत्र कां याचें उत्तर सोपें आहे. आम्हीं 'सावधान' हा मंत्र घोकतों, जपानी लोक त्याची कृति करितात. सावधानता आणि जागरूक वृत्ति यांचा राष्ट्राचे इतिहासावर फार मोठा परिणाम होतो.

**साहेबावर नियंत्रण—**

या सावधानतेमुळें पाश्चिमात्यांचे संचारावर जपानी लोक नियंत्रण घालूं शकले. गोरे लोक नुसते व्यापार करूनच थांबत नाहींत तर आपल्या धर्मांतही ढवळाढवळ करितात, आणि धर्माच्या नांवाखालीं राजकारण करूं पाहातात. ही गोष्ट लक्षांत आल्याबरोबर ब्रिटिश, फरेंच, पोर्तुगीज, स्पॅनिश इत्यादि सर्व व्यापाऱ्यांना आणि मिशनऱ्यांना जपानच्या बाहेर घालवून देण्यांत आलें. १६२७ च्या आगेंमागें हे निर्बंध निरनिराळ्या वेळीं लादले गेले. फक्त डच लोकांना व्यापाराची परवानगी होती. पण ती एका बंदरापुरतीच मर्यादित होती. त्या लोकांनीं कोठपर्यंत जावें व कोठें जाऊं नये याचे निर्बंध होते. देशांत वाटेल तेथें संचार करावा अशी त्यांना मुभा नव्हती.

गोऱ्या लोकांवर नियंत्रण घालून जपानी लोक स्वस्थ बसले नाहींत. सालोसाल युरोपियन राजकारणाविषयीं माहिती ते मिळवीत होते. डच

लोकांना व्यापाराची सवलत देऊन त्याच्या मोबदल्यांत जपानी लोकांनीं युरोपियन व आशियाटिक राजकारणाविषयीं पुष्कळ माहिती मिळविली. दर वर्षीं डच लोकांनीं एक अहवाल सादर करावा अशी त्यांचेवर सक्ती होती. या अहवालांत यूरोप आणि आशिया खंडांतील व्यापारी आणि राजकीय परिस्थितीचें समालोचन असे. या सर्व माहितीचा उपयोग जपानी राज्य-कर्त्यांना चांगला झाला असावा. परकीयांविषयीं प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष माहिती मिळविण्याची शक्य ती खटपट जपानी लोकांनीं केली व त्याप्रमाणें आपलें धोरण आंखलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**नवीन ज्ञानाची जिज्ञासा**—

सावधानपणा आणि उत्कट जिज्ञासा या दोन गुणांच्या जोरावर जपानी लोक जिवंत राहिले. पाश्चिमात्य लोकांवर त्यांनीं जरी नियंत्रण घातलें होतें तरी त्यांच्यापासून मिळणाऱ्या ज्ञानावर बहिष्कार घातला नाहीं. कि-बहुना हें नवीन ज्ञान अतिशय जिज्ञासेनें आणि उत्सुकतेनें त्यांनीं आत्मसात् केलें. डच लोकांची वसाहत ज्या ठिकाणीं होती तेथें अनेक जपानी लोक जात व माहिती मिळवीत. कांहीं दुभाष्यांनीं डच भाषेचा अभ्यास केला. पुढें डच लिपि शिकून कांहीं पुस्तकांचीं भाषांतरें करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. सुरवातीस भाषांतर करण्याकरितां एक भाषांतरकार मंडळ बसे. दिवसाचे अखेरीस कोशाचे साहाय्यानें कांहीं शब्दांचें किंवा वाक्यांचें भाषांतर पुरें होई ! प्रारंभीं वैद्यकीय ग्रंथांचीं भाषांतरें झालीं. नंतर विज्ञानशास्त्रें जपानी भाषेंत आलीं. सारांश पहिल्यापासूनच शास्त्रें आणि तंत्रें यांकडे जपानी विद्वानांनीं अधिक लक्ष दिलें असें दिसतें.

डच लोकांचें एक शिष्टमंडळ दरसाल वजिराचे भेटीस व त्याला वार्षिक अहवाल देण्यास जाई. वाटेंत ज्या ज्या ठिकाणीं या शिष्टमंडळाचा तळ पडे, त्या त्या ठिकाणीं त्यांच्याभोंवतीं जपानी विद्वान् आणि जिज्ञासू यांची गर्दी जमत असे. त्या वेळीं पाश्चिमात्य भाषा, विद्या, संस्कृति आणि शास्त्रें यांच्याविषयीं शक्य ती माहिती जपानी लोक मिळवीत असत. असें सांगतात कीं जपानी लोकांना पाश्चिमात्य भूगोल, राजकारण व समाज

यांविषयीं जी माहिती असे त्या मानानें युरोपियन लोकांना जपानविषयीं कमी ज्ञान होतें.

सरकार आणि लोक यांचें लक्ष पाश्चात्यांच्या शास्त्राकडे आणि तंत्राकडे आधीं गेलें. सरकारनें डच ग्रंथांचें जपानी भाषेंत रूपांतर करण्याकरितां एक (ब्यूरो ऑफ् ट्रान्स्लेशन्स) भाषांतर मंडळ स्थापन केलें, त्याचप्रमाणें पाश्चात्य पद्धतीनें खगोलशास्त्र व ज्योतिष यांचा अभ्यास करण्याकरितां एक वेधशाळा बांधली.

**तंत्रसाधनाचा स्वभाव—**

तांत्रिक अनुकरणाची उपजत बुद्धि जपानी लोकांत असल्यामुळें पाश्चात्य लोकांच्या ज्या ज्या वस्तू त्यांनीं पाहिल्या त्या त्या आपल्या देशांत तयार करण्याचा प्रयत्न सुरू केला. औद्योगिक अनुकरणाची ही प्रथा अगदीं पूर्वीपासून असल्यासारखी दिसते. इ. स. १६०० मध्यें एका डच जहाजावर विल आदाम्स् नांवाचा इंग्रज मनुष्य आला. त्याला इयेयासू वजिरानें आपल्या दरबारीं ठेवून घेतलें, कारण जहाजें बांधण्याची कला या गृहस्थाला अवगत होती. तिचा उपयोग करून घ्यावयाचा होता, आणि यूरोपमधील राजकारणासंबंधीं वारंवार लागणारी माहिती देण्याचें कामही त्याच्याकडून होण्यासारखें होतें. बंदुक करण्याचे कारखानेही जपानी लोकांनीं सुरू केले. डच लोकांचीं घड्याळें, संगीतकलेचीं वाद्यें, औषधें इत्यादि वस्तू पाहून त्यांचें हुबेहुब अनुकरण करण्याचा प्रयत्न जपानी कारागीर करूं लागले. मेइजी राज्यक्रांति किंवा पुनर्घटना होण्यापूर्वींच आधुनिक उद्योगधंदे व कारखाने काढण्याला जपानी लोकांनीं प्रारंभ केला होता. १८४८ व १८५३ सालीं सरकारी प्रोत्साहनानें पोलादाचे आणि कापडाचे कारखाने निघाले होते.

जपानी लोक पाश्चात्यांच्या आक्रमणापासून अलिप्त राहिले, आणि आज औद्योगिक जगांत पुढें आले हा केवळ योगायोग नाहीं. त्याच्या मागें जागरूक वृत्तीची, जिज्ञासेची, आणि व्यावहारिक अनुकरणाची परंपरा आहे. या गुणांत इतर पौर्वात्य राष्ट्रें मागें पडलीं म्हणून तीं गुलाम झालीं. ज्या प्रमाणांत या गुणांची वाढ होईल त्या प्रमाणांत स्वातंत्र्य परत मिळेल.

**मिशनऱ्यांचा डाव ओळखला—**

युरोपियन, ख्रिस्ती मिशनरी आणि देशीय राज्यकर्ते यांचे संबंध जपानमध्यें आणि इतर आशियाटिक देशामध्यें कसे होते तें तुलनात्मक दृष्टीनें अभ्यसनीय आहे. जपानमध्यें प्रारंभीं प्रारंभीं ख्रिस्ती मिशनऱ्यांना अत्यंत सहिष्णुतेनें वागविण्यांत आलें. परंतु हळूहळू येशूचीं उदात्त तत्त्वें आणि मिशनऱ्यांची हीन वागणूक यांतील विरोध चाणाक्ष जपानी पुढाऱ्यांच्या लक्षांत आला. पोर्तुगीज लोक सकाळीं चर्चमध्यें भाविकपणें जात आणि बाकीचा दिवस निंद्य आणि अनीतीच्या आचरणांत घालवीत. मिशनरी लोकांचे अनेक पंथ एकाच वेळीं जपानमध्यें आल्यामुळें त्यांची आपापसांतली लाथाळी देशीय लोकांना दिसून आली. ख्रिस्ती धर्माच्या अंतस्थ यादवीचा यूरोपमधील वृत्तांत जपान्यांच्या कानावर येतच होता. स्थानिक बौद्धधर्मी-यांना मिशनरी लोक तुच्छपणानें व कठोरतेनें वागवीत तेंही राज्यकर्त्यांना रुचलें नाहीं. धर्मांतर करतांना मिशनरी लोक वाटेल त्या जुलूमजबरदस्तीचा उपयोग करूं लागले. ख्रिस्ती धर्मांतील जेसूइट आणि इन्क्विझिशन या पंथांची हकीकत ऐकून व पाहून जपानी लोक बिथरले. एकदां हिदेयोशी नांवाच्या वजिराला जहाजावर बोलावून पोर्तुगीज लोकांनीं यथेच्छ मदिरा-पान दिलें. मदिरा मेंदूपर्यंत गेल्याबरोबर बिचाऱ्याची जीभ सैल सुटली आणि अंतःकरणांतील विचार बाहेर पडले. त्यानें पोर्तुगीज लोकांना जाब विचारण्यास सुरुवात केली. "मिशनरी लोक प्रजेवर धर्मांतराचा जुलूम कां करतात? बौद्ध लोकांचा छळ करून बुद्धमंदिरांना आगी कां लावतात? उपयुक्त जनावरांना कापून त्यांचें मांस कां खातात? जेसूइट लोकांचे अनुयायी जपानी गुलाम विकत घेऊन आशियांत इतरत्र त्यांचा व्यापार करतात हें त्या पंथाला कसें मान्य होतें?" या यक्षप्रश्नांचा भडिमार करून हिरेयोशी थांबला नाहीं. त्यानें सर्व चर्चें पाडून टाकलीं, आणि मिशनऱ्यांना हद्दपार केलें. चोवीस मिशनऱ्यांचा बेदम छळ करून त्यांची कियोतोपासून नागासाकी बंदरापर्यंत मिरवणूक काढण्यांत आली आणि तेथें त्यांना क्रुसावर चढविण्यांत आलें! हा प्रसंग सतराव्या शतकाचे अखेरीस झाला.

**ख्रिस्ती लोकांचेंच अनुकरण—**

पुढें कांहीं काळ जपानी राज्यकर्ते स्वस्थ होते. पण मध्यंतरींच्या पंधरावीस वर्षांत पुन्हा मिशनऱ्यांचें पेंव फुटलें. निरनिराळ्या पंथांचे मिशनरी देशांत आले व प्रचार करूं लागले. या वेळीं इयेयासू हा वजीर होता. त्यानें १६१४ मध्यें आज्ञापत्र काढून ख्रिस्ती धर्माला बंदी केली. सरदार-उमरावांपैकीं जे ख्रिस्ती झाले होते त्यांना शुद्धीकरण करावें लागलें. सुमारें तीनशें मिशनरींना देशाबाहेर घालवून देण्यांत आलें. पुढें यूरोपमधील धर्मवीरत्वाचें (मार्टरडम्) वारें मिशनऱ्यांनीं जपानांत आणलें. छळ सोसून मरूं पण ख्रिस्ती धर्म सोडणार नाहीं अशी वृत्ति मिशनऱ्यांनीं निर्माण केली. पण जपानी राज्यकर्त्यांना कायद्याचें उल्लंघन करणारे म्हणजे राजनिष्ठा नसणारे लोक धार्मिक कसे असूं शकतील असा विचार पडला. कारण जपानमध्यें धर्मनिष्ठा आणि राजनिष्ठा हे गुण समान आहेत. कायद्यांचें उल्लंघन झाल्यामुळें शिक्षा झाल्या आणि शिक्षेमुळें ख्रिस्ती लोक हट्टाला पेटून धर्मवीर होऊं लागले. जेसूइट लोकांचे इन्क्विझिशन्चे ऊर्फ धर्मछळाचे मार्ग जपानी राज्यकर्त्यांनीं ऐकले व पाहिले होतेच. त्याच मार्गांचा व छळाचा प्रयोग त्यांनीं ख्रिस्ती मिशनरी व अनुयायी यांचेवर केला. १६१४ सालीं ख्रिस्ती धर्मबंदीचा कायदा झाल्यानंतर पुढील पंचवीस वर्षांत सुमारें दोन लाख लोक धर्मछळाला बळी पडले असतील. पण यालाही इयेयासू शेवटपर्यंत पुरा पडला. स्पॅनिश, पोर्तुगीज् व इंग्लिश सर्व व्यापाऱ्यांना व मिशनऱ्यांना हद्दपार करून १६३८ सालीं त्यानें पाश्चात्यांचा कांटा पूर्णपणें काढून टाकला. फक्त डच लोकांना अनेक बंधनें घालून मर्यादित व्यापाराची परवानगी ठेवली. अशा रीतीनें १६३८ पासून १८५८ पर्यंत जपान पाश्चात्यांच्या आक्रमणापासून पूर्णपणें अलिप्त ठेविला गेला.

याच अवधींत आशियांतील इतर राष्ट्रांचे पायांत गुलामगिरीच्या व साम्राज्यशाहीच्या रुपेरी शृंखला पडल्या ! जपानी राज्यकर्त्यांनीं मिशनऱ्यांना व व्यापाऱ्यांना दूर ठेवलें म्हणून जपान स्वतंत्र राहिला.

ख्रिस्ती धर्माचा हिंदुस्थानांतील इतिहास निराळा आहे. सहिष्णु वृत्ति

हिंदी आणि जपानी दोन्ही समाजांनीं दाखविली. पण सहिष्णुतेची मर्यादा जपानी लोकांनीं अधिक हुषारीनें पाळली असें म्हणावें लागतें.

**गोऱ्यांची पत नाहींशी झाली—**

साहेब स्वर्गांतून आला, किंवा परमेश्वरी संकेतामुळें युरोपियन लोकांचा व आपल्या देशाचा संबंध आला, असल्या भाबड्या कल्पना जपानमध्यें कधींच नव्हत्या. १८५८ मध्यें जबरदस्तीखातर गोऱ्या लोकांना जपानचीं बंदरें खुलीं झालीं खरीं. पण त्याच घटकेपासून या लोकांना बाहेर कसें हांकलून देतां येईल या दृष्टीनें जपानी लोकांची तयारी सुरू झाली. श्वेत राष्ट्रांना कांहीं व्यापारी व कायदेशीर जादा सवलती दिल्या न दिल्या, तोंच त्या परत घेण्याचा प्रयत्न जपान्यांनीं सुरू केला. यापुढचे जपानचे व पाश्चात्यांचे संबंध निराळ्या प्रकारचे आहेत. स्वतःचें सामर्थ्य वाढविण्याचा जपानचा एकीकडे प्रयत्न चालू आहे; दुसरीकडून पाश्चात्य राष्ट्रांचा जपानच्या सामर्थ्य-वाढीला आळा घालून तें खच्ची कसें करितां येईल असा प्रयत्न चालला आहे. इंग्लंड आणि अमेरिका यांच्या आरमाराइतकें आरमार जपाननें ठेवूं नये या तहनाम्याचा अर्थ काय होतो? शेंदोनशें वर्षे सर्व गोऱ्या राष्ट्रांनीं चीन-मध्यें धुमाकूळ घातला, पण या खेळांत जपान सामील झाल्याबरोबर नऊ राष्ट्रांचा तह करण्यांत आला. उलट जपाननेंही गोऱ्या राष्ट्रांना धाब्यावर बसविण्याचें पूर्वापार धोरण चालू ठेविलें आहे. मांचूरिया आणि उत्तर चीन या प्रकरणांत चीनचा बळी पडत आहे ही गोष्ट खरी; पण या प्रसंगामुळें गोऱ्या राष्ट्रांची पत आतां आशियांत कमी होऊं लागली आहे. श्वेतेतर लोकही श्वेत राष्ट्रांचा कान धरूं शकतात हें महत्त्वाचें तत्त्व सिद्ध झालें आहे. याचा फायदा इतर सर्व श्वेतेतर वर्णांना झाल्याशिवाय राहणार नाहीं.

**हिंदी जपानी वृत्तींतील फरक—**

पाश्चात्य लोकांचा व संस्कृतीचा संबंध आल्यानंतर हिंदी आणि जपानी लोकांच्या प्रतिक्रिया अगदीं निराळ्या तऱ्हेनें झाल्या. १६२७ चे सुमारास हिंदी लोकांनीं पाश्चात्यांचें स्वागत करून त्यांना संचारस्वातंत्र्य

दिलें. उलट याच वेळीं जपानी लोकांनीं त्यांची हकालपट्टी केली. १८५७ चे सुमारास आपद्धर्म म्हणून जपानी लोकांनीं पाश्चात्यांना देशांत घेतलें. याच सुमाराला हिंदी लोकांनीं स्वातंत्र्ययुद्ध पुकारून त्यांना बाहेर घालविण्याचा निष्फळ प्रयत्न केला. १८५७ नंतर दोन्हीही देशांत अपरिहार्य मार्ग म्हणून पाश्चात्य लोकांना थारा मिळाला. पण या पाऊणशें वर्षांत दोन्ही राष्ट्रांचा इतिहास किती निराळा झाला !

ज्या जपाननें पाश्चात्यांना इतका विरोध केला त्याच जपाननें त्यांचें अनुकरण इतक्या सत्त्वर केलें कीं आज जपान म्हणजे प्रति-अमेरिका आहे असें वाटतें. हा ग्रहणशीलपणा दाखवून त्यानें स्वत्वरक्षणही केलेलें आहे. उलट हिंदुस्थान मात्र ग्रहणशीलता आणि स्वत्वरक्षण या दोन्हीही बाबतींत मंद दिसतो. कष्टानें आणि कालावधीनें कांहीं गोष्टी संस्कार करून नंतर ग्रहण करण्याची थोडीशी प्रवृत्ति हिंदी लोकांत दिसते. पण त्या अवधींत जग किती तरी पुढें निघून जातें.

पाश्चात्यांपासून जपानी लोकांनीं कल्पना अशा अगदीं थोड्या घेतल्या आहेत. पण या थोड्या कल्पनांना सर्व राष्ट्राच्या कृतीचा आणि इच्छाशक्तीचा जोर लागलेला आहे. उलट हिंदुस्थाननें पाश्चात्यांच्या कल्पना पुष्कळ उचलल्या आहेत. परंतु त्यांचेमागें इच्छाशक्तीचा व सांघिक कार्याचा जोर नसल्याकारणानें या कल्पनांमुळें बुद्धिभेद, साशंक वृत्ति आणि मनोदौर्बल्य हे दोष मात्र उत्पन्न झाले आहेत. ज्या ज्या वेळीं हिंदुस्थानांत एकाद्या सामान्य कल्पनेवर सर्व राष्ट्रांच्या सामर्थ्याचें केंद्रीकरण होतें त्या त्या वेळीं देशांत अलौकिक कार्यनिष्पत्ति झालेली दिसते. यावरून कर्तबगारींत हिंदुस्थान जपानपेक्षां मागें नाहीं हें सिद्ध होतें.

जागरूकपणा, परिस्थितीचें आकलन, नवीन परिस्थितींत ताबडतोब जुळतें घेण्याची तयारी, आणि परचक्राच्या प्रसंगीं मतभेद बाजूला सारून एकजूट करण्याची प्रवृत्ति या गुणांमुळें पाश्चात्यांशीं झालेल्या व्यवहारांत जपाननें आपलें शीरसलामत ठेविलें. उलट सावधानता, परिस्थितीचें सम्यक्ज्ञान, आपत्तीच्या समयीं एकजूट, आणि जीवनांत आवश्यक असा

फेरबदल करण्याची तयारी—हे गुण अंगीं नसल्याकारणानें हिंदुस्थान व आशियांतील इतर राष्ट्रें पाश्चात्यांच्या नियंत्रणाखालीं गेलीं.

बुद्धिमत्ता आणि कर्तबगारी हे गुण जपानप्रमाणें हिंदुस्थानांतही आहेत. किंबहुना हिंदी लोक या गुणांत श्रेष्ठ आहेत ही गोष्ट निश्चित आहे. परिस्थितीविषयीं जागरूकता आणि काळ ओळखून वागण्याची तयारी या गुणांची जोड हिंदी बुद्धीला व कर्तबगारीला मिळाली तर हेही दिवस जातील.

★ ★ ★

# १७

# आशियांतील जपानच्या कार्याचा आढावा

**संरक्षण, प्रतिबंध व आक्रमण—**

आधुनिक जपानचा प्रारंभ आत्मसंरक्षणापासून झाला. आज जपानपासून आपलें संरक्षण कसें करावें हा इतर राष्ट्रांना प्रश्न पडलेला आहे. पाश्चात्य राष्ट्रांशीं संबंध आल्यानंतर जपाननें त्यांना बाहेर घालवून दिलें व दारें लावून घेतलीं. अडीचशें वर्षें तो आपल्या घरांत एकांतवासानें राहिला. पुढें १८५३ मध्यें एक दिवस दारावर कोणीं तरी थाप मारली. हा कमोडोर पेरी होता. जपाननें फटींतून पाहिलें तों पाश्चिमात्य लोक दिसले म्हणून दार उघडलें नाहीं. पेरी पुन्हा आला आणि दार उघडा, नाहीं तर घराला सुरुंग लावतों असें म्हणाला. त्या वेळीं जपानला कळून चुकलें कीं आपणांजवळ संरक्षणाचे दृष्टीनें भरपूर साहित्यसामग्री नाहीं. म्हणून त्यानें तयारी करण्याला सुरुवात केली. आज ही स्थिति आली आहे.

जपाननें आत्मसंरक्षणाकरितां आपलें लष्करी सामर्थ्य वाढविलें. पुढें रशियाचा आणि चीनचा त्रास होऊं लागला. जपाननें पाहिलें कीं केवळ आपल्या घराचे संरक्षणाची तयारी करून उपयोगी नाहीं, घरावर भोंवतालून हल्ला होणार नाहीं याकरितां प्रतिबंधक उपाय योजिले पाहिजेत. जपानचा किनारा आणि हल्ला करणारे इतर देश यांचेमध्यें ‘ बफर ’ किंवा स्प्रिंग

पाहिजे. म्हणून त्यानें कोरिया आपले ताब्यांत घेतला. कोरिया जपानचा झाल्यानंतर त्याचेवर कोणी हल्ला करील म्हणून त्याचे पलीकडील मांचूरिया घेतला. इंग्लंडप्रमाणें आपल्यालाही साम्राज्य वाढवितां येतें असें पाहिल्यावर थोडें पुढें रेटण्यास सुरुवात केली. प्रतिबंधक धोरण जाऊन आक्रमणाचें धोरण सुरू झालें. उत्तर-चीनवर मोर्चा वळविला; नानकिंग घेतलें, कँटनकडे सैन्य रवाना झालें. सर्व चीनचा कारभार आपल्या तंत्रानें चालविला जावा अशी महत्त्वाकांक्षा त्यांतून निघाली.

सारांश, प्रारंभीं आत्मसंरक्षणाचें धोरण होतें; नंतर प्रतिबंधक इलाज म्हणून कांहीं गोष्टी केल्या; पुढें सामर्थ्याचा आत्मविश्वास वाढला; त्याबरोबर आक्रमणाचें धोरण स्वीकारलें. अशा रीतीनें जपानच्या परराष्ट्रीय धोरणांत एका दिशेनें वाढ झालेली दिसून येते.

यालाच समांतर असें व्यापारी धोरण वाढत गेलें. त्यांतून साम्राज्य-बुद्धि निर्माण झाली.

**प्रथम व्यापार, नंतर स्वामित्व—**

शेतीवर लोकांचा निर्वाह होईना म्हणून उद्योगधंद्यांना प्रारंभ केला. उद्देश असा कीं शेतीवर ज्यांचें पोट भरत नाहीं त्यांना कारखान्यांत काम मिळावें. उद्योगधंद्यांच्या मागोमाग कच्चा माल आणि बाजारपेठा यांचे प्रश्न आले. या बाबतींत जपान परतंत्र पडला. गोऱ्या साम्राज्यांच्या हातांत सर्व कच्चा माल पिकविणारे प्रदेश आणि बाजार पेठा. आपल्या मालकीचे किंवा स्वाधीन असे हे प्रदेश आणि या पेठा असल्याशिवाय खरें औद्योगिक स्वावलंबन नाहीं असें जपानला वाटलें. जपानी मालानें अमेरिका आणि यूरोप यांच्या बाजारपेठांतही यशस्वी स्पर्धा केली. पण गोऱ्या लोकांनीं जपानी मालावर भारी कर लादण्याचें धोरण ठेविलें. गोऱ्या मजुरांचा राहणीचा दर्जा कमी होईल कीं काय अशी त्यांना भीति पडली. त्यामळें बाजारपेठा आपल्या हुकमतीखालीं पाहिजेत ही भावना जपानी लोकांत अधिकच प्रबळ झाली.

संरक्षणाचे दृष्टीनें शेजारचे प्रांत आपल्या हुकमतीखालीं ठेवण्याचें लष्करशाहीचें धोरण; आणि कच्चा माल व व्यापारी पेठा आपल्या नियंत्रणाखालीं पाहिजेत असें भांडवलदारांचें धोरण. जपानमधील सामर्थ्यधारी लष्करशाही आणि संपत्तिधारी भांडवलदार या दोघांचीं उत्तरें एकच आलीं. दोघांच्या रीती आणि उद्देश निराळे. पण जगाचे दृष्टीनें दोघांच्या कृतीचा परिणाम एकच.

देशाचें संरक्षणाकरितां इतर देशांवर आक्रमण आणि व्यापार-उद्योगधंद्यांकरितां वसाहतींवर नियंत्रण हीं दोन आधुनिक साम्राज्यवादाचीं चिन्हें आहेत. जपाननें आपल्या साम्राज्यपद्धतीला "आर्थिक सहकार्य" असें नांव दिलेलें आहे. चीन आणि जपान हा आर्थिक दृष्टीनें एक गट (युनिट) कल्पून यापुढें व्यवस्था व्हावी असें जपानचें म्हणणें. आतां जपानचें आक्रमण आर्थिक सहकार्यापुरतेंच होईल कीं इतर समाजाची पिळणूक करण्याचें राहील हें सांगणें कठीण आहे. दोन्हीही विचार व प्रवृत्ति जपानमध्यें आहेत. त्यांतील कोणत्या विचाराचा पगडा परराष्ट्रीय धोरणावर बसेल त्यावर भविष्यकाल अवलंबून राहील.

हा एका बाजूनें विचार झाला. पण जपानच्या धोरणाला दुसरी ध्येयात्मक अशीही बाजू आहे. ती लक्षांत घेणें आवश्यक आहे.

**श्वेत-श्वेतेतर वादाची पीठिका—**

अन्यायाची आणि अपमानाची चीड येऊन त्यांतूनही एकादें धोरण निर्माण होत असतें. जपानची शीघ्र प्रगति व्हावयास लागली तेव्हांपासून त्याच्या विकासावर नियंत्रण घालण्याचें धोरण गोऱ्या राष्ट्रांनीं स्वीकारलेलें आहे.

खुद्द आशिया खंडांत श्वेत राष्ट्रांनीं आपला मोठा पसारा मांडला आहे. ज्या ज्या ठिकाणीं गोरे लोक आशियांतील वसाहतींत आहेत त्या त्या ठिकाणीं गोरा श्रेष्ठ आणि काळा किंवा पिवळा मनुष्य कनिष्ठ असें नातें त्यांनीं निर्माण करून ठेविलेलें आहे. जगावर प्रवास करणारे जपानी लोक जेव्हां मुंबई, कोलंबो, सिंगापूर, हाँगकाँग, शांघाय वगैरे ठिकाणीं हें व्यस्त नातें पाहतात

तेव्हां त्यांच्या स्वाभिमानाला धक्का बसतो. खुद्द जपानमध्यें अगदीं प्रारंभापासून, म्हणजे सौळाव्या शतकापासून, गोऱ्या लोकांना "बार्बेरियन्स" किंवा रानटी लोक असें मानण्याची प्रथा असे. जनावरें खाणारे, चारचौघांत जनावरांप्रमाणें एकमेकांना चाटणारे (मुका घेणारे) असे हे लोक फार मागासलेले असले पाहिजेत अशा समजुतीनें त्यांना वागविण्यांत येई. अशा या लोकांनीं आशियांतील स्थानिक लोकांना गुलामांप्रमाणें वागवावें ही गोष्ट जपानी लोकांना आवडली नाहीं. आशियांतून गोऱ्या लोकांचें उच्चाटन केलें पाहिजे आणि आशियाटिक लोकांना स्वतंत्र केलें पाहिजे अशा प्रकारची एक जोराची विचारसरणी जपानमध्यें प्रचलित आहे.

अमेरिका-कानडा वगैरे देशांनीं वसाहतीच्या नियमांत भर घालन आशियाटिक लोकांना येण्याची बंदी केली, या अपमानानें पूर्वींच्या भावनेंत अधिकच भर पडली. सुशिक्षित आणि सुसंस्कृत जपानी लोक ज्या वेळीं अमेरिकेंत जातात त्या वेळीं केवळ आशियाटिक किंवा जपानी म्हणन त्यांना पक्षपातानें वागविण्यांत येते. या अपमानाचा सूड गोऱ्या लोकांवर घेतला पाहिजे अशी मूक भावना गेल्या पिढीमध्यें वाढत वाढत आली असून आज तिला जोराची वाचा फुटली आहे. आशियाटिक लोक गोऱ्या लोकांच्या प्रदेशांत नकोत, तर गोरे लोकही आशियांत नकोत.

स्वतःच्या देशांत आणि आशियांत श्वेतेतर लोकांशीं श्वेत लोकांनीं जें धोरण ठेविलें त्यामुळें जपानांत नवीन चळवळ निर्माण झाली. "आशियांत फक्त आशियाटिक लोकच पाहिजेत" (एशिया फॉर एशियाटिक्स्) अशी चळवळ जपान व चीन या दोनही देशांत आहे, पण जपान गोऱ्या लोकांपासून पूर्ण स्वतंत्र असल्यामुळें तेथें ती अधिक जोरांत आहे.

**आशियावादाचें ध्येय—**

प्रत्येक देशांत ध्येयवादी आणि व्यावहारिक असे दोन प्रकारचे लोक असतात. जपानमध्यें आशियाटिक ध्येयवादी लोक अनेक आहेत. गोऱ्या लोकांपासून आशियांतील लोकांना मुक्त केलें पाहिजे. गोरे लोक आशियांतून घालवून दिले पाहिजेत. हें काम करण्यास पुढाकार कोण घेणार ?

आज जपानशिवाय अशा चळवळीचें नेतृत्व घेण्याचें सामर्थ्य कोणांत आहे ? पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत जपानची गणना होते, आशियांतील राष्ट्रांत जपानची गणना होते, आशियांतील राष्ट्रांत जपानच सामर्थ्यवान आहे, म्हणून हें जपानचेंच काम आहे. आशियाला स्वतंत्र करणें हें जपानचें 'मिशन' आहे.

हें कार्य साध्य होण्याकरितां चीन-जपान व हिंदुस्थान या तिघांनीं एकजूट केली पाहिजे. आजची चिनी राज्यसत्ता गोऱ्या लोकांपुढें लांगूलचालन करणारी आहे. राष्ट्रसंघ, इंग्लंड, आणि अमेरिका यांचेकडे चीनचे डोळे लागले आहेत. ही राज्यसत्ता नाहींशीं करून जपानच्या आशियाटिक ध्येयाप्रमाणें वागणारी राज्यसत्ता चीनमध्यें स्थापन झाली पाहिजे. तें काम जपान करीत आहे. तें झालें म्हणजे पुढची पायरी हिंदुस्थानांतून ब्रिटिश लोकांना घालवून देणें. अशा रीतीनें जपान-चीन-हिंदुस्थान तिघेही एकत्र झाले म्हणजे आशियाचें स्वातंत्र्य साध्य करणें सोपें काम आहे.

जपानी मनुष्य अगदीं मनांतील गोष्टी बोलूं लागला, अतिस्नेह किंवा मदिरा यामुळें त्याची जीभ मनमोकळेपणानें बोलूं लागली, कीं हे विचार त्याच्या अंतःकरणांतून भडभडून बाहेर येतात. या ध्येयवादाचा चांगुलपणा जपानी लोकांना देणें रास्त आहे. तिकडे लष्कर आणि भांडवलदार यांच्या सहकार्यानें चीनवर जपानचें आक्रमण होत असतां, या आक्रमणानें आपला आशियाटिक ध्येयवाद सिद्धीस जाणार आहे या सुखस्वप्नांत पुष्कळ उदारमतवादी, तरुण आणि ध्येयवादी असे जपानी लोक आहेत. खुद्द लष्करशाहीमध्येंही असे अनेक पुढारी आहेत. व्यवहाराच्या कठोर आणि वास्तववादी क्षेत्रांत हा ध्येयवाद कितपत उतरेल तें सांगणें फार कठीण आहे. जपानमध्यें एकादी विभूतीच झाली तर ती करूनही दाखवील. आशिया खंडांत काय शक्य नाहीं ? ही विभूतींची जन्मभूमि आहे !

**पूर्वखंडाचें नेतृत्व—**

आशियाचें नेतृत्व आतां आपण स्वीकारलें पाहिजे, तें नैसर्गिकच आपल्या गळ्यांत येऊन पडतें, असें जपानी लोकांना स्वाभाविकपणेंच वाटतें. आशियांत गोऱ्या लोकांपासून स्वातंत्र्य जिंकूं इच्छिणाऱ्या वीरांना जपाननें

आश्रयस्थान दिलेलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. यांत हिंदुस्थान, जावा, डचबेटें, इत्यादि देशांतील लोक आहेत. महायुद्धाचे काळीं जपान-मधील कांहीं हिंदी पुढाऱ्यांना आपल्या ताब्यांत घेण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न चालू असतां कांहीं जपानी देशभक्तांनीं सरकारी हुकूम धाब्यावर बसवूनही आपल्या घरांत आश्रय दिला. यूरोपमधील स्वातंत्र्यवाद्यांचें आश्रय-स्थान इंग्लंड असे; आशियांतील स्वातंत्र्यवीरांचें आश्रयस्थान जपान आहे.

आशियाटिक राष्ट्रांत स्वाभिमानाची भावना उत्पन्न करून त्यांना आशियाचा ध्येयवाद देण्याचे उद्देशानें जपानमध्यें (यंग एशिया लीगसारख्या) अनेक संस्था निघालेल्या आहेत. आशियांतल्या निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांनीं जपानमध्यें शिक्षणाकरितां यावें व शिक्षणाबरोबरच हा आशियाटिक ध्येयवाद घेऊन जावा अशी जपानी मुत्सद्यांची व शिक्षणाधि-काऱ्यांची योजना आहे. त्याकरितां शिष्यवृत्या, वसतिगृहें इत्यादि अनेक मार्गांनीं परदेशी विद्यार्थ्यांना उत्तेजन दिलें जातें. आशियावादाचा वैचारिक पाया तरुण पिढीच्या साहाय्यानें अखिल आशियांत घालावा असा जपानचा विचार आहे.

**श्वेत-श्वेतेतर वादाचें भवितव्य—**

जागतिक शांतता अथवा आंतरराष्ट्रीय विचार या दृष्टींनीं आशियावाद हा संकुचित स्वरूपाचा वाटेल. परंतु आशिया खंडांतील गोरे लोक आपल्या वसाहतीमधील श्वेतेतरवर्णीय लोकांना कशा पद्धतीनें वागवितात तें पाहिलें म्हणजे हा वादाचा टप्पा अपरिहार्य आहे असें वाटतें. आशिया खंडांतून गोऱ्या लोकांचीं साम्राज्यें नष्ट होऊन त्या त्या देशांतील लोकांना स्वातंत्र्य मिळेल तेव्हांच आशियावाद नाहीसा होईल. श्वेत-श्वेतेतर कलहाचें आशिया-वाद हें एक स्वरूप आहे. आफ्रिकेंतील कृष्णवर्णी लोक अधिक जागृत झाले म्हणजे तेथेंही आफ्रिकावाद सुरू होईल. हा श्वेत-श्वेतेतर कलह मिटून श्वेतेतर वर्णाला स्वातंत्र्य व समान दर्जा मिळाल्याशिवाय जगांत शांतता नाहीं.

श्वेत-श्वेतेतर कलह हा शांततेनें मिटावा ही गोष्ट इष्ट व चांगली आहे. उभय वंशीयांना ती भूषणास्पद आहे. परंतु तो शांततेनें मिटावा कीं

आज जपानशिवाय अशा चळवळीचें नेतृत्व घेण्याचें सामर्थ्य कोणांत आहे? पहिल्या प्रतीच्या राष्ट्रांत जपानची गणना होते, आशियांतील राष्ट्रांत जपानची गणना होते, आशियांतील राष्ट्रांत जपानच सामर्थ्यवान आहे, म्हणून हें जपानचेंच काम आहे. आशियाला स्वतंत्र करणें हें जपानचें 'मिशन' आहे.

हें कार्य साध्य होण्याकरितां चीन-जपान व हिंदुस्थान या तिघांनीं एकजूट केली पाहिजे. आजची चिनी राज्यसत्ता गोऱ्या लोकांपुढें लांगूलचालन करणारी आहे. राष्ट्रसंघ, इंग्लंड, आणि अमेरिका यांचेकडे चीनचे डोळे लागले आहेत. ही राज्यसत्ता नाहींशीं करून जपानच्या आशियाटिक ध्येयाप्रमाणें वागणारी राज्यसत्ता चीनमध्यें स्थापन झाली पाहिजे. तें काम जपान करीत आहे. तें झालें म्हणजे पुढची पायरी हिंदुस्थानांतून ब्रिटिश लोकांना घालवून देणें. अशा रीतीनें जपान-चीन-हिंदुस्थान तिघेही एकत्र झाले म्हणजे आशियाचें स्वातंत्र्य साध्य करणें सोपें काम आहे.

जपानी मनुष्य अगदीं मनांतील गोष्टी बोलूं लागला, अतिस्नेह किंवा मदिरा यामुळें त्याची जीभ मनमोकळेपणानें बोलूं लागली, कीं हे विचार त्याच्या अंतःकरणांतून भडभडून बाहेर येतात. या ध्येयवादाचा चांगुलपणा जपानी लोकांना देणें रास्त आहे. तिकडे लष्कर आणि भांडवलदार यांच्या सहकार्यानें चीनवर जपानचें आक्रमण होत असतां, या आक्रमणानें आपला आशियाटिक ध्येयवाद सिद्धीस जाणार आहे या सुखस्वप्नांत पुष्कळ उदारमतवादी, तरुण आणि ध्येयवादी असे जपानी लोक आहेत. खुद्द लष्करशाहीमध्येंही असे अनेक पुढारी आहेत. व्यवहाराच्या कठोर आणि वास्तववादी क्षेत्रांत हा ध्येयवाद कितपत उतरेल तें सांगणें फार कठीण आहे. जपानमध्यें एकादी विभूतीच झाली तर ती करूनही दाखवील. आशिया खंडांत काय शक्य नाहीं? ही विभूतींची जन्मभूमि आहे!

**पूर्वखंडाचें नेतृत्व—**

आशियाचें नेतृत्व आतां आपण स्वीकारलें पाहिजे, तें नैसर्गिकच आपल्या गळ्यांत येऊन पडतें, असें जपानी लोकांना स्वाभाविकपणेंच वाटतें. आशियांत गोऱ्या लोकांपासून स्वातंत्र्य जिंकूं इच्छिणाऱ्या वीरांना जपाननें

आश्रयस्थान दिलेलें आहे ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. यांत हिंदुस्थान, जावा, डचबेटें, इत्यादि देशांतील लोक आहेत. महायुद्धाचे काळीं जपानमधील कांहीं हिंदी पुढाऱ्यांना आपल्या ताब्यांत घेण्याचा ब्रिटिश सरकारचा प्रयत्न चालू असतां कांहीं जपानी देशभक्तांनीं सरकारी हुकूम धाब्यावर बसवूनही आपल्या घरांत आश्रय दिला. यूरोपमधील स्वातंत्र्यवाद्यांचें आश्रयस्थान इंग्लंड असे; आशियांतील स्वातंत्र्यवीरांचें आश्रयस्थान जपान आहे.

आशियाटिक राष्ट्रांत स्वाभिमानाची भावना उत्पन्न करून त्यांना आशियाचा ध्येयवाद देण्याचे उद्देशानें जपानमध्यें (यंग एशिया लीगसारख्या) अनेक संस्था निघालेल्या आहेत. आशियांतल्या निरनिराळ्या देशांतील विद्यार्थ्यांनीं जपानमध्यें शिक्षणाकरितां यावें व शिक्षणाबरोबरच हा आशियाटिक ध्येयवाद घेऊन जावा अशी जपानी मुत्सद्यांची व शिक्षणाधिकाऱ्यांची योजना आहे. त्याकरितां शिष्यवृत्या, वसतिगृहें इत्यादि अनेक मार्गांनीं परदेशी विद्यार्थ्यांना उत्तेजन दिलें जातें. आशियावादाचा वैचारिक पाया तरुण पिढीच्या साहाय्यानें अखिल आशियांत घालावा असा जपानचा विचार आहे.

**श्वेत-श्वेतेतर वादाचें भवितव्य—**

जागतिक शांतता अथवा आंतरराष्ट्रीय विचार या दृष्टींनीं आशियावाद हा संकुचित स्वरूपाचा वाटेल. परंतु आशिया खंडांतील गोरे लोक आपल्या वसाहतीमधील श्वेतेतरवर्णीय लोकांना कशा पद्धतीनें वागवितात तें पाहिलें म्हणजे हा वादाचा टप्पा अपरिहार्य आहे असें वाटतें. आशिया खंडांतून गोऱ्या लोकांचीं साम्राज्यें नष्ट होऊन त्या त्या देशांतील लोकांना स्वातंत्र्य मिळेल तेव्हांच आशियावाद नाहीसा होईल. श्वेत-श्वेतेतर कलहाचें आशियावाद हें एक स्वरूप आहे. आफ्रिकेंतील कृष्णवर्णी लोक अधिक जागृत झाले म्हणजे तेथेंही आफ्रिकावाद सुरू होईल. हा श्वेत-श्वेतेतर कलह मिटून श्वेतेतर वर्णाला स्वातंत्र्य व समान दर्जा मिळाल्याशिवाय जगांत शांतता नाहीं.

श्वेत-श्वेतेतर कलह हा शांततेनें मिटावा ही गोष्ट इष्ट व चांगली आहे. उभय वंशीयांना ती भूषणास्पद आहे. परंतु तो शांततेनें मिटावा कीं

अत्याचारानें मिटावा हें श्वेतवर्णीयांवरच अवलंबून आहे. आपल्या हातांतील सत्तेचें संक्रमण ते कोणत्या रीतीनें करतील यावर भविष्य काळ अवलंबून आहे. शांततेनें तें झालें तर इष्टच आहे. परंतु सत्तासंक्रमण झाल्याशिवाय इतिहासांत पुढील पायरीला प्रारंभ होणार नाहीं.

**राष्ट्रीय दृष्टीनें आढावा—**

जपाननें स्वत:करितां व आशियाकरितां काय साध्य केलें ? जपानच्या कर्तबगारीचा आढावा घेतांना दोन दृष्टींनीं पाहावें लागेल. एक खुद्द जपानची दृष्टि व दुसरी आशियांतील तिऱ्हाईत राष्ट्रांची दृष्टि.

राष्ट्रदृष्टीनें विचार करितां जपाननें अवघ्या साठ वर्षांत मूळापासून प्रारंभ करून प्रथम प्रतीच्या राष्ट्राचा दर्जा संपादन केला, ही एक अलौकिक कर्तबगारीची गोष्ट केली. जपाननें इतिहासाचें प्रमाण बदललें; इतिहास केला. जगाच्या इतिहासांत इतक्या शीघ्र प्रगतीचें दुसरें उदाहरण नाहीं. राष्ट्र या दृष्टीनें हा इतिहास पुढें अनेक शतकें जपानला स्फूर्ति देईल.

परंतु बाह्यत: पहिल्या प्रतीचा दर्जा मिळविलेला असला तरी अंतस्थ जीवनांतील महत्त्वाचे प्रश्न अद्याप जपाननें सोडविलेले नाहींत. शेतकरी वर्गाचें दारिद्र्य, स्त्रियांची विषमतेची स्थिति, कामगार वर्गावरील निर्बंध इत्यादि दृष्टींनीं विचार करितां सामाजिक संघटनेंत जपानला अद्याप पुष्कळच मजल मारावयाची आहे.

भौतिक सामर्थ्यांत जपान आधुनिक आहे. सामाजिक संघटनेंत कांहींसा मध्यम युगांत आहे. पण हाही दोष तो लौकरच दूर करील. वेळ देणें जरूर आहे.

**आशियाला काय मिळालें ?—**

आशियाचे दृष्टीनें विचार करितां असें स्पष्ट दिसतें कीं, जपाननें श्वेतवर्णीयांच्या श्रेष्ठत्वाचे भावनेला जोराचा धक्का दिला, आणि तितक्याच प्रमाणांत आशियांतील राष्ट्रांत आत्मविश्वास निर्माण केला. परवां परवां पर्यंत खुद्द जपानी लोक गोऱ्या लोकांना नाराज करण्याला नाराज असत.

परंतु १९३७ च्या उत्तर–चीन प्रकरणापासून तोही मनु पालटला आहे. ज्या गोऱ्या लोकांनीं पूर्व आशियांत राजासारखे मिरवावें त्यांनाच आतां तेथें काळजीपूर्वक वागावें लागतें. पूर्वेकडील बंदरांत जपानी लोकांच्या वाटेला यत्किंचितही न जाण्याची गोरे अधिकारी किती खबरदारी घेतात तें पाहिलें म्हणजे हेच हिंदुस्थानांतील साहेबांचे भाऊबंद आहेत काय असा संशय मनांत उत्पन्न होतो ! अतिपूर्व प्रदेशांत तरी जपाननें श्वेतवर्णीयांचे श्रेष्ठत्वाला धक्का दिला. ही आशियाचे स्वातंत्र्याची मानसिक तयारीच झाली. हें जपानचें अति महत्त्वाचें कार्य आहे.

उलट याच कार्याची दुसरी बाजू म्हणजे आशियांतील कांहीं प्रदेशांना आपल्या तंत्राखालीं किंवा अप्रत्यक्ष अंमलाखालीं आणिलें आणि त्यामुळें आशिया खंडांत भावी कलहाचें बीज पेरून ठेविलें असा आक्षेप जपानवर घेतां येईल. हा आक्षेप किती खरा किंवा खोटा ठरेल तें जपानच्या चीन-कोरियाविषयक भावी धोरणावर अवलंबून राहील. या बाबतींत इतक्यांत निर्णय देणें उतावीळपणाचें होईल, असें मानण्याइतका ध्येयवाद जपानी लोकांत आहे. काळच ठरवील !

**गुरूचे गुणदोष—**

आशियांतील राष्ट्रें आजपर्यंत यूरोप-अमेरिकेचे तोंडाकडे पाहात होतीं. त्यांच्याविषयीं एक प्रकारची प्रामाण्यबुद्धि होती. हें प्रामाण्याचें स्थान बदलून आतां जपानकडे गेलें. जपाननें आपल्या कर्तबगारीनें आशियाचें नेतृत्व संपादन केलें आहे. भौतिक सामर्थ्याची प्राप्ति, आर्थिक प्रगति, आणि चढाऊ राजकारण या दृष्टीनें जपानचें उदाहरण इतरांना मार्गदर्शक होऊन ते त्याला गुरुस्थानीं मानतील. परंतु गुरूची भूमिका पूर्णपणें पार पाडण्याकरितां लागणारें वैचारिक भांडवल, राजकीय वेदांत आणि व्यापक ध्येयवाद जपानजवळ नाहीं. त्यामुळें या नेतृत्वाला टिकाऊपणा नाहीं. आणि ध्येयवादाविरहित जपानचें अनुकरण इतर राष्ट्रांनीं केलें तर यूरोपचीच आवृत्ति आशियांतही होईल. या दोषाची जाणीव कांहीं जपानी पुढाऱ्यांना झालेली आहे, पण असे लोक अद्याप अल्पसंख्याक आहेत.

जपानजवळ जपानचा ध्येयवाद आहे पण तो इतर राष्ट्रांना रुजू नाहीं. जपानिझम्, जपानत्व, म्हणून कांहीं विशिष्ट ध्येयप्रणाली आहे. पण जपाना-बाहेर इतर राष्ट्रांना आपलेपणा वाटण्याइतका व्यापकपणा तिच्यांत नाहीं.

**जगाच्या दृष्टीनें महत्त्व—**

जगाच्या दृष्टीनें विचार करितां मानवी इतिहासांतील एक पान जपाननें नवीन सुरू केलें. जागतिक शांततेच्या मार्गांत श्वेत-श्वेतेतर समता हा महत्त्वाचा टप्पा आहे, त्या टप्प्यापर्यंत इतिहासाला जपाननें आणलें आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीनें राष्ट्रांतर्गत समानतेचें बीज पेरलें; रशियन राज्यक्रांतीनें समाजांतर्गत वर्गसमानतेचें तत्त्व स्थापन केलें; जपाननें श्वेत-श्वेतेतर वर्णांच्या समानतेच्या हक्काची घोषणा केली. या दृष्टीनें जपानचें स्थानही मानवी इतिहासांत महत्त्वाचें आहे.

**आदर्श नाहीं, पण असामान्य—**

जपान, आशिया आणि जग या तिन्ही भूमिकेवरून जपानच्या कार्याची पाहाणी केली तरी तिच्यांत गुणदोषांचें समान मिश्रण सांपडतें. जगांतील इतर कोणत्याही राष्ट्रांपेक्षां जपान अधिक दोषी नाहीं किंवा अधिक दोषा-तीतही नाहीं. पण एवढी गोष्ट सर्वमान्य होईल कीं जपान कांहीं सामान्य राष्ट्र नाहीं. असामान्य राष्ट्रांपैकीं एक आहे.

तुलनेच्या दृष्टीनें जपानचें पारडें थोडें अधिक जड करावयाचें झाल्यास या आंतरराष्ट्रीय तुलनेला अंतरराष्ट्रीय गुणदोषविचाराची जोड देतां येईल. राष्ट्रांतील समाज या दृष्टीनें विचार केल्यास जपानविषयीं पक्षपात वाटण्या-सारखे अनेक गुण त्याचेजवळ आहेत.

**अनुकरणीय व्यक्ति व समाज—**

राष्ट्र या दृष्टीनें एकांतिक स्वरूपाचा विचार करितां जपानमध्यें अनेक स्पृहणीय व अनुकरणीय अशा गोष्टी आहेत. पाश्चात्य आणि पौर्वात्य लोकांना या गुणांमुळेंच जपान प्रिय वाटतो. त्याचें परराष्ट्रीय राजकारण

पसंत नसणाऱ्या लोकांनाही व्यक्ति या दृष्टीनें जपानी लोक आदरणीय वाटतात, आणि समाज या दृष्टीनें त्याचेविषयीं कौतुक वाटतें.

वैयक्तिक गुणांची जोपासना जपानमध्यें अनेक वर्षें अत्यंत काळजीपूर्वक केल्यासारखी वाटते. जपानी स्वभावांतील प्रामाणिकपणा, सौजन्य, कष्टाळूपणा, सेवातत्परता, देशप्रेम, सूक्ष्म अभिरुचि, सहिष्णुता, स्वच्छता, द्रव्यनिरभिलाष आणि साधेपणांतील रुबाब, या सर्व गुणांचा समुच्चय जगांतील कोणत्याच देशांत सांपडणार नाहीं. या म्हणण्यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. पाश्चिमात्य लोकही या विधानाला अनुमति देतील.

सामाजिक गुण या दृष्टीनेंही जपाननें चांगला लौकिक मिळविला आहे. जपानच्या सामाजिक शिस्तीमुळें इतर राष्ट्रांना भीति वाटते. मनांत घेतल्यास हे लोक काय घडवून आणतील त्याचा नेम नाहीं. या समाजानें नवीन परिस्थितीशीं जमवून घेण्यांत अलौकिक लवचिकपणा व परिस्थितीची जाणीव दाखविली आहे. नवीन काळाला योग्य अशा संघटना त्यानें अल्प काळांत वाढविल्या आहेत. आणि विशेष म्हणजे हें सर्व करूनही स्वकीय संस्कृतीचें स्वत्व आणि सत्त्व दोन्हीही राखलीं आहेत.

व्यक्ति व समाज या दृष्टीनें राष्ट्रानें कसें राहावें याचा चांगला आदर्श जपाननें जगापुढें ठेविला आहे. या बाबतींत जपाननें स्वतःचेंच अनुकरण केलेलें असल्यामुळें त्याचें श्रेय जपानलाच दिलें पाहिजे. इतर समाजाशीं किंवा राष्ट्राशीं कसें वागावें याचा आदर्श जपाननें साम्राज्यवादी राष्ट्रांपासून उचलला, त्याबाबत श्रेयाचा किंवा दोषाचा वाटा असेल तर तो गुरू आणि शिष्य या दोघांत सारखा वांटून देणें जरूर आहे. "प्राप्तीचा अर्धा वांटा" गोष्ट सर्वपरिचित आहेच ! दोघांनाही फडके !

**शेवटीं 'आपला आपण'** —

आशियावाद, श्वेत-श्वेतेतर समता इत्यादि अनेक ध्येयविचार जपानांत प्रचलित असले तरी इतर राष्ट्रांनीं जपानवर फारसें अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं. शेवटीं ज्याचा तो. परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकरितां आम्हीं मदतीस येऊं असा विचार सामान्य जनतेमध्यें फार आहे ही त्यांच्या

जपानजवळ जपानचा ध्येयवाद आहे पण तो इतर राष्ट्रांना रुजू नाहीं. जपानिझम्, जपानत्व, म्हणून कांहीं विशिष्ट ध्येयप्रणाली आहे. पण जपानाबाहेर इतर राष्ट्रांना आपलेपणा वाटण्याइतका व्यापकपणा तिच्यांत नाहीं.

**जगाच्या दृष्टीनें महत्त्व—**

जगाच्या दृष्टीनें विचार करितां मानवी इतिहासांतील एक पान जपाननें नवीन सुरूं केलें. जागतिक शांततेच्या मार्गांत श्वेत-श्वेतेतर समता हा महत्त्वाचा टप्पा आहे, त्या टप्प्यापर्यंत इतिहासाला जपाननें आणलें आहे. फरान्सच्या राज्यक्रांतीनें राष्ट्रांतर्गत समानतेचें बीज पेरलें; रशियन राज्यक्रांतीनें समाजांतर्गत वर्गसमानतेचें तत्त्व स्थापन केलें; जपाननें श्वेत-श्वेतेतर वर्णांच्या समानतेच्या हक्काची घोषणा केली. या दृष्टीनें जपानचें स्थानही मानवी इतिहासांत महत्त्वाचें आहे.

**आदर्श नाहीं, पण असामान्य—**

जपान, आशिया आणि जग-या तिन्ही भूमिकेवरून जपानच्या कार्याची पाहाणी केली तरी तिच्यांत गुणदोषांचें समान मिश्रण सांपडतें. जगांतील इतर कोणत्याही राष्ट्रांपेक्षां जपान अधिक दोषी नाहीं किंवा अधिक दोषातीतही नाहीं. पण एवढी गोष्ट सर्वमान्य होईल कीं जपान कांहीं सामान्य राष्ट्र नाहीं. असामान्य राष्ट्रांपैकीं एक आहे.

तुलनेच्या दृष्टीनें जपानचें पारडें थोडें अधिक जड करावयाचें झाल्यास या आंतरराष्ट्रीय तुलनेला अंतरराष्ट्रीय गुणदोषविचाराची जोड देतां येईल. राष्ट्रांतील समाज या दृष्टीनें विचार केल्यास जपानविषयीं पक्षपात वाटण्यासारखे अनेक गुण त्याचेजवळ आहेत.

**अनुकरणीय व्यक्ति व समाज—**

राष्ट्र या दृष्टीनें एकांतिक स्वरूपाचा विचार करितां जपानमध्यें अनेक स्पृहणीय व अनुकरणीय अशा गोष्टी आहेत. पाश्चात्य आणि पौर्वात्य लोकांना या गुणांमुळेंच जपान प्रिय वाटतो. त्याचें परराष्ट्रीय राजकारण

पसंत नसणाऱ्या लोकांनाही व्यक्ति या दृष्टीनें जपानी लोक आदरणीय वाटतात, आणि समाज या दृष्टीनें त्याचेविषयीं कौतुक वाटतें.

वैयक्तिक गुणांची जोपासना जपानमध्यें अनेक वर्षे अत्यंत काळजीपूर्वक केल्यासारखी वाटते. जपानी स्वभावांतील प्रामाणिकपणा, सौजन्य, कष्टाळूपणा, सेवातत्परता, देशप्रेम, सूक्ष्म अभिरुचि, सहिष्णुता, स्वच्छता, द्रव्यनिरभिलाष आणि साधेपणांतील रुबाब, या सर्व गुणांचा समुच्चय जगांतील कोणत्याच देशांत सांपडणार नाहीं. या म्हणण्यांत कांहीं अतिशयोक्ति नाहीं. पाश्चिमात्य लोकही या विधानाला अनुमति देतील.

सामाजिक गुण या दृष्टीनेंही जपाननें चांगला लौकिक मिळविला आहे. जपानच्या सामाजिक शिस्तीमुळें इतर राष्ट्रांना भीति वाटते. मनांत घेतल्यास हे लोक काय घडवून आणतील त्याचा नेम नाहीं. या समाजानें नवीन परिस्थितीशीं जमवून घेण्यांत अलौकिक लवचिकपणा व परिस्थितीची जाणीव दाखविली आहे. नवीन काळाला योग्य अशा संघटना त्यानें अल्प काळांत वाढविल्या आहेत. आणि विशेष म्हणजे हें सर्व करूनही स्वकीय संस्कृतीचें स्वत्व आणि सत्त्व दोन्हीही राखलीं आहेत.

व्यक्ति व समाज या दृष्टीनें राष्ट्रानें कसें राहावें याचा चांगला आदर्श जपाननें जगापुढें ठेविला आहे. या बाबतींत जपाननें स्वतःचेंच अनुकरण केलेलें असल्यामुळें त्याचें श्रेय जपानलाच दिलें पाहिजे. इतर समाजाशीं किंवा राष्ट्राशीं कसें वागावें याचा आदर्श जपाननें साम्राज्यवादी राष्ट्रांपासून उचलला, त्याबाबत श्रेयाचा किंवा दोषाचा वाटा असेल तर तो गुरू आणि शिष्य या दोघांत सारखा वांटून देणें जरूर आहे. "प्राप्तीचा अर्धा वांटा" गोष्ट सर्वपरिचित आहेच! दोघांनाही फडके!

**शेवटीं 'आपला आपण' —**

आशियावाद, श्वेत-श्वेतेतर समता इत्यादि अनेक ध्येयविचार जपानांत प्रचलित असले तरी इतर राष्ट्रांनीं जपानवर फारसें अवलंबून राहण्यांत अर्थ नाहीं. शेवटीं ज्याचा तो. परतंत्र राष्ट्रांच्या स्वातंत्र्याकरितां आम्हीं मदतीस येऊं असा विचार सामान्य जनतेमध्यें फार आहे ही त्यांच्या

सदिच्छेची निदर्शक अशी गोष्ट आहे. जपानमध्यें फिरणाऱ्या हिंदी प्रवाश्याला या प्रामाणिक सद्बुद्धीचा अनेकवार अनुभव येतो व त्यामुळें आनंदही वाटतो. परंतु प्रत्यक्ष कठोर राजकारणाच्या क्षेत्रांत या सद्विचारांचा किती उपयोग होईल तें संशयास्पद आहे. इतर राष्ट्रांचे स्वातंत्र्यास जपानचा उपयोग होणें कठीण आहे. तसा उपयोग होऊन स्वातंत्र्य मिळालें तरी त्या स्वातंत्र्याबरोबर जपानचींही कांहीं बंधनें येतील. शिवाय इतरांनीं मिळवून दिलेलें हें स्वातंत्र्य किती टिकेल याचीही शंकाच आहे.

हिंदुस्थानला किंवा इतर एकाद्या आशियास्थ राष्ट्राला स्वातंत्र्य-संपादनाचे कामीं मदत करावी अशी आज भाषा आहे. पण उद्यां त्वयार्धं मयार्धं असा डाव रचून श्वेत राष्ट्रांनीं जपानशीं सख्य केल्यास, कदाचित् मग आशियावाद आणि श्वेतेतरांचें स्वातंत्र्य इत्यादि व्यापक व उदार कल्पना विरघळून जाण्याचीही शक्यता आहे. निम्मा आशिया जपानला आणि निम्मा श्वेत राष्ट्रांना असा तहनामा जपान आणि पाश्चिमात्य राष्ट्रें यांच्यांत झाला तर या आनंदोत्सवानिमित्त आशियाच्या लहानमोठ्या सर्व राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची 'सुकीयाकी' होऊन जाईल ! (सुकीयाकी हें जपानी मांसान्न शेगडीवर ताजें ताजें भाजून खातात, व ती विशेष मेजवानी समजली जाते).

तस्मात् स्वावलंबन हाच शेवटीं प्रत्येक राष्ट्राचा मार्ग आहे. इतर राष्ट्रांचें कौतुक करावें, त्यांचे चांगले गुण घ्यावेत, पण शेवटीं, 'आपला आपण' हें ध्यानांत ठेवून वागावें.

* * *

१८

# हिंदुस्थानचा भावी मार्ग

**हिंदुस्थान व जपान, खाण एकच—**

जपानचा गेल्या पाऊणशें वर्षांतील इतिहास एकाद्या कादंबरीप्रमाणें वाटतो. आजच्या जपानचें वर्णन वाचून अरेबियन नाईट्स्‌ची आठवण होते.

याच गोष्टी हिंदुस्थानांतही अशक्य नाहींत. जपानी लोक कांहीं आभाळांतून पडले नाहींत. जपान किंवा हिंदुस्थान, दोघांची खाण एकच आहे. आजपर्यंत हिंदुस्थानपासूनच जपाननें अनेक गोष्टी घेतल्या आणि त्या वाढीला लावल्या. अलीकडच्या शतकांत त्यांनीं गुरु बदलला इतकेंच. ज्या संस्कृतीवर जपान जिवंत राहिला ती संस्कृति आपल्या घरांत आहे. ज्या संस्कृतीच्या साहाय्यानें त्यानें राष्ट्रीय सामर्थ्य मिळविलें ती संस्कृति आपल्या आटोक्यांत आहे. जाऊन आणली पाहिजे. इंग्लिश लोकांनीं पाश्चिमात्य संस्कृति अंशतः येथें आणली; पण तो अंश त्यांनीं अशा स्वरूपाचा आणला कीं त्यामळें सामर्थ्यवृद्धि न होतां शक्तिपात मात्र झाला. सामर्थ्य देणारा अंश कोणी आपण होऊन आपल्या घरीं आणणार नाहीं. मूळ उगमस्थानीं जाऊन तेथून तो आपणच आणला पाहिजे.

पाश्चिमात्य संस्कृतीपैकीं सामर्थ्य देणाऱ्याही कांहीं गोष्टी येथें आहेत

पण त्यांची बैठक जरा चुकीची आहे. कच्च्या मालाचा पक्का माल करणारीं यंत्रें येथें आहेत, पण यंत्रांचें अखेरचें तोंड येथें आहे. तयार माल बाहेर टाकणारें तोंड येथें आहे, कच्चीं द्रव्यें यंत्रांत घालण्याचें तोंड यूरोपांत आहे! तेंही येथेंच पाहिजे. देशाच्या संरक्षणाला लागणाऱ्या तोफा व बंदुकाही येथें आहेत, पण—त्यांचीं तोंडें आपल्याकडे वळून पाहतात, तीं जरा उलट झालीं पाहिजेत. त्यांनीं आपल्याकडे पाठ फिरविली तरी चालेल. सारांश आर्थिक आणि राजकीय सामर्थ्य देणाऱ्याही गोष्टी आपणांस उपलब्ध करून घेतल्या पाहिजेत. तसें करणें अगदीं शक्य आहे.

**पारतंत्र्याचें तुणतुणें पुरे—**

स्वतंत्रता नाहीं म्हणून कांहीं करितां येत नाहीं हें पालुपद आतां पुरें झालें. या मनोवृत्तीमुळें देशांत दुबळेपणा व कर्तृत्वहीनता येते. सगळेच असें म्हणूं लागले म्हणजे निराशेचें वातावरण मात्र निर्माण होतें. स्वातंत्र्याच्या आघाडीवर असलेल्या कार्यमग्न वीरांनीं पारतंत्र्याच्या सबबी सांगितल्या तर त्या क्षम्य आहेत. बिचारे स्वातंत्र्याकरितां एकीकडे धडपड करून कार्य करीत असतां बोलतात; पण राजकीय क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत वावरणारांनीं हा निराशेचा वेदांत सांगून शैथिल्यानें काम करावें हें केवळ आळसाचें आणि बुद्धिमांद्याचें लक्षण आहे. पारतंत्र्य आहे ही गोष्ट मान्य आहे. पण विद्यमान आणि उपलब्ध परिस्थितींत आपणांस यथाशक्य असें काय करितां येईल याचा किती लोक विचार करितात?

जपान स्वतंत्र आहे म्हणून त्यानें इतकी प्रगति केली असें म्हणणें भ्रामकपणाचें आहे. राजकीय स्वातंत्र्याचा प्रत्यक्ष संबंध नसलेल्या अशा हजारों गोष्टी आहेत. त्या जपाननें केल्या, आपणांसही करितां येतील. पारतंत्र्य पूर्वींच्या आळसाची आणि बुद्धिशैथिल्याची शिक्षा आहे. तेच दुर्गुण आज समाजांत असले तर दीर्घकालीन पारतंत्र्याच्या रूपानें पुढेंही तीच शिक्षा भोगावी लागेल! ज्या दुष्ट गुणांमुळें पारतंत्र्य आलें, ते नष्ट झाल्याशिवाय स्वातंत्र्य येणार नाहीं, आलें तरी टिकणार नाहीं.

**स्वातंत्र्यांतील गैरसोयी—**

जपानसारख्या स्वतंत्र देशाला तरी कमी अडचणी आहेत का ? सबबीच सांगायच्या झाल्या तर त्यालाही पुष्कळ सबबी आहेत. देशांत कच्चा माल नाहीं, हजारों मैलांवरून आणावा लागतो. दोन शतकांनीं पुढें गेलेल्या श्वेत राष्ट्रांशीं स्पर्धा करणें कांहीं सोपी गोष्ट नाहीं. प्रतिस्पर्धी प्रबळ आहेत. अंतस्थ अडचणीही ज्या आपल्या देशांत आहेत, अगदीं त्याच जपानमध्येंही होत्या. पण या सर्वांतून जपाननें मार्ग काढला. पुष्कळ बाबतींत सरकारचें साहाय्य नसतांनाही समाजानें आपल्या योजनाचातुर्यानें आणि दूरदृष्टीनें आपली प्रगति करून घेतलेली आहे. अनुकूल व सहानुभूतीचें सरकार असल्यानें काम सोपें झालें इतकेंच. जपानी समाजाला स्वातंत्र्यांत जी गोष्ट पूर्णत्वें शक्य झाली, ती पारतंत्र्यामुळें आपणांला अंशतः सिद्ध होईल इतकेंच. तो अंश पदरांत पाडून घेण्याचा यथाशक्य प्रयत्न आपण करीत नाहीं. तो केला पाहिजे.

**पारतंत्र्याचा मोबदला द्या—**

पारतंत्र्य आहे म्हणून सबबी न सांगतां त्या पारतंत्र्याची जरूर ती शिक्षा भोगून बाकीच्या गोष्टी आपण साध्य करून घेतल्या पाहिजेत. सध्यांचें पारतंत्र्य हें मुख्यतः आर्थिक स्वरूपाचें आहे. पारतंत्र्याचा आर्थिक मोबदला देण्याकरितां समाजांतील प्रत्येक व्यक्तीनें जादा श्रम घेतलेच पाहिजेत. तसें झालें तर पारतंत्र्यांतही समाजाची प्रगति होऊन तो स्वातंत्र्याला पात्र होईल. पारतंत्र्याची शिक्षा म्हणून प्रत्येक व्यक्तीनें अधिक वेळ काम करण्यास तयार असलें पाहिजे; वेतन कमी घेण्याची तयारी पाहिजे; कमी फायदा घेऊन समाधान मानलें पाहिजे; सुखविलास कमी केले पाहिजेत. हा मोबदला दिल्यास परतंत्र देशाचीही प्रगति झपाट्यानें होईल. कामाचे तास, वेतन, फायदा, सुखविलास, व्यक्तिस्वातंत्र्य, इत्यादि बाबतींत स्वतंत्र देशाप्रमाणें सर्व सुखें आपण भोगूं शकूं ही समजूत चुकीची आहे. जगांत प्रत्येक गोष्टीचा मोबदला कोणत्या तरी स्वरूपांत द्यावा लागतो. आपण तो काय स्वरूपांत द्यावा याचा प्रत्येकानें विचार करावा.

**व्यापक राजकारणाची भूमिका घ्या—**

आपल्या राजकारणांत व्यापक दूरदृष्टि आली पाहिजे. या दृष्टीच्या अभावीं पायाखालची स्वातंत्र्यवाळू जाईपर्यंत आपल्या लक्षांतही ती गोष्ट आली नाहीं. गोरे व्यापारी येथें येऊन व्यापार, धर्मप्रसार आणि राज्य करूं लागले तरी त्यांच्याविषयीं येथें अज्ञान होतें. दिल्ली-पुण्याचें राजकारण खेळविणारांना पश्चिम यूरोपांत आणि अतिपूर्व आशियांत काय घटना चालली आहे व तिचे आपल्या देशावर काय परिणाम होणार आहेत याची दखल नव्हती. त्या अवधींत जगामध्यें साम्राज्यें उभारलीं गेलीं; हिंदुस्थानांत उभीं साम्राज्यें कलंडलीं. यापुढें तरी अशी चूक होऊं नये.

जगाच्या राजकारणाचा हिंदुस्थानवर परिणाम होणार आहे म्हणून तिकडे लक्ष दिलें पाहिजे. केवळ कुतूहलाकरितां नव्हे. महायुद्धांत जर्मनी विजयी झाला असता तर, जर्मनींत रशियाप्रमाणें कम्यूनिस्ट क्रांति होण्याची शक्यता होती, ती सफल झाली असती तर, चीन जपानचे ताब्यांत गेला तर, जपानचा पराभव होऊन तो गोऱ्या लोकांचे तंत्राखालीं गेला तर—तर हिंदुस्थानच्याही राजकारणावर त्याचा फार मोठा परिणाम झाला असता व होईल.

म्हणून आज केवळ इंग्लंड व हिंदुस्थान या भाषेंत विचार न करितां जगांत हिंदुस्थान, आशियांत हिंदुस्थान, अतिपूर्व राजकारणांतील हिंदुस्थान—इत्यादि दृष्टींनीं विचार केला पाहिजे. रक्त नासलें म्हणजे शरीरावर कोठेंही गळवें होऊं लागतात. देश दुर्बल असला म्हणजे सर्व दिशांनीं आपत्ती येतात. त्याकरितां राजकारणाचा विचारही सर्वतोमुखी व सर्वतोदृष्टी पाहिजे. इंग्लंडचें नियंत्रण आज उद्यां जाईल, पण त्याबरोबरच इतर कोणाचें येणार आहे कीं काय तें पाहिलें पाहिजे. स्वतंत्र पण दुर्बल अशा चीनवर इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान, इत्यादि सर्वांचा डोळा आहे. तसाच हिंदुस्थानवर नसेल कशावरून ? आज ब्रिटिश साम्राज्यावर इटली, जर्मनी, जपान, रशिया वगैरे सर्वांचा डोळा आहे. या साम्राज्यांतील वसाहती मिळाल्या तर त्यांना पाहिजे आहेत. उद्यां इंग्लंडवरच पाळी आली तर हिंदुस्थानचें उदक एकाद्या राष्ट्राच्या हातावर पडण्याची शक्यता नाहीं असें मात्र समजूं नये. कल्पनेपेक्षां सत्यसृष्टींतच चमत्कार जास्त होतात.

**शेजाऱ्याविषयीं अज्ञान—**

व्यापक राजकारणाच्या विचाराला जें सार्वांगिक ज्ञान लागतें त्याचा आपल्या समाजांत अभाव आहे. चीन-जपान व श्वेत राष्ट्रें यांचा गेलीं शेंदीडशें वर्षें अतिपूर्व आशियांत झगडा चालला आहे. पण त्याविषयीं आपल्याकडील सुशिक्षितांचेंही अज्ञान अगदीं केविलवाणें आहे. एकाद्या पदवीधराला इंग्लंडच्या सनावळी, वंशावळी आणि राजाराण्यांचीं नांवें मुखोद्गत असतील; पण अगदीं शेजारींच असलेल्या चिनीजपानी संस्कृतींविषयीं पूर्ण अज्ञान असेल. चीन-जपानांत बौद्ध धर्म आहे एवढी माहिती पुष्कळांना असेल असें प्रथम वाटतें. पण पदवीधर सुशिक्षितही "बौद्ध लोक म्हणजे जैन काय?" असें विचारतात तेव्हां मात्र पूर्ण निराशा होते.

एका काळीं पूर्वेकडे सयाम, ब्रह्मदेश, दक्षिणेकडे विषुववृत्ताच्याही खालीं जावा-बाली इत्यादि प्रांतापर्यंत हिंदु संस्कृति पोंचली होती. हे प्रांत म्हणजे हिंदुस्थानच्या सांस्कृतिक वसाहती होत्या. पण आज या गोष्टींची आपणांस स्मृतिही राहिलेली नाहीं. या प्रांतांशीं आपण संबंधही ठेवीत नाहीं. श्रीमंताच्या आळशी मुलाला आपल्या बापानें मागें ठेवलेल्या संपत्तीचीही माहिती नसावी तशी आपली स्थिति झाली आहे.

**संकुचित वृत्ति सोडा—**

ऐपतदारांनाही प्रवासाची व निरीक्षणाची हौस नाहीं. हौस आहे त्यांना ऐपत नाहीं. दूरदूरच्या प्रदेशांत जाऊन तेथील माहिती आपल्या लोकांकरितां आणावी, हिंदुस्थानची माहिती तेथें न्यावी, अशी प्रथा फार कमी प्रमाणांत आहे. ठराविक कांहीं देशांत कांहीं लोक जातात. नवीन प्रांत शोधून तेथें जावें आणि आपल्या लोकांना काय वाव आहे तें पाहावें अशी वृत्ति आवश्यक आहे.

हिंदी व्यापारी कांहीं ठिकाणीं स्थाईक झाले आहेत, नाहीं असें नाहीं. पण त्यांची दृष्टि किती संकुचित असते. टक्क्यापेक्षां पलीकडे त्यांची नजर नाहीं. स्थानिक संस्कृतीची व राजकारणाची खोल माहिती नाहीं. गोरे व्यापारी आले आणि राज्य मिळवून बसले. आज व्यापारी म्हणजे देशाचे

अनधिकृत वकील समजले जातात. पण ही दृष्टि आपल्या व्यापाऱ्यांत नाहीं. हिंदुस्थानचे आपण प्रतिनिधि आहोंत ही जाणीव त्यांना नाहीं.

कार्य करणारांचाही असाच अनुभव आहे.

**विकतचें शत्रुत्व नको—**

ज्या ज्या राष्ट्रांचा हिंदुस्थानशीं संबंध येतो किंवा येईल, त्या त्या राष्ट्रांच्या राजकारणाकडे मार्मिकपणें पाहिलें पाहिजे. उतावीळपणानें अमुक राष्ट्र आपला मित्र किंवा अमूक आपला शत्रू असें म्हणून भावी राजकारणाला मर्यादा घालून ठेवूं नये. जागतिक राजकारणांत कोण केव्हां मित्र आणि शत्रू होतात तें सांगतां येत नाहीं. रशिया व इंग्लंड दोस्त होतील असें एका पिढीपूर्वी वाटलें होतें काय ? इतर राष्ट्रांकरितां उसनें शत्रुत्व किंवा मित्रत्व हिंदुस्थाननें घेऊं नये. इंग्लंडचे शत्रू-मित्र किंवा चीनचे शत्रू-मित्र तेच आमचेही शत्रू-मित्र असें मानण्याचें कारण नाहीं. ही राजकारणांत मोठी चक होईल. परस्परांचें शत्रुत्व करणारीं दोनही राष्ट्रें आपले मित्र असूं शकतील. तरी राजकीय शत्रुत्व-मित्रत्व अधिक खोल विचार करून बांधलें पाहिजे. त्याकरितां आपण आशियाच्या व जगाच्या राजकारणाचा मार्मिक अभ्यास केला पाहिजे.

सध्यां शाळा-कॉलेजांतून फक्त इंग्लंड व हिंदुस्थान यांचा इतिहास शिकविण्यांत येतो. त्यांत अतिपूर्व व आशिया यांच्या इतिहासाची भर घालणें जरूर आहे.

**देशाचें संरक्षण—**

जगाचें आजचें राजकारण व वातावरण पाहिल्याबरोबर मनांत पहिला प्रश्न येतो तो आत्मसंरक्षणाचा. हिंदुस्थान आपलें संरक्षण करण्यास समर्थ आहे काय ? बदलत्या राजकीय परिस्थितींतून कोणचें, कोठून, कसें परचक्र येईल त्याचा नेम नाहीं. विमानविद्येच्या प्रगतीमुळें हजारों मैलांवरूनही हल्ला करितां येतो. अमेरिकेला जपानची आणि जपानला अमेरिकेची भीति वाटतेच कीं नाहीं ? दोघांचेमध्यें तर सहासात हजार मैलांचा महासागर आहे.

राजकर्त्यांनीं आम्हांस १८५७ पासून निःशस्त्र केलें आहे, त्यानंतर लष्करी शिक्षण दिलें नाहीं. त्यामुळें देशसंरक्षणाची जबाबदारी आमच्यावर नाहीं असा एक विचार येणें साहजिक आहे. प्रश्न असा आहे कीं परकीय राज्यकर्त्यांनीं संरक्षणाचें शिक्षण दिलें नाहीं या सबबीवर आपण आणखी एखाद्या राष्ट्राचे गुलाम होणार कीं काय ?

शस्त्रें मिळण्याची वेळ आली तर त्यापूर्वींची तयारी आहे काय ? बंदुकीचें वजन पेलतील अशीं किती मनगटें तयार झालीं आहेत ? प्रतिस्पर्धी मारायला आला तर प्रतिकार करण्याकरितां किती मनें तयार आहेत ? नेमबाजी सहज साध्य करतील असे किती डोळे तयार झाले आहेत ? किती अंतःकरणांत क्षात्रवृत्ति बाणलेली आहे ? देशाचें संरक्षण आपणच केलें पाहिजे अशी जाणीव किती नागरिकांत आहे ? रणक्षेत्रांतील धकाधकी आणि शारीरिक कष्ट करण्याची संवय किती तरुणांना आहे ?

तरुणांचें शिक्षण ज्यांचे हातांत आहे त्यांनीं याचा विचार केला पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणाच्या योजनेंत देशाचे संरक्षणाचा विचार प्रत्येक देशांत प्रथम केला जातो. ज्या मर्यादेपर्यंत लष्करी शिक्षण देण्याची शक्यता आहे त्या मर्यादेपर्यंत आपण जात नाहीं. उपलब्ध संधीचा फायदा घेत नाहीं.

**पूर्वतयारी ठेवा, वेळ येईल—**

लष्करी संरक्षणाचें प्रत्यक्ष शिक्षण देण्याची शक्यता नसली तरी संरक्षणाची मानसिक व शारीरिक तयारी करितां येणें शक्य आहे. मनावर व शरीरावर अवलंबून जो भाग आहे तो पुरा करून ठेवावा. साहित्यसाधनांचा भाग परिस्थिति पुरा करील. १९३३ मध्यें जर्मनींत पुनर्घटनेला प्रारंभ झाला तेव्हां तो निःशस्त्रच होता. हिटलरनें सर्व तरुणांवर फक्त खाकी कपडे चढविले, त्यांना कवायत शिकविली आणि राष्ट्रसंरक्षणशास्त्राचे धडे दिले. दोन वर्षांनीं त्यानें जाहीर केलें कीं जर्मनींत सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू होईल. युरोपियन राष्ट्रांची हिटलरला विरोध करण्याची छाती झाली नाहीं. कां ?

जपानमध्यें मुलांच्या शाळेंत कुस्ती व द्वंद्वयुद्ध, आणि मुलींच्या शाळेंत तिरंदाजी व भाला हे खेळ शिकविले जातात. लष्करी शिक्षणाच्या संस्थेंतही कुस्ती आणि द्वंद्वयुद्ध (फेन्सिग) हे विषय शिकविले जातात. लष्करी अधिकाऱ्यांना माहीत आहे कीं आजची लढाई म्हणजे कांहीं कुस्ती आणि तलवारीची नाहीं. पण लढाईला लागणारी वीरवृत्ति या खेळांमुळें निर्माण होते म्हणून ते लष्करी शिक्षणसंस्थेंतही आवश्यक आहेत.

लाठी, तलवार, भाला, जंबिया, कुस्ती, तिरंदाजी, अश्वारोहण, कवायत या विषयांत वीरवृत्ति आहे. वीरवृत्तीचा देशसंरक्षणांत उपयोग आहे. या दृष्टीनें उपलब्ध असलेल्या सर्व जुन्या नव्या साधनांचा उपयोग करून घेतला पाहिजे. 'यांत काय आहे, त्यांत काय आहे' अशी उपहासाची व उदासीनतेची वृत्ति सोडणें जरूर आहे.

**औद्योगिक संघटना**—

औद्योगिक प्रगति देशांत व्हावयास पाहिजे असेल तर समाजाच्या हातांत असलेल्या सर्व गोष्टी आधीं लोकांनीं केल्या पाहिजेत. सरकारी आश्रय या देशांत नाहीं असें गृहीत धरून त्याव्यतिरिक्त इतर काय शक्य आहे त्याचा विचार करावा. स्वतंत्र देशांत औद्योगिक प्रगति तीन कारणांमुळें झालेली आहे. सरकारी संरक्षण, औद्योगिक संघटना आणि स्वदेशीची भावना. या तीन गोष्टींपैकीं पहिली आपल्या हातांत नाहीं, दुसऱ्या दोन आहेत.

औद्योगिक संघटनेचें स्वरूप जपानसारख्या देशांत कसें आहे याचा अभ्यास करणें जरूर आहे. संघटनेचीं अनेक अंगें आहेत. सध्यांचा काल वैयक्तिक कर्तबगारीचा राहिलेला नाहीं, संघटित प्रयत्नांचा झाला आहे. हिंदी उद्योगधंद्यांना ज्यांच्याशीं स्पर्धा करावयाची आहे त्या उद्योगधंद्यांचे मागें त्यांचा सर्व देश आहे. त्या मानानें आपल्या उद्योगांचे पाठीशीं निदान आपली संघटना तरी पाहिजे. गिऱ्हाईक, कामगार, मालक, संशोधक, व्यापारी, इत्यादि औद्योगिक घटक आहेत. त्यांच्या स्वतंत्र व सहकारी अशा संघटना आवश्यक आहेत.

**एकतर्फी स्वदेशी नको, सर्वतर्फी पाहिजे—**

स्वदेशीची भावना हा व्यापक शब्दप्रयोग आहे. स्वदेशीची भावना केवळ गिऱ्हाइकालाच असून उपयोगी नाहीं. त्याचा कटु अनुभव आजपर्यंत आला. कारखानदार आणि व्यापारी यांचे अंतःकरणांतही स्वदेशीची भावना नसेल तर गिऱ्हाइकानें स्वार्थत्याग करून कांहीं उपयोग नाहीं. कामगारांच्या ठिकाणींही ती भावना जरूर आहे. आपल्या उद्योगधंद्यांचे मागें सरकार नाहीं तोंपर्यंत कारखानदार, व्यापारी, कामगार व गिऱ्हाईक या सर्वांनाच थोडथोडा स्वार्थत्याग करावा लागेल. कारखानदारांच्या नफेबाजीला आळा बसला पाहिजे, व्यापाऱ्यांनीं प्रामाणिक व्यवहार केला पाहिजे. कामगारांनीं सचोटीनें व अधिक काम केलें पाहिजे. आणि गिऱ्हाइकानें थोडी अधिक किंमत दिली पाहिजे. ही गोष्ट इच्छेवर न राहतां सक्तीनें घडून येईल अशी मोठी सामाजिक सत्ता अथवा संघटना आवश्यक आहे.

**' राष्ट्रीय औद्योगिक पुनर्घटना मंडळ '—**

उद्योगधंदे आणि व्यापार यांची विचारयोजना संकुचित दृष्टीच्या लोकांकडून न होतां व्यापक दृष्टीच्या बहुविध तज्ज्ञांकडून व्हावी. औद्योगिक क्षेत्रांत विचार व काम करणारे घटक म्हणजे कारखानदार, व्यापारी, कामगार, शास्त्रीय संशोधक, अर्थशास्त्रज्ञ, व भांडवलदार—अशा सर्वांच्या व्यापक संघटना ठिकठिकाणीं मोठ्या प्रमाणावर पाहिजेत. या सर्वांचें सहकार्य होईल तरच औद्योगिक प्रगति होऊं शकेल. यांचें सहकार्य झालें नाहीं तर आधुनिक पद्धतीचे उद्योगधंदे या देशांत निघणें शक्य नाहीं. सरकारी मदत नाहीं आणि समाजाची स्वतःची संघटनाही नाहीं असा देश संघटित आणि राजाश्रित उद्योगधंद्यांची बरोबरी कशी करूं शकेल ?

विद्यापीठांत आणि शिक्षणसंस्थांत असलेल्या अर्थशास्त्रज्ञांचा आणि शास्त्रज्ञांचा औद्योगिक जगाशीं अधिक संबंध आला पाहिजे. त्यांनीं या पुनर्घटनेंत उत्साहानें भाग घेतला पाहिजे. दूरदृष्टीच्या योजना आणि शास्त्रीय सुधारणा करण्याचे कामीं त्यांचा उपयोग होईल. आज तो होत नाहीं यांत देशाचें नुकसान आहे. त्यांचा उपयोग करून घेतां येईल अशी संघटना नाहीं.

वर सूचना केली आहे त्याप्रमाणें ‘ राष्ट्रीय औद्योगिक पुनर्घटना मंडळ ’ स्थापन झालें तर तें मालक, कामगार, गिऱ्हाईक आणि राष्ट्र अशा सर्व दृष्टींनीं विचार करील. नफ्याचें प्रमाण, कामाचे तास, कामगारांचें वेतन, देशांत शक्य व उपलब्ध असे धंदे, द्रव्यांची आयात-निर्यात, परदेशांशीं व्यापारी संबंध इत्यादि अनेक प्रश्नांचा हें मंडळ अधिकारी वृत्तीनें विचार करील. अनेक कारखानदार, भांडवलदार व शास्त्रज्ञ या संघटनेंत असल्यामुळें द्रव्यांचें संशोधन, औद्योगिक शास्त्रीय प्रयोगशाळा, कामगारांचें काम व आरोग्य यासंबंधीं संशोधन, इत्यादि गोष्टींची व्यवस्था तें करूं शकेल. द्रव्याच्या व मनुष्यबळाच्या अभावीं कोणताही एक कारखानदार या गोष्टी करूं शकणार नाहीं. आणि त्या झाल्याशिवाय उद्योगधंद्यांना आधुनिक स्वरूप येणार नाहीं.

राजकीय क्षेत्रांत राष्ट्रीय सभेचें काम चालतें त्याप्रमाणें आर्थिक क्षेत्रांत औद्योगिक पुनर्घटना मंडळानें काम केल्यास कालांतरानें तें प्रति-सरकारच होऊन बसेल. मग सरकारी आश्रयाचा प्रश्नच येणार नाहीं.

**औद्योगिक खात्याचा कार्यक्रम—**

हिंदी आकांक्षांना अनुकूल असें सरकार स्थापन झालेंच तर त्यालाही अनेक गोष्टी करितां येतील. प्रत्येक प्रांतांतील “ उद्योग व कामगार खातें ” (मिनिस्ट्री ऑफ् इंडस्ट्री अँड लेबर) कर्तृत्ववान अशा प्रधानाच्या तंत्राखालीं असल्यास अनेक उपक्रम करितां येतील. जपानचा औद्योगिक इतिहास या दृष्टीनें फार सूचक आहे. कारण इतक्या थोड्या अवधींत दुसऱ्या कोणत्याच देशानें उद्योगक्षेत्रांत आघाडी मारलेली नाहीं.

औद्योगिक खात्यानें स्वतः कांहीं उद्योगधंदे सुरू करून ते यशस्वी रीतीनें चालू लागले कीं हप्तेबंदीनें समाजाला विकावेत. त्यांवर कांहीं सरकारी नियंत्रण जरूर ठेवावें. कांहीं उद्योगधंद्यांत सरकारचें निम्मेंनिम भांडवल असावें. कांहींना कराच्या वगैरे सवलती द्याव्यात. औद्योगिक शाळा व संस्था स्थापणें, बेकारी निवारणाच्या प्रश्नाचा शास्त्रीय अभ्यास करणें, यांत्रिक कामाच्या नवीन पद्धती (रॅशनलाइझेशन्) शोधून काढणें, इत्यादि गोष्टी उद्योगखात्यानें करणें आवश्यक आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... स्थळ प्रत ... क्रं. ... ता.

**परदेशीं शिक्षणाची सोय—**

वैयक्तिक महत्त्वाकांक्षा अथवा औद्योगिक कामगिरीची तळमळ वाटून परदेशांत उद्योगधंद्याचें शिक्षण घ्यावयास जाणारे शेंकडों तरुण आहेत. यांतले कांहीं जातात, कांहीं परत येतात, कांहीं येथें कामाला प्रारंभ करितात. परंतु हा सर्व प्रकार असंघटित असा चाललेला आहे. त्यामुळें लाखो रुपये दरवर्षी खर्च होतात परंतु देशी उद्योगधंद्यांना त्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं. जाणाराची लायकी, आर्थिक मदत, परदेशांत शिक्षणाची चांगली सोय, परत आल्यावर कारखानदार-भांडवलदाराशीं संबंध, व त्यानंतर जरूर असलेला परदेशाशीं संबंध—या सर्व गोष्टींवर परदेशी शिक्षणाचें यश अवलंबून आहे. सध्यां सर्व प्रयत्न वैयक्तिक लहरीप्रमाणें होत असल्यामुळें त्यांचा यथाशक्य फायदा देशाला मिळत नाहीं.

यापुढें अधिकाधिक विद्यार्थी परदेशीं जाऊन यांत्रिक, औद्योगिक व शास्त्रीय विषय शिकून येणें आवश्यक आहे. आजपर्यंत यूरोप-अमेरिकेंत विद्यार्थी जात होते. परंतु या देशांतील महागाईमुळें तिकडे जाणाऱ्यांची संख्या अगदीं मर्यादित असे. हाच ओघ जपानकडे वळविला तर त्याच खर्चांत दुप्पट किंवा तिप्पट विद्यार्थ्यांचें अधिक शिक्षण होईल. सर्व देशांतून औद्योगिक आणि शास्त्रीय विद्या जपाननें आपल्या देशांत आणली आहे. त्या कारणानें एकाच देशांत जाऊन थोड्या खर्चांत जगांत वाढलेलें ज्ञान जपानमध्यें मिळविणें शक्य झालें आहे. विद्यार्थी काटकसरीनें राहिल्यास हिंदुस्थानांत शहराचे राहणीला जितका खर्च येतो तितकाच जपानमध्यें येईल. याशिवाय भावनेच्या दृष्टीनें जो फायदा होईल तोही अधिक महत्त्वाचा आहे. आशियांतील लोक किती प्रगति करूं शकतात आणि गोऱ्या लोकांचें खरें स्थान काय आहे या गोष्टींची त्यांस जाणीव होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढेल.

**'परदेश शिक्षण नियामक मंडळ'—**

परदेशी शिक्षणाला विधायक वळण लावण्याकरितां 'परदेश शिक्षण नियामक मंडळ' स्थापन होणें जरूर आहे. या संस्थेनें योग्य विद्यार्थ्यांनाच

शिफारसपत्र द्यावें आणि असें पत्र असलेल्या तरुणालाच त्याच्या पालकानें किंवा समाजानें द्रव्याची मदत करावी. इतरांना करूं नये. पाण्यांत, खरोखरीच समुद्रांत, पैसा जाईल ! परदेशांत असलेल्या शिक्षणाच्या सोयी, शिष्यवृत्ति, उमेदवारीची सोय, अभ्यासक्रम इत्यादि सर्व माहिती या मंडळाकडे असावी. परदेशांत अनेक शिष्यवृत्त्या व निधी आहेत त्यांचेशीं संधान बांधून हिंदी विद्यार्थ्यांकरितां त्यांचा फायदा करून घेतां येईल. ही संस्था मागें असल्यानें विद्यार्थ्यालाही परदेशांत आधार वाटेल. परत आल्यानंतर अशा तरुणाला योग्य कारखानदार किंवा भांडवलदार पाहून देण्याचें कामही या संस्थेनें करावें.

जपाननें आपल्या परदेशी शिक्षणाचा पाया अगदीं पद्धतशीर घातला म्हणून त्याला आज हे दिवस आले. त्याच मार्गानें ते आपणांसही येतील.

**जगभर पसरा—**

हिंदी लोक सर्व जगाच्या कोनाकोपऱ्यांत पसरले पाहिजेत. परप्रांतांत हिंदी मनुष्य म्हणजे त्या ठिकाणीं हिंदुस्थानच्या हिताचें रक्षण करणारा प्रतिनिधीच होय. सध्यां कांहीं ठराविक देशांतच आपले लोक जातात. त्यापेक्षांही ते दूरचे रस्ते चालून गेले पाहिजेत. पुढच्या पांचपन्नास वर्षांत वाढीला लागणाऱ्या प्रांतांत आपले लोक आजच जाऊन बसले पाहिजेत. उद्यां हिंदुस्थानचा व्यापार अधिक वाढणार आहे त्या वेळीं या लोकांचा फार उपयोग होईल. दक्षिण अमेरिका, आफ्रिका, पूर्वेकडील दक्षिण बेटें, इत्यादि ज्या ज्या ठिकाणीं जहाजें जातात त्या त्या ठिकाणीं हिंदी लोकांनीं सहकुटुंब जाऊन राहावें. आपण गेलों नाहीं तर इतर लोक जातच आहेत. सोळा-सतरा-अठराव्या शतकांत यरोपियन लोक जसे सर्वत्र पसरले तसे आज हिंदी लोक पसरावेत. अर्थात् जेथें जितका वाव असेल त्या प्रमाणांतच हें शक्य आहे. मुख्यतः मनोवृत्तीचा प्रश्न आहे. समुद्रप्रवास म्हणजे पाप आहे या कल्पनेंतून लोक नुकतेच बाहेर पडले आहेत. आतां जागतिक संचार ही पुढची नैसर्गिक पायरी आहे.

**पूर्वतयारीची शिक्षणयोजना—**

तरुण पिढीचें शिक्षणांत अशी योजना असावी कीं त्यामुळें व्यक्तीला संचारसुलभता येईल. ज्ञान, भाषा, आणि आचार या बाबतींत नवीन समाजाशीं जुळवून घेण्याची व्यक्तीची तयारी असेल तर ती जगाच्या पाठीवर वाटेल तेथें संचार करील, व घरासारखी राहील. विद्यार्थी किंवा वयस्क व्यक्ति यांची परदेशी प्रवासाचे दृष्टीनें तयारी करून घेणारी एकादी संस्था निघाली तर फार सोय होईल. असें पद्धतशीर शिक्षण मिळालें तर नवीन देशांत पाय ठेवल्याबरोबर अडचण न येतां आणि फार वेळ व पैसा खर्च न करितां माणसाला आपलें काम सुरू करितां येईल. अशा संस्थेनें व्यावहारिक व संभाषणप्रधान इंग्रजी, फ्रेंच, जपानी, स्पॅनिश्, मलायू, इत्यादि त्या त्या प्रांतांत जरूर अशी भाषा शिकवावी. उद्दिष्ट देशाचा इतिहास, समाजपद्धति, राष्ट्रीय स्वभाव, व्यापार, औद्योगिक संघटना, सामाजिक चालीरीति, शिष्टाचारपद्धति, इत्यादि गोष्टींची माहिती द्यावी. अन्नव्यवहार व पोषाखपद्धतीशीं वैयक्तिक संवयी व अभिरुचि कशा जमवून घेतां येतील तें शिकवावें. हिंदी व्यक्तीनें स्वतःच्या विशिष्ट विषयाव्यतिरिक्त नवीन देशांत हिंदुस्थानच्या दृष्टीनें काय विशेष गोष्टी पाहाव्यात त्याचें दिग्दर्शन व्हावें. आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हिंदी समाज, राजकारण, संस्कृति, परराष्ट्रीय संबंध, इत्यादि प्रश्नांवर परदेशीयांना विश्वसनीय माहिती देतां येईल इतका अभ्यास करून घ्यावा.

इतकी तयारी झाल्याशिवाय कोणींही परदेशीं जाऊं नये. वरीलप्रमाणें पूर्वतयारी झाली तर परदेशीं प्रवासांत खर्च झालेल्या प्रत्येक पैचा व्यक्तीला व देशाला उपयोग होईल.

**तरुणांना परदेशांत वाव आहे—**

धाडशी व कर्तबगार हिंदी तरुणांना आशिया खंडांतील निरनिराळ्या देशांत पसरण्याला अद्याप पुष्कळ वाव आहे. तसें करावयाचें झाल्यास त्यांना तेथें अनेक व्यवसाय करतां येण्यासारखे आहेत. त्यांपैकीं कांहीं व्यवसायांचें स्वरूप पुढील यादीवरून लक्षांत येईल.—(१) शिक्षणसंस्था काढणें किंव

शिक्षकव्यवसाय. (२) इंग्रजी वृत्तपत्रव्यवसाय व वृत्तपत्रप्रतिनिधि. (३) पौर्वात्य प्रवाश्यांना सोयीचीं अशीं शाकाहारी व मांसाहारी भोजन-निवासगृहें चालविणें. (४) पौर्वात्य प्रवाश्यांना सोयीच्या अशा प्रवाससंस्था (टूरिस्ट ब्यूरो) चालविणें. (५) अनेक भाषा जाणणारे मार्गदर्शक (गाईड). (६) परदेशीं राहणाऱ्या हिंदी व्यापाऱ्यांची कायदाविषयक कामें व आंतरराष्ट्रीय व्यापारी वकिली. (७) पौर्वात्य कलांचा अभ्यास व प्रसार; उदाहरणार्थ नृत्य, नाटच, संगीत, जानपदगीतें इत्यादि. (८) नवीन वस्तीच्या प्रदेशांत व्यापार. (९) हिंदु धर्म, वेदांत, तत्त्वज्ञान व संस्कृति यांचा मिशनऱ्यांप्रमाणें प्रचार. (१०) आशिया खंडांतील देशांत प्रवास करणाऱ्या पाश्चात्य प्रवाश्यांच्या पाश्चात्य पद्धतीनें सोयी करणें. उदाहरणार्थ, युरोपियन पद्धतीचें संगीत, पाकशास्त्र, शिवणकला, निवासालयें, इत्यादि.

हे सर्व व्यवसाय चकारींतून मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां थोडे निराळे आणि व्यावहारिक शिक्षण व अनुभव घेणाराला, आणि कष्टाची उमेदवारी करण्यास तयार असणाराला सहज करितां येतील. मात्र धाडशी, निर्भीड आणि कष्टाळू वृत्ति पाहिजे.

**सांघिक व राष्ट्रीय संस्कृति—**

हिंदुस्थान देश हा आकारानें व संस्कृतीनें एका खंडासारखा आहे. त्यांत प्रांत आणि धर्म यांना धरून अनेक संस्कृती आहेत. या सर्व संस्कृती आपापलें वैशिष्टच राखून जिवंत राहिल्या आहेत. यांचें भवितव्य काय असा प्रश्न मनापुढें उभा राहतो. या सर्व संस्कृतींतून एकादा समान धागा ओंवून त्यांना व्यष्टि आणि समष्टि अशा दोन्ही स्वरूपांत बांधून ठेवणें जरूर आहे. तशा बांधून ठेवितां आल्या तर देशभक्तीला मदत करितील; सुटच्या राहिल्या तर देश-भंगाला कारणीभूत होतील. संस्कृतींचा व्याप आणि एकजुटीचा अभाव असणारें चीनचें उदाहरण आपल्या डोळ्यापुढें आहे. उलट एकसंस्कृति व एकनिष्ठा असल्यास किती सामर्थ्य मिळतें तें जपानच्या उदाहरणावरून दिसतें.

हिंदुस्थानांत अनेक संस्कृती आहेत. त्या सर्व जिवंत राहाव्यात परंतु

कलहाला कारणीभूत होऊं नयेत. याकरितां राष्ट्रीय आणि संघीय असा भेद करणें जरूर आहे. धर्म, प्रांत, पंथ, जाति यांच्या संस्कृती या संघीय संस्कृती होत. सर्व हिंदुस्थानला समान असणारी, होणारी व व्हावयास इष्ट ती राष्ट्रीय संस्कृति. जेथें संघीय म्हणजे विशिष्ट संस्कृतिप्रधान संघाचा अथवा समाजाचा कार्यक्रम असेल तेथें संघीय आचार पाळावेत. जेथें अनेक संस्कृतींच्या अनेक संघांचा समान कार्यक्रम असेल तेथें राष्ट्रीय संस्कृतीचे आचार पाळावेत.

वस्त्र, आहार, भाषा, सभ्याचार, इत्यादि सर्व दृष्टींनीं प्रत्येक संघाचे विशिष्ट आचार आहेत तसे अखिल राष्ट्रीय आचार असावेत. ते सार्वजनिक जीवनांत पाळले जावेत. राष्ट्रीय आचार कोणते व कसे असावेत तें ठरविण्याचाही काळ आतां आला आहे. सध्यां ते घडण्याच्या स्थितींत आहेत.

हिंदी लोक आपापल्या प्रांतांतच नव्हे तर अखिल हिंदुस्थानांत, हिंदुस्थानांतच नव्हे तर सर्व जगांत वावरावयाचे आहेत, वावरले पाहिजेत, जगांत समरस झाले पाहिजेत, या दृष्टीनें आचारांची योजना झाली पाहिजे. त्या दृष्टीनें विचार करितां असें वाटतें कीं राष्ट्रीय आचारांची निश्चिति करितांना जागतिक जीवनपद्धतीला समान, किंवा त्याच्या जवळजवळ जाणारी पद्धति राष्ट्रानें स्वीकारावी.

उलट प्रत्येक संघानें आपापले आचार व संस्कृति शुद्ध आणि अविकृत स्वरूपांत ठेवण्याचा प्रयत्न करावा. सर्व संस्कृतींतून एक संस्कृति निर्माण करण्याची कल्पना अशक्य व अनिष्ट आहे. संघीय संस्कृती जगल्या पाहिजेत. विविधतेच्या दृष्टीनें त्या जरूर आहेत. परंतु त्यांना समांतर, अखिल राष्ट्राला समान, आणि जागतिक संस्कृतीला सन्निध असणारी अशी राष्ट्रीय आचारसंस्कृति निश्चित करण्याची वेळ आली आहे. त्यामुळें बाह्यतः आचारानें आणि आंतून मनानें राष्ट्राच्या एकीला मदत होऊन सामर्थ्यवृद्धि होईल.

**पौर्वात्य राहणीची पद्धति—**

संस्कृतीचा विचार करितांना राहणीच्या पद्धतीचा (स्टॅंडर्ड ऑफ

लाईफ्) विचार मनांत येतो. पाश्चिमात्य संस्कृतीच्या परिचयामुळें आमची राहणी बाटगी झाली आहे. ती धड पौर्वात्य नाहीं, धड पाश्चिमात्य नाहीं. देश गरीब असल्यामुळें ती उच्च किंवा श्रीमंतीची असूं शकत नाहीं. सुशिक्षित मनुष्यही सुसंस्कृत नसल्यानें तिच्यांत अभिरुचि दिसून येत नाहीं. ही स्थिति पालटणें जरूर आहे.

राहणी उच्च पाहिजे. पण श्रीमंतीच्या दृष्टीनें नको, अभिरुचीच्या दृष्टीनें उच्च पाहिजे. साधी अभिरुचिपूर्ण राहणी हीदेखील उच्च असूं शकेल. उलट श्रीमंती राहणी देखील अभिरुचिहीन अतएव निष्कृष्ट असूं शकेल.

शिल्पशास्त्रज्ञ आणि कलाभिज्ञ यांनीं सहकारितेनें हिंदी राहणीची पद्धति बसविली पाहिजे. थोडचा खर्चांत, चांगल्या अभिरुचीची, अंतर्बाह्य पौर्वात्य शिल्पकलेचीं अशीं घरें बांधण्याची कला वाढविणें जरूर आहे. अशा घराला शोभेल असें कमी खर्चाचें, कलापूर्ण आणि पौर्वात्य पद्धतीचें गृहसाहित्य प्रचारांत आणलें पाहिजे. अशा राहणीलाच खरोखर हिंदी उच्च राहणी म्हणतां येईल. अशी राहणी कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय नागरिक अशा सर्वांच्या आटोक्यांत पाहिजे. आपले एंजिनियर आणि कंत्राटदार यांनीं थोडा स्वतंत्र विचार केला तर ते अशी गृहशिल्पपद्धति सहज बसवितील. गृहजीवनविषयक अनेक सुंदर वस्तू आज मागें पडल्या आहेत त्यांचा पुन्हा उद्धार करून त्यांना आपल्या जीवनांत स्थान देणें जरूर आहे. याचेंच नांव सांस्कृतिक राष्ट्रीयत्व.

**प्रत्येक घरांत ' राष्ट्रकोण '—**

हिंदुस्थानच्या मागील इतिहासावरून असें दिसतें कीं समाजांतील कोणतीही भावना प्रबळ होऊन ती राष्ट्रभावनेला दडपून टाकते. वैयक्तिक स्वार्थ, सांघिक निष्ठा किंवा उदासीनता इत्यादि कारणांमुळें देशांतील राष्ट्रभावना लोपून जाते व अनर्थ ओढवतात. याकरितां उपलब्ध अशा सर्व साधनांचा उपयोग करून देशविषयक भावना आबालवृद्धांत निर्माण केली पाहिजे. या भावनेपुढें इतर निष्ठा व क्षुद्र स्वार्थ गौण ठरतील इतकी ती जोरदार व त्यागोद्दीपक असावी. अशी भावना मनांत बिंबविण्याकरितां लोकशिक्षणाच्या

सर्व साधनांचा उपयोग करून घेतला पाहिजे. शाळा, वृत्तपत्रें, रेडियो, ग्रामोफोन, बोलपट, चित्रपट या साधनांचा कसा उपयोग करून घेतां येईल त्याचा विचार व्हावा. पूर्वी रोजच्या वैयक्तिक कार्यक्रमांत धार्मिक आचाराला स्थान असे. तसें आतां राष्ट्रविषयक आचाराला दैनिक कार्यक्रमांत स्थान देणें जरूर आहे. प्रत्येक घरांत देवघर असतें त्याप्रमाणें " राष्ट्रकोण " (नॅशनल कॉर्नर) स्थापण्याची पद्धति प्रचारांत आणावी. प्रातरुत्थान, निद्रा, भोजन अशा वेळीं या पवित्र जागेपुढें मुलाबाळांनीं व वडिलांनीं प्रणाम करून आपल्या कार्यक्रमाला लागावें. वैयक्तिक व राष्ट्रीय जीवनांत प्रतीकाचें (सिंबॉल) महत्त्व फार असतें हें विसरून चालणार नाहीं.

**राजकीय वेदान्ताची निश्चिति—**

हिंदी लोक बुद्धिप्रधान असल्यामुळें त्यांचेवर बाह्य जगांतील वैचारिक-आंदोलनांचा परिणाम फार लौकर होतो. त्यामुळें अंतस्थ मतभेद उत्पन्न होऊन ऐक्यहानि होते. तसें सध्यां झालें आहे. जगांत चाललेल्या फाशिझमविरुद्ध सोशॅलिझम्‌चा वाद येथेंही सुरू झाला आहे. राष्ट्रीय धोरण या दृष्टीनें आपली निश्चित भूमिका तयार करून ती साध्य करण्याचे मार्गाला लागलें पाहिजे. कार्यप्रेमी बहुसंख्य तरुणांना काम मिळालें म्हणजे तात्त्विक वितंडवाद थांबतील परंतु बौद्धिक व भावनाविषयक समाधान करील असा राष्ट्रीय वेदान्त निश्चित झाला पाहिजे. त्याकरितां जगांतील हालचालींचें व तत्त्व-विचारांचें सूक्ष्म निरीक्षण करून हिंदुस्थानचा मार्ग ठरविला पाहिजे. आत्यंतिक स्वरूपाचे असे प्रयोग करण्याचें काम आपण समर्थ अशा युरोपियन राष्ट्रांकडे द्यावें व व्यावहारिक दृष्टीनें त्यांच्या अनुभवापासून योग्य तो निष्कर्ष काढून आपला मार्ग ठरवावा. आधींच पारतंत्र्यानें दुर्बल झालेल्या या देशाला एकादा आत्यंतिक स्वरूपाचा राजकीय प्रयोग कितपत मानवेल याची शंका आहे. प्रयोग म्हटला कीं तात्कालिक दृष्टीनें पाहतां प्राप्ति थोडी आणि खर्च फार. सामाजिक किंवा राजकीय प्रयोगाची तीच स्थिति आहे.

सध्यांचा भांडवलवाद आणि समाजवाद यांचा विचार करितां, आणि जगांत चाललेल्या प्रयोगांची फलश्रुति पाहतां, या दोहींच्या मधला मार्ग

आपणांस परवडेल असें दिसतें. ‘राष्ट्रांतर्गत मर्यादित समाजवाद’ किंवा ‘राष्ट्रीय समाजवाद’ आपण स्वीकारला तर आज राष्ट्रापुढें असलेले राष्ट्रीय, आर्थिक आणि सामाजिक प्रश्न सोडविण्याला मदत होईल.

समाजपुरुष हा सहस्रपाद असल्याकारणानें त्याची गति अगदीं सावकाश आहे. आळई एका पानावरून दुसऱ्या पानावर जातांना अगदीं सावकाश आणि मधला आधार निश्चित करीत करीत जाते, तसेंच कोणत्याही समाजाचें आहे. व्यक्तिवादावरून एकदम समाजवादावर समाज येणें कठिण आहे. तसा एकदम नेण्याचा प्रयत्न केला तर धक्के बसून नुकसान होणार. म्हणून नियंत्रित व्यक्तिवादाच्या भूमिकेवर कांहीं काळ राहून स्वामित्वाच्या कल्पनेला आळा घालीत घालीत समाजवादाच्या भूमिकेवर समाजाला आणतां येईल.

**आशियाचा नेता कोण ?—**

आशिया खंडांतील सर्व देशांचा विचार करितांना वैचारिक पुढारीपण कोणाकडे आहे असा प्रश्न पुढें येतो. आशियांतील पुढारलेलीं राष्ट्रें तीन— जपान, चीन व हिंदुस्थान. बाकीचीं राष्ट्रें उदयाला यावयाचीं आहेत. बिचाऱ्यांचा उदय लौकर होवो. पण या तीन राष्ट्रांपैकीं कोणतें राष्ट्र इतरांना व्यावहारिक मार्ग दाखवील हा प्रश्न आहे. जपाननें पाश्चिमात्य साम्राज्यवादाचा अंगीकार केल्यामुळें इतर राष्ट्रें त्याचेपासून चार हात लांबच राहतील. चीन पारतंत्र्यांत चालला आहे. हिंदुस्थान पारतंत्र्यांत आहेच. पण हिंदुस्थाननें वैचारिक जिवंतपणा कायम ठेविला आहे. विचाराच्या दृष्टीनें जगांत पहिल्या तीन चार विद्यमान विभूतींत मोडण्यासारख्या व्यक्ती हिंदुस्थानांतच आहेत. अशा हिंदुस्थानपासून आशियांतील इतर राष्ट्रांनीं मार्गदर्शकत्वाची अपेक्षा करावी असा काळ लौकरच येईल.

गेलीं दोन हजार वर्षें आशियाला आध्यात्मिक जीवन हिंदुस्थाननें दिलें. भावी काळांत तोच मान कायम ठेवण्याची जवाबदारी आजच्या पिढीकडे आहे.

* * *

# सूचि


### अ

असंतोष—राजकीय ९९
अस्पृश्य ईटा ९५, ९६

### आ

आइनू वंश २१
आर्थिक स्थिति ४९
आशिया १६८, १६९
आशियावाद १२२, २३९
आहारपद्धति (भोजनपद्धति) ४, ५, ३३, ४९, ५०, ७०

### इ

इतिहास, राजकीय २३–२५
इतिहास, सांस्कृतिक ३६–३९
इझानागी व इझानामी ३६
इमारती ५, ७१, ८७–८९
इंग्रजी भाषेचा प्रचार ६७–६९

### उ

उच्च शिक्षण २१८, २१९
उद्योगधंदे १३२

### ए

एकांतवास, जपानचा २६
एमिग्रेशन कायदे १६०, १६१

### ऐ

ऐतिहासिक परंपरा १५, १६, १९, २४, २५

### औ

औद्योगिक प्रगति १२७–१३५
औद्योगिक वाढ १३३, १३४
औद्योगिक शिक्षण २१९

### क

कन्फ्यूशियस ३८
कन्याविक्री ८३
कमोडोर पेरी २३६
कम्यूनिस्ट १२३
करमणुकी ७२
कलानियंत्रण १८६–१८८
काबुकी नाट्यकला ६५
कामगारजीवन ८२, ८३, ११०, १३८, १४४–१४८
कामगार व कारखाने १०९, १११, ११२
कामगार संघटना ११२, ११३
कारखानदारांची वृत्ति १३७, १३८
कारखाने १३५–१५०
किमोनो ७९
कुटुंब संस्था ५९, ८६, ८७

## सूचि


**ख**

ख्रिस्ती धर्म २५, २६, ३८, १९७, २२७, २३१, २३२

**ग**

गुप्त संघ १२१, १२२

ग्रामजीवन ७, १०२, १०३, १०५, १०६

ग्रामधंदे १०५

ग्रामसुधारणा १००–१०८

गृहरचना ६, ४९, ५१, ८७–८९

**च**

चहासमारंभ ५९, ६०

चिनी संस्कृति ३९, ४४, ४८

चीन-जपान लढा १५१ ते १७३

चित्रकला ६४

**ज**

जाझ् ७१

जातिसंस्था ३१, ३२, ९३

जीवनपद्धतीत विविधता २–७

**त**

तरुणांचा धर्म २०७

तिरंदाजी ६०

तंत्रसाधन २३०

**द**

देशप्रीति १७, १७६, १७७

**ध**

धर्म १९२ ते २०८

ध्यानमंदिरें ६१

**न**

नाट्यकला ६५, ७२

नीतिशिक्षण २१४

नो नाट्यकला ६५

नृत्य ६४

नृत्यगृहें ७३

**प**

पाश्चिमात्य संस्कृति ४४, ६७

पुनर्घटना २७–३२

पुनर्विवाह ८५

पुष्परचनाशास्त्र ६३

प्राथमिक शाळा ७

पोलिस १२४, १८३

**ब**

बाह्य स्वरूपदर्शन १–११

बुशिदो १७, ६१, ९४

बौद्ध धर्म १९९–२०६

**भ**

भगवान् बुद्ध ३७

भवितव्य, जपानचें २१, २२, ९९

भाषावैशिष्ट्य ४८, ५५, ६७, ६९

भकंप ७१

भांडवलशाही ९८, ११४, १२६, १४८

## सूचि


### म

मजुरी ११०, १११
मतस्वातंत्र्य १९८
मदिरालयें (कॅफे) ७३
मिशनरी ३८, ३९, १९६, १९७
मेइजी चित्रालय २९
मोगा ७७

### य

युद्धकालीन जीवन १७४–१९०
युरोपियन व्यापारी २३
योरीतोमो स्मृतिकार ९३

### र

राहणी ६, ४९
राजकारण ११६–१२६
राजसत्ता १५–१७, ११९
राज्यक्रांति, शांततेची २७
राज्यघटना ११६–१२१
राष्ट्रीय आचारधर्म १७, १८
राष्ट्रीय वैशिष्टच २१

### ल

लष्करशाही ९७, ९८, १२०, १२१
लष्करी सामर्थ्य ३४
लोकसंख्या १६३, १६४
लोकस्थिति १०, ११, १२, २१, ४२, ४३, ९८, ९९
लोकवर्णन १४, २०, ६२, ९४, ९५, ९६, १८०

### व

वर्गपद्धति ३२, ३३, ९७
वसाहती १०८, १०९
वस्त्रपद्धति (पोषाख) ३, ४, १०, ५०, ५१, ६९
वाङ्मय ३१, १२५
विद्यार्थीजीवन २१६, २१७
विमापद्धति, सांघिक १११
विवाहपद्धति ८४, ८५
वीरसमाधि ७, १६
वैयक्तिक कर्तबगारी ३३
वृत्तपत्रसंस्था १२४, १२५
व्यायाम—खेळ ३४, ३५, ७३, ७४, २११

### श

शहरें २, ३, ५, ६, १८०
शाकाहार आणि मांसाहार ३३
शालागृह २१०, २११
शास्त्रीय संशोधन १२८–१३०, १३९–१४१
शिक्षणपद्धति २०९–२२२
शिंतोधर्म १६, १९७, १९८
शेतकरी १०२, १०३, १६४
शेती १००, १०१, १०३, १०४, १०६, १०७
शोगून २७
श्वेतवर्णीयांचे संबंध ७, २५, २२३, —२३५, २३८, २४१

सूचि


स

सभ्याचार ८, ५३, ५५, ५७, ७५, ८९, ९०

समाजक्रांति ९६, ९७

समाजपद्धति ३६, ३७

समाजवाद ११५

सम्राट मेइजी २८

सामुराई ३२, ९४

सार्वजनिक जीवन ३४

सुगीतो खेडेगांव १०२

सैनिक १७

संगीत ६४, ७१, ७२

संस्कृतिविशेष १५, १६, ५२, ५३, ६५, ६६

स्वभावविशेष ८, ९, १८, २०, ४०, ५७–५८, ६१

स्वस्ताई १३०, १३१.

स्त्रीकामगार ८२, ८३

स्त्रीजीवन ७६–८५, ९०, ९१

स्त्रीपोलिस १८३

स्त्रीशिक्षण ७६, ७७, २१९, २२०

ह

हजार टाके १७४, १७५

हॉलिवुड ७१

हिंदुस्थान व जपान १२, २९, ३७, ४७, ८९, ९०, १३०, २२३, २३५, २४५–२६४



REFBK-0005693

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५६९३


५